# लोकलेखा समिती

## (२०१५-२०१६)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.१, ३.२.१, ३.२.२, ३.२.३ ), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.१) संबंधित, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.२) व सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.३)**

## चोविसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक        ऑगस्ट, २०१७ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
जुलै/ऑगस्ट, २०१७

# लोकलेखा समिती

## (२०१५-२०१६)

### (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.१, ३.२.१, ३.२.२, ३.२.३ ), गृह विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.१) संबंधित, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.२) व सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.३)**

## चोविसावा अहवाल

## लोकलेखा समिती
## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.
(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.
(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.
(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.
(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.
(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.
*(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.
(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.
**(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.
(२४)(अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक १ मे, २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.
(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(४) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.
(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.
(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.
(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

** **श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी उप सभापती, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ चा सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील गृहनिर्माण विभाग (परिच्छेद क्र.३.१, ३.२.१, ३.२.२ व ३.२.३), गृह विभाग (परिच्छेद क्र. ३.३.१), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (परिच्छेद क्र.३.३.२) व सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.३.३) यावर विचार करून लोकलेखा समितीचा चोविसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १३ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रधान सचिव, गृह विभाग, दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच दिनांक ७ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक ११ व २४ जुलै २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई/नागपूर,
दिनांक २४ जुलै २०१७.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

## अनुक्रमणिका


| अनुक्रमांक (१) | विभाग व तपशील (२) | | | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|---|
| | **प्रस्तावना** | ... | ... | (पाच) |
| (१) | **गृहनिर्माण विभाग**<br>(परिच्छेद क्र.३.१, ३.२.१, ३.२.२ व ३.२.३) | ... | ... | १ |
| **(२)** | **गृह विभाग**<br>(परिच्छेद क्र. ३.३.१) | ... | ... | ४६ |
| **(३)** | **वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**<br>(परिच्छेद क्र.३.३.२) | ... | ... | ५३ |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>(परिच्छेद क्र.३.३.३) | ... | ... | ५९ |

## (अ) गृहनिर्माण विभाग

**१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.१ " मुंबई गलिच्छ वस्ती सुधार मंडळाकडून केल्या गेलेल्या गलिच्छवस्ती सुधारणांच्या कामांमधील कमतरता ", परिच्छेद क्र.३.२.१ " महसूलाची हानी ", परिच्छेद क्र.३.२.२ " वसुली योग्य रकमांची वसुली न करणे " व परिच्छेद क्र. ३.२.३ " महसूलाचे नुकसान " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिलेले आहेत.

**१.१ परिच्छेद क्रमांक ३.१.४.१ कामे वाटपातील अनियमितता :-**

वर्ष २०१०-१३ या कालावधीतील कामांच्या विभागणीशी संबंधित करार नोंदवहीची तपासणी केली असता असे आढळून आले की, UEव RC ला दिलेल्या कामांपेक्षा जास्त कामे MSIB ने MSSM ला दिली होती, जे तक्ता १ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता १ MSSM/UE/RC यांच्यामध्ये विभागलेल्या कामांची तुलनात्मक आकडेवारी

| वर्ष | MSIM (टक्के) | UE (टक्के) | RC (टक्के) | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०१०-११ | १४७८ (७१.८२) | ४६७ (२२.६९) | ११३ (५.४९) | २०५८ |
| २०११-१२ | २६१८ (५०.२६) | १६८६ (३२.३७) | ९०५ (१७.३७) | ५२०९ |
| २०१२-१३ | २९३३ (५९.०१) | ११९८ (२४.१०) | ८३९ (१६.८९) | ४९७० |
| **एकूण ...** | ७०२९ (५७.४४) | ३३५१ (२७.३८) | १८५७ (१५.१८) | १२२३७ |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, शासनाच्या निर्देशांना डावलून UE आणि RC च्या तुलनेत MSSM ला जास्त संख्येत कामे दिली गेली होती. खुल्या निविदेद्वारे RC ना द्यावयाच्या ३४ टक्के कामांपैकी प्रत्यक्षात फक्त १५ टक्के कामेच दिली गेली होती. ज्यामुळे १९ टक्के कामांमध्ये स्पर्धात्मक दराचा फायदा घेण्यात आला नाही. तसेच UE ना द्यावयाच्या एकूण कामांपैकी सहा टक्के कामे दिली गेल्याने UE रोजगाराच्या संधीपासून वंचित राहिले.

MSIB शहर विभागाच्या EE नी असे सांगितले (जून, २०१३) की, MPs/MLAs यांनी प्रस्तावित केलेली तातडीची कामे UE आणि MSSM ना देण्यात आली होती. इतर दोन विभागांनी असे सांगितले (जून, २०१३) की, पाच वर्षामध्ये प्राप्त झालेल्या/प्राप्त व्हावयाच्या प्रशासकीय मंजुरीच्या संचयी प्रमाणात कामांची विभागणी करणे गरजेचे आहे आणि जर त्यात तफावत आढळली तर ती नंतरच्या कामामध्ये समायोजित करण्यात यावी.

ही उत्तरे मान्य करता येत नाहीत कारण शासन निर्णयात विहीत केलेल्या प्रमाणात कामांची विभागणी करावयाची होती, जे केले गेले नव्हते.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

भविष्यात याबाबत काळजी घेण्यात येईल असे सादर केले, त्यामुळे शेरा निरंक.

**१.२ यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

भविष्यात याबाबत काळजी घेण्यात येईल असे सादर केले आहे. यावर महालेखाकार (A.G.) यांचे कडून शेरा निरंक आहे.

**यावर शासनाचे अभिप्राय :**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्यात यावेत.

**१.३ परिच्छेद क्रमांक ३.१.४.२ " कार्यदेश दिल्यानंतर देखील कामे सुरू न होणे " :**

MP LAD च्या मागदर्शक सूचनांनुसार, कार्यादेश जारी केल्यापासून एक वर्षाच्या आत काम पूर्ण होणे अपेक्षित असते. परंतु असे निदर्शनास आले की, रु.१.७१ कोटी खर्चासाठी मंजुरी मिळालेल्या आणि ऑगस्ट, २०११ ते मे, २०१२ मध्ये दिल्या गेलेल्या २९ MP LAD कामांपैकी, जानेवारी, २०१४ पर्यंत फक्त नऊ कामे पूर्ण झाली होती आणि उर्वरित २० कामांपैकी १३ कामांचा प्रारंभच करण्यात आला नव्हता तसेच सात कामे अपूर्ण राहिली होती (जानेवारी, २०१४). २० कामांमध्ये २१ ते ३० महिन्यांचा विलंब झाला होता.

पश्चिम व शहर विभागाच्या EE नी असे नमूद केले (जून, २०१३) की, ज्या जमिनीवर प्रस्तावित काम करायचे होते त्या जमिनीच्या मालकाकडून ना हरकत प्रमाणपत्र (NOC) प्राप्त न झाल्याने कामास सुरुवात करता येऊ शकली नाही.

अशाप्रकारे संबधित जमीन मालकांकडून आवश्यक NOC प्राप्त न करत कामे दिली गेल्याने कामे सुरू करता आली नाहीत/ती पूर्ण होण्यास विलंब झाला.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

१. ७ अपूर्ण कामांची व २० कामे जी सुरू झालेली नाहीत. त्यांची सद्यस्थिती या बाबत लोकलेखासमितीकडे उत्तरे सादर करावीत.

२. सन २०१३-१४ ते २०१५-१६ या काळातील खासदार निधीमधून झालेल्या, सुरू असलेल्या अर्धवट असलेल्या कामांबाबत लोकलेखा समितीकडे उत्तरे सादर करावीत.

**१.४ यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

प्रस्तावित कामासाठी जमीन मालकांकडून " ना हरकत प्रमाणपत्र " प्राप्त न झाल्यामुळे सर्व २७ कामे सुरू करता आली नाहीत.

सन २०१३-१४ ते २०१५-१६ मधील खासदार निधीतून झालेल्या कांमाची स्थिती खालीलप्रमाणे आहेत :—

| वित्तीय वर्ष संख्या | मंजूर कामांची संख्या | कामे पूर्ण झालेल्याची संख्या | कामे अर्धवट असल्याची संख्या | कामे सुरू न झालेल्याची संख्या |
|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ५९१ | ५२७ | ८ | ५६ |
| २०१४-१५ | ४४५ | ३१५ | ५६ | ७४ |
| २०१५-१६ | ४६९ | १८१ | १७७ | १११ |

**यावर शासनाचे अभिप्राय :**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्यात यावेत.

**१.५ परिच्छेद क्रमांक ३.१.४.३ अग्राह्य कामे केल्याबाबत :**

MMRDA ने रु.१५० कोटी रकमेस मंजुरी दिली (डिसेंबर २०११) ज्यापैकी MSIB ने गलिच्छ वस्त्यामध्ये सार्वजनिक शौचालये, जल जोडण्या, नवीन गटारे, बालवाड्या, शाळेचे वर्ग आणि कल्याण केंद्रे बांधणे अशा सहा प्रवर्गातील १,३८५ कामे करण्यासाठी रु.१४१.७८ कोटी वाटप केले. डिसेंबर, २०१३ पर्यंत रु.१०८.५७ कोटी खर्चाची १,१९८ कामे करण्यात आली.

पश्चिम विभागातील अभिलेख्याच्या तपासणीतून असे निदर्शनास आले की, वर्ष २०१२-१३ मध्ये एकूण १,३८५ कामांपैकी व्यायामशाळा, खुली आसराकेंद्रे आणि बोअर वेल बांधणे यासारख्या रु.२.६० कोटी खर्चाच्या ३९ कामांना MSIB ने मंजुरी दिली, जी कामे MMRDA ने निर्धारित केलेल्या प्रवर्गापैकी एकाही प्रवर्गात मोडत नव्हती. लेखापरिक्षकांनी MSIB च्या अधिकाऱ्यांसह संयुक्तपणे दिलेल्या स्थळ भेटींमधून असे निदर्शनास आले (मे, २०१३) की, गलिच्छ वस्त्या नसतांनाही सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आवारात बोअर वेल बांधण्यात आल्या होत्या.

पश्चिम विभागाच्या EE नी असे सांगितले (जून, २०१३) की, MPs/MLAs ने सुचविल्याप्रमाणे कामे करण्यात आली होती. EE नी पुढे असेही स्पष्टीकरण दिले की, व्यायामशाळा आणि खुली आसरा केंद्रे ही बालवाडया, समाज कल्याण केंद्रे किंवा शाळांच्या वर्गासारखीच होती आणि बोअर वेल बांधणे म्हणजे जल जोडण्या देण्याप्रमाणेच होते.

हे उत्तर मान्य करता येत नाही कारण ज्या प्रवर्गासाठी MMRDA ने निधी उपलब्ध करून दिला होता त्यामध्ये ही मंजूर/कार्यान्वीत केलेली कामे मोडत नव्हती. तसेच, बोअर वेल्स या गलिच्छ वस्त्यांमध्ये न बांधता सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आवारात बांधण्यात आल्या होत्या.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

दि. २८ डिसेंबर २०११ रोजीच्या पत्राची प्रत यादीसह, स्पष्टीकरणासह सादर न केल्याबाबत.

**१.६ यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

दि. २८ डिसेंबर २०११ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. (विवरण क्र. १)

**यावर शासनाचे अभिप्राय :**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्यात यावेत.

**१.७ परिच्छेद क्रमांक ३.१.४.४ कामे करण्यासाठी योग्य नियोजन नसणेबाबत :**

रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील वेगवेगळ्या गलिच्छ वस्त्यांमध्ये ५१० सीटेड टॉयलेट फ्लॉक बांधण्याचे काम MSIB ने रु.२.९४ कोटी किमतीस मे. कम्प्यूटर इंजिनिअर्स यांच्याकडे सोपविले (जून, २०१०) होते. जे जून, २०११ पर्यंत पूर्ण करायचे होते.

पूर्व विभागाच्या EE कडील अभिलेख्यांच्या तपासणीमधून असे उघडकीस आले की, वारंवार मुदतवाढ देऊनही कंत्राटदाराने ऑक्टोबर, २०१२ पर्यंत ५१० पैकी फक्त ३१५ सीटेड टॉयलेट ब्लॉक्स बांधली होती. उर्वरित १९५ सीटेड ब्लॉक्स बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याचे कारण देऊन फक्त ३१५ सीटेड टॉयलेट ब्लॉक्स बांधण्याचे निश्चित करण्यता आले (ऑक्टोबर, २०१२) कंत्राटदाराला अंतिम देयकापोटी रु.२.४५ कोटी देण्यात आले (जानेवारी, २०१३).

पूर्व विभागाच्या EE नी असे सांगितले (जून, २०१३) की, उर्वरित १९५ सीटेड टॉयलेट ब्लॉक्स बांधण्यासाठी निवड करण्यात आलेल्या जागांवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत होती आणि गलिच्छ वस्त्यांमधील जास्त संख्येत असलेल्या लोकसंख्येमुळे उर्वरित सीटेड टॉयलेट ब्लॉक्स बांधण्याचे काम पूर्ण करता येऊ शकले नाही.

हे उत्तर मान्य करता येत नाही, कारण पुढील लेखापरीक्षणातून असे आढळून आले की, MSIB ने त्याच वस्तीमध्ये ३८ सीटेड टॉयलेट ब्लॉक्स बांधण्याचे रु. ५२.९० लाखांचे काम पाच कंत्राटदारांना दिले होते (मे, २०१२) जे एप्रिल, २०१३ पर्यंत पूर्ण करायचे होते. तसेच, मंडळाने जून, २०१० मध्ये दिलेल्या ५१० सीटेड टॉयलेट ब्लॉक्स कामाबरोबर हे ३८ सीटेड टॉयलेट ब्लॉक्स बांधण्याचे नवीन काम संलग्न करावयास हवे होते आणि त्याद्वारे रु.२३.३९ लाखाची बचत झाली असती.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

ऑक्टोबर, २०१२ मध्ये ५१० शौचकुपांच्या बांधकामाच्या कामाची व्याप्ती कमी करून ती ३१५ वर समिती करण्यात आली. परंतु त्याच भागात ३८ शौचकुपांचे बांधकामाचे काम माहे मे, २०१२ मध्ये रु.२३.३९ लक्ष एवढ्या जास्त किमतीत देण्यात आले जे टाळता येण्यासारखे होते.

**१.८ यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

सन २०१० मध्ये मंजुर केलेल्या शौचालयांमध्ये ५१० कामे व सन २०१२ मध्ये मंजुर केलेली ३८ कामे ही रमाबाई आंबेडकर नगर व कामराज नगर या भागातील असली तरी ज्या चाळीमध्ये शौचालयांचे काम करावयाचे होते ते वेगवेगळे आहे व वेगवेगळ्या चाळी असल्यामुळे आणि दोन वर्षांनंतर ३८ शौचालयासंदर्भात मागणी आल्यामुळे व त्यासाठी वेगळा निधी असल्याने संबंधित रु.२३,३९,००० किंमतीची बचत झाली नसती.

उपरोक्त बाबींवरून असे निदर्शनास येते की, ५१० शौचकुपांच्या व ३८ शौचकुपांच्या कामात दोन वर्षांचे अंतर आहे, तसेच ही अंदाजपत्रके वेगवेगळ्या दरसूचीवर आधारित आहेत. त्यामुळे यांच्या कामाच्या किंमती मधील फरकात बदल आहे.

उपरोक्त दोन्ही कामे ही वेगवेगळ्या निधी अंतर्गत जसे की, ५१० शौचकुपांचे काम महाराष्ट्र शासन तसेच एम.एम.आर.डी.ए. कडून विशेष सहाय्यक अनुदानाअंतर्गत तथापि, ३८ शौचकुपांचे काम निर्मल भारत अभियानाअंतर्गत करण्यात आले आहे. तसेच दोन्ही कामे वेगवेगळ्या ठिकाणी व वेगवेगळ्या ठेकेदारांमार्फत करण्यात आली आहेत.

**यावर शासनाचे अभिप्राय :**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्यात यावेत.

**१.९ परिच्छेद क्रमांक ३.१.४.५ दलित वस्तीची शहानिशा न करता अनियमित कामे केल्याबाबत :**

मुंबईमधील दलित वस्त्यांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाकडून विशेष घटक योजनेअंतर्गत वर्ष २०१०-१३ मध्ये MSIB ला रु. २०१०-१३ मध्ये MSIB ला रु.२४९.८५ कोटी रक्कम प्राप्त झाली. दलित वस्त्यांमधील अनुसूचित जाती/नव बौद्धांच्या संख्येच्या आधारावर त्यांचा तुलनात्मक प्राधान्यक्रम निश्चित करून या योजनेखाली दलित वस्त्यांमध्ये कामे करावयाची होती. MSIB ने जिल्हाधिकारी व त्यांच्या स्वतःच्या विभागामार्फत एकूण दलित वस्त्या शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकत नाही. दलित वस्त्या शोधण्यासाठी MSIB च्या मुख्य अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण घेण्याविषयीही निर्देशित केले होते. (ऑक्टोबर, २०११)

लेखापरीक्षणात असे उघडकीस आले की, वर्ष २०१०-१२ मध्ये स्थानिक MLA नी प्रस्तावित केलेल्या क्षेत्रात रु. १६६.२० कोटी खर्चाच्या २,१११ कामांना MSIB ने मंजुरी दिली आणि दलित वस्त्यांचा शोध न घेता २०१२-१३ दरम्यान १,८९० कामे पूर्ण केली. अशाप्रकारे फक्त दलित वस्त्यांमध्ये कामे केली गेली अथवा नाही याची लेखापरिक्षकांना पडताळणी करता आली नाही.

MSIB च्या उप मुख्य अभियंता यांनी असे सांगितले (जुलै, २०१३) की, डिसेंबर, २०११ रोजी घेतल्या गेलेल्या DPDC च्या बैठकीमध्ये सन्माननीय ग्रामीण विकास मंत्री आणि मुंबई शहर जिल्ह्याचे पालक मंत्री यांनी सन्माननीय MLAs नी प्रस्तावित केलेली कामे विचारात घ्यावी असे निर्देश दिले आणि त्यासाठी त्वरीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या.

MSIB ची ही कृती योग्य नव्हती कारण दलित वस्त्या शोधण्यासाठी योग्य प्रकारे सर्वेक्षण करणे गरजेचे होते आणि योजने अंतर्गत निर्धारित लाभार्थ्यांपर्यंत याचा लाभ पोहोचेल याची खात्री करण्यासाठी अशा सर्वेक्षणाच्या आधारावर कामाचे कार्यान्वयन करावयास हवे होते.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

मा.आमदार महोदयांनी सुचविल्यानुसार कामे करण्यात येतात, असे उप अभियंता यांच्या तर्फे जुलै, २०१३ मध्ये सांगण्यात आले. तथापि सदर स्पष्टीकरण लक्षात घेता जास्तीतजास्त पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा लाभधारकांना मिळेल याची शहानिशा करूनच प्रभागात कामे प्रस्तावित केली जातात. हे स्पष्टीकरण मान्य करता येणार नाही.

**१.१० यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालयाने दलित वस्त्या शोधण्याचा प्रयत्न केला होता, परंतु कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. तसेच, मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी देखील सर्वेक्षण करण्याचे निर्देशित केले होते, ही बाब महालेखापाल (A.G.) यांच्या अहवालात आली आहे.

मुंबईमध्ये ग्रामीण भागाप्रमाणे अनुसूचित जाती जमातीच्या वेगळ्या अशा दलित वस्त्या आढळून येत नाहीत. गलिच्छ वस्त्यांमध्ये अनुसूचित जातीधर्माचे लोक राहतात. तरी उपरोक्त निधीची अनुसूचित जातीच्या वस्त्या पाहूनच त्यामध्ये कामे घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे केवळ दलितांची वस्ती आहे अशी बाब आढळून येत नसल्यामुळे गलिच्छ वस्त्यांमध्ये केलेली कामे ही दलित वस्त्यांमध्ये केलेली कामे मानणे योग्य ठरेल, असे असेल तरी बुद्ध नगर, इर्ला ब्रीज, अंधेरी, भीम नगर, गोरेगांव, भीम नगर, पवई, महात्मा फुले नगर, संभाजी चौक, बुद्धविहार, गोराई, बोरीवली या ठिकाणी देखील उपरोक्त कामे करण्यात आली आहेत.

**यावर शासनाचे अभिप्राय :**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्यात यावेत.

**१.११ परिच्छेद क्रमांक ३.१.४.६ (अंतर्गत नियंत्रण) मालाच्या चाचणीतील अंतर्गत अपूरेपणाबाबत :**

कंत्राटदाराबरोबर केलेल्या करारांमधील कलम ५२ नुसार एखाद्या घटकाच्या विकास किंवा संपूर्ण इमारतीच्या गुणवत्ता/सक्षमता आणि निर्दोषत्ता यांची चाचणी घेण्यासाठी MSIB ने विहित केलेल्या सर्व चाचण्या कंत्राटदारांनी स्वखर्चाने MHADA च्या माल चाचणी प्रयोगशाळेत (MTL) करून घ्यावेत. MHADA च्या मुख्य अभियंता I यांनी एका परिपत्रकाद्वारे (एप्रिल, २०११) संबंधित अभियंता/CAO यांना कामे/रकमांची प्रदाने यांना प्रमाणित करण्यापूर्वी चाचणी प्रमाणपत्राच्या वैधतेची खात्री करण्याविषयी आणि जर शंका/तफावत असली तर MHADA च्या MTL शी संपर्क साधून चाचणी प्रमाणपत्रांची वैधता तपासण्याविषयी सूचना दिल्या.

चाचणी तपासणी केलेल्या १२७० पैकी ४० प्रकरणांमध्ये असे निदर्शनास आले की, सादर केलेल्या माल चाचणी प्रमाणपत्रांच्या आधारावर कंत्राटदारांना रु.४.३१ कोटिच्या अंतिम देयकांचे प्रदान करण्यात आले होते. पंरतु, लेखापरिक्षकांनी MTL बरोबर उलट तपासणी केली असता MTL ने एकही चाचणी प्रमाणपत्र जारी केले नसल्याचे उघडकीस आले. तसेच चाचणी तपासणी केलेल्या इतर ३९ प्रकरणांमध्ये माल चाचणी प्रमाणपत्रे अभिलेख्यांमध्ये उपलब्ध नसतानाही विभागाने रु. ४.२६ काटींचे अंतिम प्रदान केले. मालाची चाचणी केली नसल्यामुळे, कामे करताना कंत्राटदाराकडून कमी प्रतीचा माल वापरला जाण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. मंडळामध्ये अंतर्गत नियंत्रण कमकुवत असल्याचे हे निदर्शक आहे.

EEs नी असे नमूद केले (जून, २०१३) की कंत्राटदाराकडून चाचणी अहवाल मागवण्यात आले आहेत आणि कंत्राटदाराकडून चाचणी शुल्काच्या प्रदानाच्या पावत्या प्राप्त झाल्यावर त्या विभागाला सादर करण्यात येतील. तसेच, जी प्रमाणपत्रे खोटी असल्याविषयी शंका येईल त्यांची MHADA च्या VQC कक्षाकडून पडताळणी केली जाईल.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

१. ४० बनावट चाचणी प्रमाणपत्राबाबत काय कार्यवाही करण्यात आली.

२. ३९ प्रकरणांमधील ठेकेदारांना मालाचे चाचणी (Test) प्रमाणपत्र सादर न करता ही देयक अदा करण्यात आल्याबाबतची कारणे लोकलेखा समितीला देण्यात यावीत. सदर ३९ प्रकरणापैकी किती प्रकरणांमध्ये अजूनही प्रमाणपत्र उपलब्ध नाही, ते ही लोकलेखा समितीस सादर करण्यात यावे.

**१.१२ यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

४० बनावट चाचणी प्रमाणपत्राबाबत तसेच ३९ प्रकरणांमधील कामाबाबत नोटीस देऊन खुलासा मागविणे व नंतर दंडात्मक कार्यवाही अशी आवश्यक कार्यवाही करण्यात आल्याबाबतची कारणे लोकलेखा समितीला देण्यात यावीत. सदर ३९ प्रकरणापैकी किती प्रकरणांमध्ये अजूनही प्रमाणपत्र उपलब्ध नाही, ते ही लोकलेखा समितीस सादर करण्यात यावे.

**विषय : "दक्षता व गुणनियंत्रण कक्षाने उपस्थित केलेल्या निरिक्षण अहवालाची पुर्तता न केल्याबाबत" :**

कामांचे कार्यान्वयन निर्धारित वैशिष्टयांसह आणि आरेखनानुसार होत असल्याची खात्री करण्यासाठी कामे सुरू असताना MHADA च्या VQC कक्षाकडून तपासणी केली जाते. तपासणी दरम्यान VQC कक्षाने काढलेली अभिक्षणे ही अनुपालनासाठी/पुर्ततेसाठी तसेच सदोष कामांना सुधारण्यासाठी अभिक्षण ज्ञापनाच्या रुपात संबंधित विभागाना पाठविली जातात. तसेच कामाचा दर्जा सुधारण्यासाठी, अंतिम देयक पारित करण्यापूर्वी, VQC कक्षाने जारी केलेले कोणतेही OM प्रलंबित नसल्याचे संबंधित EE नी प्रमाणीत करावे अशाप्रकारे MHADA च्या मुख्य अभियंत्यांनी सूचना दिल्या होत्या. (फेब्रुवारी, २००४)

लेखापरिक्षणात असे आढळून आले की, चाचणी तपासणी केलेल्या १२७० प्रकरणांपैकी २७ प्रकरणांमध्ये ३२ OM प्रलंबित असतानाही EE नी कोणतेही OM प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र दिले होते व त्या आधारावर कंत्राटदाराची रु.२.६० कोटीची अंतिम देयके पारित करण्यात आली होती.

पश्चिम विभागाच्या EE नी असे सांगितले (जून, २०१३) की OMS ची पुर्तता करण्यात आली होती, परंतु VQC कक्षाकडून पुर्तता अहवाल प्राप्त झाला नव्हता.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

जून, २०१३ मध्ये ओ.एम.ची पूर्तता करण्यात आली होती.

**यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

सदरबाबतीत महालेखापाल (A.G.) कडून निरंक अभिप्राय आहेत.

**विषय : " अंतर्गत लेखापरिखण व निरिक्षणबाबत " :**

एप्रिल, २०११ मध्ये MHADA ने प्रस्थापित केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षण शाखेने ती अस्तित्वात आल्यापासून MSIB चे किंवा त्यांच्या एकाही कार्यालयाचे अंतर्गत लेखापरिक्षण केले नव्हते.

MHADA च्या LAW ने एकदाही अंतर्गत लेखापरीक्षण केले नसल्याचे CAO नी मान्य केले. (जून, २०१३) त्याचवेळी उपमुख्य अभियंत्यांनी मात्र तपासण्या केल्या असल्याचे सांगितले. परंतु तपासण्या घेतल्या असल्याचे सिद्ध करण्यासाठी उपमुख्य अभियंत्यांनी कोणताही पुरावा सादर केला नाही.

**महालेखापाल यांचे लेखापरीक्षणातील शेरे :**

करण्यात येणाऱ्या अंतर्गत लेखापरिक्षण व निरिक्षणाचा कालावधी लोकलेखा समितीस सादर करण्यात यावा.

**यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :**

अंतर्गत लेखापरिक्षण संदर्भात लेखापरिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून दरवर्षी अंतर्गत लेखापरिक्षण केले जाईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. याबाबत आवश्यक पदे मंजूर करून कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**यावर शासनाचे अभिप्राय :**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्यात यावेत.

## (ब) गृहनिर्माण विभाग

### २ परिच्छेद क्र. ३.२.१ महसुलाची हानी (राजयोग सोसायटी) :

**२.१** गृहनिर्माण संस्थेला गाळयांचे प्रत्यक्ष वाटप झाल्याच्या तारखेपर्यंतचे व्याज वसूल न करता महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाने २२५ गाळयाचे वाटप केले. परिणामी, ४.३२ कोटी महसुलाची हानी झाली. तसेच, गृहनिर्माण संस्थेकडून गाळयांची किंमत तसेच व्याजाची एकूण रु.१४.३१ कोटी एवढी थकीत रक्कमही वसूल करण्यात आली नव्हती.

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाने बांधलेल्या गाळयांच्या विक्रीचे नियमन महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (मालत्तेचे व्यवस्थापन, गाळयांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम, १९८१ द्वारे केले जाते. MHADA च्या विनियम १३ (२) नुसार, विशिष्ट प्रवर्ग किंवा प्रवर्गांसाठी गृहनिर्माणाच्या योजना MHADA ने महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या (विभाग) मान्यतेने तयार करून राबविले पाहिजे.

मुंबई मंडळातील मालमत्ता व्यवस्थापकांच्या अभिलेख्यांच्या तपासणीतून असे आढळून आले की, वर्सोवा, मुंबई येथील बांधलेल्या २२५ गाळयांचा ताबा मिळण्यासाठी राजयोग सहकारी गृहनिर्माण संस्थेने (संस्था) विभागाकडे विचारणा केली होती. (डिसेंबर, २००८) त्यानुसार संस्थेला २२५ गाळे (प्रत्येकी ९६५ चौ.मी. फूट बांधिव क्षेत्रफळाचे) उपलब्ध करून देण्याविषयी MHADA ला विभागाने निर्देश दिले (ऑगस्ट, २००९) ३१ मार्च, २००९ पर्यंतच्या कालावधीचे व्याज संम्मिलीत करून नोव्हेंबर, २००८ मध्ये MHADA ने परिगणीत केलेली प्रती चौ.फुट विक्री किमत रु.४,३६१ प्रती चौ.फुट होती, जी पूर्णांकात रु.४,४०० प्रती चौ.फुट एवढी झाली आणि त्याच्या आधारे MHADA ने संस्थेला तात्पुरते प्रस्ताव पत्र जारी करून (ऑगस्ट, २००९) प्रत्येक गाळयाची विक्री किंमत रु.४२.४६ लाख असल्याचे कळविले. तात्पुरत्या प्रस्ताव पत्रानुसार एकूण किंमतीच्या (रु.९५.५४ कोटी) २५ टक्के रक्कम ही तात्पुरते प्रस्ताव पत्र जारी केलेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत आणि उर्वरित ७५ टक्के ९० दिवसांच्या आत भरणे आवश्यक होते. १३.५ टक्के प्रति वर्ष या दराने व्याज भरल्यास रक्कम प्रदानाची नियत तिथी ४५ दिवसांपर्यंत पुढे वाढविली जाऊ शकत होती आणि जर त्या तारखेपर्यंत रक्कमेचे प्रदान झाले नाही तर सदर वाटप रद्द करावयाचे होते व आधी भरलेल्या रक्कमेतून गाळयाच्या एकूण किंमतीच्या एक टक्के रक्कम वजा करून उर्वरित रक्कम परत करायची होती.

**लेखापरीक्षणात खालील बाबी आढळल्या :**

ऑगस्ट, २००९ मध्ये गाळयांचे प्रत्यक्ष वाटप होऊनही या महिन्यापर्यंतचे व्याज समाविष्ट न करता फक्त मार्च, २००९ पर्यंतचे व्याज विचारात घेऊन नोव्हेंबर, २००८ मध्ये रु.४,४०० प्रति चौ. फूट एवढी विक्री किंमत प्रगणित करण्यात आली. प्रत्यक्ष वाटपाच्या तारखेपर्यंतचे व्याज समाविष्ट केल्यास येणारी विक्री किंमत रु.४,५९९ प्रति चौ. फूट होती. अशाप्रकारे विक्री किंमत चुकीच्या पद्धतीने निश्‍चित केल्यामुळे २२५ गाळयांच्या वाटपात रु.४.३२ कोटी महसूलाची हानी झाली.

ऑगस्ट, २००९ ते जून, २०११ दरम्यान संस्थेने एकूण रु.९५.५४ कोटी पैकी फक्त रु.८९.७७ कोटी भरले. संस्था जरी तिचे दायित्व पूर्ण करू शकली नाही, तरी MHADA ने तात्पुरत्या प्रस्ताव पत्रातील अटी व शर्तीनूसार वाटप रद्द केले नाही किंवा गाळयाच्या किमतीच्या एक टक्का रक्कम वजा देखील केली नाही. सप्टेंबर, २०१३ पर्यंतच्या कालावधीसाठी विलंबित प्रदानावरील रु.८.५४ कोटी व्याजासह गाळ्याच्या किंमतीपोटी संस्थेकडून रु.५.७७ कोटी देय रक्कम प्रलंबित होती.

अशाप्रकारे, प्रत्यक्ष वाटपाच्या तारखेपर्यंत व्याजाची आकारणी न केल्यामुळे गाळयाच्या विक्री किंमतीची चूकीची निश्‍चिती करण्यात आली, परिणामी, रु.४.३२ कोटी महसूलाची हानी झाली आणि व्याजासह रु.१४.३१ कोटी प्रलंबित देय रकमेची वसूली झाली नाही.

जून, २०१३ मध्ये हे प्रकरण शासनाकडे निर्दीष्ट केले गेले, जानेवारी, २०१४ पर्यंत त्यांचे उत्तर प्राप्त झाले नव्हते.

**महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :**

१. माहे मार्च, २००९ पर्यंतच्या व्याजासहित परिगणना करून विक्री किंमत रु. ४,३६१ प्रति चौ. फू. काढण्यात आली. तात्पुरते देकार पत्र देण्यापर्यंतची व्याजासहित परिगणना करून सदनिकेची विक्री किंमत प्रति. चौ. फू. किती होईल ?

**ज्ञापन :**

**२.२ महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

**म्हाडाचे अभिप्राय :**

माहे मार्च, २००९ मध्ये मूळ विक्री किंमत प्रति चौरस फूट रु.४,३६१/- निश्‍चित करण्यात आलेली होती. तथापि, सुधारित विक्री किंमत ही सभासदांना देण्यात आलेल्या देकारपत्राच्या दिनांकानुसार व्याजासहित परिगणना केलेली आहे. मात्र काही देकारपत्रे वेगवेगळ्या तारखेस दिले असल्यामुळे सदनिकांची विक्री किंमत भिन्न आहे.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

म्हाडाचे अभिप्राय स्विकारण्याची विनंती आहे.

२. संस्थेकडून वसूल करण्यायोग्य एकूण रक्कम (मूळ रक्कम+ व्याज) याबाबतची सद्य:स्थिती लोकलेखा समितीस सादर करावी.

**ज्ञापन :**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

**म्हाडाचे अभिप्राय :**

राजयोग सह गृह संस्थेकडून विलंबावरील व्याज व विक्री किंमतीमधील फरकाची रक्कम व वसुलीची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :—

| तपशील | संस्थेकडून एकूण वसुलीयोग्य रक्कम (सुधारित विक्री किंमतीनुसार) | संस्थेकडून आजपर्यंत वसूल करण्यात आलेली रक्कम | संस्थेकडील वसुली बाकी असलेली रक्कम |
|---|---|---|---|
| विक्री किंमतीमधील फरक | ६,२३,६९,९५१/- | २,२१,२९,०१४/- | ४,०२,४०,९३७/- |
| व्याज | ३,९९,२८,७४७/- | १,८३,५९,४६४/- | २,१५,६९,२८३/- |
| एकूण | १०,२२,९८,६९८/- | ४,०४,८८,४७८/- | ६,१८,१०,२२०/- |

३. संस्थेकडे बाकी असलेल्या रक्कमेबाबत नोव्हेंबर, २०१२ नंतर नोटिस न दिल्याच्या कारणांबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

**म्हाडाचे अभिप्राय :**

सदरहू सदनिकेची परिगणीत केलेली सुधारित विक्री किंमत फेब्रुवारी, २०१६ मध्ये प्राप्त झाल्यानंतर राजयोग संस्थेतील एकूण ५६ सभासदांना सदनिकेच्या नोव्हेंबर, २०१२ नंतरच्या किंमतच्या फरकाची रक्कम व इतर थकबाकी भरण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

४. नोव्हेंबर, २०१२ मध्ये अंतिम स्मरणपत्र संस्थेस पाठविल्यानंतर संस्थेने अदा केलेल्या रक्कमेबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

**म्हाडाचे अभिप्राय :**

नोव्हेंबर, २०१२ पासून राजयोग संस्थेकडून आजमितीपर्यंत सुधारित विक्री किंमतीतील फरकाची रक्कम व विलंब व्याजासहित एकूण रु.४,०४,८८,४७८/- वसुल करण्यात आलेली आहे.

५. आजमितीपर्यंत संस्थेकडे ताब्यात दिलेली सदनिकांची संख्या आणि पूर्ण रक्कमेची वसुली न करता संस्थेकडे सदनिकांचा ताबा देण्याची कारणे याबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

**म्हाडाचे अभिप्राय :**

राजयोग संस्थेस आजमितीस २०५ सदनिकांचा ताबा देण्यात आलेला असून २०३ सभासदांना सुधारित विक्री किंमतीच्या फरकाची रक्कम व विलंब आकार वसूल न करता पूर्वीच ताबा देण्यात आलेला आहे. यापैकी ४० सभासदांनी फरकाची पूर्ण रक्कम अदा केलेली असून ०२ सभासद यांनी सदनिकेपोटीची सुधारित विक्री किंमतीसह पूर्ण रकमेचा भरणा केलेला आहे. उर्वरित सभासदांकडून फरकाची रक्कम वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

## (क) गृहनिर्माण विभाग

### ३ परिच्छेद क्र. ३.२.२ वसुली योग्य रक्कमांची वसुली न होणे :

**३.१** बळकट अंतर्गत नियंत्रणाच्या अभावी महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणांस मीरा सहकारी गृहनिर्माण संस्था व रायगड सैनिकी शाळेकडून देय असलेल्या रु.३.४८ कोटी रकमेची वसुली झाली नाही. तसेच रु.५.०४ कोटी व्याजाचीही हानी झाली.

एखाद्या संघटनेच्या संपत्तीचे रक्षण करण्यासाठी व तिला देय असणाऱ्या रक्कमेची वसुली निर्धारित वेळेत होईल याची खात्री करण्यासाठी संघटनेची सर्व कार्ये प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने होत असल्याची पर्याप्त खात्री देण्यासाठी प्रस्थापित केलेली अंतर्गत नियंत्रण व्यवस्था ही त्या संघटनेच्या व्यवस्थापन प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग असते. MHADA अधिनियम, १९७६ मधील तरतुदींनुसार संपूर्ण राज्यात गृहनिर्माण, जमिनींचा विकास, गाळे अथवा भूखंडाचे वाटप इत्यादी कामे करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) जबाबदार असते. खाली सविस्तरपणे दिलेल्या दोन प्रकरणामध्ये बळकट अंतर्गत नियंत्रणाचा अभाव असल्यामुळे ओशिवरा, जोगेश्वरी येथील मीरा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि रायगड सैनिकी शाळा, अंधेरी यांना भाडेपट्टीवर दिलेल्या जमिनीच्या संदर्भात त्यांच्याकडून देय असलेल्या रक्कमेची वसूली करण्यात MHADA ला अपयश आले.

**प्रकरण I : (मीरा सहकारी. गृहनिर्माण संस्था)**

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (जमिनींचे वाटप) विनियम, १९८२ च्या विनियम १६ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने ओशिवरा, जोगेश्वरी (पश्चिम) येथील ६,९६१ चौ.मी. क्षेत्रफळाची जमिन मीरा सहकारी गृहनिर्माण संस्थेला (संस्था) दिली (सप्टेंबर २०११), MHADA च्या नियंत्रणाखालील मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाच्या (मुंबई मंडळ) मुख्य अधिकाऱ्यांने संस्थेला जमिनीच्या भाडेपट्टी अधिमूल्यापोटी रु.६.७१ कोटी भरण्याचे कळविले (२० जून २००२) आणि ३० वर्षे एवढ्या भाडेपट्टीच्या कालावधीमध्ये देय असलेल्या भाडेपट्टी भाड्याची रक्कम सम्मिलीत (Capitalize) केली. तसेच, संस्थेला असेही कळविण्यात आले की, सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत जर संस्था रक्कम भरु शकली नाही तर ती भरण्यासाठी अतिरिक्त तीन महिन्यांचा कालावधी देण्यात येईल आणि जर त्याही कालावधीत रक्कम भरली नाही तर संपूर्ण रक्कम भरेपर्यंत प्रतिवर्ष १३.५ टक्के चक्रवाढ दराने व्याज आकारले जाईल. मुंबई मंडळाने संस्थेस नंतर असेही कळविले (२८ जून २००२) की, सदर भूखंड महापालिकेच्या किरकोळ मंडईसाठी राखीव ठेवण्यात आलेला होता आणि संस्थेने भूखंडाच्या ४० टक्के क्षेत्रात महापालिका मंडई बांधावी व ती बृहन्मुंबई महापालिकेस (MCGM) मोफत हस्तांतरीत करावी. त्यानुसार, संस्थेने स्वखर्चाने बांधावयाच्या महापालिका मंडईवरील खर्च विचारात घेऊन संस्थेकडून देय असलेली रक्कम कमी करून ती रु.३.२२ कोटी निर्धारित करण्यात आली. महापालिका किरकोळ मंडई बांधण्यासाठी संस्थेला साधारणतः रु.१३,००० प्रती चौ.मी. खर्च येईल असा MHADA चा अंदाज होता. (२८ जून २००२) तात्पुरतया स्वरुपात गृहीत धरलेल्या बांधकामाच्या खर्चात जर काही कपात झाली तर भाडेपट्टी अधिमुल्यात होणाऱ्या फरकाची रक्कम MHADA ला देण्यात येईल अशा आशयाचे एक सहमतीपत्र सादर करण्याचेही संस्थेला निर्देश देण्यात आले होते. संस्थेने रु.३.२२ कोटी भरले आणि २९ जून २००२ रोजी भाडेपट्टी करारपत्र कार्यान्वित केले.

MHADA ने महापालिका मंडईच्या बांधकामाची सुधारित किंमत रु.८,६०८ प्रती चौ.मी. निश्चित केली (नोव्हेंबर २००३). त्यानुसार, संस्थेकडून MHADA ला रु.४.३२ कोटी एवढी सुधारित रक्कम देय असल्याचे सुचित केले गेले (मार्च २००४) आणि असे सुचनापत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत रु.१.१० कोटी एवढी फरकाची रक्कम भरण्यास संस्थेला सांगितले गेले व असे न केल्यास, प्रतिवर्ष १३.५ टक्के दराने चक्रवाढ व्याज देय होत.

लेखापरिक्षणात असे आढळून आले की, जानेवारी, २०१४ पर्यंत, संस्थेने MHADA कडे रु.१.१० कोटी प्रलंबित देय रक्कमेचा किंवा १५ मार्च, २००४ ते ३१ जानेवारी, २०१४ पर्यंतच्या कालावधीसाठीच्या (सुमारे १० वर्षे) रु.२.७१ कोटी व्याजाचा भरणाही केला नव्हता. १५ मार्च, २००४ ते १४ मार्च, २०१३ पर्यंतच्या कालावधीसाठी वसूल करावयाच्या एकूण रु.३.४२ कोटी (रु.१.१० कोटी प्रलंबित देय रक्कम अधिक रु.२.३२ कोटी व्याज) रक्कमेसाठी MHADA ने संस्थेला मे २०१३ मध्ये फक्त एक मागणी सूचना जारी केली. तसेच रु.१.१० कोटी एवढ्या प्रलंबित रक्कमेचा संस्थेने जरी भरणा केला नव्हता तरीही संस्थेला MCGM कडून भोगवटा प्रमाणपत्र व बांधकाम पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त होणे शक्य व्हावे यासाठी सप्टेंबर, २००४ व ऑक्टोंबर २००४ मध्ये MHADA ने MCGM ला “ना हरकत प्रमाणपत्र” जारी केले.

लेखापरिक्षणात असेही आढळून आले की, संस्थेने ६५४ चौ. मी. एवढ्या अतिरिक्त बांधीव क्षेत्रफळाची (BUA) मागणी केली होती. (१ डिसेंबर, २००३). MCGM कडून अभिन्यासाठी (layout) एक ऐवजी १.२ एवढा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) प्राप्त होईल असे गृहित धरुन, अभिन्यासाकरीता पर्याप्त प्रमाणात BUA उपलब्ध नसतानाही, MHADA ने संस्थेला अतिरिक्त BUA मंजूर केला. (२२ डिसेंबर, २००३). MHADA ने अतिरिक्त BUA साठी मंजुरी देण्यापूर्वीच (२२ डिसेंबर, २००३) संस्थेने अतिरिक्त BUA

साठी रक्कम भरली होती. (०३ डिसेंबर, २००३) असेही आढळून आले. FSI मध्ये वाढ होईल या अपेक्षेने अतिरिक्त BUA देणे नियमबाह्य असल्याने संस्थेला अदेय लाभ दिला गेला. अभिन्यासाकरीता वाढीव FSI देण्याविषयी जानेवारी २०१४ पर्यंत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता.

१. मार्च २००४ ते मे, २०१३ या कालावधीत थकबाकीची वसुली करण्याबाबत नोटीशी का देण्यात आल्या नाहीत याबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :**

**३.२** महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :

**म्हाडाचे अभिप्राय :**

हे खरे आहे की, थकबाकी वसुलीकरीता मार्च २००४ ते मे २०१३ या कालावधीदरम्यान नोटीसा काढण्यात आल्या नव्हत्या. तथापि, सन २०१६ मध्ये वसुलीसाठी नोटीसा काढण्यात येऊन वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

२. संस्थेला थकबाकी भरण्यासाठी शेवटची संधी कधी आणि कोणत्या तारखेपर्यंत देण्यात आली होती ? थकबाकी भरण्याची शेवटची तारीख निघून गेली असल्यास, म्हाडाने कोणती कार्यवाही केली ? विहित तारखेनंतरही थकबाकी भरण्यात आली नसेल तर त्या अनुषंगाने केलेली पुढील कार्यवाही याबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

**म्हाडाचे अभिप्राय :**

कार्यालयीन पत्र दिनांक १९ जानेवारी २०१६ नुसार रु.५,२१,९८,५९१/- थकबाकीच्या रकमेचा भरणा पत्र मिळाल्यानंतर १५ दिवसांत करणेबाबत संस्थेला कळविण्यात आले होते. संस्थेने दिनांक ११ फेब्रुवारी २०१६ रोजी रु.१,०९,५०,०१५/- इतक्या रकमेचा भरणा केला. संस्थेचे सदर थकबाकीबद्दल काही आक्षेप आहेत. सदर आक्षेप दूर केल्यानंतर म्हाडामार्फत थकीत रकमेचा भरणा करून घेणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

३. संस्थेकडून थकबाकी वसूल करावयाची असताना देखील बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकरिता संस्थेस सन २००४ मध्ये ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याबाबतची कारणे लोकलेखा समितीस अवगत करावी.

**ज्ञापन :**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

**म्हाडाचे अभिप्राय :**

सोसायटीकडून थकबाकी वसूल करावयाची असताना देखील महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकरिता सोसायटीला २००४ साली ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत त्यावेळेच्या परिस्थितीनुरुप निर्णय घेण्यात आल्याची शक्यता आहे.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

४. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून चटई क्षेत्र निर्देशांकात १.०० ते १.२० इतकी वाढ होईल असे गृहीत धरुन सदर संस्थेला २००३ मध्ये अधिकचे अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ मंजूर करण्यता आले. जर अभिन्यासाकरिता वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकास मंजुरी देण्यात आली असल्यास याबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

**म्हाडाचे अभिप्राय :**

विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील विनियम ३३ (५) नुसार महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या गृहनिर्माण योजनेत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व कमी उत्पन्न गट यांचेकरीता कमीतकमी ६०% तरतूद केली असल्यास, अभिन्यासाला लागू असलेल्या F.S.I. मध्ये २०% वाढीस परवानगी दिली जाते. ओशिवरा, जोगेश्वरी (प.) येथील अभिन्यास दिनांक २७ जून १९९४ रोजी १.०० F.S.I. करीता मंजूर करण्यात आला होता. सदर अभिन्यासात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व कमी उत्पन्न गट यांचेकरीता सदनिका आणि उच्च उत्पन्न गटातील गृहनिर्माण संस्था यांचा समावेश असल्याने, महानगरपालिकेकडून अभिन्यासाकरिता " मध्ये १.०० ते १.२० इतकी वाढ होईल असे गृहित धरुन सन २००३ साली सोसायटीला अधिकचा B.U.A मंजूर करण्यात आला होता. दरम्यानच्या काळात शासनाच्या अधिसूचना क्र. TPB ४३०८/७४/CR-II/२००८/UD-११, दिनांक ०६ डिसेंबर २००८ नुसार म्हाडा अभिन्यासाकरीताच्या F.S.I. मध्ये वाढ होऊन तो २.५ इतका झाला. त्या अनुषंगाने म्हाडामार्फत ओशिवरा, जोगेश्वरी (प.) येथील २.५ इतक्या F.S.I. करीताचा सुधारित अभिन्यास महानगरपालिकेस मंजुरिकरीता पाठविण्यात आला आहे. त्यानंतर शासनाच्या अधिसूचना क्र. TPB ४३१३/१२३/CR-४७/२०१३/UD-II, दिनांक ०८.१०.२०१३ नुसार म्हाडा अभिन्यासाकरिताच्या F.S.I. मध्ये वाढ होऊन तो ३० इतका झाला असून, त्यानुसार सुधारित अभिन्यास तयार करून महानगरपालिकेस मंजुरिकरिता पाठविण्याची कार्यवाही सुरू आहे.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :—**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

**प्रकरण II : रायगड सैनिकी शाळा**

**३.३** महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ च्या विनियम १६ अन्वये, माध्यमिक शाळा (३,८०० चौ.मी.) आणि क्रिडांगण (६,३०० चौ.मी.) याकरीता राखीव ठेवलेले भूखंड ६०:४० या प्रमाणात अनुक्रमे रायगड सैनिकी शाळा (RMS) आणि राज पुरोहीत ट्रस्ट (RPT) यांना देण्याचे निर्देश महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने MHADA ला दिले (मार्च-२००२).

त्यानुसार मे २००२ मध्ये जमिनीच्या वाटपाविषयीचा प्रस्ताव पत्र MHADA ने RMS व RPT ला पाठविली. अंतिम मोजणीच्या वेळी २,४०० चौ.मी. क्षेत्रफळाचा शाळेसाठी राखीव असलेला भूखंड आणि ४,३३२ चौ.मी. क्षेत्रफळाचा क्रिडांगणासाठी राखीव असलेला भूखंड RMS ला देण्यात आला आणि एप्रिल २००४ मध्ये ३० वर्षासाठी रु.८३.२२ लाख रक्कमेच्या भाडेपट्टीचे करारपत्र कार्यान्वित करण्यात आले. RPT कडून कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने ऑगस्ट २००४ मध्ये MHADA ने RPT ला दिलेला प्रस्ताव रद्द केला आणि RPT ला देऊ केलेले ४,४९९ चौ.मी. क्षेत्र (शाळेचा भूखंड : १,६११ चौ.मी. आणि क्रिडांगण : २,८०० चौ.मी.) RMS ला रु.५३.६१ लाखाच्या अधिमूल्याला देण्याचा प्रस्ताव मांडला (सप्टेंबर २००४) व हे अधिमुल्य प्रस्ताव पत्र प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत भरावयाचे होते. निर्धारित वेळेत देय रक्कमेचा भरणा न केल्यास, नियत तिथी तीन महिन्यांनी वाढवली जाईल ज्यासाठी उर्वरित देय रक्कमेवर १३.५ टक्के दराने व्याज लागू होणार होते, जे न भरल्यास, जमिनीचे वाटप रद्द करण्यात येणार होते.

MHADA च्या धोरणानुसार (ऑगस्ट २००४), ज्या व्यक्ती/संस्थेस शाळा बांधण्यासाठी भूखंड देण्यात आला आहे, ती एकुण BUA च्या पाच ते २० टक्के भाग व्यापारी प्रयोजनाकरिता वापर करू शकते, ज्यासाठी प्राप्त झालेल्या उत्पन्नापैकी १० टक्के उत्पन्न MHADA ला देणे आवश्यक असते, तसेच, जेथे एकूण BUA च्या २० टक्क्यांपेक्षाही जास्त क्षेत्र व्यापारी प्रयोजनासाठी वापरले जाते तेथे प्राप्त झालेल्या उत्पन्नापैकी २५ टक्के उत्पन्न MHADA ला देणे आवश्यक असते. शाळेच्या भूखंडावर बांधण्यात येत असलेल्या इमारतीचा वापर व्यापारी प्रयोजनासाठी करण्यास मंजुरी देण्याविषयी RMS ने MHADA ला विनंती केली. (जानेवारी २००५), जी MHADA ने मान्य केली (मार्च-२००५) त्यानुसार, इमारतीमधील संपूर्ण तळ मजला व पहिला मजला (१,४०९ चौ.मी.) RMS ने व्यापारी प्रयोजनासाठी रु.९.५१ कोटी भाडेपट्टी अधिमुल्यावर मे. इन्वेंशन रिआल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड यांना भाडेपट्टीवर दिला. (सप्टेंबर-२००६).

१. सन २००५ मध्ये वाणिज्य वापराकरिता परवानगी देतेवळी अनुज्ञेय चटई क्षेत्रफळ निर्देशांक २.०० होता. सदर चटई क्षेत्रफळ निर्देशांक कोणत्या तारखेला वाढवून ४.०० करण्यात आला याबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :**

**३.४** महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :

**म्हाडाचे अभिप्राय :**

जेव्हा वाणिज्य वापराकरिता सन २००५ साली परवानगी देण्यात आली तेव्हा सदर भूखंडाकरिता दिनांक ३० ऑक्टोबर २००० रोजीच्या सुधारित विकास नियंत्रण नियमावलीनुसार (D.C.R.) ४.०० F.S.I. लागू होता व २.०० F.S.I. लागू नव्हता.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

२. रायगड सैनिकी शाळेने सप्टेंबर, २००६ मध्ये त्यांना देण्यात आलेली जागा वाणिज्य वापराकरिता पोट भाड्याने परस्पर वितरीत केली असताना देखील रायगड सैनिकी शाळेस थकबाकी भरण्याची नोटीस विलंबाने म्हणजे जुलै, २०१५ मध्ये देण्यात आली याची कारणे याबाबत लोकलेखा समितीस अवगत करावे.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

**म्हाडाचे अभिप्राय :-**

रायगड मिलीटरी स्कूल यांनी सप्टेंबर, २००६ मध्ये त्यांना देण्यात आलेली जागा वाणिज्य वापराकरिता भाडेतत्वावर परस्पर वितरित केली असताना देखील रायगड मिलीटरी स्कूल यांना थकबाकी भरण्याकरिता नोटीस देण्यात झालेला विलंब आहे, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, जुलै, २००५ मध्ये नोटीस देण्यात आली असून, वसुलीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

३. थकबाकीची वूसली करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व तहसिलदार यांना केव्हा कळविण्यात आले आणि त्याबाबतची सद्यःस्थिती लोकलेखा समितीस सादर करावी.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

**म्हाडाचे अभिप्राय :-**

म्हाडाच्या मिळकतीबाबतच्या थकबाकीच्या वसुलीकरिता म्हाडास अधिकार प्राप्त असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय अथवा तहसिलदार कार्यालय यांचेशी सदर बाबत पत्रव्यवहार करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे वसुलीकरिता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व तहसिलदार यांचेशी केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखात दिसून येत नाही.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

४. रायगड सैनिकी शाळा व मे.इन्वेशन रिएल्टर्स प्रा.लि. यांच्यात भाडेपट्टा करार सप्टेंबर, २००६ मध्ये झालेला असताना म्हाडा, रायगड सैनिकी शाळा व मे.इन्वेंशन रिएल्टर्स प्रा.लि. यांच्यातील त्रिपक्षीय कराराची अंमलबजावणी न करण्यात आल्याची कारणे लोकलेखा समितीस सादर करावी.

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

**म्हाडाचे अभिप्राय :-**

म्हाडा, रायगड मिलीटरी स्कूल आणि मे.इन्वेंशन रियटर्स प्रा.लि. यांच्यामध्ये त्रिपक्षीय करारनामा करण्याकरिता रायगड मिलीटरी स्कूल/ मे.इन्वेंशन रियटर्स प्रा.लि. यांचेकडे म्हाडाकडून पाठपुरावा सुरू आहे.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

५. रायगड सैनिकी शाळेस अंतिमतः एकूण किती अतिरिक्त जागा/भूखंड देण्यात आली ?

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

**म्हाडाचे अभिप्राय :-**

सुरुवातीस रायगड मिलिटरी स्कूल यांना २,४०० चौ.मी. (शाळेकरिता राखीव) व ४,३३२ चौ.मी. (खेळण्याच्या मैदानाकरिता राखीव) इतका भूखंड वितरीत करण्यात आला होता. त्यानंतर १,६११ चौ.मी. (शाळेकरिता राखीव) व २,८८८ चौ.मी. (खेळण्याच्या मैदानाकरिता

राखीव) इतका भूखंड वितरीत करण्यात आला. अशाप्रकारे रायगड मिलीटरी स्कूल यांना ४,०११ चौ.मी. (शाळेकरिता राखीव) व ७,२०० चौ.मी. (खेळण्याच्या मैदानाकरिता राखीव) इतका भूखंड वितरीत करण्यात आला. त्यानंतर १२०० चौ.मी. इतका भूखंड खाजगी मालकीच्या असल्याने निदर्शनास आल्याने, सदर भूखंड एकूण वितरणामधून वळता करण्यात आला. अशा प्रकारे अंतिमतः एकूण भूखंड १०,०३१ चौ.मी. इतका भूखंड वितरीत करण्यात आला.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

६. **एकूण किती अधिमूल्य रक्कम अनुज्ञेय होती ?**

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

**म्हाडाचे अभिप्राय :-**

अधिमूल्याची एकूण देय रक्कम रु.१,५४,४६,१५५/- इतकी आहे.

त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

७. सदर भूखंडावरील /जमिनीवरील अतिक्रमण काढून टाकण्यात आले आहे का ?

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

**म्हाडाचे अभिप्राय :-**

शासनाच्या दिनांक १० जून २००५ रोजीच्या आदेशानुसार सदर अभिन्यासाकरिता मे.रिलायन्स इंटरप्रायझेस यांची शासकीय संस्था म्हणून नेमणूक करण्यात आली असून त्यांचेमार्फत वेळोवेळी अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

**८. रायगड सैनिकी शाळेला उर्वरित रक्कम वसुल करण्यासाठीची नोटीस केव्हा देण्यात आली ?**

**ज्ञापन :-**

**महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

**म्हाडाचे अभिप्राय :-**

रायगड मिलीटरी स्कूल यांना दिनांक २१.०१.२०१६ रोजी रु.४,०८,६५,८३५/- इतक्या उर्वरित थकबाकीकरिता नोटीस देण्यात आली.

**त्यावर शासनाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-**

म्हाडाचे अभिप्राय स्वीकारण्याची विनंती आहे.

**MHADA मधील अभिलेख्यांच्या तपासणीत (जानेवारी २०१२) खालील बाबी आढळून आल्या :-**

शाळेच्या भूखंडावरील ४,८०० चौ.मी. एवढ्या एकूण उपलब्ध BUA पैकी (प्राप्त झालेला दोन एवढा FSI विचारात घेऊन) RMS ने १,४०९ चौ.मी. BUA व्यापारी प्रयोजनासाठी मे.इन्वेंशन रिआल्टर्स यांना दुय्यम भाडेपट्टीवर दिला. एकूण BUA च्या २९.३५ टक्के क्षेत्राचा व्यापारी प्रयोजनासाठी वापर केल्यामुळे एकूण प्राप्त उत्पन्नापैकी २५ टक्के भाग (रु.२.३८ कोटी) MHADA ला देणे आवश्यक होते. RMS कडून रु.२.३८ कोटी वसूल करण्याविषयी मार्च-२००७ ते सप्टेंबर-२००८ दरम्यान नस्तीवरील टिप्पणीवर चर्चा करण्यात येऊनही, भूखंडाच्या व्यापारी प्रयोजनासाठी केलेल्या वापराप्रित्यर्थ विभागून घ्यावयाच्या उत्पन्नाच्या वसूलीविषयी RMS ला नोटीस जारी करण्याविषयी MHADA कडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. MHADA च्या अशा अनास्थेमुळे नोव्हेंबर, २००६ ते जानेवारी २०१४ या कालावधीसाठी देय असलेले रु.२.३३ कोटी व्याजाचे नुकसान झाले.

भूखंडाच्या व्यापारी प्रयोजनासाठी करावयाच्या वापरासाठी MHADA ने RMS ला दिलेल्या मंजुरीमध्ये (मार्च-२००५), MHADA,

RMS व इन्वेंशन रिआल्टर्स यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करणे अपेक्षित होते. परंतु असे निदर्शनास आले की, RMS ने फक्त इन्वेंशन रिआल्टर्स (दुय्यम भाडेपट्टीधारक) यांच्या बरोबर भाडेपट्टी करार (सप्टेंबर-२००६) केला असला तरी त्रिपक्षीय करार न केल्याबद्दल MHADA कडून RMS ला कोणतीही नोटीस पाठविण्यात आली नव्हती. RMS आणि दुय्यम भाडेपट्टीधारक यांच्या दरम्यान करण्यात आलेला भाडेपट्टीचा करार २८ वर्षापर्यंत (सप्टेंबर २०३४) वैध असला तरी MHADA व RMS मधील भाडेपट्टीचा करार फक्त एप्रिल २०३४ पर्यंतच वैध होता.

सर्वप्रथम RMS ला देण्यात आलेल्या ज्या ६,७३२ चौ.मी. क्षेत्रुळाच्या भूखंडासाठी एप्रिल-२००४ मध्ये भाडेपट्टी करार करण्यात आला होता, त्यापैकी १,२१२ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग MHADA च्या मालकीच्या असल्याने सिद्ध करण्यात स्पष्ट पुरावा उपलब्ध नव्हता.

भूखंडावर अतिक्रमण झाले असल्याचे कारण देऊन ४,४९९ चौ.मी. क्षेत्रफळाच्या अतिरिक्त भूखंडासाठी देय असलेल्या रु.५३.६१ लाख रक्कमेपैकी RMS ने फक्त रु.१५ लाख भरले. परंतु, अतिक्रमण हटवण्यासाठी किंवा भूखंडाचे वाटप रद्द करण्यासाठी MHADA ने कोणतीही कारवाई केली नाही.

अशा प्रकारे, MHADA मध्ये बळकट अंतर्गत नियंत्रण व्यवस्था नसल्यामुळे मीरा सहकारी संस्थेकडून आणि रायगड सैनिकी शाळेकडून रु.३.४ कोटी देय रक्कमेची वसुली झाली नाही आणि रु.५.०४ कोटी व्याजाचेही नुकसान झाले.

जुलै, २०१३ मध्ये हे प्रकरण शासनाकडे निर्दिष्ट करण्यात आले, जानेवारी २०१४ पर्यंत त्यांचे उत्तर प्राप्त झालेले नव्हते.

१. भूखंड/सदनिका वितरीत केलेल्यापैकी थकबाकीदार असलेल्यांची यादी म्हाडाकडे आहे का ? असेल तर एकूण थकबाकी रक्कम वसूल करण्याचे कालावधी निहाय विश्लेषण ?

२. खालील बाबीसंदर्भात म्हाडाने अंतर्गत नियंत्रण प्रणाली मजबूत करण्यासाठी कोणत्या उपाययोजना योजल्या आहेत.

(अ) व्यक्ती/संस्थां ज्यांच्याकडून रक्कम वसूल करावयाची आहे त्यांची परिपूर्ण माहिती/डेटाबेस

(आ) कालावधीनिहाय (Age-wise) थकबाकीचे विश्लेषण?

(इ) थकबाकीदार, निष्कासन कार्यवाही इ. बाबत ठराविक कालावधीनंतर नोटीस देण्यासाठीची प्रणाली

(ई) थकबाकीदारांवर कठोर देखरेखीसाठीची व्यवस्थापन माहिती प्रणालीची निर्मिती.

**यासंदर्भात म्हाडाचे अभिप्राय :-**

गतकाळात म्हाडाद्वारे वितरीत करण्यात आलेल्या सदनिका/गाळेधारकांपैकी थकबाकीदारांबाबत म्हाडास माहिती आहे. सदर थकबाकीदारांबद्दल माहिती एकत्रित करून त्यांची एकत्रित यादी तयार करण्याची कार्यवाही म्हाडामार्फत सुरू आहे.

सदर थकबाकीदारांची एकत्रित यादी संकलित केल्यानंतर खालील मुद्यांवर पुढील कार्यवाही करण्यास्तव माहिती उपलब्ध होऊ शकेल व माहिती प्राप्त झाल्यानंतर पुर्तता करण्यात येईल.

(अ) थकबाकीचे वर्षनिहाय विश्लेषण सादर करण्यात येईल.

(आ) उपरोक्त थकबाकी शिल्लक असलेल्या सर्व थकबाकीदारांची माहिती तयार करण्यात येईल.

अशाप्रकारची यादी तयार झाल्यानंतर त्याचे सखोल विश्लेषण करण्यात येऊन त्यानुसार आवश्यक अनुषंगीक कार्यवाही करण्यात येईल. वसुली करावयाच्या संपूर्ण रकमेबाबत माहिती संकलित करण्यात येईल. तसेच थकबाकीदारांच्या कडक देखरेखीसाठी, थकबाकीदारांना सांविधिक नोटीसा पाठविण्यासाठी, निष्कासनाची कार्यवाही इत्यादींसाठी म्हाडास्तरावर एक Management Information System तयार करण्याचे काम ऐरणीवर/प्रगतीपथावर आहे.

## (ड) गृहनिर्माण विभाग

### ४ परिच्छेद क्रमांक ३.२.३

**लेखापरिक्षणात आढळून आलेल्या बाबी :**

**४.१** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) अधिनियम, १९७६ च्या विनियम १० मध्ये विनिर्दिष्ट केले आहे की, भाडेपट्टी अधिमुल्याच्या संपूर्ण रक्कमेची प्राप्ती झाल्यावरच अशी जमीन ज्या व्यक्ती/संस्थेला वाटप करण्यात आली आहे त्यांच्या नावाने भाडेपट्टी करारपत्र कार्यान्वित करावे अणि असे भाडे पट्टी करारपत्र कार्यान्वित केल्यावरच जमिनीचा ताबा हस्तांतरित करावा. मार्च, २००० मधील MHADA च्या धोरणानुसार, जमिनीचे वाटप झालेल्या व्यक्ती/संस्थेने जमिनीच्या वापरात निवासी ऐवजी बिगर निवासी प्रयोजनासाठी असा बदल केल्यास रुपये २५० प्रती चौ.मी. दराने अधिमूल्य वसूल करावयाचे होते. तसेच जून, २००३ च्या MHADA च्या मूल्य निश्चित (Pricing) धोरणानुसार, MHADA अधिनियमाच्या विनियम १६ अन्वये शासनाने वाटप केलेल्या भूखंडासाठी चालू बाजार दराने म्हणजेच, प्रस्ताव पत्राच्या तारखेस प्रचलित असणाऱ्या दराने मूल्य आकारावयाचे होते.

MHADA चा एक उपविभाग असलेल्या पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातील मुख्य अधिकारी यांच्याकडील अभिलेख्यांच्या तपासणीत (मार्च, २०१२) असे आढळून आले आहे की, सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी इस्लामपूर येथील पाच एकर क्षेत्रफळाची जमीन MHADA ला गाळे बांधण्यासाठी हस्तांतरीत केली होती (ऑक्टोबर, १९६६), आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकांसाठी (EWS) MHADA ने त्यावर ५० गाळे बांधले (जानेवारी, १९६९) परंतु, पाणीपुरवठ्याची व्यवस्था नसल्यामुळे EWS या गाळ्यांचे वाटप करू शकले नाहीत.

कासेवगाव शैक्षणिक संस्थेने (KES) विनंती केल्यावर (ऑगस्ट/सप्टेंबर, १९८३) ५० गाळे (६,५४२ चौ.मी.जमीन) आणि १५,९७२ चौ.मी. एवढी या गाळ्यालगतची मोकळी जागा अशी एकूण जवळजवळ पाच एकर KES ला देण्याचे MHADA ने ठरविले. (सप्टेंबर, १९८३) त्यानुसार ५० गाळे व त्याखालची जमीन तसेच त्यात लगतची जमीन यांच्या ९० वर्षांच्या भाडेपट्टी कालावधीसाठीच्या निर्देश देणारे प्रस्ताव पत्र (ऑक्टोबर, १९८३) MHADA ने KES ला जारी केले. मोकळी जागा देण्यासाठीच्या अटी व शर्ती स्वतंत्रपणे कळविण्यात येतील असे MHADA ने प्रस्ताव पत्रात सूचित केले होते. परंतु तत्कालीन उप अभियंता, गलिच्छ वस्ती व गृहनिर्माण विभाग IV, कोल्हापूर यांनी मोकळ्या जागेचा तात्पुरता ताबा KES ला हस्तांतरित केला (डिसेंबर, १९८३).

मोकळ्या जागेच्या वाटपाच्या अटी व शर्ती विषयी MHADA ने कोणताही अंतिम निर्णय न घेतल्यामुळे तत्कालीन वित्त व नियोजन मंत्र्यांनी उर्वरित १५,९७२ चौ.मी. एवढी मोकळी जमीन KES ला देण्याची विनंती केली (नोव्हेंबर, २००५ व फेब्रुवारी, २००६) (I) सप्टेंबर १९८३ मध्ये देण्यात आलेल्या निर्णयात दुरुस्ती करणे आणि मोकळ्या जागेचे वाटप रद्द करणे किंवा (II) चालू दरसूचीमधील दरानुसार येणारे भाडेपट्टी अधिमूल्य किंवा वाटपाच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठीचे जमिनीच्या किंमतीवरील व्याज सम्मिलित करून (Capitalize) येणारी रक्कम यापैकी जी रक्कम अधिक असेल ती अनुक्रमे KES कडून वसूल करणे, असे दोन विकल्प/पर्याय MHADA ने गृहनिर्माण विभागाकडे मंजुरीसाठी सादर केले (जून, २००८). परंतु वर्ष १९८३ मधील दराने KES ला जमीन देण्याचे निर्देश गृहनिर्माण विभागाने MHADA ला दिले (जून, २००९) आणि २६ वर्षांसाठी प्रतिवर्ष १२.५ टक्के दराने परिगणित केलेल्या रु.६.९९ लाख व्याजासह वर्ष १९८३ मधील दराने परिगणित केलेले भाडेपट्टी अधिमूल्य आणि सम्मिलित भाडे अशी एकूण रु.७.८७ लाख (परिशिष्ट ३.२) रक्कम वसूल करण्याविषयी MHADA ने ठराव केला (ऑगस्ट, २००९) व ही रक्कम KES ने सप्टेंबर, २००९ मध्ये प्रदान केली.

एखाद्या जागेचे वाटप करण्यापूर्वी ज्या व्यक्ती किंवा संस्थेस वाटप करावयाचे आहे त्यांना जमिनीची किंमत व त्यावर लागू होणारे भाडेपट्टी भाडे याविषयी सूचित करणारे एक प्रस्ताव पत्र MHADA जारी करते. सदर प्रकरणात, कोणतेही प्रस्ताव पत्र न देता आणि कोणत्याही अटी व शर्ती निर्धारित न करता वर्ष १९८३ मध्ये मोकळ्या जमिनीचा ताबा KES ला हस्तांतरित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे, भाडेपट्टी अधिमूल्य वसूल न करता आणि भाडेपट्टी करार कार्यान्वित न करता KES ला जमिनीचे हस्तांतरण केल्यामुळे MHADA अधिनियमाच्या विनियम क्र.१० चा भंग झाला होता. प्रत्यक्षात, जमिनीचे तात्पुरते हस्तांतरण व प्राप्ती हे व्यवहार KES च्या लेटरहेडवर करण्यात आले होते.

वर्ष २००९ मधील प्रस्तावाच्या तारखेस प्रचलित असणाऱ्या बाजार दराऐवजी वर्ष १९८३ मधील दराने मोकळ्या जमिनीचे वाटप केल्यामुळे फक्त MHADA च्या मूल्य निश्चित धोरणाचाच भंग झाला असे नाही तर MHADA ला रु.४५.४८ लाख महसुलाचे नुकसान झाले.

ठराव क्र. ६४१५ (ऑगस्ट, २००९) नुसार, MHADA ने जमिनीच्या वापरामध्ये निवासी ऐवजी बिगर निवासी असा बदल केला होता. मात्र MHADA ने जमिनीच्या वापरातील सदर बदलासाठी रु.२५०/- प्रती चौ.मी. दराने अधिमूल्याची वसुली केली नाही. परिणामी रु.३९.९३ लाख महसुलाचे नुकसान झाले.

अशाप्रकारे, MHADA च्या मूल्य निश्चिती धोरणाचे उल्लघंन करून चालू बाजार दराचा अवलंब न करता जमिनीचे वाटप करणे आणि जमिनीच्या वापरात बदल केल्याबद्दल KES कडून अधिमुल्याची वसुली न करणे यामुळे MHADA ला रु.८५.४१ लाख महसुलाचे नुकसान झाले.

**४.२ म्हाडाचे अभिप्राय :**

प्राधिकरणाच्या ठराव क्र.७२२, बाब क्र.४२/१८, दि. १७ फेब्रुवारी १९८३ अन्वये प्राधिकरणाने असा निर्णय घेतला होता की, कासेगाव एज्युकेशन सोसायटी यांना इस्लामपूर येथे ५० गाळे सभोवतालच्या ५ एकर जमिनीसह प्राधिकरणाच्या गाळयांच्या व जमिनीच्या किंमतीविषयक धोरणास अनुसरुन देण्यात यावेत.

वरील ठरावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी दि. २४ ऑक्टोबर १९८३ रोजीच्या पत्रान्वये कासेगाव एज्युकेशन सोसायटीला ५० गाळयांना वितरण आदेशात १ ते २० अटी व शर्ती नमूद केल्या आहेत. सदर ५० गाळे रु.४,९८,५०० या किंमतीला "As is where is basis" वर एकरकमी पद्धतीवर देण्यात येत असल्याचा उल्लेख केलेला आहे. त्याचप्रमाणे या गाळयांच्या बांधकामाखालील जमीन व त्याला अनुलग्न असलेली जमीन ९० वर्षांच्या लीजवर देण्यात येत असल्याचा उल्लेख आहे. ५ एकर जमिनीचा तात्पुरता ताबा (प्रोव्हीजनल पसेशन) दि. २८ डिसेंबर १९८३ रोजी कासेगाव एज्युकेशन सोसायटीच्या इंजिनिअरींग आणि पॉलिटेक्नीकल कॉलेजला देण्यात आला आहे.

त्यानंतर जिल्हाधिकारी, सांगली ह्यांनी या जमिनीचा विनियोगाबाबत आक्षेप घेतला होता. प्राधिकरणाने दि. ३ जून २००८ च्या ठराव क्र. ६२९३ नुसार कासेगाव एजयुकेशन सोसायटीला देण्यात आलेली १५९७२ चौ.मी. क्षेत्रफळ एवढी जमीन कासेगाव एज्युकेशन सोसायटीने इस्लामपूर येथे गृहनिर्माणास योग्य अशी तेवढ्याच मुल्याची व क्षेत्रफळाची जमीन (बदली जमीन) म्हणून म्हाडाला द्यावी. याबाबत शासन स्तरावरुन आदेश घेण्यासाठी शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्यामध्ये २ पर्याय सुचविले होते.

त्यावर शासनाने त्यांच्या दि. २ जून २००९ च्या पत्रान्वये प्राधिकरणास निर्णय कळविला आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने दि. ७ ऑगस्ट २००९ रोजीच्या ठराव क्र. ६४१५ अन्वये निर्णय घेतला की, गृहनिर्माण विभागाच्या दि. २ जून २००९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदरहू जमीन १९८३ पासून कासेगाव एज्युकेशन सुंस्थेच्या ताब्यात असल्यामुळे त्यावेळच्या प्रचलित/नियमाप्रमाणे मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी काढलेली किंमत (रु.१,६४,६७२ अ त्यावरील दि. ३० सप्टेंबर १९८३ ते दि. २६ सप्टेंबर २००९ या २६ वर्षाच्य कालावधीची १२.५०% येणारे व्याज रु.५,३५,१८४ मिळून १५९७२ चौ.मी. क्षेत्रफळासाठी येणार एकूण किंमत) रु.६,९९,८५६ आकारण्यात यावी, असा एकमताने ठराव करण्यात आलस. त्यांची पुणे मंडळातर्फे अंमलबजावणी करण्यात आली व संस्थेने सदर रक्कमेचा भरणा मंडळाकडे केला आहे.

परिशिष्ट ३.२. मध्ये नमूद केल्याप्रमाणे (१) सन २००९ चे शिघ्रशिद्ध गणक दर घेऊन जमिनीचे अधिमुल्य (२) म्हाडा ठराव क्र.५५५३ नुसार वापर बदल शुल्क आकारणी (३) पुढील ३० वर्षासाठी वार्षिक भूईभाडे (४) दि. १३ नोव्हेंबर २००९ ते दि.३० मार्च २०१६ पर्यंत १२.५०% दराने होणारे वयाजाचे भांडवलीकरण करून एकूण रु.१,७९,५०,८५५ एवढ्या रकमेची कासेगाव एज्युकेशन संस्थेकडून वसुली करावयाच्या अनुषंगाने मिळकत व्यवस्थापक, पुणे मंडळ यांनी दि.११ जानेवारी २०१६ अन्वये कासेगाव एज्युकेशन संस्थेस नोटीस बजावली आहे. जेणेकरून म्हाडाचे आर्थिक नुकसान होणार नाही.

**शासनाचे अभिप्राय :**

सदर प्रकरणी शासन पत्र दिनांक २ जून २००९ अन्वये, सदरहू संस्थेस उक्त जमीन सन १९८३ च्या प्रचलित धोरण/नियमाप्रमाणे आकारणी करण्याबाबतच्या दिलेल्या आदेशामुळे लेखा परिक्षणामध्ये नमूद केलेल्या महसूलाची हानी झालेली आहे.

सदरहू प्रकरणाची वस्तुस्थिती आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या अहवालातील उक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन यासंदर्भात उचित निर्णय घेण्यासाठी प्रकरण शासनास सादर करण्यात आलेले आहे.

## (अ) गृहनिर्माण विभाग

**५ साक्ष :**

उपरोक्त परिच्छेद क्र.३.१, ३.२.१, ३.२.२ व ३.२.३ या परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १३ फेब्रुवारी २०१७ रोजी गृहनिर्माण विभागाच्या सचिवांची तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**५.१ परिच्छेद क्र. ३.१.४.१ कामांची अनियमित विभागणी :**

साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कामाच्या वाटपासंदर्भात निर्धारित केलेली टक्केवारी गाठण्यात विभागाला यश मिळाले आहे का ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, तंतोतंत ३३:३३:३४ या टक्केवारीप्रमाणे साध्य झालेले नाही परंतु, यात प्रगती झालेली आहे.

Department had agreed to take care on this aspect in future. सन २०१५-२०१६ ची आकडेवारी काय आहे या समितीच्या प्रश्नाला सन २०१५-२०१६ मध्ये लेबर सोसायटीला ३३ टक्क्यांपर्यंत कामे मिळाली आहेत. मात्र, ई-टेंडरिंगच्या माध्यमातून दिलेल्या कामात खूप वाढ झालेली आहे. कारण, आता ३ लक्ष रुपयांच्या वरील कामांसाठी ई-टेंडर पद्धती स्वीकारावी लागते त्याचे प्रमाण ६५.६१ टक्के झाले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

परंतु, एक गोष्ट चांगली आहे की, विभागाने ३ लाखाच्या अटीत अडकू नये म्हणून कामाचे तुकडे केले नाहीत हे अतिशय चांगले काम केलेले आहे. तसेच बेरोजगार तरुणांच्या संस्थांवर अन्याय होऊ नये, असे समितीचे म्हणणे आहे मात्र, ते करीत असताना लेबर सोसायटीची टक्केवारी ३३ टक्क्यांच्या वर जाऊ नये, हे विभागाने पहावे असेही समितीने विभागास अवगत केले असता बेरोजगार तरुणांच्या संस्थांची टक्केवारी मात्र ३३ टक्क्यांपर्यंत गेलेली नसल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

तसेच दिनांक ६ एप्रिल २०१७ च्या पत्रान्वये मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील तीनही कार्यकारी अभियंता यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत की, ३३:३३:३४% प्रमाणे काम वाटप करणे अन्यथा त्यांच्यावर कठोर कार्यवाही केली जाईल. बेरोजगार अभियंत्यांच्या संस्थांवर अन्याय होऊ नये तसेच मजूर सहकारी संस्थांच्या कामे वाटपाची टक्केवारी ३३% च्या वर जाऊ नये याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत आणि भविष्यात काळजी घेण्यात येईल असेही समितीस अवगत केले.

**५.२ परिच्छेद क्र. ३.१.४.२ कार्यादेश दिल्यानंतर देखील कामांस सुरुवात न करणे :**

उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने समितीने विभागास अपूर्ण कामाची माहिती द्यावी असे सांगितले असता एकूण ७ अपूर्ण कामे आहेत व २० कामे सुरुच होऊ शकली नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

७ कामे सुरुच झालेली नाहीत का ? मग यापूर्वी दिलेली माहिती चुकीची होती, असे विभागाला म्हणावयाचे आहे का ? ही कामे सन २०१२-२०१३ ची आहेत. आता २०१७ हे वर्ष सुरू झालेले आहे. कामे सुरू न होण्यासाठी कोण जबाबदार आहेत व त्याबाबतची कारणे काय आहेत ? अशी पृच्छा समितीने केली असता २७ कामे सुरुच झालेली नाहीत, ही वस्तुस्थिती असून खाजगी जमिनीवर हे काम करावयाचे आहे परंतु, संबंधितांकडून ना-हरकत प्राप्त होत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सचिव महोदय देत असलेली माहिती चुकीची आहे. या सर्व कामांसाठी लागणारी जमीन खाजगी नसून ती शासकीय आस्थापनांचीच असल्याचे समितीने नमूद करताच विभागीय सचिवांनी मी माझे उत्तर परत घेतो शासकीय आस्थापनांच्या या जागा असून त्यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे कामे सुरू होऊ शकलेली नाहीत अशी माहिती समितीस दिली.

शासकीय योजनांसाठी शासकीय आस्थापनांकडून जमीन मिळत नसेल आणि कामे सुरू होऊ शकत नसतील तर ते योग्य नाही. अधिकारी देखील या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात, ही बाब अतिशय गंभीर आहे. महालेखाकारांकडून सर्व कामांची तपासणी केली जात नाही. ते रॅण्डमली १० टक्के कामे निवडतात. या १० टक्के कामांमध्ये जर २७ कामे ४ वर्षांत पूर्ण न केलेली सापडत असतील तर त्याचा आपण विभाग म्हणून विचार केला पाहिजे. ही कामे सुरू न होण्याबाबत काय अडचणी होत्या अशी विचारणा समितीने केली असता ही स्लम बोर्डाची कामे आहेत आमदार किंवा खासदार निधीतून ही कामे करावयाची होती. जिल्हाधिकारी या कामांना प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देत असतात. मात्र, महानगरपालिकेकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी म्हाडाची असते असा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी केला.

केवळ म्हाडामध्येच ही पद्धत आहे, असे नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात अशीच पद्धत आहे. आमदारांनी आमदार निधीतून करावयाच्या कामाबाबतचे पत्र दिल्यानंतर जिल्हाधिकारी त्या कामास प्रशासकीय मंजुरी प्रदान करतात व पुढील कार्यवाही त्या त्या यंत्रणेने पार पाडावयाची

असते यात काही नवीन नसल्याचे समितीने नमूद केले असता इतर महापालिकांपेक्षा मुंबई महानगरपालिकेचा कारभार फार मोठा आहे काही ठिकाणी त्यांची कामेही असतात. ना-हरकत मिळण्याबाबतचे प्रस्ताव उप मुख्य अभियंता यांच्यापर्यंत पाठविले जातात. अनेक वेळा महानगरपालिकेकडून प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याबाबत नकारही मिळतो असा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी केला.

विभागीय प्रतिनिधींनी केलेला खुलासा समितीला मान्य होण्यासारखा नाही संपूर्ण महाराष्ट्रात एकच पद्धत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करून घेणे गरजेचे आहे. तसा पाठपुरावा करण्यात आपल्या अधिकाऱ्यांना अपयश आलेले आहे आणि ही विभागाची अकार्यक्षमता असल्याचे समितीने अवगत केले तसेच या २७ कामांमध्ये काही जमिनी मुंबई महानगरपालिकेच्या आहेत, काही रेल्वेच्या आहेत आणि त्यांच्याकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळविण्यात आपल्याला अपयश आले आहे. परंतु, म्हाडाची देखील जमीन आहे आणि त्या ठिकाणी देखील आपण हतबल ठरला आहात. त्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता समितीने विभागाला दोन महिन्यांचा कालावधी द्यावा अशी विनंती विभागीय सचिवांनी समितीस केली तसेच म्हाडाच्या जमिनीबाबतची माहिती आता उपलब्ध नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

म्हाडाच्या जमिनीबाबत म्हाडाकडे माहिती देखील नाही. म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी पाठपुरावा केला नाही. योग्य पद्धतीने ही कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले नाहीत आणि आज गृहनिर्माण विभागाच्या सचिवांना समितीसमोर उत्तरे द्यावी लागत आहेत. जर अशा प्रकारे ही कामे पूर्ण करण्याकडे दुर्लक्ष केले असेल तर ते योग्य नसल्याचे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

यावर आता दोनच उपाय आहेत एकतर हे काम पूर्ण करण्यासाठी दोन महिन्यात प्रयत्न करू अन्यथा सदरचे काम रद्द करू असा खुलासा विभागीय सचिवांनी केला असता दोन महिन्यात हे काम सुरू करावे किंवा रद्द करावे असे समितीचे आदेश असल्याचे समितीने विभागास सांगितले.

आमदारांनी सुचविलेल्या कामासाठी एनओसी मिळत नसेल तर सामान्य माणसांच्या कामाच्या एनओसीची काय परिस्थिती असेल अशी शंका समितीने उपस्थित केली असता समितीने सदरचे काम रद्द करण्याचे आदेश दिले तर ते काम रद्द करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ही कामे रद्द करावीत अशी समितीची भूमिका नसून आपण शक्यतो सदरहू कामे पूर्ण करावीत, अशी समितीची सूचना असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता विभागाला दोन महिने वेळ द्यावा दोन महिन्यात काम पूर्ण करू असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

मार्गदर्शक तत्वाप्रमाणे आपल्याला एक वर्षात काम पूर्ण करावयाचे होते असे महालेखाकारांनी विभागाच्या निदर्शनास आणले असता सदरचे काम पूर्ण झाले नाही म्हणून संबंधितांनी एनओसी मिळण्यासाठी कोणते प्रयत्न केले त्याची चौकशी करायची आहे किंवा सदरहू कामासाठी एनओसी मिळण्यासाठी दोन महिने प्रयत्न करण्यात येतील त्यानंतर हे काम सुरू करायचे की नाही यासंबंधी निर्णय घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ही कामे दोन महिन्यात सुरू करावी किंवा रेल्वेच्या किंवा काही अडचणींमुळे काम होत नसेल तर रद्द करावे. ज्या अधिकाऱ्यांकडे हे काम सोपविलेले होते, ज्यांनी या कामात निष्काळजीपणा दाखविला म्हणून त्यांचेवर विभागाने कारवाई करावी, असे समितीचे आदेश आहेत. अन्यथा असे व्हायला नको की, भविष्यात चांगले काम करतील म्हणून या प्रकरणी त्या अधिकाऱ्यांना सोडून द्यावे असे समितीने विभागास आदेशित केले असता विभागीय सचिवांनी सकारात्मक असल्याचे समितीस अवगत केले.

खासदार निधीमध्ये कोणती कामे घेता येतात यासंबंधी मार्गदर्शक तत्वे आहेत. या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे कामे झाली नाहीत का अशी पृच्छा समितीने केली असता त्यावेळच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ही कामे प्रस्तावित होती. त्यावेळेस काही बदल झाले आहेत का, हे बघावे लागेल असा खुलासा महालेखाकारांनी केला.

यामध्ये विभाग कामाला मंजुरी देत नाही. विभाग इम्प्लीमेटींग एजेन्सी आहे The Collector will be able to tell about this issue अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

सन २०१३ ते २०१६ या कालावधीत मोठ्या प्रमाणात कामे सुरू झालेली आहेत, परंतु मोठ्या प्रमाणात अर्धवट स्थितीत आहेत. या कामांची आजची सद्यःस्थितीबाबतचे जे आकडे दिलेले आहेत तीच स्थिती आहे का अशी विचारणा समितीने केली असता अर्धवट कामे कधी पूर्ण होतील याची कमिटमेंट मी देतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले तसेच सन २०१३-२०१४ मध्ये ५६ कामे सुरू झालेली नव्हती, परंतु आज त्या कामाची संख्या ३२ वर आहे. यातील अर्धवट म्हणजेच प्रगतीपथावरील ८ कामे आहेत. २३ कामे सुरू केलेली आहेत सन २०१४-२०१५ मध्ये प्रगतीपथावर असलेली पूर्वी ५६ कामे होती, ती आता २४ आहेत. पूर्वी सुरू न झालेली ७४ कामे होती, ती आता ६६ आहेत. यापैकी ५८ कामे रद्द करण्यासंदर्भात खासदार महोदयांनी पत्र दिलेले आहे म्हणून ती संख्या मोठी असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

सदरची कामे मंजूर करण्याचे पत्र कोणी दिले होते आणि रद्द करण्याचे पत्र कोणी, कोणत्या वर्षी, कोणत्या तारखेला दिले अशी विचारणा समितीने केली असता अचुक तारीख माहित नाही, परंतु ५८ कामे रद्द करण्याचे सूचित केलेले आहे या कामासंबंधी काय मार्गदर्शक सूचना आहेत त्या बघून घेऊ असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

काम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली. माननीय खासदारांनी ते काम रद्द करण्यासाठी पत्र दिले आहे. विभाग तीन-तीन वर्षे काम करीत नाही म्हणून सदरहू काम रद्द करण्याचे पत्र दिलेले आहे ही कामे कशी पूर्ण होतील यासाठी विभागाने प्रयत्न करावेत असे समितीने नमूद करता सन २०१५-२०१६ मध्ये १७७ कामे प्रगतीपथावर होती, ती आता ९४ आहेत. सुरू न झालेली १११ कामे होती ती आता ५५ असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

तसेच खालीलप्रमाणे विवरण सादर केले.

मासिक अहवाल खासदार निधींच्या बाबतीत.

| वित्तीय वर्ष | एकूण मंजूर कामे संख्या | कामे पूर्ण झालेली संख्या | कामे प्रगतीपथावर असलेली संख्या | कामे सुरू न झालेली संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ५९१ | ५६० | ० | ३१ | सोबतच्या तक्त्या मधील शेवटचा रकाना सुरू न झालेली कामे ३१+६५अ६८=१६४ रद्द करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यात आला आहे. कृपया अनुपालन करण्यात आले आहे. मान्य करण्यात यावे. |
| २०१४-१५ | ४४५ | ३७२ | ८ | ६५ | |
| २०१५-१६ | ४६९ | ३७३ | २८ | ६८ | |
| | | | | १६४ | |

अशी कोणती कामे होती की, ती सुरू होऊ शकली नाहीत, त्या कामाचे स्वरुप काय होते या समितीच्या प्रश्नाला यामध्ये काही शौचालयाची कामे, पायवाट अशी कामे असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता सचिवांनी जो विषय सांगितला ती कामे पूर्ण करावी आणि जी कामे पूर्ण करता येणे शक्य नाही ती रद्द करावीत असे समितीने विभागास निदेश दिले असता जी कामे अर्धवट आहे ती मार्चपर्यंत संपविण्यात येईल अन्यथा रद्द करण्यात येतील असे समितीस आश्वासित केले.

**५.३ परिच्छेद क्रमांक ३.१.४.३ अग्राह्य कामे कार्यान्वित करणे :-**

एमएमआरडीएने विभागाला दिनांक २८/१२/२०११ रोजी पत्र पाठविले होते. त्यामध्ये एमएमआरडीए यांनी सांगितले होते की, १५० कोटी रुपयांमध्ये २ टप्प्यामध्ये म्हाडाकडे वर्ग करण्याचे आदेश दिलेले आहेत. याशिवाय मुंबई शहरामध्ये उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्तीची कामे आवश्यकतेप्रमाणे शासनाने घालून दिलेल्या रुपये २००० प्र.चौ.मी. या आर्थिक मर्यादेमध्ये करण्यात यावी. शिवाय PMGP कार्यक्रमातंर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये विशेष दुरुस्तीची काही कामे प्रस्तावित झाल्यास त्याचाही शासनाच्या धोरणानुसार विचार करण्यात यावा, असेही आदेश माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते. याचा अर्थ असा आहे की, जे काम स्वीकार्य नाही ते विभागाने घेतले असल्याचे समितीने नमूद केले असता एमएमआरडीएने प्रस्तावित केलेली कामे घेण्यात आली होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने ज्या पत्राचा उल्लेख करून या परिच्छेदाचे उत्तर दिले आहे त्या पत्रामध्ये सार्वजनिक शौचालये, भागामध्ये पाण्याचे कनेक्शन, बालवाडी, शाळाखोली, समाजकल्याण केंद्र इत्यादी कामे करावयाची होती. विभागाने बोअरवेल खाजगी संस्थेमध्ये काढली आहे. महालेखाकारांनी समितीला वैद्यनाथधाम,वजिरा नाका, शिवशक्ती को.ऑप सोसायटी मधील बोअरवेलचे फोटोग्रॉफस पाठविलेले आहेत हे मार्गदर्शक तत्वामध्ये कोठे आहे? विभागाने या कामाची तपासणी करावी मार्गदर्शक तत्वानुसार ही कामे खाजगी संस्थामध्ये बसत नसतील तर हे काम ज्या अधिकाऱ्याने केले असेल त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याची कार्यवाही करावी असे समितीने विभागास सांगितले असता यामध्ये जे काम नाही, त्याच्या व्यतिरिक्त जी कामे घेण्यात आली असतील त्या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

जे काम मार्गदर्शक तत्वामध्ये बसत नाही ते काम खाजगी जागेत केलेले आहे. हे काम ज्या अधिकाऱ्यांनी केले आहे त्यांच्याकडून पैसे वसूल करावे असे आदेश समितीने दिले असता विभागामार्फत याची चौकशी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

आता चौकशीचा मुद्दा कोठे आहे विभाग चौकशी करणार, त्यानंतर कोणी बघणारच नाही समितीचा मुद्दा असा आहे की, Now, we are here to decide the things. महालेखाकारांनी विभागाकडे चौकशी करून अहवाल पाठविला. आपण आम्हाला पत्र पाठवून दिले की, आम्ही एमएमआरडीएच्या मार्गदर्शक तत्वानुसार काम केलेले आहे. What was the MMRDA guidelines? सहा कामे एमएमआरडीएने सांगितली होती. त्या व्यतिरिक्त उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी दोन हजार चौरस मिटरपर्यंत खर्च करावेतत असा त्या पत्रात उल्लेख आहे. What is mean by PMGP अशी विचारणा समितीने केली असता PMGP चा फूलफॉर्म काय आहे हे आताच कन्फर्म सांगता येणार नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

याअनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, हे पैसे फक्त रिपेअर बोर्डाला दिले नव्हते तर रिपेअर बोर्ड आणि स्लम बोर्ड यांना दिले होते आणि हा विषय रिपेअर बोर्डाशी संबंधित आहे.

या विषयासबंधी विभागाने रिपेअर बोर्ड आणि स्लम बोर्ड एकत्रित मिळून बैठक घेऊन वस्तुस्थिती समितीसमोर सादर करावी असे समितीने विभागास सांगितले असता समितीने जेथे जेथे सांगितले की, अनियमितता झालेली आहे, त्याची चौकशी करू. चौकशी याचा अर्थ असा नव्हे की काम झाले की नाही झाले यामध्ये जबाबदार व्यक्ती कोण आहे, याची चौकशी केली जाईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

हा अतिशय गंभीर असा विषय आहे खासदारांनी सुचविल्याप्रमाणे कामे करण्यात आली आहेत. व्यायामशाळा, बालवाडी, समाजकल्याण केंद्र हे शाळांच्या कामांसारखीच आहे, हे असे कसे होऊ शकते. बोअरवेल खोदणे म्हणजे जलजोडणी प्रमाणेच आहे. या बाबींचा उल्लेख महालेखकारांनी त्यांच्या आक्षेपात केलेला आहे त्या आक्षेपाला केवळ पत्र पाठवून चालणार नाही हे प्रकरण अतिशय गंभीर आहे या प्रकरणाची विशेष चौकशी करून एक महिन्याच्या आत कारवाई करावी व तसा अहवाल समितीकडे सादर करावा असे समितीने सूचित केले. तसेच दलित वस्तीच्या ठिकाणी न बांधता सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या आवारात कामे केलेली असल्याचेही विभागाच्या निदर्शनास आणले. स्लमचे हे पैसे आहेत त्यामुळे ज्या ज्या अधिकाऱ्यांनी ही कामे केली आहेत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून वसुलीची कार्यवाही करावी आणि एक महिन्यात समितीकडे अहवाल पाठविण्यात यावा असे विभागास आदेशित केले तसेच विभागाने दिलेला रिप्लॉय समितीला मान्य नसून या विषयावर विभागाने समितीला डिटेल्स रिप्लॉय द्यावा त्यानंतर समिती या विषयावर पुन्हा साक्ष लावेल असे समितीने विभागास अवगत केले यावर एक महिन्यात ही माहिती देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. कारवाई करून अहवाल समितीकडे आल्यानंतर समिती अंतिम निर्णय घेईल असे मत समितीने व्यक्त केले.

त्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.

एम. एम. आर. डी. ए. कडून देण्यात आलेल्या रु.१५०.०० कोटी संदर्भात सदर निधी कसा खर्च करावा या संदर्भात ज्या सूचना देण्यात आल्या होत्या त्या अनुषंगाने तत्कालीन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी मा.प्रधान सचिव, गृहनिर्माण यांना दिनांक ०२/०१/२०१२ च्या पत्रान्वये कळविले होते. ज्यामध्ये असा उल्लेख आहे की, रु.१५०.०० कोटी कसा खर्च करावा याबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदय यांचेशी वर्षा या निवासस्थानी सविस्तर चर्चा झाली आहे व सदर चर्चेच्यावेळी मा.मुख्यमंत्री यांनी असे निर्देश दिले की, उपरोक्त निधीतील ५० टक्के निधी हा ३६ विधानसभा मतदार संघामध्ये व ५० टक्के निधी हा ६ लोकसभा मतदार संघात विभागण्यात यावा. सदर कामाच्या याद्या स्थानिक आमदार, खासदार यांचेकडून घेऊन त्यांची आवश्यकता व्यवहार्यता इत्यादी बाबी तपासून मंजूर कराव्यात.

उपरोक्त निर्देशाप्रमाणे एमएमआरडीएने दिलेल्या निधीमध्ये कामे घेण्यात आलेली आहेत. कामे पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र एम. एम. आर. डी. ए. ला सादर करण्यात आले आहे. ते त्यांनी स्वीकृत केले आहे. तसेच दिनांक २८ डिसेंबर २०११ च्या पत्रान्वये एमएमआरडीएने अनुदानाचा उपयोग कोणत्या कामासाठी करावयाचा आहे याची यादी दिलेली आहे, जी सोबत जोडली आहे आणि म्हणून करण्यात आलेली कामे ही ग्राह्य कामे असल्याने खुलासा मान्य करण्यात यावा अशी विनंती विभागाने केली आहे.

एम. एम. आर. डी. ए. कडून प्राप्त झालेल्या निधीमधून शासन निर्णयातील अभिप्रेत असलेल्या बाबींसाठी प्राधान्याने कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कार्यवाही न करण्याबाबत नमूद केले आहे.

### ५.४ परिच्छेद क्रमांक ३.१.४.४ कामाच्या कार्यान्वयनाचे अयोग्य नियोजन :-

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, माहे ऑक्टोबर २०१२ मध्ये ५१० शौचकुपांच्या बांधकामाच्या कामाची व्याप्ती कमी करून ती ३१५ वर सीमित करण्यात आली. त्यावर आपण २ कोटी ४५ लाख रुपये खर्च केलेत. त्याच भागात ३८ शौचकुपांचे बांधकामावर माहे मे २०१२ मध्ये रुपये २३.३९ लक्ष जास्त खर्च झाले, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे हे पैसे विभागाला वाचविता

आले असते असे मत समितीने व्यक्त केले असता विभागाने यासंबंधी आढावा घेतला आणि संबंधित टिमला तेथे पाठविले. ही ३८ कामे ५१० पैकी ओव्हरलॅपिंग होती की दुसरा विभाग होता, याबाबत आढावा घेण्यास सांगितले होते, परंतु हा विभाग दुसरा असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

रिप्लॉयमध्येच आहे की, हा दुसरा एरिया आहे. या ५१५ कामाच्या स्कोपमध्ये ३८ टॉयलेट ब्लॉक होते की नाही? ५१५ चे जे टेंडर काढले त्यामध्ये हे ३८ होते का? When this work was awarded? ३८ चे केव्हा अवॉर्ड केले या समितीच्या प्रश्नाला माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की,सन २००८-२००९ च्या डीएसआरप्रमाणे २०१० मध्ये ५१० कामे मंजूर करण्यात आली होती. ३८ कामे ही सन २०१२ मध्ये मंजूर केलेली असून त्यासाठीचा डीएसआर सन २०११ चा आहे. ५१० मध्ये ही कामे इन्क्लूड नव्हती त्याचे लोकेशन्स वेगळी आहेत.

यासंदर्भात खोलवर जाऊन तपासणी करण्याची आवश्यकता असून यामध्ये सचिवांनी स्वतः लक्ष द्यावे, असे समितीला वाटते. तसेच आणल्या जाणाऱ्या निधीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात रॅकेट असते हा गंभीर विषय आहे आणि यातील मॅक्झीमम प्रकार म्हाडामध्येच होतात. त्यामुळे या प्रकरणाबाबत सचिवांनी स्वतः लक्ष देऊन कार्यवाही करावी असे मत समितीने व्यक्त केले.

विभागाने याबाबतची आश्वासित माहिती समितीला दिली असून ती पुढीलप्रमाणे आहे.

मंडळाने रमाबाई आंबेडकरनगर, घाटकोपर (पूर्व) येथे वेगवेगळ्या ठिकाणी ५१० आसनी शौचालयाचे बांधणीच्या कामाकरिता निविदा मागविलेली होती यात प्रामुख्याने शौचालय बांधावयाची होती त्याची यात प्रामुख्याने ५१० आसनी शौचालये बांधावयाची होती त्याची संक्षिप्त रुपाने माहिती पुढीलप्रमाणे :—

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १ | कामाच्या निविदेतील रक्कम | ४,९०,२०,७९२ |
| २ | निविदेची मान्यता | ४०.०७% कमी दराने रु.२,९३,७८,१६० |
| ३ | निविदेतील कामाची व्याप्ती | ५१० शौचालय पुनर्बांधणी/नव्याने बांधणी |
| ४ | प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कामांची व्याप्ती | ३१५ शौचालय |
| ५ | ३१५ शौचालयांना अंदाजपत्रकानुसार लागणारी प्रमाणित रक्कम (रु.२.९३ × ३१५) ५१० | रु.१,८१,४५,३३४ |
| ६ | प्रत्यक्षात ठेकेदारास अदा करण्यात आलेली रक्कम | रु.२,४४,६१,४७२ |
| ७ | निविदेतील अटीनुसार ठेकेदारास करण्यात येणारे किंमत वृद्धी (Price Esclation) | रु.२४,६२,८१३ |
| ८ | निविदेतील अटीनुसार ठेकेदारास अदा करण्यात आलेल्या अतिरिक्त बाबी (Extra item) | रु.१०,५८,४१४ |
| ९ | शौचालयाच्या भूमीगत टाक्यांचे शासनाच्या निर्देशानुसार निरी संस्थेकडून उन्नतीकरण केल्यामुळे कामाच्या खर्चात झालेली वाढ तसेच प्रत्यक्ष झोपडपट्टीतील जागेच्या आवश्यकतेनुसार करावा लागलेली अतिरिक्त कामांचा खर्च | रु.२७,९४,९११ |
| १० | ३१५ शौचालयांच्या कामांकरिता निविदेतील ५१० शौचालयांच्या अंदाजपत्रकानुसार गुणोत्तराने काढलेला अतिरिक्त खर्च (अनु.क्र.७+८+९) | रु.६३,१६,१३८ |
| ११ | त्यामुळे बांधकामाकरिता प्रत्यक्षात झालेला खर्च (अनु.क्र.५+७+८+९) | रु.२,४४,६१,४७२ |

महालेखाकार यांनी ३.१.४.४ मधील ५१० टॉयलेट्ससंदर्भातील त्रुटी काढली होती. ५१० टॉयलेट्सची ऑर्डर २ कोटी ९४ लाख रुपयांची आहे आणि ३१५ टॉयलेट्ससाठी २ कोटी ४५ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये अशी विशेषता आहे की, याचे काम कॉम्प्युटर इंजिनिअर्स लिमिटेड या कंपनीला दिले. या कंपनीने टॉयलेट्स ब्लॉकचे काम केव्हापासून सुरू केले आहे, याची माहिती देण्यात यावी अशी समितीने पृच्छा केली असता यासंदर्भात ओपन टेंडर काढण्यात आले होते, सदरहू टेंडर ४० टक्के बिलोने गेले होते आणि

ओपन कॉम्पिटीशनमध्ये त्यांच्याकडून काम करून घेतलेले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले तसेच ५१० टॉयलेट्सकरिताची इस्टीमेटेड कॉस्ट आणि ॲडमिनीस्ट्रेटीव्ह ॲप्रुव्हल २ कोटी ९४ लाख रुपयांचे होते, परंतु ३१५ टॉयलेट्सचे काम केले असल्यामुळे २ कोटी ९४ लाख रुपयांमधून ६० टक्के रकमेमध्ये काम व्हायला पाहिजे होते. त्यापेक्षा अधिक पेमेंट का करण्यात आले, असे समितीचे म्हणणे असल्याचे विभागीय सचिवांनी मत व्यक्त केले.

महालेखाकार यांचे तेच म्हणणे आहे की, ३१५ टॉयलेट्सकरिता २ कोटी ४५ लाख रुपयांचे पेमेंट कशाप्रकारे करण्यात आले? यामध्ये एक्सेस पेमेंट झाल्याचे विभागाला वाटत नाही काय ३१५ टॉयलेट्सकरिता २ कोटी ४५ लाख रुपये खर्च कशा प्रकारे झाला अशी विचारणा समितीने केली असता The issue is as you have completed 60 per cent of the work, you should have paid only 60 per cent.u You have paid almost 100 per cent अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाने तो मुद्दा संपविला तेथील ३८ ब्लॉक्स वेगळे होते. परंतु हा मूळ कॉन्ट्रॅक्ट ५१० टॉयलेटचा होता व २ कोटी ९४ लाख रुपयांचे काम होते. ५१० टॉयलेट्स पैकी ३१५ टॉयलेट्स पूर्ण केले आहेत. परंतु ३१५ टॉयलेट्सकरिता जास्त निधी खर्च झाल्याचे दिसत आहे असे महालेखाकारांनी विभागाच्या निदर्शनास आणले असता यासंदर्भात मी स्वतः फाईल तपासतो व within next one month I will give the report असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

**५.५ परिच्छेद क्रमांक ३.१.४.५ दलित वस्त्यांचा शोध न घेता कामांचे नियमबाह्यपणे कार्यान्वयन :-**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, गलिच्छ वस्ती आणि दलित वस्तीचा पैसा विभागाला दुसरीकडे खर्च करता येत नाही, असा समितीचा समज आहे. समितीच्या सदस्यांनी गत २५ वर्षांपूर्वी नगरपालिकेत काम केलेले आहे. याचा अर्थ त्यांना माहितच नाही की, कोठे दलित वस्ती आहे.

दलित वस्त्या कोठे आहेत हे जाहीररित्या आपल्याला माहितच नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

दलित वस्ती या आयडेंटीफाईड असतात. मुंबईमध्ये किती दलित वस्त्या घोषित केल्या आहेत? अशी समितीने विचारणा केली असता मुंबईमध्ये कोणती झोपडपट्टी दलित वस्ती म्हणून आहे हे माहीत नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

नगरपालिकांमध्ये दलित वस्ती घोषित केली असल्याशिवाय काम करायला मान्यताच मिळत नसल्याचे समितीने विभागास अवगत केले असता शहरी आणि निमशहरी भागामध्ये दलित वस्त्या या आयडेंटिफाईड असतात त्यामुळे तेथे काहीच अडचण येत नाही. परंतु मुंबईमध्ये संमिश्र लोकवस्ती आहे. आमदारांनी सुचविलेल्या कामामध्ये जेथे जास्तीत जास्त दलित लोकसंख्या आहे तेथे काम केले जाते, परंतु तेथे निश्चित लोकसंख्या ही संमिश्र असते असा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी केला.

किती टक्के दलित असले तर आपण त्याला दलित वस्ती म्हणून संबोधतो, याच्या काही गाईड लाईन्स आहेत. समिती सदस्य हे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करतात त्यामुळे त्यांचा हा रोजचा विषय आहे. १०० टक्के संमिश्र वस्ती अशी कोठेही नसते. उदा. आंबेडकरनगर असेल तर तेथे दलित वस्ती मिळेल. आजही ५० टक्के झोपडट्टया या क्लासिफाईड आहेत. मुस्लिम समाजाची जेथे झोपडपट्टी आहे तेथे जास्तीत जास्त मुस्लीम लोक राहतात. दहा, वीस टक्के इतर दुसरे लोक राहतात, तसेच दलितांचेही आहे म्हणून दलित वस्त्या क्लासिफाईड केल्या पाहिजेत असे समितीने मत व्यक्त केले असता ही वस्तुस्थिती आहे की, दलित वस्त्यांचे वर्गीकरण झालेले नाही, परंतु तेथे काम झालेले आहे. जोपर्यंत दलित वस्त्या जाहीर होत नाहीत तोपर्यंत दलित वस्त्यांच्या निधीचा उपयोग करायला नको असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अशा प्रकारचा शासनाचा निर्णय आहे जोपर्यंत वस्त्यांचे वर्गीकरण होत नाही तोपर्यंत दलित वस्तीला मान्यता मिळत नाही. हा विषय समाजकल्याण विभागाकडे घेऊन जाऊया. समाजकल्याण विभाग तो अधिसूचित आहे की, नाही हे खात्री करून देतो. समाजकल्याण विभागाकडून कन्फर्मेशन मिळाल्यानंतरच आपल्याला काम करता येते अशी माहिती समितीने दिली असता दलित वस्त्या अधिसूचित कराव्यात किंवा आजच्या परिस्थतीमध्ये कसे काम करायचे यासंदर्भात थोडया मार्गदर्शक तत्वे द्यावीत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

विभागाने लोकसंख्येचे आकडे समाजकल्याण विभागाकडे दिले की समाजकल्याण विभाग ते करून देतात. दलित वस्त्यांचे आकडे महानगरपालिकेतून मिळतात असेही समितीने विदित केले तसेच गोंदिया येथे लहान नगरपालिका आहे तरी देखील तेथे दलित पॅकेज जाहीर केले जाते. जेथे स्लम विभाग आहे तेथे दलित वस्तीच्या नावाखाली आपण पैसे खर्च केलेले आहेत. येथे आमदार, खासदार कायदा चालतो एखाद्या ठिकाणी आमदारांनी सांगितले की, ही दलित वस्ती आहे तर अधिकारी तेथे काम करतात असे समितीला दिसत असल्याचे समितीने नमूद केले. विभाग दलित वस्तीच्या नियमान्वये कितीही पैसे खर्च करू शकतो. जेथे दलित वस्तीचे पॅकेज जाहीरच नाही तेथे दलित वस्तीचे पैसे खर्च केले जात असतील, असा प्रकार मुंबईत घडत असेल तर हा प्रकार सर्व नगरपालिकांमध्ये लागू करावा. तिकडे वेगळा कायदा

आणि येथे वेगळा कायदा हे कसे शक्य आहे? ही बाब आक्षेपार्ह आहे. चार घर दलितांची आहेत आणि ५० घरे दुसऱ्या जातीची आहेत तेथे पैसे कसे खर्च करता येतील अशी पृच्छा ही समितीने केली. या अहवालात असे म्हटले आहे की, डीपीडीसीच्या बैठकीत सन्माननीय ग्रामविकास मंत्री आणि मुंबई शहर जिल्ह्याचे माननीय पालक मंत्री, सन्माननीय खासदार/आमदारांनी प्रस्तावित केलेली कामे दलित वस्ती म्हणून विचारात घ्यावी परंतु यासाठी सिस्टीम ठरवून दिलेली असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता जोपर्यंत दलित वस्ती जाहीर होत नाही तोपर्यंत तेथे पैसे खर्च करता येत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

गलिच्छ वस्तीचा पैसा जातीचा आधार न घेता कोठेही खर्च करता येईल, परंतु दलित वस्तीमध्ये ५० टक्के बांधव दलित असले पाहिजे तरच आपल्याला हा निधी खर्च करता येईल. अशा प्रकारची मार्गदर्शक तत्व असताना त्याचे पूर्णपणे पालन करण्यात आले नाही. त्या ठिकाणच्या माननीय पालक मंत्र्यांच्या निर्देशाप्रमाणे खासदार निधी आणि आमदार निधी खर्च करू शकतो, हा विषय मान्य करता येत नाही. ही चूक झालेली आहे, याबद्दल त्यावेळच्या अधिकाऱ्यांनी शासनाची मान्यता न घेता काम केलेले आहे अशी जी कामे केलेली आहेत ती अयोग्य आहे म्हणून या प्रकरणी तत्कालीन अधिकाऱ्यांना " कारणे दाखवा नोटीस " देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले.

या अनुषंगाने विभागाने पुढील माहिती समितीस अवगत केली.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने दलित वस्त्यांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याकरिता शासनाने उपलब्ध केलेल्या निधीतून कामे करण्याकरिता त्याच वस्त्यामध्ये कामे व्हावीत या उद्देशाने दलित वस्त्यांची माहिती मिळण्याकरिता मा.जिल्हाधिकारी/मुंबई शहर तसेच मुंबई उपनगर यांना अनुक्रमे पत्र क्र.१३३८/दिनांक १२ ऑगस्ट २०११ व क्र.१३३९ दिनांक १२ ऑगस्ट २००८. २०११ अन्वये कळविले होते. तसेच याच बाबतीत मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/ प्राधिकरण यांनी पत्र क्र.१७७९ व १७८० दि. ५ ऑक्टोबर २०११ अन्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर व उपनगर यांना अर्धशासकीय पत्र दिलेले होते.

उप जिल्हाधिकारी (अति./निष्का) व सक्षम प्राधिकारी, कुलाबा विभाग यांनी त्यांचे कार्यालयात दलित वस्ती याबाबतची गणना झालेली नसल्यामुळे घोषित झोपडपट्ट्यापैकी ५०% पेक्षा जास्त दलित वस्ती असलेली झोपडपट्टीची निश्चित माहिती या कार्यालयास उपलब्ध नाही असे त्यांचे पत्र क्र.कक्ष/१/टे-१/दलित वस्ती यादी/का.वि.५९९/२०११ दिनांक ५ ऑक्टोबर २०११ अन्वये कळविलेले आहे.

या बाबतीत मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने देखील प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे विभागाकडून देखील माहिती मिळविण्याकरिता पत्र क्र.१५४८ दिनांक १३.०९.२०११ पाठविले होते.

शासनाने जारी केलेल्या नागरी दलित वस्त्यांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याकरिताचा शासन निर्णय क्र.झोपसु/२०१०/प्र.क्र.१७७/झोपसु-१ अ, दिनांक २५ फेब्रुवारी २०११ या मधील अट क्र. १ मध्ये असे नमूद केले आहे की, मुंबई शहर जिल्ह्यामधील लोकप्रतिनिधींनी सुचविलेली लोकोपयोगी व अत्यावश्यक नागरी सुविधांच्या कामाची तातडी, आवश्यकता व्यवहार्यता, सुसाध्यता व उपलब्ध निधी विचारात घेऊन निधी वितरित करण्यात यावा.

शासनाने नागरी दलित वस्तीच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्वांत शुद्धिपत्रकाद्वारे सुधारणा केलेली असून यात खालीलप्रमाणे उल्लेख करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौद्धांसाठी ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध (विशेष घटक) यांची लोकसंख्या जेथे तुलनेने अधिक आहे तेथे प्राधान्याने उतरत्या क्रमाने या शासन निर्णयात खाली नमूद करण्यात आलेली सुविधाविषयक कामे हाती घेण्यात येतील. यामुळे सदर ठिकाणी मार्गदर्शक तत्त्वानुसार कामे करण्यात आलेली आहेत. तसेच मा.आमदार महोदयांनी सुचविलेल्या काही कामास शासनाकडून मंजुरी घेण्यात आलेली आहे. उदा.वरळी मतदारसंघाचे रु.२.४० कोटींचे काम या सहायक अनुदानातून शासनाने निर्णय क्र.झोपसु/२०१०/प्र.क्र.१७७/झोपसु-१ अ दिनांक २५ फेब्रुवारी २०११ अन्वये मंजूर केलेले आहे.

**५.६ परिच्छेद क्रमांक ३.१.४.६ अंतर्गत नियंत्रण मालाची तपासणी करण्यातील अपर्याप्तता :-**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, मटेरिअल टेस्टींग लॅबकडून घ्यावयाचे ४० कामांची प्रमाणपत्र बोगस सादर केलेली आहेत, तसेच या प्रमाणपत्रांची तपासणी न करता त्यांचे पेमेंट केलेले आहे. यासंदर्भात संबंधित कंत्राटदारावर एफआयआर दाखल करण्यात आला आहे काय, त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहे काय किंवा त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे. काळ्या यादीत टाकले नसेल तर सदरहू कंत्राटदार आजही कामे घेत आहेत काय, तसेच त्यांच्याकडून संबंधित रकमेची वसुली करण्यात आली आहे काय ? या प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत.

समितीच्या उपरोक्त प्रश्नांना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यासंदर्भातील आढावा घेतलेला असून संबंधित कंत्राटदारावर आजपर्यंत एफआयआर दाखल करण्यात आलेला नाही, तसेच त्यांना काळ्या यादीत देखील टाकलेले नाही. परंतु एफआयआर दाखल करण्याच्या व काळ्या यादीत टाकण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

संबंधित सर्व कंत्राटदार यांच्यावर एफआयआर दाखल करण्याची व काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही एका महिन्याच्या आत करण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले. महालेखाकार यांचा आक्षेप आल्यावर संबंधित कंत्राटदारावर कारवाई न करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी. केवळ खालील अधिकाऱ्यांवर कारवाई करून चालणार नाही. याचे कारण म्हणजे After objections that were raised by A.G. , they should have make an inquiry and action should have been taken. ४० कामांचे मटेरिअल टेस्टींग लॅबकडून घ्यावयाचे सर्टिफीकेट बोगस सादर करण्यात येऊन पैसे काढण्यात आलेले आहेत ही फार गंभीर बाब आहे. असे असतानाही कोणत्याच अधिकाऱ्याने संबंधितांवर कारवाई केलेली नाही. त्यामुळे संबंधित कंत्राटदारांसह संबंधित अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी. तसेच या मुद्याप्रमाणेच व्हीजीलन्सचा मुद्दा देखील महत्त्वाचा असल्याचे समितीने नमूद केले असता सदरहू व्हीजीलन्सचा मुद्दा कंम्प्लाय झालेला आहे. परंतु पूर्वीच्या मुद्यासंदर्भात कंत्राटदार यांच्यावर एफआयआर दाखल करणे व त्यांना काळ्या यादीत टाकणे या सूचना दिलेल्या आहेत. यासंदर्भातील टेस्टींग म्हाडाच्या लॅबमध्ये केली जाते. परंतु आता विभाग सूचना देणार आहे की, त्याच्या २० टक्के टेस्ट स्टेटच्या लॅबमध्ये करावी आणि त्याच्या १० टक्के टेस्ट केंद्राच्या लॅबमध्ये करावी, यामुळे थ्री लेअर व्हेरीफीकेशन होऊ शकतो अशा सूचना देण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

यामधील ३९ केसेसमध्ये विदाऊट रिपोर्ट पैसे देण्यात आलेले आहेत असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता अशा लोकांवर त्यांना काळया यादीत टाकण्याची व एफआयआर दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या अनुषंगाने विभागाने आणखी अशी माहिती दिली की,

(१) ४० बनावट चाचणी प्रमाणपत्राबाबत संबंधित नोंदणीकृत ठेकेदारास व सुशिक्षित बेरोजगार अभियंते यांना काळ्या यादीत टाकणेबाबत मंडळाने म्हाडाचे उप मुख्य अभियंता, परिमंडळ-२/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना पत्र क्र.९६७२, ५४, २०९८ दिनांक २ मार्च २०१७, ४ मार्च २०१७, अन्वये कळविले आहे. तसेच मजूर सहकारी संस्थांच्या बाबतीत अध्यक्ष काम वाटप समिती तथा उप निबंधक, मुंबई शहर यांना मंडळाने पत्र क्र.९६७३, ५३, २०९९ दिनांक २ मार्च २०१७, ४ मार्च २०१७ अन्वये कळविले आहे. संबंधित ४० कामे सुस्थितीमध्ये असून सध्याच्या कार्यकारी अभियंता यांनी बहुतांश ठिकाणी त्यात गैरव्यवहार झाला नसल्याचे दिसून येत आहे. अशी त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन खात्री केलेली आहे.

(२) उक्त ३९ कामांबाबत सद्य:स्थितीत त्या त्या विभागातील उप अभियंता यांचे काम सुस्थितीत असल्याबाबत प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. सन २०१७-१८ मध्ये हाती घेण्यात येणाऱ्या कामांच्या बाबतीत साहित्यांच्या काही चाचण्या राज्य शासन/केंद्र शासनाच्या प्रयोग शाळांतून तपासणी करून घेण्याबाबतचे निर्देश संबंधित कार्यकारी अभियंता यांना देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त (४०+३९) = ७९ कामाबाबत सद्य:स्थितीत कार्यरत असलेल्या अभियंत्यांनी ही कामे सुस्थितीत असल्याबाबत प्रमाणित केलेले आहे. या ७९ कामांचे मालांची चाचणी करण्याकरिता त्या त्या वर्षात म्हाडा प्राधिकरणाच्या दक्षता व गुणनियंत्रण प्रयोगशाळेतील चाचणी दराच्या तीनपट रक्कम ही प्राधिकाऱ्याने जारी केलेल्या परिपत्रक क्र.C-१/VQC/A/५५४/०५, दिनांक १२ एप्रिल २००५ अन्वये त्या त्या कंत्राटदाराकडून वसूल करण्याचे प्रस्तावित आहे. परंतु हे परिपत्रक दिनांक ३१/०३/२००५ पर्यंतच्या कामांकरिता लागू होते. हेच परिपत्रक या कामांकरिता लागू करून त्यांचेकडून सदरची रक्कम वसूल करण्याचे प्रस्तावित आहे. ज्यात सुमारे रु.९,९९,४४४ एवढी रक्कम प्राधिकरणाच्या खात्यामध्ये जमा होऊ शकेल.

ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा यांनी दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन देऊन सदर निवेदन अतिरिक्त मुख्य सचिव, गृहनिर्माण तसेच अध्यक्ष, विधीमंडळ लोकलेखा समिती यांच्या निदर्शनास आणावे अशी विनंती केली आहे.

कंत्राटदारांनी कामाकरिता वापरलेल्या साहित्याचे सादर केलेले टेस्ट रिपोर्ट हे खरे किंवा खोटे याबाबत संबंधित अधिकारी सकृतदर्शनी सत्यता पडताळू शकत नाही. त्यामुळे कंत्राटदारांनी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येऊ नये तसेच बिलामध्ये टेस्ट रिपोर्ट अनावधानाने पहाण्याचे राहून जाऊ शकते. एवढ्या मोठया प्रमाणावर कामे करीत असताना सर्वच कामांमध्ये अधिकारी जागेवर जाऊन तपासणी करीत असतात. तसेच दक्षता विभागाकडूनही वेळोवेळी तपासणी करण्यात येते. म्हाडाच्या विविध मंडळाकरिता साहित्य चाचणी शुल्कापोटी दोन ते तीन पट रक्कम वसूल करता येणे शक्य आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येऊ नये अशी धारणा आहे.

चाळीस बनावट प्रकरणातील संबंधित ठेकेदारानीही विनंती करून असे नमूद केले आहे की, आम्हाला आपण या कार्यवाही अंतर्गत काळ्या यादीत टाकलेले आहे. संबंधित कामे जागेवर असल्याची व दर्जेदार असल्याची आपल्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे, त्यामध्ये कामाचा दर्जा चांगला असल्याने आमच्यावर करण्यात आलेली कारवाई पुरेशी असून आमच्यावर गुन्हा दाखल करण्यात येऊ नये. ही बाब लोकलेखा समितीचे अध्यक्षांचे निदर्शनास आणावी. याउपर जो निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

संबंधितांवर तशी कारवाई करण्यात यावी, याबद्दल दुमत नाही. परंतु विदाऊट रिपोर्ट पैसे देणे व बोगस असलेल्या लॅब सर्टिफीकेटची तपासणी न करता पैसे देणे याकरिता विभागाचे अधिकारी देखील जबाबदार आहेत असे मत समितीने व्यक्त करता विभागामार्फत संबंधित कंत्राटदार व विभागाचे संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करू. प्रमाणपत्र सादर न करता पेमेंट झालेले आहे, म्हणजेच विभागाचे अधिकारी देखील त्याकरिता जबाबदार आहेत. त्यामुळे याकरिता कोणते अधिकारी जबाबदार आहेत, ते तपासून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

काम सुरू असताना व्हीजीलन्सच्या अधिकाऱ्यांनी देखील तपासणी केलेली नाही. तसेच व्हीजीलन्सच्या क्लिअरन्स शिवाय कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित न करण्याचा नियम आहे. अशा प्रकारची सूचना दिली असताना देखील त्याचे पालन झाल्याचे दिसत नाही. लेखा परीक्षणात असे आढळून आले की, चाचणी तपासणी केल्यावर १२७० प्रकरणांपैकी २७ प्रकरणांमध्ये ३२ ओ ॲण्ड एम प्रलंबित असतानाही कार्यकारी अभियंता यांनी कोणतेही ओ ॲण्ड एम प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र दिले व २ कोटी ६० लाख रुपयांची देयके पास केली असल्याचे समितीने विभागास अवगत केले असता अंतर्गत लेखापरीक्षण आणि व्हीजीलन्स दोन्ही बाबी तपासून घेण्यात येतील तसेच यासंदर्भात व्हीजीलन्सचे क्लिअरन्स नव्हते यासंदर्भात जबाबदारी निश्चित करून रिकव्हरी करावी लागेल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

यामध्ये कंत्राटदाराकडून वसुली करण्यात यावी, त्यांना काळ्या यादीत टाकावे, इत्यादी मुद्दे आले आहेत. यामधील सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर देखील जबाबदारी निश्चित करण्यात यावी याचे कारण म्हणजे, काही न करता पैसे काढणे हे कंत्राटदाराचे काम आहे, परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी सतर्क राहून तसे होऊ द्यायला नको असे समितीने विदित केले असता प्रमाणपत्र न देता, व्हीजीलन्सचे क्लिअरन्स न घेता देयक काढण्यात आले असेल तर यामध्ये संगनमत असल्याचे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

त्याला कोल्युजन आहेच अशा अधिकाऱ्यांना एका महिन्याच्या आत निलंबित केले पाहिजे हा फार गंभीर विषय आहे. तपासणी करतो, कार्यवाही करतो, असे म्हणून काहीही होणार नाही. व्हीजीलन्सचे सर्टिफीकेट नसताना देखील कार्यकारी अभियंता दुर्लक्ष करीत असेल तर हे योग्य नाही. What action will you take? आता चौकशी झालेली आहे, त्यामुळे पुन्हा चौकशी करण्याचा प्रश्नच येत नाही. ही वस्तुस्थिती नाही, असे आपण सांगावे, समिती ते मान्य करते असे समितीने विभागास सांगितले असता संबंधित दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन करणे, त्यांची विभागीय चौकशी सुरू करणे, एफआयआर दाखल करणे अशा प्रकारची कार्यवाही केली जाऊ शकते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

संबंधित दोषी अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात यावे, अशी समितीची मागणी आहे. विभागाने समितीचा संदर्भ घेऊन त्या अधिकाऱ्यांचे निलंबन करावे हे मोठे प्रकरण आहे. त्यांच्यामुळेच २ कोटी ६० लाख रुपयांची देयके पास करण्यात आलेली आहेत. अधिकाऱ्यांना काही माहीत नसते, असे नाही. हे सर्व ठरवून होत असते. कनिष्ठ अभियंता, सहाय्यक अभियंता यांच्याकडून फाईल पुटअप करतेवेळी फाईलवर सर्व बाबी लिहिल्या जातात. कोणतीही फाईल स्टेप बाय स्टेप पुटअप होत असते व त्या फाईलवर प्रत्येक टेबलवरील अधिकाऱ्याचा रिमार्क असतो. कनिष्ठ अभियंता यांनी सदरहू फाईलवर लिहिलेला रिमार्क पहावा. खालील अधिकाऱ्याने निदर्शनास आणले असतानाही कार्यकारी अभियंता यांनी देयके दिली का ते पहावे. तसेच ही बाब कनिष्ठ अभियंता किंवा सहायक अभियंता किंवा उप अभियंता यांनी जाणीवपूर्वक निदर्शनास आणली नाही काय, ते देखील तपासावे व संबंधित सर्वांवर कारवाई करण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता विभागीय सचिवांनी याबाबत सकारात्मकता दर्शविली.

विभागाने उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, टेस्ट रिपोर्ट कॉन्ट्रॅक्टरकडून मागविला जातो परंतु सदरहू रिपोर्ट लेखा विभागाने मागवायला पाहिजे असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले यावर ती प्रोसिजर चुकीची आहे, हे विभाग मान्य करतो. विभागाने सॅम्पल सील करून पाठविले पाहिजे आणि त्याचा डायरेक्ट रिपोर्ट आला पाहिजे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाचे म्हणणे योग्य आहे जर असे झाले नाही तर कंत्राटदार त्यांना पाहिजे तसा किंवा बोगस रिपोर्ट आणतील असे समितीने विदित केले असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, त्यातील काही सॅम्पलची तपासणी २० टक्के स्टेट लेव्हल लॅबमध्ये व १० टक्के सेंट्रल लेव्हलवरील लॅबमध्ये केली पाहिजे व तशा सूचना देण्यात येतील.

इंटरनल ऑडीट विभाग असताना देखील २०११ पासून ऑडीटची सीस्टीम म्हाडामध्ये नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. याअनुषंगाने महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, टेस्टींग रिपोर्ट शिवाय पेमेंट कसे रिलीज केले जाते, याबाबत म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता आहे यासंदर्भात समन्वय साधला जात नाही काय? महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, मला असे वाटते की, प्रोसिजर ले डाऊन आहे प्रोसिजरचे उल्लंघन झालेले आहे, असे सकृतदर्शनी दिसून येते आणि समितीने ते पॉईंट दिलेले आहे. We will have to fix the responsibility. In future, we have to avoid this.

संबंधितांवर अशी कठोर कारवाई करण्यात यावी की, भविष्यात त्यांच्याकडून व इतरांकडून असा प्रकार केला जाणार नाही. सिस्टीममध्ये सुधारणा करायची असेल तर संबंधितांवर कारवाई करावीच लागणार आहे. अन्यथा आपण केवळ आश्वासन दिले आणि हा विषय संपला, असे व्हायला नको. यासंदर्भात संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एका महिन्याच्या आत सादर करण्यात यावा. तसेच आजच्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या सर्व आश्वासनांबाबत कार्यवाही करून एका महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. तसेच जी कामे करण्यात येतील व ज्या बाबी रद्द करण्यात येतील, त्याबाबत देखील कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची सूचना आहे.तसेच अंतर्गत लेखापरीक्षण झालेले नाही, याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता अंतर्गत लेखापरीक्षण विंगच्या संदर्भात एक अंतर्गत लेखा कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे व त्याकरिताची पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्याचे कार्यान्वयन सुरू झालेले आहे. वर्षातून एकदा अंतर्गत लेखापरीक्षण होईल, अशी काळजी घेतली जात आहे. ही कार्यवाही सन २०१४ पासून सुरू केलेली असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

सन २०१४ पासून नियमित अंतर्गत लेखापरीक्षण झालेले आहे काय? अंतर्गत लेखापरीक्षण करण्याची पद्धत कशी आहे? अशी विचारणा समितीने केली असता सन २०१४ पासून नियमित अंतर्गत लेखापरीक्षण केले जाते याकरिता दोन अकाऊंट ऑफीसर आणि चार कर्मचारी नेमलेले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

अंतर्गत लेखापरीक्षणासाठी विभागाचे अधिकारी नेमण्यात येऊ नये. याचे कारण म्हणजे यामध्ये असे होते की, संबंधित ऑडीट पार्टी येते आणि जाते. त्यामुळे समितीचे असे म्हणणे आहे की, अंतर्गत लेखापरीक्षणासाठी एक पॅनल तयार करण्यात यावे आणि कोणती ऑडीट पार्टी कुठे जाणार आहे, याकरिता रॅन्डमली चिठ्या टाकून ठरविण्यात यावे. विभागाला खरोखर पारदर्शकता आणायची असेल तर असे करावे. अन्यथा केवळ कागदोपत्री करायचे असेल तर यांनी सांगितलेली सिस्टीम करावी असे मत समितीने व्यक्त केले असता यांच्या अंतर्गत लेखापरीक्षणामध्ये अकाऊंट ऑफीसर असतात. परंतु शासकीय स्तरावर देखील ऑडीटची टीम तयार करण्यात यावी, अशी समितीची सूचना असल्याचा उल्लेख विभागीय सचिवांनी केला.

तसेच अंतर्गत लेखापरीक्षण कक्ष तयार करण्यात आलेला असून त्याप्रमाणे दरवर्षी लेखापरिक्षण केले जात आहे. यापुढे समितीच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व तसे निर्देश इंटरनल ऑडीट पार्टीला देण्यात येतील असे समितीस अवगत केले.

उपरोक्त समितीने नमूद केल्याप्रमाणे अंतर्गत लेखापरीक्षण करावे असे समितीने पुनः नमूद केले.

आजच्या बैठकीतील प्रत्येक बाबीला विभागाकडून समर्पक आश्वासन मिळालेले आहे. परंतु एकाही प्रश्नाचे स्पष्ट उत्तर मिळालेले नसल्याचे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

विभागाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली जाईल व तसे झाले तर मोठी सुधारणा होणार असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

साक्षीकरिता येत असताना you should come prepare with present status. हा विषय आता लक्षात आलेला आहे. आपण याबाबतची पुन्हा चौकशी करणार व आम्ही पुन्हा साक्ष लावणार, हे असेच सुरू रहायला नको असे समितीने विभागास सांगितले असता या विषयावर ३८ या भागावरच कॉन्सनट्रेट करीत राहिलो आणि त्यामुळे महालेखाकारांनी उपस्थित केलेला मुद्दा आम्ही काढू शकलो नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाचे म्हणणे आहे की, आता ते करण्यात येईल, ती कामे गाईडलाईन्स प्रमाणे बसतात की नाही असे महालेखाकारांनी मत व्यक्त केले असता त्यामध्ये एवढेच सबमीशन आहे की, गाईडलाईनचा पाठपुरावा हा जिल्हाधिकारी यांनी केला पाहिजे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्याकरिता नव्याने मंजुरी घ्यावी लागेल असे महालेखाकारांनी सांगितले असता रद्द करण्यापूर्वी किंवा नव्याने मंजुरी घेण्यापूर्वी काम पूर्ण करता येईल की, नाही किंवा काम सुरू करता येईल की, नाही याकरिता दोन महिन्यांचा वेळ मिळालेला आहे. विभागामार्फत यामध्ये काही करू शकलो तर फार चांगली बाब असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. विभागाने ते चौकटीत करावे असे समितीने मत व्यक्त केले.

## (ब) गृहनिर्माण विभाग

**६ साक्ष :—**

**६.१ परिच्छेद क्रमांक - ३.२.१ : महसुलाची हानी :-**

उपरोक्त परिच्छेदाअंतर्गत असलेल्या राजयोग सोसायटी संदर्भात माहिती देण्यात यावी असे समितीने नमूद केले असता वर्सोवा-अंधेरी मध्ये म्हाडाने राजयोग सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी २२५ सदनिका विकसीत केल्या. दिनांक २०.०२.२००९ रोजी त्याला शासन मंजुरी देण्यात आली. त्यांतर्गत शासनाच्या दिनांक १८.०८.२००९ च्या आदेशान्वये म्हाडाला आतापर्यंत २०३ सभासदांची यादी प्राप्त झाली. त्यानंतर दिनांक १०.०२.२०१० रोजी १४ सदस्यांची यादी म्हाडाला प्राप्त झाली. त्यानंतर पुन्हा दिनांक ११.०५.२०१० रोजी ६ सदस्यांची यादी प्राप्त झाली. अशाप्रकारे शासनाद्वारे या सोसायटीमधील २२५ सदनिकांपैकी २२३ सदस्यांची नावे फायनल करून म्हाडाला प्राप्त झालेली आहेत. सोसायटीमध्ये अजूनही ०२ सदनिका शिल्लक आहेत.

सुरुवातीला म्हणजेच सदनिका वाटपाच्या वेळी सदनिकेची किंमत ४२ लाख ४६ हजार रुपये ठेवण्यात आली होती. त्यानुसार संबंधितांना लेटर इश्यु झाले व त्याप्रमाणे संबंधितांनी पेमेंट केले. त्यानंतर पीओएल डेटा म्हणजेच प्रायमरी ऑफर लेटर ज्या दिवशी इश्यू झाले त्याप्रमाणे त्याचे रिकॅलक्युलेशन केले पाहिजे होते. १९० सदनिकांची किंमत प्रत्येकी ४२ लाख ४६ हजार रुपये होती. परंतु पुनर्मुल्यांकन केल्यावर सदनिकेची सुधारीत किंमत ४४ लाख ३७ हजार रुपये झाली. त्यापैकी जवळपास ३६ सदस्यांनी पूर्ण रक्कम भरलेली आहे. आणि १५३ सदस्यांनी पूर्ण रक्कम भरलेली नसल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सुधारीत रक्कम ४४ लाख ३७ हजार रुपये ठरविली. ही सुधारीत रक्कम सुरुवातीच्या २०३ सदस्यांना लागू आहे की, नंतर प्राप्त झालेल्या यादीतील १४ सदस्यांना लागू आहे, याबाबत माहिती देण्यात यावी अशी समितीने विचारणा केली असता वेगवेगळ्या सदस्यांना ज्या तारखांना ऑफर लेटर मिळाले त्याप्रमाणे सदनिकांचे रेट निश्चित केलेले आहेत. १९० सदनिकांची सुधारीत विक्री किंमत ४४ लाख ३७ हजार ठरविण्यात आली. त्यानंतर दिनांक ०१.०९.२०१० रोजी ०६ सदनिकांचे तात्पुरते देकारपत्र झाले व त्या सदनिकांची किंमत ४२ लाख ४६ हजार रुपयांपासून ५१ लाख ४१ हजार रुपये झाली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

नंतरच्या ०६ सदनिकांकरीता जास्तीची रक्कम कशी वाढली या समितीच्या प्रश्नाला त्या सदनिकांचे वेगवेगळ्या वर्षी देकारपत्र मिळाले असल्यामुळे ती रक्कम आकारण्यात आलेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१९० सदनिका आणि ०६ सदनिकांच्या रकमेमध्ये खूप फरक आहे याबाबत समिती माहिती जाणून घेऊ इछिते असे समितीने नमूद केले असता सदरहू रक्कम जास्तीची नाही त्यामध्ये तारखेचा फरक असल्यामुळे रकमेमध्ये फरक पडलेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एका वर्षामध्ये एवढा फरक पडतो काय? ०६ सदनिकाधारकांकडून ४४ लाख ३७ हजार रुपयांऐवजी ५१ लाख ४१ हजार रुपये घेण्यात आलेले असल्याचे समितीने नमूद केले असता त्यामध्ये इंटरेस्टचा देखील समावेश असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. याअनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, इंटरेस्ट एवढा कसा होऊ शकेल या रकमेमधील कॅलक्युलेशन कसे केले याची माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता यासंदर्भात केलेल्या कॅलक्युलेशनसंदर्भातील सर्व कागदपत्रे समितीला सादर करण्यात येतील असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. तथापि माहिती अप्राप्त आहे.

त्यानंतरच्या सदनिकांची माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले असता त्यानंतरची आणखी एक सदनिका ५१ लाख ५५ हजार रुपयांना वाटप करण्यात आली. या सदनिकेच्या दरामध्ये पूर्वीच्या ०६ सदनिकेंच्या तुलनेत सुमारे १० ते १५ हजार रुपयांची वाढ झालेली आहे. त्यानंतरची एक सदनिका दिनांक ०१.११.२०१० रोजी वाटप करण्यात आली. त्या सदनिकेची किंमत ४२ लाख ४६ हजार रुपयांपासून ५२ लाख ४१ हजार रुपये झाली. याचे कारण म्हणजे यामध्ये एका महिन्याचे अंतर झाले. त्यानंतर आणखी एक सदनिका दिनांक १५.११.२०१० रोजी वितरित करण्यात आली व तिची किंमत ५५ लाख ६० हजार रुपये झाली. त्यानंतरच्या एका सदनिकेची किंमत पुन्हा वाढली. मी यासंदर्भात लेटेस्ट माहिती देतो की, दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी वितरित केलेल्या सदनिकेची किंमत ४४ लाख १० हजार रुपये झाली. आता ०२ सदनिका शिल्लक असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

एकूण किती रक्कम प्राप्त झाली आणि किती रक्कम बाकी आहे, याबाबत माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास अवगत केले असता एकूण २२३ सदनिकाधारकांना ताबा देण्यात आला असून १६३ सदनिकाधारकाकडून सुधारित विक्री किंमतीनुसार ६ कोटी १८ लाख रुपये वसुली रक्कम व्याजासह येणे बाकी असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच सदरहू प्रकरणी संबंधिताना नोटीस दिली असून नोटीस दिल्यानंतर ६ कोटी १८ लाख रुपये वसूली पैकी ४ कोटी ४ लाख रुपये रक्कम संबंधितांनी भरलेली असल्याचाही खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. तसेच उर्वरित वसुली प्रकरणी संबंधितांना नोटीस देण्यात आली असून पुन्हा स्मरणपत्र देण्यात येईल असेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

राजयोग सोसायटीकडून ५.७७ कोटी रुपये ड्यूज रक्कम व्याजासह आहे काय असा प्रश्न महालेखाकारांनी विचारला असता सदरहू ड्यूजची रक्कम व्याजासह गणना करून ६.१८ कोटी रुपये इतकी असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले. याअनुषंगाने महालेखाकारांनी प्रिंसिपल अमाऊंट बाबत बोलत असून व्याजाबाबत बोलत नसल्याचे विभागास अवगत केले The Society paid only Rs. 89.77

crore out of Rs.95.54 crore between August, 2009 and June 2011. The outstanding dues were Rs. 5.77 crore. I am not talking about interest.

यावर विभागीय प्रतिनिधींनी असे अवगत केले की, नोटीसा देण्यात आल्या होत्या व आजच्या स्थितीत १० कोटी २२ लाख रुपये वसुली रकमेपैकी ४.४ कोटी रुपये वसूल झाले आहेत. फरकाच्या रकमेची वसुली बाकी आहे.

The figures which A.G. have quoted and the figures which Department have quoted will not tally. मूळ वसुली रक्कम ६.२३ लक्ष रुपये होती व महालेखाकार यांनी ५.७७ कोटी रुपये सदरहू रक्कम सांगितली आहे व याप्रकरणी व्याजाचा मुद्दा वेगळा आहे असे समितीने नमूद केले. तसेच अभिप्रायामध्ये विभागाने नमूद केले आहे. महालेखाकार यांनी सांगितलेली रक्कम व विभागाने दर्शविलेली रक्कम जुळत नाही. महालेखाकार यांच्या म्हणण्याप्रमाणे दिनांक १ ऑक्टोबर २०११ रोजी मुळ रक्कम ५.७७ कोटी रुपये येणे बाकी होते. विभागाच्या म्हणण्याप्रमाणे सदरहू रक्कम ६.२३ कोटी रुपये असल्याचे समितीने अवगत केले असता रेफरन्स वेगळा असल्याने सदरहू फिगर जुळत नसल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

६.१८ कोटी रुपये बाकी वसुली कोणत्या तारखेपर्यंतची आहे व त्यानंतर रक्कम वसूल झालेली नाही का तसेच त्यानंतर सदरहू प्रकरणी कोणती कारवाई केली अशी विचारणा समितीने केली असता माहे मार्च, २०१६ अखेरपर्यंतची वसुली असून त्यानंतर रक्कम वसूल झाली नसून संबंधिताना नोटिसा पाठविलेल्या आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

From how many Members it has to be collected? या समितीच्या प्रश्नाला From 163 Members. असे उत्तर विभागीय सचिवांनी दिले.

सदरहू वसुली प्रकरणी पाठपुरावा करणे गरजेचे असून सदनिका हस्तांतरण केव्हा करता येते अशी पृच्छा समितीने केली असता विनियम १३ (२) खालील सर्व सोसायट्यांवर १० वर्षांचा कॅप आहे. सदरहू सदनिका १० वर्षे कालावधी पूर्ण होईपर्यंत विकता येत नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

Can they give as gift to their family members? अशी विचारणा समितीने केली असता As it is heiriditory transfer, Gift Deed to family member is allowed. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

काही दिवसापूर्वी सदरहू नियम शिथील करण्यात आला आहे काय? २%, ५% मधील सदनिका कोणत्या आहेत असे समितीने विचारले असता नियम १३(२) नुसार मंजुरी दिलेल्या गृहनिर्माण संस्था आहे. For heiriditory transfer no time-limit has been prescribed. कालमर्यादा दिलेली नाही. मी दोन-तीन सदनिकांचे हस्तांतरण करून दिले आहे. त्यापैकी विटा येथील आमदार महोदयांची एक सदनिका होती. सदनिका प्राप्त झाल्यानंतर २ ते ३ वर्षांच्या कालावधीमध्ये ते कालवश झाले होते. We allowed it to be transferred in the name of his son असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

However, they cannot sell it. Even though, he has expired असे समितीने अवगत केले असता On the death of allottee, the property will get transferred in the name of his legal-heir. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला तसेच मयत झालेल्या सदनिकाधारकाच्या वारसाच्या नावावर सदनिका हस्तांतरित केल्यानंतर ती हस्तांतरित करण्यासाठी १० वर्षांचा कॅप असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

आमदार महोदयांच्या म्हाडा सोसायटीला दुर्दैवाने अद्याप महानगरपालिकेच्या पाण्याचे कनेक्शन देण्यात आले नाही. सदरहू प्रकरणी कोणती भूमिका घेण्यात येणार आहे व कारवाई करण्यात येणार आहे? असे समितीने विचारले असता समितीने सांगितले तर सदरहू प्रश्न सुटू शकेल असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले याअनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, सदरहू प्रकरणी विभागाकडून का सांगण्यात येत नाही सदनिकांचे विक्रीतून पैसे म्हाडाला मिळालेले आहेत. सदरहू जबाबदारी म्हाडाची आहे.

Whether this building is an illegal building? This is a legal building. Then, why you are not getting water supply connection? अशी पृच्छा समितीने केली तसेच ही बाब समिती जबाबदारीने सांगत आहे. आमदार महोदयांसाठी बांधण्यात आलेल्या सदनिकेमध्ये पाण्याची अडचण असल्याने व कनेक्शन नसल्याने तेथे राहण्यास जाण्याकरिता कोणी तयार नसल्याचे समितीने अवगत केले असता सदरहू सोसायटीला पाणी मिळत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले तसेच सदरहू बाब तपासण्याचे समितीस आश्वासित केले तसेच पाण्यासंदर्भातील मुद्दा विभागापर्यंत आला नसल्याचेही विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वरळी येथील शुभदा सोसायटीस देखील आतापर्यंत पाण्याचे कनेक्शन मिळालेले नाही. वहाँ पर रोज ५०-१०० टँकर से पानी आता है. वहां पर पानी का कनेक्शन क्यों नहीं मिलता? म्हाडाकी बिल्डिंग कायदेशीर है म्हाडा ने तो बेकायदेशीर बिल्डिंग बनायी नहीं होगी. सदनिकेची विक्री करून रक्कम मिळविल्यानंतर पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी म्हाडाची असल्याचे समितीने विभागास अवगत केले असता वहां पर तो लोग रह रहे हैं। तसेच सदरहू विषयी महापालिका आयुक्तांशी चर्चा करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले.

## (क) गृहनिर्माण विभाग

**७ साक्ष :—**

**७.१ परिच्छेद क्रमांक ३.२.२ वसुली योग्य रकमांची वसुली न होणे :**

मीरा सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून २००४ पासून वसूलीची कार्यवाही सुरू असल्याचे अभिप्रायामध्ये नमूद केले आहे याबाबत समितीने विचारणा केली असता सदरहू गृहनिर्माण संस्थेस सुरुवातील देण्यात आलेले कन्सेशन नंतर बोर्डाने विड्रॉ केले व पार्ट कन्सेशन रिस्टोअर केले. सदरहू बाब ग्राह्य धरुन सदरहू गृहनिर्माण संस्थेकडून येणे बाकी असलेली रक्कम अद्याप प्राप्त झाली नसून येणे बाकी असलेल्या रकमेचे पार्ट पेमेंट करण्यात आले आहे. ५ कोटी २१ लक्ष रुपये वसुली पैकी १ कोटी ९ लाख रुपये रक्कम वसूल झाली आहे. उर्वरित वसुली करावयाची आहे. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

सदरहू वसुली कधी करण्यात येणार आहे ? सन २००४ पासून सदरहू प्रकरणी वसुलीची प्रक्रिया पार पाडण्यात येत असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता, पार्ट पेमेंटनंतर ऑब्जेक्शन घेऊन १ वर्ष झाले असून त्यासंदर्भात निर्णय घ्यावयाचा असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

सदरहू प्रकरणी आब्जेक्शन घेऊन १ वर्ष झाले आहे व वसुलीचे प्रकरण जवळपास १२ वर्षापासून प्रलंबित असून सदरहू सोसायटीस कोणत्या कारणास्तव संरक्षण देण्यात येत आहे ? सन २००४ साली यु.सी. मिळविण्याकरिता म्हाडाने एन.ओ.सी. दिली नसती तर सर्व पैसे त्याच वेळी वसूल झाले असते. आता जवळपास १२ ते १३ वर्षांचा कालावधी झाला असून पुढील ५-१० वर्षे अशाच प्रकारे वसुलीसाठी जातील असे मत समितीने व्यक्त केले तसेच बिल्टअप एरिया सफिशिएंट नसताना ॲडिशनल एफ.एस.आय.देण्यात आला आहे in anticipation of the F.S.I. being increased to 1.2, असे होते का अशी विचारणाही महालेखाकारांनी केली असता १.२ एफ.एस.आय.देण्याचे कारण असे आहे की त्याच्या ४० टक्के महानगरपालिकेला द्यावा लागतो, तो दिलेला नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

वाढ गृहीत धरुन सन २००३ साली गृहनिर्माण संस्थेला अधिकचा बी.यू.ए.मंजूर करण्यात आला होता. सदरहू बाब बेकायदेशीर आहे. १.२ एफ.एस.आय.गृहीत धरुन मंजुरी कशी देता येईल? सदरहू अभिन्यास महानगरपालिकेस मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी नाही असे उत्तर समितीस दिले.

सदरहू प्रकरणास म्हाडा एवढे लाईटली का घेत आहे. म्हाडा प्रशासनावर कोणाचे दडपण आहे का? सदरहू सोसायटी कोणाची आहे अशी विचारणा समितीने केली असता प्रशासनावर कोणाचेही दडपण नसून सोसायटीला नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. सदरहू सोसायटी शासकीय अधिकाऱ्यांची असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आपण आमदारांच्या सोसायटी प्रकरणी कार्यवाही करता परंतु अधिकाऱ्यांच्या सोसायटी प्रकरणी करीत नाहीत असे स्पष्ट मत समितीने व्यक्त केले असता नाही, आमदार महोदयांच्या सोसायटीलाही नोटीस दिलेली आहे व शासकीय अधिकाऱ्यांच्या सोसायटीलाही नोटीस देण्यात आली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

नोटीस दिली ठीक आहे परंतु थकीत रक्कम वसूल का करण्यात येत नाही? अधिकाऱ्यांची सोसायटी असल्याने म्हाडाचे अधिकारी सदरहू वसूली प्रकरणी दिरंगाई करीत आहेत, अशी समितीने अहवालामध्ये शिफारस केली तर ती आपणास मान्य असेल का सदरहू प्रकरणी कडक कारवाई करून पैसे वसुलीची भूमिका म्हाडाने घ्यावी असे समितीने विभागास अवगत केले असता सदरहू प्रकरणी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

महानगरपालिकेला रिटेल मार्केट संबंधी हस्तांतरणाची प्रक्रिया एक महिन्याच्या आत पार पाडण्यात यावी व सदरहू कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा. त्यानंतर समितीचा सदरहू प्रकरणीचा अहवाल अंतिम करण्यात येईल असे समितीने विभागास सांगितले याअनुषंगाने महालेखाकारांनीही १.२ एफ.एस.आय.चे पैसे ३ डिसेंबरला अप्रुव्हल मिळण्यापूर्वीच भरले असून दिनांक २२ डिसेंबर रोजी म्हाडाने अप्रुव्हल दिले असल्याचेही विभागास अवगत केले.

रायगड सैनिकी शाळेच्या संदर्भातील लेखापरिच्छेदाची माहिती समितीस द्यावी असे समितीने विभागास अवगत केले असता सदरहू विषय वसूली, कमर्शिअल, चेंज ऑफ यूज, ट्राय पार्टी ॲग्रीमेंट, संदर्भातील असून ट्राय पार्टी ॲग्रीमेंट आतापर्यंत झाले नसल्याचेही विभागीय सचिवांनी अवगत केले.

थर्ड पार्टी इंट्रेस क्रिएट करण्यात आला आहे. सदरहू प्रकरणी अनियमितता खूप आहे. सदरहू प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे अशी पृच्छा समितीने केली असता वसुली प्रकरणी नोटीस पाठविण्यात आल्या असून काही प्रमाणात रक्कम वसूल झाली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

व्हायलेशन ऑफ यूज संदर्भात कोणती कारवाई केली आहे सदरहू भागाची जबाबदारी एखाद्या वार्ड ऑफिसरकडे देण्यात आलेली असेल. सदरहू प्रकरणी शासनाची वसुली होत नसल्याने विभागाने भविष्याची कोणती योजना आखली आहे अशी विचारणा समितीने केली असता सदरहू प्रकरणी काही कारवाई करण्यात आली नसून भविष्यामध्ये सदरहू प्रकरणी संपुर्ण वसुली करून ट्राय पार्टी ॲग्रीमेंट करावे लागणार आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

वसुली झाली नाही किंवा संबंधितांनी पैसे भरले नाही तर कोणती कारवाई करण्यात येणार आहे या समितीच्या प्रश्नाला असे झाले तर रिकव्हरी करिता कोर्सिव्ह ॲक्शन घ्यावी लागेल व व्यावसायिक वापर बंद करावा लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदरहू प्रकरणी ६ महिन्यात सर्व प्रोसिजर नाही केले तर जप्ती व उचित कारवाई करून जागा ताब्यात घेण्यात यावी. समजा असे केले नाही तर समितीला याप्रकरणी सदरहू शिफारस करावी लागेल असे मत समितीने व्यक्त केले असता सदरहू प्रकरणी कार्यवाही करण्याकरिता ६ महिन्यांचा अवधी देण्यात यावा अशी विनंती विभागीय सचिवांनी केली तथापि समितीने सदरहू प्रकरणी कार्यवाही करण्याकरिता ३ महिन्यांचा कालावधी पुरेसा असून आतापर्यंत अशा प्रकारे कार्यवाही करण्याकरिता समितीने ६ महिन्यांचा कालावधी कोणत्याच विभागाला दिलेला नसल्याचे समितीने विभागास अवगत केले.

मार्च अखेरपर्यंत सदरहू कार्यवाही करण्याकरिता विभागाला वेळ देणे उचित राहील असे मत महालेखाकार यांनी व्यक्त केले असता सदरहू प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी ६ महिने लागतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

सचिव वित्त विभाग यांनी आता समितीने तीन लेखापरिच्छेदातील तीन विषयावर चर्चा केली असल्याचे समितीस विदित केले. मार्च महीने तक यह काम हो गया तो यह खुशी की बात है. इसमें रिकवरी का इश्यू है. यदि वे नहीं देंगे तो हमें कोर्सिव्ह ॲक्शन करनी पडेगी. जहां तक जप्ती की कार्रवाई करने का मसला है. उसके लिए हम आदेशित कर सकते है. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

म्हाडाने किती सोसायट्यांना घरे बांधून दिली, त्यांच्याकडून किती येणे बाकी आहे, यासंदर्भात वसुलीचा सेंट्रलाईज हिशोब ठेवण्यात आला आहे काय अशी पृच्छा सचिव, वित्त विभाग यांनी केली असता हिशोब ठेवण्यात आला असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

म्हाडाने बांधलेल्या सोसायट्या व त्यांच्याकडून करावयाची वसूली यासंदर्भात समितीने माहिती मागितली होती त्याबाबत विभागाने माहिती तयार करण्यात येत आहे, असे स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे. सदरहू वसुलीच्या माहितीची यादी तयार नसेल तर वसुली कशा पध्दतीने करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली तसेच सोसायटीला दिलेली जागा, येणे बाकी व वसुलीच्या प्रकरणांच्या माहिती संदर्भात एक सॉफ्टवेअर तयार करण्यात यावे, त्यामाध्यमातून सर्व डाटा उपलब्ध होणे शक्य होईल असे मत ही समितीने व्यक्त केले.

म्हाडा स्तरावरून एक इंटिग्रेटेड सॉफ्टवेअर तयार करण्याचे काम सुरू असून ते डीपीआर स्तरावर आहे. सदरहू काम ३ महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आले आहे. सदरहू सॉफ्टवेअरचे काम पुढील ८ महिन्यांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

सैनिक शाळेसाठी व खेळण्याच्या मैदानासाठी जागा आरक्षित करण्यात आली होती. काही जागेचा वाणिज्य वापर करण्यात येत आहे. त्यासाठी कोणत्याही प्रकारची मान्यता देण्यात आलेली नाही, ट्राय पार्टी ॲग्रीमेंट करण्यात आले नाही तसेच थकीत रक्कमही भरण्यात येत नाही. अशी परिस्थिती असताना सदरहू प्रकरण म्हाडा प्रशासनाकडून गांभीर्याने घेण्यात येत नाही, अनियमितते प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. सदरहू प्रकरणी लेखापरिच्छेद काढण्यात आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नाही. तसेच, सदरहू प्रकरणी सभागृहात चर्चा झालेली असताना त्यास म्हाडा प्रशासनाने गांभीर्याने घेतले नाही.

बैठकीतही विभागाकडून समर्पक उत्तर मिळाले नाही. विभागाला केवळ या प्रकरणी सद्य:स्थिती विचारून हा विषय संपवायचा का? सदरहू प्रकरणी एक महिन्याच्या आत सर्व कार्यवाही पूर्ण करावी. प्रलंबित वसुलीची बाब समिती समजू शकते. ट्राय पार्टी ॲग्रीमेंटशिवाय सदरहू जागा इतर प्रयोजनाकरिता वापरासाठी देता येते का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी नाही असे उत्तर समितीस दिले.

शाळा व खेळाच्या मैदानाच्या आरक्षित जागेचा वापर इतर प्रयोजनाकरिता करण्याकरिता मंत्रिमंडळाच्या मंजुरी शिवाय परवानगी देता येत नाही. मुख्यमंत्री महोदयांना देखील जागेचे आरक्षण बदलणे प्रकरणी अधिकार नाहीत. He can recommend, but ultimately, it will go before the Cabinet. शाळेसाठी देण्यात आलेल्या जागेचा वापर पहिल्या मजल्यावर करण्यात येत आहे व सदरहू प्रकरणी व्हायलेशन होत असून वाणिज्य प्रयोजनासाठी जागेचा वापर करण्यात येत आहे. अशी परिस्थिती असताना म्हाडा प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात येत नाही. महालेखाकारांनी लेखा आक्षेप घेतल्यानंतरही सदरहू प्रकरण गांभीर्याने घेण्यात येत नाही. खेळाच्या

मैदानासाठी जागा आरक्षित असेल तर त्यासंदर्भात चेंज ऑफ यूज करता येत नाही. सदरहू जागेवर बांधकाम झाले असेल तर ते अनधिकृत असल्याने पाडावे लागेल किंवा नियम ३७ नुसार चेंज ऑफ यूज प्रकरणी मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागेल. खेळाच्या मैदानासाठी आरक्षित जागेचा वापर इतर प्रयोजनासाठी करता येत नाही वा त्यामध्ये चेंज ऑफ यूज करता येत नाही असे मतही समितीने व्यक्त केले.

In how much built-up area the school has come up and how much area of playground is available? Whether a school be on top of the commercial premises? Whether it is permissible as per regulations of MCGM? This should come on record अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता Change of use is not allowed we donot have any option but to take action असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

What penalty will you levy on them? Will you only regularise it or keep mum? असे समितीने विचारले असता we will recommend for taking action. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

What action डिमॉलेशन शिवाय म्हाडा प्रशासनाकडे इतर कोणताही पर्याय नसल्याचे समितीने विभागास अवगत केले असता That will be our recommendation but ultimately this decision will have to be taken at higher level असे विभागीय सचिवांनी विदित केले.

खेळाच्या मैदानावरील अनधिकृत बांधकाम नियमित करता येत नाही त्यासाठी मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागते. सदरहू प्रकरणी म्हाडा प्रशासनाने पूर्णतः दुर्लक्ष केले असून कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. सर्व वसुली झाली नसताना म्हाडा प्रशासनाने एनओसी दिली त्यास १२ ते १३ वर्षांचा कालावधी झाला आहे. महालेखापरिक्षकांनी सदरहू प्रकरणी लेखा आक्षेप घेतला असताना म्हाडा प्रशासनाने गांभीर्याने कारवाई केल्याचे दिसून येत नाही. एक वर्षापूर्वी नोटीस दिली एवढीच कार्यवाही म्हाडा प्रशसनाने केली आहे. सदरहू प्रकरणी यु.सी. कोणत्या अधिकाऱ्याने दिली? अनधिकृत बांधकामाला अशा प्रकारे यु.सी. देता येत नसल्याने सदरहू प्रकरणी संबंधीत अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे दोन महिन्यापूर्वीच कार्यभार स्वीकारल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले आहे या दोन महिन्यात विभागात सुधारणा करण्यासाठी विभागाने सु-मोटू कोणती कारवाई केली अशी विचारणा समितीने केली असता मी विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर विभागाच्या दोन-तीन बैठका घेऊन कामकाजाबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच कार्यवाही पलीकडे कामात कशी सुधारणा करता येईल याबाबत देखील सूचना दिलेल्या असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

फक्त सूचना देऊन सुधारणा होणार नाहीत असे समितीने विभागास अवगत केले असता समिति जो कहेंगी उसको पूरा करने का मैं प्रयास करुंगा असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

यहां पर सब काम गलत हो रहा हैं. इतनी बकाया राशि होने पर केवल सिम्पल नोटीस दी जाती है. एक नोटीस देने के बाद फिर से दूसरे महीने में दूसरी नोटीस दी जानी चाहिए. वे लोग १२ महीने तक जवाब नहीं देते हैं, इसलिए तीन महीने के बाद दूसरी नोटीस दी जानी चाहिए. We are not receiving any reply from them. You are not taking any action जो रिप्लाय नहीं देंगे उन पर कार्रवाई किजिए. तसेच या प्रकरणी जे कोणी अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कडक कारवाई करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा असे समितीने विभागास अवगत केले. जर विभागाकडून कारवाई झाली नाही तर संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करावी लागेल हे समितीला शिफारशीमध्ये नमूद करावे लागेल असे मतही समितीने व्यक्त केले.

## (ड) गृहनिर्माण विभाग

**८ साक्ष :—**

**८.१ परिच्छेद क्रमांक ३.२.३ महसुलाचे नुकसान :**

सदरहू परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, या प्रकरणी देखील नोटीस देऊन विषय संपविण्यात आल्याचे दिसते.

या प्रकरणी विभागाने फक्त नोटीस बजाविलेली नसून सन २००९ पासून पैसे वसूल करावे, असे नोटींग करून ती नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविलेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

विभागाने नोटीस दिल्यानंतर पुन्हा नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्याची गरज काय? दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी कासेगाव एज्युकेशन संस्थेस १ कोटी ७९ लाख ५० हजार ८५५ इतक्या रकमेची वसुली करण्याची नोटीस बजावली असे स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे. विभागाने नोटीस बजाविल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्याकडे अॅप्रोच का झालात या समितीच्या प्रश्नाला अगोदरचा आदेश शासकीय स्तरावर झाला होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आदेश न घेता नोटीस पाठविण्यात आली असे आपले म्हणणे आहे काय, आपण कोणत्या अधिकाराखाली नोटीस पाठविली अशी विचारणा समितीने केली असता नवीन आदेश नव्हते जुने आदेश रद्द करून नवीन आदेश केले असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

म्हाडा अधिनियमाच्या विनियम १६ अन्वये रेडीरेकनरनुसार जागेची किंमत घेतली पाहिजे असा नियम आहे. विभाग नियमाच्या बाहेर जाऊन कोणतेही काम करीत नाही. सन १९८३ मध्ये संस्थेच्या लेटरहेडवरच संस्थेस जागा दिल्याचा रिमार्क दिला. हा रिमार्क म्हाडाच्या लेटरहेडवर देण्यात आला नाही संस्थेस ५० गाळे दिले. म्हाडा विनियम १६ अंतर्गत सन २००९ मध्ये ही जागा रेग्युलराईज केली. विनियम १६ नुसार रेडीरेकनरनुसार जागेची किंमत घेतली पाहिजे त्यानुसार आपण संस्थेस १७९ ची नोटीस पाठविली असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता विनियम बरोबर आहे पण शासनाने आधी एक आदेश काढला होता आणि गोंधळाची परिस्थिती नसावी म्हणून विभागाने तसे केले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

पूर्वीचा आदेश पूर्णपणे रेग्युलराईज केला नव्हता का? शासनाने हजारोंना लीजवर जमीन देते शासनाने १०० वर्षासाठी लीज दिलेली आहे, रिन्युअलसाठी कुठे काही करावे लागते ? माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठविलेली नस्ती आपण सु-मोटू पाठविली की, कोणाच्या सांगण्यावरून पाठविली अशी पृच्छा समितीने केली असता संस्थेकडून प्रस्ताव आला होता आधीचा आदेश रद्द करावा अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

त्या संदर्भात आपण एक महिन्यात कार्यवाही करावी. अन्यथा समितीला अहवालात शिफारस करावी लागेल असे मत समितीने व्यक्त केले विभागाने केलेली कारवाई योग्य आहे. परंतु विभागाने पुढे पॅरा टाकला की, ती नस्ती माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवावी यासंदर्भात समितीने विचारणा केली असता विभागाने रिकव्हरी सुरू केली हे बरोबर आहे. परंतु गोंधळाची परिस्थिती नसावी म्हणून रेफरन्स केलेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

कोणी रेफरन्स केला, संस्थेकडून रेफरन्स आला का या समितीच्या प्रश्नाला पुणे मंडळाकडून रेफरन्स आला असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले तसेच, संस्थेला नोटीस दिल्यानंतर संस्थेचे म्हणणे होते की, शासनाच्या पत्रानुसार १९८३ च्या दराने पैसे वसूल करण्यास सांगितले होते आणि त्यानुसार म्हाडाचा ठराव झालेला आहे. त्या ठरावानुसार संस्थेने ७ लाख रुपये भरलेले आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट गाईडलाईन्स आहेत की, ज्या दिवशी जागा वितरित झाली त्या दिवसापासून पैसे घ्यावेत. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांकडे फाईल पाठविण्याचा विषय नाही. या प्रकरणी विलंब होण्यासाठी विभाग हे सर्व करीत आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. समितीला सांगण्यात येते की, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत म्हणजे विभागाकडून व्यक्तीपरत्वे प्रकरण हाताळणी होते काय असे समितीने विचारले असता विभागाने प्रकरण क्लिअर करण्यासाठी पाठविले या प्रकरणी उशीर व्हावा असा हेतू नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्या प्रकरणी माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत त्या प्रकरणी माननीय मुख्यमंत्री काय करु शकतात? माननीय मुख्यमंत्री सर्वोच्च न्यायालयाचे आदेश ओव्हररुल्ड करणार आहेत काय माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे नस्ती पाठविली असे विभागाने सांगितले त्या नस्तीमध्ये विभागाने कोणती भूमिका घेतली आहे अशी विचारणा समितीने केली असता ए.जी.नी घेतलेल्या भूमिकेशी विभाग सहमत असून त्यास मान्यता द्यावी, अशी विभागाची भूमिका आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाच्या प्रस्तावास मान्यता द्यावी की संस्थेकडून आलेला अर्ज रद्द करावा यापैकी कोणती भूमिका घेतली या समितीच्या प्रश्नाला जुना शासन निर्णय रद्द करून सन २००९ प्रमाणे वसुली करावी असे विभागाने नमूद केले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.तसेच तोपर्यंत वसुलीला स्थगिती दिलेली नाही असेही अवगत केले.

विभागाने कारवाई सुरू केली काय या समितीच्या प्रश्नाला संस्थेस नोटीस दिलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्या गोष्टीवर माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना विभागाने काय सुचविले त्याची प्रत समितीला द्यावी असे समितीने विभागास अवगत केले असता सुप्रीम कोर्ट के कई डिसीजन होते हैं, पुराने ऑर्डर्स होते हैं, हम तो ऑर्डर लेते हैं असे विभागीय सचिवांनी विदित केले. यावर समितीने आपने बिना ऑर्डर लिए पैसे की वसूली का नोटीस क्यों दिया अशी पृच्छा केली याअनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की, पुराने ऑर्डर अस्तित्व में थें, उसको रद्द करने के लिए हमने प्रस्ताव भेजा हैं.

आपने वसुली के बारे में पार्टी को नोटीस दे दिया असे मत समितीने व्यक्त केले असता म्हाडा की तरफ से, बोर्ड की तरफ से रेफरन्स आया तो इसमें हमें ऐसा लगा कि इसमें जो कन्फ्यूजन है वह दूर करना चाहिए. उसके लिए हमने यह काम किया है असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

इस बारे में आपके विभाग का क्या ओपिनियन है? यावर विभाग का वही ओपिनियन है जो हमारा है. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यानि अभी जो नोटीस भेजा, वही ओपिनियन है? या समितीच्या प्रश्नाला जी हाँ नोट पर क्या लिखा है उसकी प्रत मैं समितीको दिखा सकता हूं. हम समिती को इसकी एक प्रत देते हैं.असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या अनुषंगाने विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे. **(विवरण पत्र क्र. २)** एज्युकेशन सोसायटीला जमीन देण्याबद्दलचा मूळ आदेश होता. त्यानंतर निवासी आणि बिगर निवासी कोठून आले हे स्पष्ट करावे असे समितीने विभागास अवगत केले असता सन १९६९ मध्ये म्हाडाने तेथे ५० निवासी गाळे बांधले होते. परंतु तेथे पाणी नसल्यामुळे ग्राहक मिळाले नाहीत. सन १९८३ मध्ये कासेगाव शिक्षण संस्थेने प्रस्ताव दिला की, आम्ही शिक्षण संस्था सुरू करीत असल्यामुळे आतापर्यंत जे ५० गाळे विकले गेले नाहीत ते गाळे आणि त्या सभोवतालची ५ एकर जमीन कासेगाव शिक्षण संस्थेस द्यावी. म्हाडाचा तसा ठराव झाल्यानंतर त्या खोल्यांचा वापर वसतिगृहासाठी केलेला आहे. ती जागा शैक्षणिक संस्थेला दिल्यामुळे चेंज ऑफ युझ झालेला आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

तेथे वसतिगृह आहे की, वाणिज्यिक वापराकरिता जागेचा वापर होत आहे तसेच तेथे पाणी उपलब्ध झाले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता तेथे वसतिगृह असून सन १९६९ पासून तेथे पाणी नव्हते आता त्यांना नगरपालिकेमार्फत पाणी मिळालेले असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाने सांगितले की, तेथे पाणी नसल्यामुळे ग्राहक मिळत नव्हते त्यामुळे आपण त्यांना ते गाळे दिले या समितीच्या प्रश्नाला विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की,सन १९६९ मध्ये हे गाळे बांधल्यानंतर ते विकण्यासाठी म्हाडाने बराच प्रयत्न केला परंतु तेथे पाण्याची सोय नसल्यामुळे गाळे विकले गेले नाहीत.

नगरपालिकेने शिक्षण संस्थेस पाणी उपलब्ध करून दिले मग म्हाडास पाणी का उपलब्ध झाले नाही सन १९६९ मध्ये पाणी का मिळाले नाही या समितीच्या प्रश्नाला पाणी नसल्यामुळे गाळे विकले गेले नाहीत असा रेकॉर्ड विभागाला सापडला असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाने संस्थेस गाळ्यांसोबत १५ हजार चौ.मीटर जागा दिली त्या जमिनीचा चेंज ऑफ युझर केलेला नाही ना अशी विचारणा महालेखाकार यांनी केली असता विभागाच्या रेकॉर्डनुसार चेंज ऑफ युझर नसल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाने शिक्षण प्रयोजनार्थ १५ हजार चौ.मी. जागा दिलेली असल्याची माहिती महालेखाकार यांनी दिली. यावर समितीने संस्थेस जागा दिली त्याबद्दल समितीचा आक्षेप नाही. फक्त नियमाचे पालन होणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

विभागाने उत्तर देताना ती फाईल पुढे पाठविली म्हणून हा विषय निघाला असल्याचे समितीने नमूद केले असता या संदर्भात विभागाचा हेतू स्पष्ट केला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागास जे काही करावयाचे आहे ते योग्य करावे, असे समितीचे म्हणणे आहे.या संदर्भात योग्य ती कार्यवाही करून समितीस दोन महिन्यात अहवाल द्यावा. समितीस आवश्यकता वाटल्यास पुन्हा आपणास साक्षीसाठी बोलाविण्यात येईल असे समितीने विभागास सांगितले.

## (अ) गृहनिर्माण विभाग

### ९ अभिप्राय व शिफारशी :

### ९.१ परिच्छेद क्रमांक ३.१.४.१ : " कामांची अनियमित विभागणी "

मुंबई मधील मुंबई शहर व उपनगरे यांची गलिच्छवस्ती सुधारणेची कामे मुंबई गलिच्छवस्ती सुधारणा मंडळ (MSIB) कडून कार्यान्वित केली जातात. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग अवलंब करीत असलेल्या कार्यपद्धती/लेखांकन पद्धती आणि जिल्हा दर सूची (DSR) याचे अवलंबन MSIB करते आणि संबंधित योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कामाचे कार्यान्वयन केले जाते. लोकसभा/राज्यसभा सदस्यांच्या स्थानिक क्षेत्रविकास योजना आणि DPDC यांनी प्रस्तावित केलेल्या विविध कामांचे अंदाजपत्रक विभागाकडून सादर करून त्यास जिल्हाधिकारी प्रशासकीय मंजुरी देतात. व इतर कामांना उपाध्यक्ष किंवा म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा MSIB चे मुख्य कार्य अधिकारी हे त्यांच्याकडे सुपूर्द केलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय मान्यता देतात. बहुतांश कामे रु. १५ लक्ष पेक्षा कमी असल्यामुळे MSIB ने दोन्ही शासन निर्णयात विहित केलेल्या प्रमाणात जिल्हा उप निबंधकांमार्फत मजूर सहकारी संस्था मर्यादित या संस्थेला (३३ टक्के), लॉटरीद्वारे बेरोजगार अभियंत्यांना (३३ टक्के) आणि खुल्या निविदेद्वारे नोंदणीकृत कंत्राटदारांना (३४ टक्के) अशाप्रकारे कामांची वाटणी केली जाते. सन २०१०-२०१३ या कालावधीतील कामाची विभागाशी संबंधित करार नोंदवहीची तपासणी केली असता बेरोजगार अभियंत्यांना व नोंदणीकृत कंत्राटदारांना दिलेल्या कामापेक्षा MSIB ने जास्त कामे मजूर सहकारी संस्था मर्यादित यांना दिली होती. त्यात नोंदणीकृत कंत्राटदारांना ३४ टक्के पैकी प्रत्यक्षात फक्त १५ टक्के तसेच बेरोजगार अभियंत्यांना द्यावयाच्या एकूण कामांपैकी ६ टक्के कमी कामे दिली गेली. अशाप्रकारे शासन निर्णयात विहित केलेल्या प्रमाणात कामाची विभागणी करण्यात आली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

या संदर्भात समितीसमोर विस्तृत चर्चा झाली असता उपरोक्त वस्तुस्थिती विभागाने मान्य करून भविष्यात याबाबत काळजी घेण्यात येईल असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. समितीने शासन निर्णयात नमूद टक्केवारीचे उल्लंघन होऊ नये व तीनही संस्थांना विहित प्रमाणात कामाची विभागणी करणे बंधनकारक असल्याचे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींना सांगितले असता विभागाने दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजीच्या पत्रान्वये मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळातील तीनही कार्यकारी अभियंता यांना सक्त सूचना देऊन ३३:३३:३४ प्रमाणे काम वाटप करणे अन्यथा त्यांचेवर कठोर कारवाई केली जाईल असे कळवून आवश्यक ती उपाययोजना करण्यात आल्याचे व भविष्यात याची काळजी घेण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. **या संदर्भात शासन निर्णयाची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात यावी व कोणत्याही संस्थेवर कामाच्या विभागणीमध्ये अन्याय होणार नाही याअनुषंगाने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

### ९.२ परिच्छेद क्रमांक ३.१.४.२ : " कार्यादेश जारी करूनही कामाची सुरूवात न करणे "

लोकसभा किंवा राज्यसभा सदस्यांच्या स्थानिक क्षेत्रविकास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यादेश जारी केल्यापासून एक वर्षाच्या आत कामे पूर्ण होणे अपेक्षित असते. माहे ऑगस्ट,२०११ ते माहे मे,२०१२ मध्ये रु. १.७१ कोटी खर्चासाठी मंजुरी मिळालेल्या एकूण २९ कामांपैकी फक्त ९ कामे पूर्ण झाली होती, १३ कामांचा प्रारंभच करण्यात आला नव्हता व ७ कामे अपूर्ण राहिलेली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

७ कामे ही सन २०१२-१३ ची असतानाही आता सन २०१७ पर्यंत ती कामे सुरू न होण्यामागील कारणे समितीने विचारली असता, खाजगी जमिनीवर ही कामे करावयाची असून संबंधितांकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे कामे प्रलंबित असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले असता, समितीने यावर आक्षेप घेऊन या जमिनी खाजगी नसून शासकीय आस्थापनांच्याच असल्याचे निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी ते मान्य केले. अशा परिस्थितीत शासनाला जर शासकीय आस्थापनांकडून शासकीय योजनांसाठी जमीन अथवा ना-हरकत प्रमाणपत्र मिळत नसेल तर ही बाब गंभीर व शासकीय व्यवस्थेची अकार्यक्षमात दर्शविणारी असल्याचे समितीने मत व्यक्त केले व या मागील कारणे काय? अशी समितीने विचारणा केली असता, आमदार किंवा खासदार निधीतून ही कामे करावयाची असल्यामुळे त्यास जिल्हाधिकारी प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करून देतात. मात्र महानगरपालिकेकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळवावयाची जबाबदारी म्हाडाची असते. या मान्यतेसाठी बराच वेळ जातो. अनेकवेळा महानगरपालिकेकडून ना-हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याबाबत नकारही मिळतो व त्यामुळे विलंब लागतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले असता, शासनस्तरावरील या परवानग्यांसाठी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करणे अपेक्षित असतानाही विभाग त्यात अपयशी ठरलेले आहे. शासकीय योजनांसाठी शासकीय आस्थापनांकडूनच जमिनी मिळत नसतील व यात काही जमिनी तर रेल्वेच्या व स्वतः म्हाडाच्याच असतानाही कामे सुरू होऊ शकली नाहीत तर ही बाब समितीला मान्य करण्यासारखी नाही. या सर्व महत्त्वाच्या बाबींकडे बऱ्याचदा अधिकारी देखील दुर्लक्ष करतात. लोकप्रतिनिधींच्या सार्वजनिक महत्त्वाच्या कामांची जर ही स्थिती असेल तर सर्वसामान्य जनतेने शासनाकडून काय अपेक्षा ठेवावी. या प्रलंबित कामांच्या संदर्भात दोनच उपाय शिल्लक असून एकतर ही कामे तात्काळ पूर्ण करावीत अन्यथा ही कामे रद्द करावीत असे मत समितीने नोंदविले. प्रशासकीय मान्यतेसाठी ही कामे प्रलंबित ठेवणे ही बाब समिती मान्य करू शकत नाही. कामांची

उपरोक्त परिस्थती पाहता यातील कित्येक कामे तर रद्द करणेबाबत खासदार महोदयांनी स्वतःच पत्र दिलेली आहेत. मा.आमदार व खासदारांनी सुचविलेली व त्यास जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मंजुरी दिलेली कामे प्रशासकीय कारणास्तव प्रलंबित ठेवण्यात येऊ नयेत. तसेच ही कामे रद्द देखील करण्यात येऊ नयेत. तर ती कोणत्याही प्रकारे प्रयत्न व पाठपुरावा करून विभागाने पुर्णच करावीत असे समितीचे स्पष्ट मत आहे. **परंतु जर काही अपरिहार्य कारणास्तव ही कामे होवूच शकत नसतील तर मात्र ही कामे व निधी दोन्ही अडकवून ठेवण्यापेक्षा ती रद्द करण्याशिवाय पर्याय नाही. मार्गदर्शक तत्वाप्रमाणे एक वर्षात ही कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु ती झालेली नाहीत. ही कामे पूर्ण करण्यासाठी विभागाने पूर्ण प्रयत्न करून आवश्यक त्या सर्व परवानग्या अथवा ना-हरकत प्रमाणपत्र तात्काळ मिळवावेत. दोन महिन्यांपर्यंत पूर्ण प्रयत्न करून देखील ही कामे सुरू होऊ शकली नाहीत तर मात्र कामे रद्द करताना त्यामागील संपूर्ण कारणमिमांसा, अडचणी, अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष अथवा बेजबाबदारपणा, परवानग्या मिळविणेसाठी करण्यात आलेले प्रयत्न इ. सर्व बाबींचा पूर्ण अभ्यास व आढावा घेऊन शासनाचे पूर्ण समाधान झाले तर ती कामे रद्द करावीत. तसेच ज्या अधिकाऱ्यांकडे ही कामे सोपविलेली होती व जे त्यांना सोपविलेली जबाबदारी पार पाडू शकले नाहीत अथवा कामात निष्काळजीपणा दाखविलेला असेल तर त्यांचेवर विभागाने कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यांच्या आत कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

### ९.३ परिच्छेद क्रमांक ३.१.४.३ : " अग्राह्य कामे कार्यान्वित करणे "

MMRDA ने रु. १५० कोटी रक्कमेस मंजुरी दिली ज्यापैकी MSIB ने गलिच्छवस्तीमध्ये सार्वजनिक शौचालये, जल जोडणी, नविन गटारे, बालवाड्या, शाळेचे वर्ग आणि कल्याण केंद्र बांधणे अशा सहा प्रवर्गातील १३८५ कामे करण्यासाठी रु. १४१.७८ कोटी वाटप केले. त्यापैकी रु. १०८.५७ कोटी खर्चाची ११९८ कामे करण्यात आली. यातील रु. २.६० कोटी खर्चाच्या ३९ कामांना MSIB ने मंजुरी दिली. जी कामे MMRDA ने निर्धारीत केलेल्या प्रवर्गापैकी एकाही प्रवर्गात मोडत नव्हती. तसेच गलिच्छवस्ती नसतानाही सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आवारात बोअरवेल बांधण्यात आल्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

समितीने विभागाने जी कामे स्वीकारार्य नाहीत ती घेतली असे आक्षेप साक्षीदरम्यान नोंदविले असता, MMRDA ने विभागाला दिनांक २८ डिसेंबर २०११ रोजी पत्र पाठवून त्यामध्ये रु. १५० कोटी दोन टप्प्यांमध्ये म्हाडाकडे वर्ग करण्याचे आदेश दिलेले होते. तसेच मुंबई शहरामध्ये उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीची कामे आवश्यकतेप्रमाणे शासनाने घालून दिलेल्या प्रति २००० चौ.मी. या आर्थिक मर्यादेत करण्यात यावीत शिवाय PMGP कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये विशेष दुरुस्तीची कामे प्रस्तावित झाल्यास त्याचा शासन धोरणानुसार विचार करण्यात यावा असे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी दिल्यामुळे ही कामे करण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी साक्षीदरम्यान सांगितले.

विभागाने ज्या पत्राचा उल्लेख करून या परिच्छेदासंदर्भात उत्तर दिले आहे त्या पत्रामध्ये गलिच्छवस्तीमधील सार्वजनिक शौचालये, पाण्याचे कनेक्शन, बालवाड्या, शाळा खोल्या, समाजकल्याण केंद्र इ. कामे करावयाची होती. परंतु विभागाने सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये बोअरवेल घेतली आहे. तसेच खासदारांनी सुचविल्याप्रमाणेच कामे करण्यात आली आहेत. व्यायाम शाळा आणि खुली आसरा केंद्रे ही बालवाड्या, समाजकल्याण केंद्रे किंवा शाळांच्या वर्गासारखीच होती आणि बोअरवेल बांधणे म्हणजे जल जोडणी देण्याप्रमाणेच होते असे विभागाने दिलेले उत्तरही मान्य करण्यासारखे नसून हे काम मार्गदर्शक तत्वामध्ये कोठे बसते व ज्या प्रवर्गासाठी हा निधी उपलब्ध करून दिला होता त्या प्रवर्गात ही कामे करण्यात आल्याचे दिसून येत नसून बोअरवेल या गलिच्छवस्त्यांमध्ये न बांधता सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आवारात बांधण्यात आलेल्या असल्यामुळे या प्रकरणाची विशेष चौकशी करून १ महिन्याच्या आत कारवाई करावी व त्याचा अहवाल समितीकडे सादर करावा असे निर्देश समितीने बैठकीदरम्यान विभागीय सचिवांना दिले.

या संदर्भातील चौकशी करून विभागाने याबाबतची आश्वासित माहिती समितीस सादर केली. त्यात MMRDA कडून देण्यात आलेल्या रु. १५० कोटी संदर्भात सदर निधी कसा खर्च करावा याबाबत ज्या सूचना देण्यात आल्या होत्या त्याअनुषंगाने तत्कालिन उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांना दिनांक २ जानेवारी २०१२ च्या पत्रान्वये कळविले होते. ज्यामध्ये रु. १५० कोटी चा निधी कसा खर्च करावा याबाबत तत्कालिन मुख्यमंत्री महोदयांसोबत झालेल्या सविस्तर चर्चेच्या अनुषंगाने उपरोक्त निधीतील ५० टक्के निधी हा ३६ विधानसभा मतदारसंघांमध्ये व ५० टक्के निधी हा ६ लोकसभा मतदारसंघांमध्ये विभागण्यात यावा. सदर कामांच्या याद्या स्थानिक आमदार/खासदार यांचेकडून घेऊन त्यांची आवश्यकता, व्यवहार्यता इ. बाबी तपासून मंजूर कराव्यात असे विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे उपरोक्त निर्देशाप्रमाणे MMRDA ने दिलेल्या निधीमध्ये कामे घेण्यात आलेली असून ती पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र MMRDA ला सादर करण्यात आले असून ते त्यांनी स्वीकृत केले आहे. तसेच दिनांक २८ डिसेंबर २०११ च्या पत्रान्वये MMRDA ने अनुदानाची उपयोगिता कोणत्या कामासाठी करावयाची आहे याची यादी दिलेली असल्यामुळे करण्यात आलेली कामे ही ग्राह्य कामे असल्याने खुलासा मान्य करण्यात यावा व शासन निर्णयातील अभिप्रेत असलेल्या बाबींसाठी प्राधान्याने कामे करण्यात आलेली असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करण्याबाबत देखील सदरहू आश्वासित माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

विभागाने उपरोक्त दिलेल्या आश्वासित माहितीचे अवलोकन केले असता समितीला हा खुलासा समाधानकारक वाटत नाही. विभागाला या योजनेअंतर्गत प्राप्त निधी हा केवळ गलिच्छवस्त्यांमध्ये सार्वजनिक शौचालये, जल जोडणी, नवीन गटारे, बालवाड्या, शाळेचे वर्ग आणि कल्याण केंद्र बांधणे या कामांसाठी खर्च करणे अपेक्षित असताना या तत्वावर ही कामे झाल्याचे समितीला दिसून येत नाही. तसेच MMRDA ने विभागाला निधी देतेवेळी हा निधी कसा खर्च करावा यासंदर्भात सूचना केलेल्या असून तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांसमवेत झालेल्या बैठकीत निधीचे वाटप कसे करावे याबाबत उहापोह दिसून येतो. **शासन स्तरावरून प्राप्त माहितीच्या आधारे या निधीमधून झालेली कामे ती पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र एमएमआरडीएला सादर करण्यात आले असून ते त्यांनी स्वीकृत केल्याचे दिसून येते, व कामाची आवश्यकता, शासकीय धोरण व व्यवहार्यता विचारात घेऊनच ही कामे करण्यात येत असल्यामुळे यासंदर्भात समितीची कोणतीही शिफारस नाही.**

**९.४ परिच्छेद क्रमांक ३.१.४.४ : " कामाच्या कार्यान्वयनाचे अयोग्य नियोजन "**

रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर येथील वेगवेगळ्या गलिच्छवस्त्यांमध्ये ५१० सीटेड टायलेट ब्लॉक बांधण्याचे काम MSIB ने रु. २.९४ कोटी किंमतीस मेसर्स कॉम्प्युटर इंजिनीअर यांच्याकडे सोपविले (जून,२०१०) होते जे जून,२०११ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. वारंवार मुदतवाढ देवूनही कंत्राटदाराने माहे ऑक्टोबर,२०१२ पर्यंत फक्त ३१५ ब्लॉक बांधले व १९५ ब्लॉक बांधण्यासाठी निवड करण्यात आलेल्या जागांवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत असल्यामुळे व गलिच्छवस्त्यांमधील जास्त संख्येत असलेल्या लोकसंख्येमुळे जागा उपलब्ध नसल्यामुळे उर्वरित सीटेड टॉयलेट ब्लॉक्स बांधण्याचे काम पूर्ण करता येऊ शकले नाही. त्यामुळे कंत्राटदाराला अंतिम देयकापोटी ५१० पैकी ३१५ सीटेड टायलेट ब्लॉकचे रु. २.४५ कोटीच प्रदान करण्यात आले. परंतु MSIB ने त्याच वस्त्यांमध्ये ३८ सीटेड टायलेट फ्लॉक बांधण्याचे रु. ५२.९० लक्षचे काम ५ कंत्राटदारांना माहे मे,२०१२ मध्ये दिले होते ते माहे मे-एप्रिल,२०१३ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. मंडळाने माहे जून,२०१० मध्ये दिलेल्या ५१० सीटेड टायलेट फ्लॉक कामाबरोबर हे ३८ सीटेड टायलेट ब्लॉक बांधण्याचे नवीन काम संलग्न करून त्याद्वारे रु. २३.३९ लक्षची बचत करणे आवश्यक होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

माहे जून,२०१० मध्ये ५१० शौचकुपांचे बांधकाम देतेवेळी ३८ कामांचा समावेश त्यात का करण्यात आला नाही, तसेच हे ३८ ब्लॉक्सचे काम उपरोक्त ५१० पैकी ओव्हर लॅपिंग होते की दुसऱ्या विभागातील होते याबाबत समितीने आढावा घेण्यास विभागाला सांगितले असता, हा विभाग दुसरा असल्याचे व हे काम ओव्हर लॅपिंग नसून सन २००८-०९ च्या डीएसआर प्रमाणे सन २०१० मध्ये ५१० कामे मंजूर करण्यात आली असून ३८ कामे ही सन २०१२ मध्ये मंजूर केलेली असून त्यासाठीचा डीएसआर सन २०११ चा आहे व ही कामे ओव्हर लॅपिंग नसून त्यांची लोकेशन्स वेगवेगळी असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. ५१० सीटेड टायलेट ब्लॉक्सची ऑर्डर रु. २.९४ कोटी किमतीस देण्यात आली होती. परंतु कंत्राटदाराने त्यापैकी पूर्ण केलेल्या फक्त ३१५ सीटेड टायलेट ब्लॉकसाठी रु. २.४५ कोटीचे प्रदान कंत्राटदाराला करण्यात आले. हे प्रदान ५१० च्या तुलनेने अतिरिक्त झाले असल्याचे समितीने नमूद केले. तसेच यात मेसर्स कॉम्प्युटर इंजिनीअर लि. या कंपनीने सीटेड टायलेट ब्लॉकचे काम केव्हा पासून सुरू केले याची माहिती समितीने विचारली असता हे ओपन टेंडर काढण्यात आले होते व सदरहू टेंडर ४० टक्के Below गेले असल्याचे सांगण्यात आले. तसेच फक्त ३१५ सीटेड टायलेट ब्लॉकचे काम पूर्ण झाले आहे तर जवळपास ६० टक्केचे प्रदान कंत्राटदाराला होणे आवश्यक असताना त्यांना जवळजवळ ९५ टक्के प्रदान झाले असल्यामुळे हे प्रदान अतिरिक्त असल्याचे आक्षेप समितीने घेतले असता, सदरहू प्रकरण स्वतः तपासून १ महिन्याच्या आत अहवाल समितीला सादर करण्याबाबत विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले. सदरहू आश्वासित माहिती समितीला प्राप्त झाली असून निविदेची मान्य रक्कम ५१० शौचकुपांकरिता रु. २,९३,७८,१६० असून ३१५ सीटेड टायलेट ब्लॉकना अंदाजपत्रकानुसार लागणारी प्रमाणित रक्कम रु. १,८१,४५,३३४ असून त्याअनुषंगाने प्रत्यक्षात कंत्राटदाराला अदा करण्यात आलेली रक्कम रु. २,४४,६१,४७२ आहे. त्यात अंदाजपत्रकानुसार लागणारी प्रमाणित रक्कम रु. १,८१,४५,३३४ अधिक किंमतवृद्धी (price escalation) रु. २४,६२,८१३, अतिरिक्त बाबी (Extra Item) रु. १०,५८,४१४ तसेच शौचालयांच्या भूमिगत टाक्यांचे उन्नतीकरण तसेच प्रत्यक्षात झोपडपट्टीतील जागेच्या आवश्यकतेनुसार कराव्या लागलेल्या अतिरिक्त कामाचा खर्च रु. २७,९४,९११ असे एकूण रु. ६३,१६,१३८ रक्कमेचे अतिरिक्त खर्चाचे प्रदान मिळून कंत्राटदारास रु. २,४४,६१,४७२ रकमेचे प्रदान करण्यात आल्याचे सदरहू माहितीत नमूद करण्यात आलेले आहे. **परंतु या प्रकरणी मंजूर शौचकुपे, जागेची उपलब्धता, बांधण्यात आलेली शौचकुपे, कंत्राटदाराला करण्यात आलेले प्रदान, तसेच नवीन ३८ कामे, त्यांच्या जागा, त्याची आवश्यकता, आजमितीस तेथे किती शौचकुपे अस्तित्वात आहेत, किती सुस्थितीत कार्यरत आहेत इ. सर्व बाबींसंदर्भात शंका घेण्यास पूर्ण वाव असल्यामुळे यात गैरव्यवहार व अनियमितता झाली असल्याची पूर्ण शक्यता असून यात मोठे रॅकेट देखील कार्यरत असल्याची शंका नाकारू शकत नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व प्रत्यक्ष पाहणी विभागबाह्य सचिव दर्जाच्या सनदी अधिकाऱ्यामार्फत करण्यात यावी व त्यासंबंधीचा विस्तृत अहवाल व यात काही गैरप्रकार वा अनियमितता आढळल्यास दोषींवर कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

## ९.५ परिच्छेद क्रमांक ३.१.४.५ : " दलितवस्त्यांचा शोध न घेता कामाचे नियमबाह्य कार्यान्वयन "

मुंबई मधील दलितवस्त्यांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाकडून विशेष घटक योजनेंतर्गत सन २०१०-२०१३ मध्ये MSIB ला रु. २४९.८५ कोटी रक्कम प्राप्त झाली असून दलितवस्त्यांमधील अनुसूचित जाती/नवबौद्ध यांच्या संख्येच्या आधारावर त्याचा तुलनात्मक प्राधान्यक्रम निश्चित करून या योजनेखाली दलितवस्त्यांमध्ये कामे करावयाची होती. MSIB ने जिल्हाधिकारी व त्यांच्या स्वतःच्या विभागामार्फत एकूण दलितवस्त्या शोधण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही. दलितवस्त्या शोधण्यासाठी MSIB च्या मुख्याधिकाऱ्यांना सर्वेक्षण करण्याविषयी देखील निर्देशित केले होते. परंतु सन २०१०-१२ मध्ये स्थानिक आमदारांनी प्रस्तावित केलेल्या क्षेत्रात रु. १६६.२० कोटी खर्चाच्या २१११ कामांना MSIB ने मंजुरी दिली आणि दलितवस्त्यांचा शोध न घेता सन २०१२-१३ दरम्यान १८९० कामे पूर्ण केली. दिनांक ३ डिसेंबर २०११ रोजी घेतल्या गेलेल्या डीपीडीसीच्या बैठकीमध्ये तत्कालिन मा.ग्रामविकास मंत्री आणि मुंबई शहर पालकमंत्री यांनी आमदारांनी प्रस्तावित केलेली कामे विचारात घ्यावी असे निर्देश दिल्यामुळे त्यासाठी त्वरीत प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे विभागामार्फत सांगण्यात आले. MSIB ने केलेली ही कृती योग्य नव्हती कारण दलितवस्त्या शोधण्यासाठी योग्यप्रकारे सर्वेक्षण करणे गरजेचे होते आणि योजनेंतर्गत निर्धारित लाभार्थ्यांपर्यंत याचा लाभ पोहोचेल याची खात्री करण्यासाठी अशा सर्वेक्षणाच्या आधारावर कामाचे कार्यान्वयन करावयास हवे होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

दलितवस्त्या या आयडेंटीफाईड (Identified) असतात. मुंबईमध्ये किती दलितवस्त्या अधिकृतरित्या घोषित करण्यात आल्या आहेत. तसेच दलितवस्त्यांचा पैसा विभागाला दुसरीकडे खर्च करता येतो काय? अशी विचारणा समितीने विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान केली असता, मुंबईमध्ये कोणत्या झोपडपट्ट्या दलितवस्ती म्हणून घोषित आहे हे माहित नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. शहरी आणि निमशहरी भागांमध्ये दलितवस्त्या या आयडेंटीफाईड असतात. त्यामुळे तेथे कोणती अडचण येत नाही. परंतु मुंबईमध्ये संमित्र लोकवस्ती असल्यामुळे कोणतीही झोपडपट्टी ही पुर्णपणे दलितवस्ती आहे असे सांगता येत नाही. त्यामुळे आमदारांनी सुचविलेल्या कामांमध्ये जेथे जास्तीत-जास्त दलित लोकसंख्या आहे तेथे ही कामे केली जातात असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. परंतु दलितवस्त्यांचे वर्गीकरण झालेले नाही परंतु तेथे कामे झालेली असून जोपर्यंत दलितवस्त्या जाहीर होत नाहीत तोपर्यंत दलितवस्त्यांचा निधीचा उपयोग करायला नको असाही खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर साक्षीदरम्यान केला. दलितवस्त्यांसाठी देण्यात आलेला सदरचा निधी हा क्लासिफाईड किंवा आयडेंटीफाईड दलितवस्त्यांमध्ये न वापरता केवळ जेथे झोपडपट्टीचा भाग आहे तेथेच दलितवस्त्या असल्याचे गृहित धरुन दलितवस्त्यांच्या नावाखाली हा पैसा खर्च झाल्याचे दिसून येते. जेथे दलितवस्तीचे पॅकेज जाहीरच नाही तेथील केवळ झोपडपट्ट्यांचा आधार घेऊन दलितवस्त्यांचा पैसा खर्च केला जात असेल तर हे तर शासन यंत्रणेचे सपशेल अपयश व निधीचा अपव्यय आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात दलितवस्त्यांसाठी निधीची तरतुद करण्यात येते. परंतु अद्याप मुंबईत दलितवस्त्याच घोषित नसणे अथवा त्याची अधिकृत माहितीच शासनाकडे उपलब्ध नसणे व त्यामुळे हा निधी नियम, निकष, अटी व मार्गदर्शक तत्वानुसार न वापरता दलितवस्त्यांच्या व्यतिरिक्त अन्य जागेवर वापरण्यात येणे, या सर्व बाबी यासाठी विहित तरतुदींचे उल्लंघन करणारीच असून हे प्रकार शासनाच्या माध्यमातूनच जर मुंबईत घडत असतील तर अन्य ठिकाणी वेगळा न्याय व कायदा का लावण्यात येतो. राज्यभर सर्व महानगरपालिकांमध्ये हेच निकष व निर्णय लागू करावे असेही समितीने विदित केले. मा. पालकमंत्र्याच्या आदेशाचा आधार घेऊन नियमबाह्य कार्य विभागाला करता येणार नाही. यासाठी कार्यपद्धती ठरवून दिलेली असतानाही त्याचे पालन न होण्यामागची कारणमिमांसा काय? याबाबत समितीने विभागीय प्रतिनिधींना विचारणा केली असता जोपर्यंत दलितवस्त्या जाहीर होत नाहीत तोपर्यंत तेथे पैसे खर्च करता येत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान केला. ही कार्यपद्धती आक्षेपार्ह असून याबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले असल्यामुळे तत्कालिन अधिकाऱ्यांनी शासनाची मंजुरी न घेता जी कामे केलेली आहेत त्याबाबत तत्कालिन अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास साक्षीदरम्यान दिले असता, विभागाने यासंदर्भात नंतर समितीस अधिक माहिती लेखी स्वरुपात सादर केली असून त्यात मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने दलितवस्त्यांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याकरिता शासनाने उपलब्ध केलेल्या निधीतून कामे करण्याकरिता त्याच वस्त्यांमध्ये कामे व्हावीत या उद्देशाने दलितवस्त्यांची माहिती मिळण्याकरिता वेळोवेळी पत्रव्यवहार व अर्धशासकीय पत्र दिले असता उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, कुलाबा विभाग यांचेमार्फत त्यांच्या कार्यालयात दलितवस्तीबाबतची गणना झालेली नसल्यामुळे घोषित झोपडपट्टयांपैकी ५० टक्के पेक्षा कमी दलितवस्ती असलेल्या झोपडपट्टयांची निश्चित माहिती उपलब्ध नसल्याचे उत्तरादाखल कळविण्यात आले. त्या सोबतच मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचेकडून देखील ही माहिती मिळविण्याकरिता पत्राद्वारे कळविले असता शासनाने जारी केलेल्या नागरी दलितवस्त्यांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याकरिताचा शासन निर्णय क्र.झोपसु/२०१०/ प्र.क्र.१७७/झोपसु-१ अ, दिनांक २५ फेब्रुवारी २०११ या मधील अट क्र. १ मध्ये असे नमूद केले आहे की, मुंबई शहर जिल्ह्यामधील लोकप्रतिनिधींनी सुचविलेली लोकोपयोगी व अत्यावश्यक नागरी सुविधांच्या कामाची तातडी, आवश्यकता, व्यवहार्यता, सुसाध्यता व उपलब्ध निधी विचारात घेवून निधी वितरीत करण्यात यावा. शासनाने नागरी दलितवस्तीच्या संदर्भात मार्गदर्शक तत्त्वात शुद्धीपत्रकाद्वारे सुधारणा केलेली असून यात पुढीलप्रमाणे उल्लेख करण्यात आलेला आहे. या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौद्धांसाठी ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध (विशेष घटक) यांची लोकसंख्या जेथे तुलनेने अधिक आहे तेथे प्राधान्याने उतरत्या क्रमाने या शासन निर्णयात खाली नमूद करण्यात आलेली सुविधाविषयक कामे हाती घेण्यात येतील. यामुळे सदर ठिकाणी मार्गदर्शक तत्वानुसार कामे करण्यात आलेली आहेत. तसेच मा.आमदार महोदयांनी सुचविलेल्या काही कामास शासनाकडून मंजूरी घेण्यात आलेली आहे असे विभागाकडून लेखी स्वरूपात समितीला कळविण्यात आलेले आहे.

विभागाकडून प्राप्त उपरोक्त अधिकच्या माहितीवरून मुंबईमध्ये अद्यापही दलितवस्त्या घोषित झालेल्या नसल्याचे दिसून येते. त्यामुळे मुंबईमध्ये गलिच्छवस्ती सुधारणा संदर्भातील निधी खर्च करण्यासाठी उपरोक्त शासन निर्णयाद्वारे शिथिलता दिल्याचे विभागाने दिलेल्या उपरोक्त माहितीवरून दिसून येते. तसेच मार्गदर्शक तत्वांमध्ये शुद्धीपत्रकाद्वारे केलेल्या सुधारणेनुसार ज्या प्रभागामध्ये अनुसूचित जाती/नवबौद्ध (विशेष घटक) यांच्या लोकसंख्येची तुलना अधिक आहे तेथे प्राधान्याने उतरत्या क्रमाने सुविधाविषयक कामे हाती घेण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. हे निकष अत्यंत मोघम स्वरूपाचे असून यांची शहानिशा केल्यानंतरच उपरोक्त काम करण्यात आले असल्याचे देखील माहितीमध्ये नमूद करण्यात आलेले नाही. अशा संदिग्ध व मोघम रचनेच्या आधारे कोणतेही काम कोणत्याही झोपडपट्टीमध्ये करण्याची मुभा विभागास प्राप्त होते व दलितवस्त्यांसाठी तरतूद असलेल्या निधीचे व कामाचे वाटप अन्य वस्त्यांसाठी करणे शक्य होऊ शकते. **अशा परिस्थितीत या शासन निर्णयाच्या आधारे केवळ गलिच्छवस्ती सुधारणेसाठी देण्यात आलेल्या निधीचा वापर हा केवळ त्याच प्रयोजनासाठी न होता अनेक निकषबाह्य कामांमध्ये व वस्त्यांमध्ये देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जे या अंतर्गत अपेक्षित नाही. दलितवस्त्या सुधारणेच्या उदात्त हेतूने ही तरतूद करण्यात आली आहे. त्याचा उद्देश लक्षात घेऊनच या निधीचे व कामाचे वाटप होणे आवश्यक आहे. अतः शासनाने या संपुर्ण बाबींचा पुन्हा आढावा घेवून स्पष्ट मार्गदर्शक तत्वे विहित करावीत व त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच दलितवस्त्या अधिसूचित करण्याचे काम तातडीने पूर्ण करावे व दलितवस्त्यांसाठीचा निधी दलितवस्त्यांमध्येच खर्च करणेबाबतचे नियोजन करून निर्णय घेण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**९.६ परिच्छेद क्रमांक ३.१.४.६ : " अंतर्गत नियंत्रण "**

**(१) मालाची तपासणी करण्यातील अपर्याप्तता तसेच दक्षता व गुणवत्ता नियंत्रण कक्षांच्या अभिक्षणांची पूर्तता न करणे -**

**कंत्राटदाराबरोबर** केलेल्या करारामधील कलम ५२ नुसार एखाद्या घटकाच्या किंवा संपूर्ण इमारतीच्या गुणवत्ता/सक्षमता आणि निर्दोषता यांची चाचणी घेण्यासाठी MSIB ने विहित केलेल्या सर्व चाचण्या कंत्राटदारांनी स्वखर्चाने म्हाडाच्या माल चाचणी प्रयोगशाळेत (MTL) करणे बंधनकारक असून कंत्राटदारास देयकाचे प्रदान करण्याअगोदर चाचणी प्रमाणपत्राची वैधता तपासण्याची देखील आवश्यकता असतानाही १२७० पैकी ४० प्रकरणांमध्ये सादर केलेल्या माल चाचणी प्रमाणपत्राच्या आधारावर कंत्राटदारांना रु. ४.३१ कोटिच्या अंतिम देयकाचे प्रदान करण्यात आले होते. लेखापरिक्षकांनी MTL बरोबर केलेल्या उलट तपासणीत MTL ने एकही चाचणी प्रमाणपत्र जारी केले नसल्याचे उघडकीस आले. तसेच चाचणी तपासणी केलेल्या इतर ३९ प्रकरणांमध्ये माल चाचणी प्रमाणपत्र अभिलेख्यांमध्ये उपलब्ध नसतानाही विभागाने रु. ४.२६ कोटिचे अंतिम प्रदान केले, असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

त्याचप्रमाणे कामांचे कार्यान्वयन निर्धारित वैशिष्ट्यांसह आणि आरेखनानुसार होत असल्याची खात्री करण्यासाठी म्हाडाच्या VQC कक्षाकडून तपासणी करणे आवश्यक असून VQC कक्षाने काढलेली अभिक्षणे ही अनुपालनासाठी किंवा पुर्ततेसाठी तसेच सदोष कामांना सुधारण्यासाठी अभिक्षण ज्ञापनाच्या (OM) रूपात संबंधित विभागांना पाठविली जातात. कामाचा दर्जा सुधारण्यासाठी अंतिम देयक प्राप्त करण्यापूर्वी VQC कक्षाने जारी केलेले कोणतेही OM प्रलंबित नसल्याचे कार्यकारी अभियत्यांनी प्रमाणित करण्याबाबत म्हाडाच्या मुख्य अभियंत्यांनी सूचना दिलेल्या असतानाही चाचणी केलेल्या १२७० प्रकरणांपैकी २७ प्रकरणांमध्ये ३२ OM प्रलंबित असतानाही कोणतेही OM प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंत्यांनी देऊन कंत्राटदारांची रु. २.६० कोटिची अंतिम देयके पारीत करण्यात आली होती, असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदरहू विषयावर समितीसमोर साक्षीदरम्यान चर्चा करताना ४० कामांची बोगस प्रमाणपत्रे कंत्राटदारांनी सादर करून व या प्रमाणपत्रांची तपासणी न करता त्यांचे देयकांचे प्रदान करणे, याबाबत विभागाने कंत्राटदारावर FIR दाखल करणे, त्यांना काळ्या यादीत टाकणे, तसेच या प्रकरणी दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणे अशी कोणती कारवाई आजतागायत केली असल्याचे समितीने विचारले असता या संदर्भात कोणतीही कारवाई केली नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. तसेच काम सुरू असताना व्हीजीलन्सच्या अधिकाऱ्यांनीदेखील तपासणी केलेली नसून व्हीजीलन्सच्या क्लिअरन्सशिवाय कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित न करण्याचे नियम असतानाही याचे पालनदेखील झाल्याचे सदरहु प्रकरणात दिसून येत नाही. २७ कामांमध्ये OM प्रलंबित असतानाही कार्यकारी अभियंता यांनी OM प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र देऊन रु. २.६० कोटी देयकांचे प्रदान करण्यात आले. या सर्व बाबी अत्यंत गंभीर असून यासंदर्भात कंत्राटदार व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनासारखी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असतानाही कुठलीही कारवाई विभागाच्या स्तरावरून झाल्याचे दिसून येत नाही. यासंदर्भात समितीसमोर साक्षीदरम्यान उत्तर देताना अहवाल प्राप्त झाल्याशिवाय पैसे देणे व बोगस सर्टीफिकेटची तपासणी न करता पैसे देणे यात विभागाचे अधिकारीदेखील जबाबदार असून त्यांचेवर जबाबदारी निश्चित करून १ महिन्याच्या आत अहवाल देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले.

याअनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या आश्वासित माहितीचे अवलोकन केले असता ४० बनावट प्रमाणपत्रांबाबत संबंधित नोंदणीकृत ठेकेदारास व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना काळ्या यादीत टाकण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले असून संबंधित ४० कामे सुस्थितीत असून कार्यकारी अभियंता यांनी बहुतांश ठिकाणी त्यात गैरव्यवहार झाला नसल्याचे दिसून येत असल्याचे सदरहू अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच ३९ कामांबाबत सद्यःस्थितीत कामे सुस्थितीत असल्याबाबत प्रमाणपत्र घेण्यात आले असून सन २०१७-१८ मध्ये हाती घेण्यात येणाऱ्या कामांच्या बाबतीत साहित्याच्या काही चाचण्या राज्य शासन/केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेकडून तपासणी करून घेण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले असल्याचे देखील नमूद करण्यात आलेले आहे. तसेच या ७९ कामांच्या मुल्याची छाननी करण्याकरिता त्या त्या वर्षात म्हाडा प्राधिकरणाच्या दक्षता व गुण नियंत्रण प्रयोगशाळेतील चाचणी दराच्या तीन पट रक्कम ही प्राधिकरणाने जारी केलेल्या परिपत्रकान्वये कंत्राटदारांकडून वसूल करण्याचे प्रस्तावित करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर कंत्राटदारांनी कामाकरिता वापरलेल्या साहित्याचे सादर केलेले चाचणी अहवाल हे खरे किंवा खोटे याबाबत संबंधित अधिकारी सकृतदर्शनी सत्यता पडताळू शकत नसल्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येऊ नये तसेच बिलामध्ये चाचणी अहवाल नव्हते या संदर्भात अनावधानाने ते पाहण्याचे राहून जाऊ शकते असे विभागाने दिलेले स्पष्टीकरण तर अनाकलनीयच असून अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे. तसेच म्हाडाच्या विविध मंडळाच्या खरेदी साहित्य चाचणी शुल्कापोटी दोन ते तीन पट रक्कम वसुल करता येणे शक्य असल्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येऊ नये असेही सदरहू अहवालात नमूद आहे. तसेच ४० बनावट प्रमाणपत्रासंबंधातील प्रकरणांतील ठेकेदारांनी संबंधित कामे जागेवर असल्याचे व दर्जेदार असल्याचे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली असल्यामुळे आमच्यावर गुन्हा दाखल करण्यात येऊ नये अशी विनंती विभागामार्फत लोकलेखा समितीच्या अध्यक्षांच्या निदर्शनास आणावी असा देखील उल्लेख सदरहु माहितीमध्ये नमूद करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रकरणी महालेखाकारांनी घेतलेले आक्षेप व त्यावर विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान दिलेले आश्वासन व त्याअनुषंगाने समितीकडे दाखल केलेले कार्यवाही अहवाल याचे अवलोकन करता हे प्रकरण अतिशय गंभीर स्वरूपाचे असून विभागाने चौकशी व कारवाईच्या नावाखाली अत्यंत सोयीस्कर व समितीची दिशाभूल करणारी भूमिका घेऊन यात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांना व कंत्राटदारांना नियमबाह्यरित्या संरक्षण देण्याचे काम केल्याचे दिसून येते. महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपासंदर्भात व अधिकाऱ्यांनी त्यांची जबाबदारी पार न पाडण्याबाबत तसेच कंत्राटारांनी केलेल्या उल्लंघनाबाबत अहवालात कोणतेही नियमानुकुल अथवा समर्थनीय विवेचन नमूद न करता कामाचा दर्जा चांगला असून संबंधित कामे जागेवर असल्याचे नमूद करून अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येऊ नये अशी माहिती वजा सूचना अहवालाच्या माध्यमातून समितीला करणे ही बाब तर अत्यंत आक्षेपार्ह असून समितीच्या सांविधानिक कामामध्ये अडथळा निर्माण करणारी आहे. एवढेच नव्हे तर ४० बनावट प्रमाणपत्रासंबंधीच्या प्रकरणात ठेकेदारांनी संबंधित कामे जागेवर असल्याचे व दर्जेदार असल्याचे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केलेली असल्यामुळे आमच्यावर कोणतेही गुन्हे दाखल करण्यात येऊ नये अशी विनंती विभागामार्फत लोकलेखा समितीच्या निदर्शनास आणावी व अशी कंत्राटदारांनी विभागाला केलेली विनंती देखील विभागाने अहवालात नमूद करून समितीकडे अग्रेषित केली. ही तर सर्वात गंभीर बाब असून समितीचा अवमान करणारी तर आहेच. शिवाय समितीला अशाप्रकारे माहिती वजा सूचना देणारी असून समितीच्या कामात अप्रत्यक्षरित्या अनाहूत हस्तक्षेप करणारी आहे. या संपुर्ण प्रकरणात कंत्राटदारांपासून तर अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचाच सहभाग असल्याचे प्राथमिकरित्या सिद्ध होत असून यात फार मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे समितीचे आता स्पष्ट मत झाले आहे. **अतः या संपुर्ण प्रकरणाचे गांभीर्य पाहता या प्रकरणाची तपासणी त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात यावी. चौकशी सुरू करणेपुर्वी यात सहभागी असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना निलंबित करून नंतर ही चौकशी करण्यात यावी. जेणेकरून ही चौकशी निःपक्षपातीपणे व पारदर्शकरित्या करणे शक्य होईल व यात दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी व दोषी कंत्राटदारांवर कठोर स्वरूपाची दंडात्मक कारवाई करून सर्वांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकून त्यांना पुढे शासनस्तरावरील कोणतेही काम देण्यात येऊ नये. तसेच समितीला दिलेल्या आश्वासित माहितीमधील भाषा, शब्दरचना व पद्धत ही आक्षेपार्ह व समितीचा अवमान करणारी असून यासंदर्भातदेखील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**९.७ (२) अंतर्गत लेखापरिक्षण व तपासणी -**

माहे एप्रिल,२०११ मध्ये म्हाडाने प्रस्तावित केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षण शाखेने ती अस्तित्वात आल्यापासून MSIB चे किंवा त्यांच्या एकाही कार्यालयाचे अंतर्गत लेखापरिक्षण केले नसल्याचा आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

**याबाबत विभागाने अंतर्गत लेखापरिक्षण नियंत्रण व्यवस्था अधिक बळकट करावी, प्रत्येक वर्षी लेखापरिक्षण करणे बंधनकारक करण्यात यावे, अंतर्गत लेखापरिक्षणासाठी एक पॅनल तयार करण्यात यावे. तसेच हे ऑडीट गुणवत्तेवर व पारदर्शकरित्या होण्याकरिता रॅन्डम ऑडीट करण्यात यावे तसेच यात विभागाचे अधिकारी न घेता विभागबाह्य अधिकाऱ्यांचा यात समावेश करण्याबाबत देखील विचार करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## (ब) गृहनिर्माण विभाग

**१० अभिप्राय व शिफारशी :**

**१०.१ परिच्छेद क्रमांक ३.२.१ : " महसुलाची हानी " (राजयोग सहकारी गृहनिर्माण संस्था)**

**वर्सोवा, मुंबई** येथील बांधलेल्या २२५ गाळ्यांचा ताबा मिळण्यासाठी राजयोग सहकारी गृहनिर्माण संस्थेने विभागाकडे मागणी करून प्रत्येकी ९६५ चौ.फु. बांधीव क्षेत्रफळाचे २२५ गाळे उपलब्ध करून देण्याविषयी विचारणा केली असता त्यानुसार संस्थेला २२५ गाळे उपलब्ध करून देण्याविषयी म्हाडाला विभागाने निर्देश दिले. दिनांक ३१ मार्च २००९ पर्यंतच्या कालावधीचे व्याज सम्मिलित करून माहे नोव्हेंबर,२००८ मध्ये म्हाडाने परिगणित केलेली प्रती चौ.फु. विक्री किंमत रु. ४३६१ जी पुर्णांकात रु. ४४०० एवढी झाल्यानंतर त्याच्या आधारे संस्थेला तात्पुरते प्रमाणपत्र जारी करून (ऑगस्ट,२००९) प्रत्येक गाळ्याची विक्री किंमत रु. ४२.४६ लक्ष असल्याचे कळविले. तात्पुरत्या प्रस्ताव पत्रानुसार एकूण किंमतीच्या (रु. ९५.५४ कोटी) २५ टक्के रक्कम ही तात्पुरते प्रस्ताव पत्र जारी केल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत आणि उर्वरित ७५ टक्के ९० दिवसांच्या आत भरणे आवश्यक होते. १३.५ टक्के प्रतिवर्षी या दराने व्याज भरल्यास रक्कम प्रदानाची नियत तिथी ४५ दिवसांपर्यंत पुढे वाढविली जाऊ शकत होती व तरीही प्रदान झाले नाही तर वाटप रद्द करावयाचे होते व आधी भरलेल्या रक्कमेतून गाळ्याच्या एकूण किंमतीच्या १ टक्के रक्कम वजा करून उर्वरित रक्कम परत करावयाची होती. परंतु ऑगस्ट,२००९ मध्ये गाळ्यांचे प्रत्यक्ष वाटप होवूनही त्या महिन्यापर्यंतचे व्याज समाविष्ट न करता फक्त मार्च,२००९ पर्यंतचे व्याज विचारात घेऊन नोव्हेंबर,२००८ मध्ये रु. ४४०० प्रति चौ.फु. एवढी विक्री किंमत प्रमाणित करण्यात आली. प्रत्यक्ष वाटपाच्या तारखेपर्यंतचे व्याज समाविष्ट केल्यास येणारी विक्री किंमत रु. ४५९९ प्रती चौ.फु. होती. अशाप्रकारे विक्री किंमत चुकीच्या पद्धतीने निश्चित केल्यामुळे २२५ गाळ्यांच्या वाटपात रु. ४.३२ कोटी महसुलाची हानी झाली. तसेच ऑगस्ट,२००९ ते जून,२०११ दरम्यान संस्थेने एकूण रु. ९५.५४ कोटी पैकी फक्त रु. ८९.७७ कोटी भरले. संस्था जरी तिचे दायित्व पूर्ण करू शकली नाही तरी म्हाडाने तात्पुरत्या प्रस्ताव पत्रातील अटी व शर्तीनुसार वाटप रद्द केले नाही किंवा गाळ्याच्या किंमतीच्या १ टक्का रक्कम वजा देखील केली नाही. सप्टेंबर,२०१३ पर्यंतच्या कालावधीसाठी विलंबीत प्रदानावरील रु. ८.५४ कोटी व्याजासह गाळ्याच्या किंमतीपोटी संस्थेकडून रु. ५.७७ कोटी देय रक्कम प्रलंबित होती. अशाप्रकारे प्रत्यक्ष वाटपाच्या तारखेपर्यंत व्याजाची आकारणी न केल्यामुळे गाळ्यांच्या विक्री किंमतीची चूकीची निश्चिती करण्यात आली. परिणामी रु. ४.३२ कोटी महसुलाची हानी झाली आणि व्याजासह रु. १४.३१ कोटी प्रलंबित देय रक्कमेची वसुली झाली नाही, असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

आजी/माजी विधानसभा/विधानपरिषद, लोकसभा व राज्यसभा सदस्य या गटाकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ च्या विनियम १३ (२) अंतर्गत राजयोग सहकारी गृहनिर्माण संस्था ही नविन गृहनिर्माण योजना म्हाडाने राबविली असून त्याकरिता एकूण २२३ सदस्यांची शिफारस म्हाडाच्या प्रचलित निकष व नियमांच्या पूर्ततेस अधिन राहून राज्य शासनाकडून करण्यात आलेली होती. २२५ विकसीत सदनिकांपैकी २२३ सदस्यांची यादी अंतिम झालेली असून २ सदनिका शिल्लक आहेत. सुरूवातीला या प्रत्येक सदनिकांची किंमत रु. ४२,४६,००० होती. त्यानुसार संबंधितांना लेटर इश्यु झाले व संबंधितांनी रक्कमेचे प्रदान देखील केले. त्यानंतर पीओएल म्हणजे प्रायमरी ऑफर लेटर ज्या दिवशी इश्यु झाले त्याप्रमाणे त्याचे पुनर्मुल्यांकन करणे आवश्यक होते. त्यानुसार १९० सदनिकांची किंमत प्रत्येकी रु. ४२,४६,००० होती. परंतु पुनर्मुल्यांकन केल्यावर सदनिकेची सुधारित किंमत रु. ४४,३६,००० झाली. त्यापैकी जवळपास ३६ सदस्यांनी पूर्ण रक्कम भरलेली असून उर्वरित सदस्यांनी पूर्ण रक्कम भरली नाही. सदस्यांना वेगवेगळ्या तारखेला प्रायमरी ऑफर लेटर मिळाल्यामुळे भरावयाच्या रक्कमेमध्ये तफावत दिसून येते. काही सदनिकांची सुधारित विक्री किंमत रु. ४४,३७,००० होती. काही सदनिकांची किंमत नंतर रु. ५१,४१,००० झाल्याचे देखील विभागीय सचिवांनी समितीला सांगितले. एका वर्षामध्ये रक्कमेत एवढा फरक पडण्याचे कारण काय अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये व्याजाचा देखील समावेश असल्याची माहिती विभागीय सचिवांकडून देण्यात आली. या सदनिकांची किंमत वाढून अंतिमतः ती याअगोदरच्या रकमेपेक्षा जास्त असल्याचे देखील विभागीय सचिवांनी समितीला सांगितले. आजतागायत १६३ सदनिकाधारकांकडून सुधारित विक्री किंमतीनुसार रु. ६,१८,००,००० रक्कमेची वसुली व्याजासह येणे बाकी असून संबंधितांना यासंदर्भात नोटीस दिल्यानंतर रु. ४,०४,००,००० रक्कम भरण्यात आलेली असून उर्वरित वसुली प्रकरणी संबंधितांना पुन्हा नोटीस देण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. तसेच त्यांना पुन्हा स्मरणपत्र देण्याबाबत देखील सांगण्यात आले.

१०.२ राजयोग संस्थेस आजमितीपर्यंत २०५ सदनिकांचा ताबा देण्यात आला असून २०३ सभासदांना सुधारित विक्री किंमतीच्या फरकाची रक्कम व विलंब आकार वसूल न करता त्यापूर्वीच ताबा देण्यात आलेला आहे. यापैकी ४० सभासदांनी फरकाची पूर्ण रक्कम अदा केलेली असून २ सभासदांनी सदनिकेपोटी सुधारित विक्री किंमतीसह पुर्ण रक्कमेचा भरणा केलेला असून उर्वरित सभासदांकडून फरकाची रक्कम वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. **समितीने अधिक स्पष्टता येण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभाग व म्हाडाला पत्राद्वारे सुधारित विक्री किंमतीच्या फरकाची रक्कम वसूल करण्यामागे अस्तीत्वात असलेल्या नियमाच्या तरतुदीबाबतची माहितीसंदर्भात विचारणा केली असता त्यांनी दिनांक २४ जुलै २०१७ रोजी दिलेल्या पत्रान्वये सदनिकेची विक्री किंमत प्राधिकरणाचा**

**ठराव क्र.५४५ व दिनांक ९ नोव्हेंबर १९८२ रोजीच्या मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या परिपत्रकानुसार निश्चित केली जाते. सदरचे परिपत्रकामध्ये व्याज भांडवलीकरणाची तरतूद आहे. सदरच्या तरतूदीनुसार विक्री किंमत निश्चित करून सदनिका वितरणाचे तात्पुरते देकार पत्र देण्यात येते. व्याज भांडवलीकरणासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचा त्या त्या वर्षी लागू असलेला व्याजदर (Prime Lending Rate) विचारात घेऊन विक्री किंमत करण्यात येते असे कळविले आहे. महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने सदरहू विषयावर समितीसमोर विस्तृत चर्चा झाली आहे. परंतु राजयोग सोसायटी ही विधानसभा/विधानपरिषद सदस्यांची असून लोकलेखा समितीचे काही सदस्य या राजयोग सोसायटीचे देखील सदस्य असल्यामुळे लोकलेखा समितीने या प्रकरणासंदर्भातील निर्णय घेणे उचित होणार नाही. अतः महालेखाकारांनी याबाबत घेतलेले आक्षेप लक्षात घेता शासनाने या प्रकरणी योग्य तो निर्णय घ्यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१०.३ म्हाडाने आमदारांसाठी दिलेल्या या सदनिकांमध्ये पाण्याची अडचण असल्याने त्या ठिकाणी राहण्यास जाण्यास कोणी तयार नाही. तसेच वरळी येथील आमदार-खासदारांकरिता सदनिका उपलब्ध करून देण्यासाठी निर्मित सुखदा सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये आजतागायत पाण्याचे कनेक्शन मिळाले नसून तेथे रोज टॅक्टरने पाणीपुरवठा होतो. म्हाडाने बनविलेल्या या व अशा अनेक इमारती बेकायदेशीर नसतानाही व सदनिका विक्री करून म्हाडाने रक्कम मिळविल्यानंतर व पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी म्हाडाची व महानगरपालिकेची असतानाही या सहकारी गृहनिर्माण संस्थेला नियमित पाणीपुरवठा होत नाही असे समिती सदस्यांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर सदरहू बाब तपासून घेण्यात येईल व या संदर्भात महानगरपालिका आयुक्तांशी देखील चर्चा करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वासित केले होते. **अतः या बाबींची चौकशी करून या सहकारी गृहनिर्माण संस्थेला नियमित पाणीपुरवठा सुरू होण्याच्यादृष्टीने आवश्यक ती पुढील कार्यवाही म्हाडा आणि मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## (क) गृहनिर्माण विभाग

**११ अभिप्राय व शिफारशी :**

**११.१ परिच्छेद क्रमांक ३.२.२ : " वसुली योग्य रक्कमांची वसुली न होणे "**

**(मीरा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि रायगड सैनिकी शाळा)**

**(१) मीरा सहकारी गृहनिर्माण संस्था**

मीरा सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास (जमिनींचे वाटप) विनियम १९८२ च्या विनियम १६ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने ओशिवरा, जोगेश्वरी (प.) येथील ६९६१ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन मीरा सहकारी गृहनिर्माण संस्थेला दिली. म्हाडाच्या नियंत्रणाखालील मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाच्या (मुंबई मंडळ) मुख्य अधिकाऱ्यांनी संस्थेला जमिनीच्या भाडेपट्टी अधिमुल्यापोटी रु. ६.७१ कोटी भरण्याचे कळविले. ३० वर्षे एवढ्या भाडेपट्टीच्या कालावधीमध्ये देय असलेल्या भाडेपट्टी भाड्याची रक्कम सम्मिलित केली. तसेच सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत जर संस्था रक्कम भरू शकली नाही तर ती भरण्यासाठी अतिरिक्त ३ महिन्यांचा कालावधी देण्यात येईल आणि जर त्याही कालावधीत रक्कम भरली नाही तर संपूर्ण रक्कम भरेपर्यंत दरवर्षी १३.५ टक्के चक्रवाढ दराने व्याज आकारले जाईल, असेही संस्थेला कळविण्यात आले होते. तसेच संस्थेला असेही कळविण्यात आले होते की, सदर भूखंड महानगरपालिकेच्या किरकोळ मंडईसाठी राखीव ठेवण्यात आला होता. संस्थेने भूखंडाच्या ४० टक्के क्षेत्रात महानगरपालिका मंडई बांधावी व ती बृहन्मुंबई महानगरपालिकेला मोफत हस्तांतरित करावी. त्यानुसार संस्थेने स्वखर्चाने बांधावयाच्या महानगरपालिका मंडई वरील खर्च विचारात घेवून संस्थेकडून देय असलेली रक्कम कमी करून ती रु. ३.२२ कोटी निर्धारित करण्यात आली. महानगरपालिका किरकोळ मंडई बांधण्याकरिता संस्थेला साधारणतः रु. १३,००० प्रती चौ.मी. खर्च येईल असा म्हाडाचा अंदाज होता. तात्पुरत्या स्वरुपात गृहीत धरलेल्या बांधकामाच्या खर्चात जर काही कपात झाली तर भाडेपट्टीच्या अधिमुल्यात होणारी फरकाची रक्कम म्हाडाला देण्यात येईल अशा आशयाचे एक सहमती पत्र सादर करण्याचे संस्थेला निर्देश देण्यात आलेले होते. म्हाडाने महानगरपालिका मंडईच्या बांधकामाची सुधारित किंमत रु. ८६०८ प्रती चौ.मी. निश्चित केली. त्यानुसार म्हाडाला संस्थेकडून रु. ४.३२ कोटी सुधारित रक्कम देणे आवश्यक होते. असे सूचना पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत रु. १.४० कोटी एवढी फरकाची रक्कम भरण्यास व असे न केल्यास प्रतिवर्षी १३.५ टक्के चक्रवाढ दराने व्याज देखील देय होते. संस्थेने या रक्कमेचा भरणा केला नसतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र व बांधकाम पूर्तता प्रमाणपत्र प्राप्त होणे शक्य व्हावे यासाठी म्हाडाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला ना-हरकत प्रमाणपत्र जारी केले. तसेच संस्थेने ६५४ चौ.मी. एवढ्या अतिरिक्त बांधीव क्षेत्रफळाची मागणी केली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अभिन्यासासाठी १ ऐवजी १.२ एवढा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक प्राप्त होईल असे गृहीत धरुन म्हाडाने संस्थेला BUA मंजूर केला. FSI मध्ये वाढ होईल या अपेक्षेने अतिरिक्त BUA देणे नियमबाह्य असल्याने संस्थेला अदेय लाभ दिला गेला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

साक्षीदरम्यान मीरा सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून सन २००४ पासून वसुलीची कार्यवाही सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. तसेच सदरहू सहकारी गृहनिर्माण संस्थेस सुरूवातीस देण्यात आलेली सवलत नंतर बोर्डाने withdraw करून Part Concession देण्यात आले. अशाप्रकारे येणे बाकी असलेली पूर्ण रक्कम अद्यापही प्राप्त झाली नसून रक्कमेचे अंशतः प्रदान करण्यात आलेले आहे. उर्वरित वसुलीचे प्रकरण जवळपास १२ वर्षांपासून प्रलंबित असतानाही या सहकारी गृहनिर्माण संस्थेला विभागाने एवढे संरक्षण देण्याचे कारण काय अशी समितीने विचारणा केली. तसेच सन २००४ साली UC मिळविण्याकरिता म्हाडाने ना-हरकत प्रमाणपत्र दिले नसते तर सर्व वसुली त्यावेळीच पूर्ण झाली असती असे मत समितीने व्यक्त केले. तसेच FSI मधील वाढ गृहीत धरुन सहकारी गृहनिर्माण संस्थेला अधिकचा BUA देखील बेकायदेशीररित्या मंजूर करण्यात आला. सरकारी अधिकाऱ्यांची संस्था असल्यामुळे एवढे संरक्षण या सहकारी गृहनिर्माण संस्थेला विभागाने दिले काय अशीही विचारणा समितीने केली असता या शासकीय अधिकाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला नोटीस देण्यास आल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. तसेच थकबाकी भरण्याकरिता नोटीस देण्यास विलंब झाला असल्याची वस्तुस्थिती विभागाने मान्य केली.

एखाद्या संघटनेच्या संपत्तीचे रक्षण करण्यासाठी व तिला देय असणाऱ्या रक्कमेची वसुली निर्धारित वेळेत होईल याची खात्री करण्यासाठी संघटनेची सर्व कार्ये प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने होत असल्याची पर्याप्त खात्री देण्यासाठी प्रस्थापित केलेली अंतर्गत नियंत्रण व्यवस्था ही त्या संघटनेच्या व्यवस्थापन प्रक्रियेचा एक अविभाज्य भाग असते. म्हाडा अधिनियम, १९७६ मधील तरतुदींनुसार संपूर्ण राज्यात गृहनिर्माण, जमिनींचा विकास, गाळे अथवा भूखंडाचे वाटप इ. कामे करण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण जबाबदार असते. या प्रकरणांमध्ये बळकट अंतर्गत नियंत्रणाचा अभाव असल्याचे समितीला दिसून आले.

अतः या प्रकरणी तातडीने ही वसुली संस्थेकडून करण्यात यावी तसेच महानगरपालिकेला रिटेल मार्केट संबंधी हस्तांतरणाची प्रक्रिया १ महिन्याच्या आत पार पाडावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा असे निर्देश समितीने विभागाला दिले असता विभागाने

यासंदर्भातील आश्वासित माहिती समितीला सादर केली. त्यात सन २००४ ते २०१३ या कालावधीदरम्यान वसुलीच्या नोटीसा काढण्यात आल्या नव्हत्या. तर सन २०१६ मध्ये या नोटीसा काढण्यात आल्याचे समितीला सांगण्यात आले. तसेच वसुलीच्या रक्कमेपेकी काही रक्कम भरण्यात आली असून संस्थेचे या थकबाकीबद्दल काही आक्षेप असून ते दूर केल्यानंतर रक्कमेचा भरणा करून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल असे विभागाच्या प्रतिनिधींनी समितीला कळविले, तसेच थकबाकीची वसुली प्रलंबित असतानाही भोगवटा प्रमाणपत्र मिळण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत त्यावेळच्या परिस्थितीनुरुप निर्णय घेण्यात आल्याची शक्यता असल्याचे देखील समितीला कळविण्यात आले. तसेच FSI बाबत सुधारित अभिन्यास तयार करून महानगरपालिकेस मंजुरीकरिता पाठविण्याची कार्यवाही सुरू असल्याचेही सदर माहितीमध्ये नमूद करण्यात आले आहे. **विभागाने समितीला दिलेली उपरोक्त आश्वासित माहिती पाहता विभागाने वसुलीसंदर्भातील कारवाई याअगोदरच करून समितीपुढे येणे अपेक्षित होते. परंतु समितीसमोर परिच्छेद साक्षीसाठी येईपर्यंत विभागाने या प्रकरणाची कोणतीही गंभीर दखल घेतली नसून संरक्षणच देण्याचे काम केलेले आहे. वसुलीसाठी नोटीस विलंबाने देणे, वसुली प्रलंबित असतानाही ना-हरकत प्रमाणपत्र देणे, तसेच FSI मधील वाढ गृहीत धरुन कार्यवाही करणे अशा गंभीर बाबींसंदर्भात महालेखकारांनी आक्षेप घेतलेले असून याबाबत शासनाने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच शासनाने ही वसुलपात्र रक्कम तात्काळ वसूल करावी. तसेच महानगरपालिकेला रिटेल मार्केट संबंधी हस्तांतरणाची प्रक्रिया तातडीने पार पाडण्यात यावी व उपरोक्त केलेल्या सर्व कार्यवाहीचा अहवाल समितीस २ महिन्यांत सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**११.२ रायगड सैनिकी शाळा**

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास विनियम १९८२ च्या विनियम १६ अन्वये माध्यमिक शाळा (३८०० चौ.मी.) आणि क्रीडांगण (६३०० चौ.मी.) याकरिता राखीव ठेवलेले भूखंड ६०:४० या प्रमाणात अनुक्रमे रायगड सैनिकी शाळा आणि राज पुरोहीत ट्रस्ट यांना देण्याचे निर्देश शासनाने म्हाडाला (मार्च,२००२) दिले. अंतिम मोजणीच्या वेळी शाळेसाठी २४०० चौ.मी. आणि क्रीडांगणासाठी ४३३२ चौ.मी. क्षेत्रफळाचा राखीव असलेला भूखंड रायगड सैनिकी शाळेला देण्यात आला. माहे एप्रिल,२००४ मध्ये ३० वर्षांसाठी रु. ८३.२२ लक्ष रक्कमेच्या भाडेपट्टीचे करारपत्र कार्यान्वित करण्यात आले. राज पुरोहीत ट्रस्टकडून कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने म्हाडाने त्यांचा प्रस्ताव रद्द केला व त्यांचा ४४९९ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड देखील रु. ५३.६१ लक्ष अधिमुल्याला रायगड सैनिकी शाळेला देण्याचा प्रस्ताव मान्य केला. म्हाडाच्या धोरणानुसार जी व्यक्ती किंवा संस्थेस शाळा बांधण्यासाठी भूखंड देण्यात आला असेल ती व्यक्ती BUA च्या ५ ते २० टक्के भाग व्यापारी प्रयोजनासाठी वापरु शकते, त्या आधारावर रायगड सैनिकी शाळेने इमारतीमधील संपूर्ण तळ व पहिला मजला (१४०९ चौ.मी.) व्यापारी प्रयोजनासाठी रु. ९.५१ कोटी भाडेपट्टी अधिमूल्यावर M/s. Invention Realtors Pvt. Ltd. यांना दुय्यम भाडेपट्टीवर दिला. नियमानुसार रायगड सैनिकी शाळेला या अंतर्गत एकूण प्राप्त उत्पन्नापैकी २५ टक्के भाग (रु. २.३८ कोटी) म्हाडाला देणे आवश्यक होते. परंतु मार्च,२००७ ते सप्टेंबर,२००८ दरम्यान नस्तीवरील टिप्पणीवर चर्चा करण्यात येऊनही या रक्कमेबाबत म्हाडाने नोटीस जारी करण्याव्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच भूखंडाचा व्यापारी प्रयोजनासाठी करावयाच्या वापरासाठी म्हाडा, रायगड सैनिकी शाळा, M/s. Invention Realtors Pvt. Ltd. यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करणे अपेक्षित असतानाही तसे न केल्याबद्दल म्हाडाकडून रायगड सैनिकी शाळेला कोणतीही नोटीस पाठविण्यात आली नव्हती. म्हाडाने रायगड सैनिकी शाळेतील भाडेपट्टीचा करार माहे एप्रिल, २०३४ पर्यंतच वैध असताना M/s. Invention Realtors Pvt. Ltd. यांचे सोबत रायगड सैनिकी शाळेने माहे सप्टेंबर, २०३४ पर्यंत करार केला. तसेच रायगड सैनिकी शाळेला दिलेल्या भूखंडापैकी १,२६९ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग म्हाडाच्या मालकीचा असल्याचे सिद्ध करणारे स्पष्ट पुरावे उपलब्ध नाहीत. अशाप्रकारे म्हाडामध्ये अंतर्गत बळकट नियंत्रण व्यवस्था नसल्यामुळे रु. ५.०४ कोटी व्याजाचेही नुकसान झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

११.३ या प्रकरणी रक्कमेची वसुली, इमारतीचा व्यावसायिक वापर, वापरातील बदल तसेच त्रिपक्षीय करार असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी नोंदविले असल्यामुळे यात अनियमितता झाली असून यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली अशी पृच्छा समितीने केली असता वसुली प्रकरणात नोटीसा पाठविण्यात आल्या असून काही प्रकरणात रक्कम वसूल झाली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच violation of use बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून सदरहू प्रकरणी वसुली करून त्रिपक्षीय करार करावा लागणार असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच पैसे भरले नाहीत तर व्यावहारीक वापर बंद करून वसुलीबाबत अधिक कठोर कारवाई करावी लागणार असल्याचे देखील विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. तसेच यासाठी ६ महिन्यांचा कालावधी देण्यात यावा अशीही विनंती समितीसमोर करण्यात आली. **वस्तुतः शाळा व खेळाच्या मैदानाच्या आरक्षित जागेचा वापर इतर प्रयोजनासाठी करण्याकरिता मंत्रिमंडळाच्या परवानगीशिवाय मंजुरीच देता येत नसताना अशा प्रकरणी उल्लंघन होत असून देखील म्हाडा प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. या प्रकरणाकडे म्हाडाने पूर्णतः दुर्लक्ष केले असून नोटीसा देण्यापलिकडे कोणतीही कार्यवाही विभागाने केली नाही. वास्तविक शैक्षणिक प्रयोजनासाठी ही जमीन शासनाने दिली असताना इमारतीतील संपूर्ण तळ व पहिला मजला**

व्यापारी प्रयोजनासाठी देऊन शाळा मात्र त्यावरच्या मजल्यांवर ठेवणे हीच बाब मूएळात समितीला आक्षेपार्ह वाटते. अतः या संपूर्ण प्रकरणाची विभागाने सखोल चौकशी करून नियमानुसार आवश्यक ती कठोर कार्यवाही करावी व या प्रकरणी जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांचेवर कडक कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

११.४ तसेच रायगड सैनिकी शाळेला दिलेल्या भूखंडापैकी १,२६९ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग म्हाडाच्या मालकीचा असल्याचे सिद्ध करणारे स्पष्ट पूरावे उपलब्ध नसल्याचे आक्षेप महालेखाकारांनी घेतलेले आहेत. यासंदर्भात सखोल चौकशी करून नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस २ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

११.५ तसेच गतकाळात म्हाडाद्वारे वितरित करण्यात आलेल्या सदनिका किंवा गाळेधारकांची अद्ययावत माहिती ठेवण्याकरिता संगणकीय सॉफ्टवेअर तयार करण्यात यावे. त्यात विभागाने करावयाची वसुली, कालावधी व दिनांक इ. माहिती अद्ययावत करण्यात यावी. त्यात थकबाकीचे वर्षनिहाय विश्लेषण व थकबाकी शिल्लक असलेल्या थकबाकीदारांची माहिती संकलित करण्यात यावी व थकबाकीदारांच्या कडक देखरेखीसाठी, थकबाकीदारांना शेवटची नोटीस पाठविण्यासाठी, निरीक्षणाची कार्यवाही करण्यासाठी म्हाडा स्तरावर एक **Management Information System** तयार करण्याचे सुरू असलेले काम देखील तात्काळ अंतिम करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस २ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

## १२ (ड) गृहनिर्माण विभाग

**अभिप्राय व शिफारशी :**

### १२.१ परिच्छेद क्रमांक ३.२.३ : " महसूलाचे नुकसान "

**मौजे इस्लामपूर, जि.सांगली येथील कासेगाव एज्युकेशन सोसायटीस अनियमितपणे वाटप करण्यात आलेल्या भूखंडाबाबत -**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अधिनियम,१९७६ च्या विनियम १० मध्ये विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे भाडेपट्टी अधिमुल्याच्या संपुर्ण रक्कमेची प्राप्ती झाल्यावरच अशी जमीन ज्या व्यक्तीस/संस्थेला वाटप करण्यात आली आहे तरच त्यांच्या नावाने भाडेपट्टी करारपत्र कार्यान्वित करावे आणि असे भाडेपट्टी करारपत्र कार्यान्वित केल्यावरच जमिनीचा ताबा हस्तांतरीत करावा. तसेच माहे मार्च, २००० मधील म्हाडाच्या धोरणानुसार जमिनीचे वाटप झालेल्या व्यक्ती किंवा संस्थेने जमिनीच्या वापरात निवासी ऐवजी बिगर निवासी प्रयोजनासाठी असा बदल केल्यास २५० प्रती चौ.मी. दराने अधिमुल्य वसुल करावयाचे होते. तसेच माहे जून,२००३ च्या म्हाडाच्या मूल्य निश्चिती धोरणानुसार म्हाडा अधिनियमाच्या विनियम १६ अन्वये शासनाने वाटप केलेल्या भूखंडासाठी चालू बाजार दराने म्हणजे प्रस्ताव पत्राच्या तारखेस प्रचलित असणाऱ्या दराने मूल्य आकारावयाचे होते.

परंतु सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी इस्लामपूर येथील ५ एकर क्षेत्रफळाची जमीन म्हाडाला गाळे बांधण्यासाठी हस्तांतरीत (ऑक्टोबर, १९६६) केली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी म्हाडाने त्यावर ५० गाळे बांधले (जानेवारी, १९६९), परंतु पाणी पुरवठ्याची व्यवस्था नसल्यामुळे या गाळ्यांचे वाटप करू शकले नाहीत.

कासेगाव शैक्षणिक संस्थेने विनंती केल्यावर (ऑगस्ट/सप्टेंबर, १९८३) ५० गाळे (६५४२ चौ.मी.जमीन) आणि १५९७२ चौ.मी. एवढी त्या गाळ्यांलगतची मोकळी जागा अशी एकूण जवळजवळ ५ एकर जमीन या शैक्षणिक संस्थेस देण्याचे म्हाडाने ठरविले. त्यानुसार ५० गाळे व त्या गाळ्यांची जमिन तसेच त्या लगतची जमिन त्याअनुषंगाने ९० वर्षाच्या भाडेपट्टीसाठी विक्री किंमतीपोटी रु. ४.९८ लक्ष भरण्याविषयी निर्देश देणारे प्रस्ताव पत्र म्हाडाने जारी केले. मोकळी जागा देण्याच्या अटी व शर्ती स्वतंत्रपणे कळविण्यात येतील असेही पत्रात नमूद होते. परंतु तत्कालिन उपअभियंता, गलिच्छवस्ती व गृहनिर्माण विभाग IV, कोल्हापूर यांनी मोकळ्या जागेचा तात्पुरता ताबा कासेगाव शैक्षणिक संस्थेला हस्तांतरीत केला. (डिसेंबर,१९८३) मोकळ्या जागेच्या वाटपाच्या अटी व शर्ती विषयी म्हाडाने कोणताही अंतिम निर्णय न घेतल्यामुळे तत्कालिन वित्त व नियोजन मंत्री यांनी उर्वरित १५९७२ चौ.मी. एवढी मोकळी जमीन कासेगाव शैक्षणिक संस्थेला देण्याची विनंती केली. (नोव्हेंबर,२००५ व फेब्रुवारी,२००६) त्यात (१) माहे सप्टेंबर,१९८३ मध्ये देण्यात आलेल्या निर्णयात दुरुस्ती करणे आणि मोकळया जागेचे वाटप रद्द करणे किंवा (२) चालू दरसूची मधील दरानुसार येणारे भाडेपट्टी अधिमूल्य किंवा वाटपाच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठीचे जमीनीच्या किंमतीवरील व्याज संम्मिलित करून येणारी रक्कम यापैकी जी रक्कम अधिक असेल ती वसुल करणे असे दोन पर्याय म्हाडाने गृहनिर्माण विभागाकडे मंजूरीसाठी सादर (जून,२००८) केले. परंतु सन १९८३ मधील दराने जमीन देण्याचे निर्देश गृहनिर्माण विभागाने म्हाडाला दिले आणि २६ वर्षांसाठी प्रतिवर्ष १२.५ टक्के दराने परिगणित केलेल्या रु. ६.९९ लक्ष व्याजासह वर्ष १९८३ मधील दराने परिगणित केलेले भाडेपट्टी अधिमूल्य आणि संम्मिलित करण्यात आलेले रु. ०.८८ लक्ष भाडेपट्टी भाडे अशी एकूण रु. ७.८७ लक्ष रक्कम वसुल करण्याविषयी म्हाडाने ठराव केला व ही रक्कम कासेगाव शैक्षणिक संस्थेने माहे सप्टेंबर, २००९ मध्ये प्रदान केली.

एखाद्या जागेचे वाटप करण्यापूर्वी ज्या व्यक्ती किंवा संस्थेस वाटप करावयाचे आहे त्यांना जमिनीची किंमत व त्यावर लागू होणारे भाडेपट्टी भाडे याविषयी सुचित करणारे एक प्रस्ताव पत्र म्हाडा जारी करते. सदर प्रकरणात कोणतेही प्रस्ताव पत्र न देता आणि कोणत्याही अटी व शर्ती निर्धारित न करता सन १९८३ मध्ये मोकळ्या जमिनीचा ताबा कासेगाव शैक्षणिक संस्थेला हस्तांतरीत करण्यात आला होता. त्याचप्रमाणे भाडेपट्टी अधिमूल्य वसुल न करता आणि भाडेपट्टी करार कार्यान्वित न करता कासेगाव शैक्षणिक संस्थेला जमिनीचे हस्तांतरण केल्यामुळे म्हाडा अधिनियमाच्या विनियम क्र. १० चा भंग झाला होता. प्रत्यक्षात जमिनीचे तात्पूरते हस्तांतरण व प्राप्ती हे व्यवहार कासेगाव शैक्षणिक संस्थेच्या लेटरहेडवर करण्यात आले होते. सन २००९ मधील प्रस्तावाच्या तारखेस प्रचलित असणाऱ्या बाजार दराऐवजी सन १९८३ मधील दराने मोकळ्या जमिनीचे वाटप केल्यामुळे फक्त म्हाडाच्या मुल्य निश्चिती धोरणाचाच भंग झाला असे नाही तर म्हाडाला रु. ४५.४८ लक्ष महसूलाचे नुकसान झाले. ठराव क्र.६४१५ (ऑगस्ट,२००९) नुसार म्हाडा ने जमिनीच्या वापरामध्ये निवासी ऐवजी बिगर निवासी असा बदल केला होता. मात्र म्हाडा ने जमिनीच्या वापरातील सदर बदलासाठी रु. २५० प्रती चौ.मी.दराने अधिमूल्याची वसुली केली नाही. परिणामी रु. ३९.९३ लक्ष महसूलाचे नुकसान झाले. अशाप्रकारे म्हाडाच्या मुल्य निश्चिती धोरणाचे उल्लंघन करून चालू बाजार दराचा अवलंब न करता जमिनीचे वाटप करणे आणि जमिनीच्या वापरात बदल केल्याबद्दल कासेगाव शैक्षणिक संस्थेकडून अधिमुल्याची वसूली न करणे यामुळे म्हाडाला रु. ८५.४१ लक्ष महसूलाचे नुकसान झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदरहू विषयावर साक्षीदरम्यान विभागाने यासंदर्भात दिनांक ११ जानेवारी २०१६ रोजी कासेगाव शैक्षणिक संस्थेस रु. १,७९,५०,८५५ इतक्या रक्कमेची वसुली करण्याची नोटिस बजावली असून हे पैसे वसुल करावे असे प्रस्तावित करून नस्ती मा.मुख्यमंत्री महोदयांकडे आदेशार्थ पाठविण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. विभागाने नोटिस बजावल्यानंतर सदरहू नस्ती मा.मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्याची आवश्यकता काय? अशी विचारणा समितीने केली असता या अगोदरचे आदेश हे शासनाने काढलेले असल्यामुळे ते आदेश रद्द करून नवीन आदेश काढण्याची आवश्यकता असल्यामुळे सदरहू नस्ती मा.मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात आली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर विदित केले. महालेखाकारांनी घेतलेल्या भूमिकेशी विभाग सहमत असून त्याअनुषंगानेच प्रस्ताव सादर करून वसुली प्रस्तावित केल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. या संदर्भातील टिप्पणीची प्रत व आश्वासित माहिती मागितल्याप्रमाणे विभागाकडून प्राप्त झालेली असून टिप्पणीत सन २००९ मधील प्रचलित धोरणानुसार आकारणी करण्याबाबत विभागाकडून प्रस्तावित करण्यात आले असता त्यावर " महसूल विभागाने अभिप्राय द्यावा " असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिल्याचे टिप्पणीमध्ये नमूद आहे. सदर निर्देशाच्या अनुषंगाने महसूल व वन विभागास अभिप्राय देण्यासाठी नस्ती दिनांक ७ एप्रिल २०१७ रोजी सादर करण्यात आली असल्याचे देखील त्यात नमूद करण्यात आले आहे.

**१२.२ उपरोक्त प्रकरणाची संपूर्ण सद्यःस्थिती व वस्तुस्थिती पाहता शासनस्तरावर सदरहु प्रकरण प्रस्तावित करण्यात आलेले असून निर्णयार्थ प्रलंबित असल्यामुळे शासनाने या प्रकरणी योग्य तो निर्णय घ्यावा व त्याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

## गृह विभाग

१३ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.३.१ ''यंत्रसामुग्री विनावापर पडून राहणे '' यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

### १३.१ परिच्छेद क्र.३.३.१ यंत्र सामुग्री विनावापर पडून राहणे :-

गृह विभागाने रु. १.०९ कोटी किंमतीस खरेदी केलेल्या " रामन स्पेक्टोफोटोमीटर " या यंत्रसाठी स्टॅबीलायझर, UPS आणि डी ह्यूमीडीफायर उपलब्ध न केल्यामुळे यंत्र नादुरुस्त झाले व त्यामुळे बराच काळ ते विनावापर पडून राहिले तसेच त्यामुळे नवीन सुटे भाग खरेदी करण्यावर अतिरीक्त रु. २६.९० लाखाची जबाबदारी ठरली.

संचालक, न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा संचालनालय मुंबई यांनी रामन स्पेक्टोफोटोमीट (यंत्र) खरेदी करण्याविषयीचा एक प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाला सादर केला. (ऑगस्ट, २००८) चाचण्यांचे निष्कर्ष, शोध, विश्लेषण आणि नमुन्याचा रासायनिक व प्रत्यक्ष तपासणी यांचा तुलनात्मक अभ्यास सुलभ व्हावा यासाठी गोळा केलेल्या नमुन्यांचे रासायनिक, भौतिक व जैवशास्त्रीय पृथक्करण/विश्लेषण करण्यासाठी यंत्राची गरज होती. या यंत्राचे स्फोटके, अमली पदार्थ ओळखणे, इतर अंमली द्रव्यांचा शोध, शाईची तपासणी/विश्लेषक, पॉलिमरची ओळख पटविणे इत्यादी सारखे बरेच उपयोग होते. हे यंत्र रु. १.३० कोटी किंमतीस खरेदी करण्यास विभागाने प्रशासकीय मंजुरी दिली. (सप्टेंबर २००८)

ऑगस्ट २००८ मध्ये निविदा मागवण्यात आल्या आणि संचालक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या अध्यक्षतेखालील खरेदी समितीने मे.रेनीशॉ, PLc युनायटेड किंगडम (पुरवठादार) यांचा एकमेव वितरण असलेल्या ठाणे येथील लॅब इंडिया इन्स्टूट्युट प्रायव्हेट लिमिटेड यांच्या बोलीस मंजुरी दिली. (जानेवारी २००९) त्यानुसार १४९.५८७ GBP (रु. १.०९ कोटी) किंमतीस एक यंत्र पुरविण्याविषयी मे. रेनीशॉ PLc युनायटेड किंगडम यांच्या नावाने एक पुरवठा आदेश जारी करण्यात आला. (फेब्रुवारी २००९) सप्टेंबर २००९ मध्ये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय मुंबई यांच्या कार्यालयात हे यंत्र बसविण्यात येऊन कार्यान्वीत करण्यात आले. या यंत्रासाठी सातत्याने २२० व्होटचा वीजपुरवठा, ५ KVA क्षमतेचा अखंडीत वीज पुरवठा (UPs) नियंत्रीत आर्द्रता व अंतर्गत तापमान असणे गरजेचे असले तरी पुरवठादाराने निविदा सादर करतानाच सुचित केले होते.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय मुंबई यांच्याअभिलेख्ययांच्या तपासणीत (मार्च, २०१२) खालील बाबी आढळून आल्याः

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय मुंबई यांनी केलेल्या तक्रारीची शहानिशा करण्यासाठी पुरवठादाराचा भारतातील प्रतिनिधी आला असता (ऑक्टोबर २००९) त्यांच्या असे निदर्शनास आले की, यंत्र कार्यरत राहण्यासाठी आवश्यक असलेली २२० व्होटस क्षमता सध्याच्या स्टॅबिलायझरमुळे प्राप्त होत नसल्यामुळे यंत्र सुरू करण्यात येऊ शकत नव्हते. त्यामुळे फिल्टर्सच्या दीर्घकालीन कार्यक्षमतेसाठी कंपनीच्या भारतातील प्रतिनिधीने एक नामांकित कंपनीचा UPs डिजीटल स्टॅबीलायझर आणि डी ह्यूमीडीफायर बसविण्याची शिफारस केली. परंतु जानेवारी २०१४ पर्यंत न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय मुंबई यांनी नामांकित कंपनीचे UPs आणि डिजीटल स्टॅबीलायझर खरेदी केले नव्हते.

यंत्राच्या लॉग बुकची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, सप्टेंबर-ऑक्टोबर २००९ ते फेब्रुवारी २०११ या काळात १८ नमुन्यांची चाचणी घेण्यासाठी फक्त पाच वेळा हे यंत्र वापरण्यात आले होते. न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे नोव्हेंबर २००९ ते जानेवारी २०११ दरम्यान १५ महिने हे यंत्र विनावापर पडून होते.

मार्च २०११ पासून यंत्र बंद होते. पुरवठा दाराच्या भारतातील प्रतिनिधीने DFSL ला दिलेल्या बैठकीत त्याला असे आढळले (मे २०११) की, वीप पुरवठ्यातील चढउतार, दीर्घ काळ यंत्रणेचा वापर न करणे प्रयोगशाळेतील तापमान व आद्रतेतील बदल यामुळे कदाचित चार्च-कपल डिवाईस (CCD) शोधक यंत्र बंद पडले होते. परंतु बऱ्याच विलंबाने जुलै २०१३ मध्ये CCD शोधक यंत्र युनायटेड किंगडम येथील पुरवठादाराकडे दुरुस्तीसाठी पाठविण्यात आले. ज्यावर अंदाजे रु. ९.२३ लाख खर्च होणे अपेक्षित होते. CCD शोधक यंत्र किरकोळ दुरुस्तीच्या पलीकडे नादुरुस्त झाले असल्याचे सांगत पुरवठादाराने ते परत पाठविले. अखेर ऑक्टोबर २०१३ मध्ये रु. २६.९० लाख किंमतीचे नवीन CCD शोधक यंत्र खरेदी करण्यासाठी DFSL ने मान्यता दिली. जानेवारी २०१४ पर्यंत CCD शोधक यंत्र खरेदी करण्यात आले नव्हते.

अशाप्रकारे, पुरवठादाराने प्रारंभी सुचित करूनही विभागाने UPs स्टॅबिलायझर आणि डी ह्युमिडीफॉयरची तरतूद न करणे त्याचप्रमाणे विभागात पुरेशा प्रमाणात कर्मचारी उपलब्ध नसणे या कारणांमुळे मार्च २०११ मध्ये पूर्णतः बंद पडलेले हे यंत्र सप्टेंबर २००९ ते फेब्रुवारी २०११ मध्ये फारच कमी प्रमाणात वापरले गेले होते. अशाप्रकारे ज्या उद्दीष्टाने रु. १.०९ कोटी खर्च करून हे यंत्र खरेदी करण्यात आले होते. ते उद्दिष्टच फक्त असफल झाले असे नाही तर यंत्र दीर्घकाळ विनावापर पडून राहिल्याने त्याचे सुटे भाग खरेदी करण्यावर अतिरिक्त रु. २६.९० लाखाची जबाबदारी ठरली.

जुलै, २०१३ मध्ये ही बाब शासनाकडे निर्दीष्ट करण्यात आली. जानेवारी २०१४ पर्यंत त्याचे उत्तर प्राप्त झाले नव्हते.

**१३.२ ज्ञापन :-**

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

गृह विभागाच्या दिनांक ३० सप्टेंबर २००८ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या मान्यतेनुसार न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचे त्यांचे दिनांक ५ फेब्रुवारी २००९ च्या पुरवठा आदेशान्वये विहित खरेदी प्रक्रिया राबवून रु. १.०८ कोटी इतक्या रमन स्पेक्ट्रोफोमीटर ही यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली आहे. रमन स्पक्ट्रोफोमीटर या यंत्रसामग्रीमुळे गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल उदा :- रंग, शाई, पेपर, वेगवेगळ्या प्रकारचे पॉलीमार्स, नायनॉन दोऱ्या, धागे, कापडाचे तुकडे इत्यादी मुद्देमाल व मूळ मुद्देमाल यांचे तुलनात्मक परिक्षण करण्यासाठी भौतिक तसेच रासायनिक निरीक्षण करण्यासाठी व निरनिराळे मादक आणि गुंगीकारक औषधे/पदार्थ तसेच उच्च कार्बनिक स्फोटक/स्फोटकांचे अंश यांचा शोध घेण्यासाठी या यंत्रसामग्रीचा उपयोग केला जातो.

सदर यंत्रसामग्री खरेदी करतेवेळी स्टॅबीलायझर, युपीएस-५ केव्हीए व डी-ह्यूमीडीफायर या बाबींची आवश्यकता असलयाचे नमूद केले आहे. सदर यंत्रसामग्री ही संचालनालयाच्या भौतिकशास्त्र विभागात बसविण्यात आली असता, ती यंत्रसामग्री व्यवस्थितरीत्या चालू नसल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर मेसर्स लॅब इंडिया प्रा.लि. या कंपनीच्या अभियंत्याकडून तपासणी करून व आवश्यकतेची पूर्तता करून सदर यंत्र चालू करण्याचा प्रयत्न केला परंतु, सदर यंत्रणा कायमस्वरुपी दुरुस्त झाली नाही. तद्नंतर दिनांक ३ मे २०११ रोजी बंद यंत्रणेची तपासणी केली असता, विविध कारणांमुळे व जास्त दिवस सदर यंत्र बंद अवस्थेत असलयाने या यंत्राचा सीसीडी डिटेक्टर हा भाग नादुरूस्त करण्याकरीता संबंधित कंपनीकडून कोटेशन मागवून सीसीडी डिटेक्टर हा भाग दुरुस्तीकरिता परदेशात पाठविला असता त्यांचेकडून हा भाग दुरुस्तीकरीता लागणारा खर्च हा जास्त असल्याने त्याऐवजी सदर यंत्राचा हा भाग नवीन खरेदी करण्याचे सदर कंपनीने सुचविले.

त्यानुसार नवीन सीसीडी डिटेक्टर मेसर्स लॅब इंडिया प्रा.लि. ठाणे यांचेकडून दिनांक ११ नोव्हेंबर २०१३ च्या आदेशान्वये घेण्यात आला असून त्याची किंमत रु. २२,०१,०६३ इतकी आहे. ही यंत्रसामग्री संचालनालयास दिनांक रोजी प्राप्त करून घेऊन कार्यान्वित करण्यात आला. सद्यस्थितीत ही यंत्रसामग्री कार्यान्वित असून त्यामार्फत सन २००९ मध्ये ११, सन २०११ मध्ये ०७, सन २०१५ मध्ये १६, सन २०१६ मध्ये ६२ प्रकरणांची तपासणी करण्यात आली आहे. संचालनालयात सद्यस्थितीत ही यंत्रसामग्री सुस्थितीत व कार्यान्वित असून ती उपयुक्त आहे.

**साक्षः**

१३.४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याकरिता समितीने दिनांक १४ फेब्रुवारी २०१६ रोजी अपर मुख्य सचिव, गृह विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

**परिच्छेद क्रमांक ३.३.१ " यंत्र सामुग्री विनावापर पडून राहणे "**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, रामन स्पेक्टोफोटोमीटर या यंत्राच्या खरेदीच्या अटीमध्ये सदर यंत्रसामग्री खरेदी करतेवेळी स्टॅबीलायझर, युपीएस-५- केव्हीए व डी-हयूमीडीफायर उपलब्ध न करून देण्याबाबत त्यामध्ये अट होती. हे न केल्यामुळे यंत्रसामुग्री नादुरुस्त झाली. त्यामुळे बराच काळ त्याचा वापरही झालेला नाही. त्यानंतर त्याकरिता नवीन सुटे भाग मशीनकरिता खरेदी करावे लागले. त्यासाठी अतिरिक्त खर्च २६.९० लाख रुपये करावा लागला आहे याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे?

याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की,सविस्तर घटनाक्रम इनचार्ज डायरेक्टर सांगतील. त्यांच्याकडून घेतलेल्या माहितीवरुन असे दिसते की, याकरिता २००८ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. २००९ मध्ये ही यंत्रसामुग्री परदेशातून आपल्याकडे आलेली आहे. ही यंत्रसामुग्री आल्यानंतर फिजीक्स डिव्हीजनकडे देण्यात आली होती. हे खरे आहे की, त्यांनी सूचना केली होती की, युपीएस व डी-हयूमीडीफायर पाहिजे. तरीही सुरुवातीस २००९-२०१० मध्ये हे इस्ट्रूमेंट वापरले व काही प्रमाणात चाचण्या करण्यात आल्या. २०१० मध्ये युपीएस देखील घेण्यात आला. यानंतर २०११ मध्ये या मशीनमध्ये बिघाड आढळून आला. इंजिनिअरने केलेल्या सूचनेवरुन असे दिसले की, व्होल्टेज फ्लक्चुएशन किंवा हयुमीडीफीकेशन बरोबर नसल्यामुळे किंवा कमी वापर झाल्यामुळे यात बिघाड झाल्याची शक्यता आहे असा त्यांनी रिपोर्ट दिलेला आहे व याबाबत काय करता येईल हे तपासून सांगण्यात येईल. कारण हे प्रकरण परदेशातील आहे. तेथे संपर्क केल्यावर त्यांनी सांगितले की, या मशीनमधील सीसीडी पार्ट निकामी झालेला आहे व दुरुस्त करण्याऐवजी रिप्लेसमेंट करणे गरजेचे आहे. रिप्लेसमेंटची ऑर्डर प्लेस केली व २२ लाख रुपये याकरिता निधी दिलेला आहे. आता ते इन्स्टुमेंट जनरल ॲलायटीकल डिव्हीजनमध्ये आहे. मागील दोन वर्षापासून ६०-७० चाचण्या वर्षाला केल्या जातात. नार्कोटीसमध्ये मॅऊमॅऊ व केटामाईन अशा प्रकारच्या ड्रग्जच्या कन्फर्मेटरी टेस्ट या माध्यमातून प्राप्त होत असतात आणि याबाबत सविस्तर घटनाक्रमाबाबत इनजार्च डायरेक्टर हे समितीला अधिक माहिती देतील.

अधिक माहिती देताना प्रभारी संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, यांनी अशी माहिती दिली की, दिनांक १ जानेवारी पासून ते या पदावर कार्यरत आहेत. तत्पूर्वी याबाबत झालेल्या घटनांचा आढावा घेतला असता सन २००९ मध्ये सदरील इन्स्ट्रुमेंट खरेदी केलेले आहे व वापरले आहे. हे इन्स्ट्रूमेंट फॉरेन्सीकच्या दृष्टीने खूप उपयुक्त आहे. तुलनात्मक अभ्यास यामध्ये चांगला केला जातो. यामध्ये थ्री डायमेंशन इमेज असल्यामुळे नक्की ते कंपाऊंड आहे की नाही हे सांगू शकतो. आता विभागीय सचिव महोदयांनी सांगितलेल्या केटामाईन व इतर चाचण्या हे एमडीपीएस ॲक्टमध्ये नव्हते. पण या मशीनवर काम करताना या ॲक्टमध्ये चाचण्या आलेल्या आहेत. मधील काळात हे मशीन बंद पडले, रिपेअरींग केल्यानंतर हे मशीन सुस्थितीमध्ये चालू आहे. या मशीनवर आज चांगल्या प्रकारे काम करीत आहोत. माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये १७ केसेस रिपोर्ट केल्या आहेत.

महालेखाकारांनी काढलेला परिच्छेदातील मुद्दयाप्रमाणे त्या त्या वेळी ते इन्स्ट्रूमेंट न बसविल्यामुळे २६.९० लाख रुपयांचा खर्च झालेला आहे त्याबाबत माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता तसे काही झालेले नसून आमच्याकडे या मशीनच्या बॅटरीज होत्या, त्यामुळे मशीन चालू होते. परंतु इंजिनियरने May be असे म्हटले आहे त्यामुळेच झाले असे नाही पण ते एक कारण असू शकते असा खुलासा प्रभारी संचालक यांनी समितीसमोर केला.

कोणत्याही इन्स्ट्रूमेंटला स्टॅबीलायझर बसविलेला असतो. हे काम का अडले आहे? या यंत्रासाठी स्टॅबीलायझर, युपीएस, डी-हयूमीडीफायर उपलब्ध न केल्यामुळे यंत्र नादरुस्त झाल्याचे महालेखाकारांचे म्हणणे आहे, यावर समितीला तुमचे स्पष्टीकरण पाहिजे आहे. ते यंत्र चांगले आहे, त्यामुळे फायदा होतो, सरकार इंम्प्रूव होते, लोकांना सुविधा मिळत आहेत तो विषय येथे नाही महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपाबाबत सांगावे असे समितीने नमूद केले असता यासंदर्भात आवश्यक असलेले युपीएस आमच्याकडे होते असा खुलासा प्रभारी संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय यांनी केला.

पुरवठादाराने जेव्हा मशीनरीचा पुरवठा केला, त्यावेळी पुरवठादाराने निविदा सादर करताच सूचित केले होते की, या यंत्रासाठी सातत्याने २२० व्होल्टचा वीज पुरवठा, ५ केव्हीए क्षमतेचा अखंडीत वीज पुरवठयाकरिता युपीएस नियंत्रित याकरिता म्हणजे नियंत्रित आर्द्रता डी-हयूमीडीफायर व अंतर्गत तापमान असणे गरजेचे असेल. त्यानंतर ही मशीनरी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाकडे २००९ मध्ये आली आहे. २००९ ते २०११ पर्यत १८ नमुन्यांची चाचणी घेण्यासाठी फक्त ५ वेळा या मशीनचा उपयोग झाला आहे. त्यानंतर १५ महिने हे यंत्र विनावापर पडून राहिले.

Because it was not working. यानंतर पुरवठादाराच्या भारतीय प्रतिनिधीने याला यामधील सीसीडी नावाचा पार्ट बदलून टाका, त्याचे रिपेअरींग होत नाही. तशा परिस्थितीत नवीन सीसीडी आपणास खरेदी करावी लागणार होती. त्यामध्ये हा बदल कशाला करावा लागला. कदाचित चार्ज कपल डीव्हाईस शोधक यंत्र वीज पुरवठयातील बदलामुळे बंद पडले असेल. यानंतर बऱ्याच विलंबाने जुलै २०१३ मध्ये त्याला रिपेअरींगकरीता पाठविले. ऑक्टोबरमध्ये सांगीतले की, नवीन खरेदी करण्यात यावी. याप्रमाणे खरेदी केली आहे. म्हणून आज ही मशीनरी बरोबर सुरू आहे. आज मशीन सुरू आहे त्याबाबत समितीचा काही आक्षेप नाही. हे मशीन का खरेदी केले याबाबतही समितीचा आक्षेप नाही. आक्षेप आहे की, जे आवश्यक होते त्याकरिता जास्त पैसे लागणार नव्हते जेव्हा आपण एखाद्या मशीनवर १ कोटी रुपये खर्च करतो तर मशीनकरिता १० लाख रुपयांचा विचार करू नये. Ultimately we want the result. त्याकरिता आता २६ लाख रुपये आपणास खर्चही करावे लागले. दोन वर्षे हे यंत्र निकामी राहिले. याबाबत जबाबदारी निश्चित करावी हे समितीचे म्हणणे असल्याचे समितीने विभागास सांगितले असता याबाबत प्राथमिक चौकशी आदेशित केलेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीलाही तेच अपेक्षित असून ही तांत्रिक बाब होती कंत्राटदाराने टेंडर भरताना ती बाब विभागाच्या निदर्शनास आणली की, हे करणे गरजेचे आहे व याशिवाय हे होणार नाही. तरी देखील त्याबाबत काळजी घेतली नाही. विभागाची जबाबदारी होती की, त्या सर्व बाबींची काळजी घेणे परंतु ज्या अधिकाऱ्यांनी त्याबाबतची काळजी घेतली नाही, ते अधिकारी त्यास जबाबदार आहेत त्यांच्याविरोधात कारवाई होणे अपेक्षित असल्याचे मत समितीने नमूद केले.

याअनुषंगाने प्रभारी संचालक यांनी असे विदित केले की, यासंदर्भात तातडीची प्राथमिक चौकशी सुरू आहे एक महिन्याच्या आत यासंदर्भातील अहवाल तयार होईल. याबाबत विभागीय सचिवांनीही अशी माहिती दिली की, हा घटनाक्रम चार, पाच वर्षांचा आहे त्यामुळे यांना चौकशी करू देणे आवश्यक आहे. तसेच यासंदर्भातील ओरीजनल कागदपत्रे मागविले आहेत. याचा सर्व्हीस कॉल रिपोर्ट दिनांक १३.०८.२०१० रोजीचा आहे. त्यांनी असे म्हटले की, " UPS installed and working satisfactorily " .

आपण डी-ह्युमीडीफायर लावलेला नाही, टेंम्प्रेचर मेंटेन करण्यासाठी एअरकंडीशनर लावले नाही याची कारणे काय आहेत अशी समितीने पृच्छा केली असता टेप्रेंचर कंट्रोल करण्यासाठी एअरकंडीशनर लावलेला आहे. केवळ डी-ह्युमीडीफायर लावण्यात आला नव्हता परंतु मुंबईमध्ये त्याची जास्त आवश्यकता भासत नसल्याचा खुलासा प्रभारी संचालकांनी केला.

काही बाबींकरिता पॉवर बॅकअप कंम्पलसरी आहे. ऑपरेशन थिअटरमध्ये लाईन गेल्यास पॉवर बॅकअपची आवश्यकता भासते व त्यामुळे तेथे तो ठेवावाच लागतो. येथेही पॉवर बॅकअप ठेवला नाही तर यंत्र निकामी होतील. त्यामुळे या ठिकाणी पॉवर बॅकअपची आवश्यकता आहे आपण पुरवठादारानी सांगितल्याप्रमाणे केले असते तर, then the machine may came under their guarantee period. असे समितीने विभागास अवगत केले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, त्यात देखील सिस्टीममध्ये दुरुस्तीची गरज आहे. याचे कारण म्हणजे एएमसी त्यासोबत घेतले नव्हती.

The AMC is a different issue and the guarantee period is a different issue. गॅरंटीच्या कालावधीमध्ये त्यांच्याकडून काही वसूल करून घ्यायचे असेल तर किंवा त्यांच्याकडून ते दुरुस्त करून घ्यायचे असेल तर त्यांच्या नियमाप्रमाणे सर्व व्यवस्था करून घ्यावी लागणार आहे. परंतु विभाग काहीच व्यवस्था करणार नाही, डी-ह्युमीडीफायर लावणार नाही, युपीएस बॅकअप देणार नाही, २० केव्हीएची सप्लाय देणार नाही आणि असे असतानाही त्यानंतर म्हणाल की, गॅरंटी कालावधी सुरू आहे. He will not be responsible. त्या प्रकारची व्यवस्था देण्याची जबाबदारी आहे. पुरवठादारांनी सुरूवातीलाच सांगितले की, हे सर्व करावे लागणार. परंतु ज्यांनी अशा प्रकारे केले नाही किंवा ज्यांनी यासंदर्भातील निर्णय घेतला नाही, that officers will be responsible. त्यामुळे त्याकरिता आपले फॉरेन्सिक डिपार्टमेंट जबाबदार आहे, असे समिती म्हणत नाही, परंतु ज्या लोकांनी खरेदीची ऑर्डर दिली त्यांनीच या विषयावर निर्णय घेण्याची आवश्यकता होती. परंतु त्यांनी तसा निर्णय घेतला नाही, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणार आहात काय? त्यांची चौकशी हे लोक करू शकत नाही. The Director (Forensic) cannot make an enquiry on this issue. त्यामुळे ही बाब विभागानेच केली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता विभागाकडे महासंचालकांचे पद आहे त्या पदाचा दर्जा डायरेक्टर फॉरेन्सीक आणि डायरेक्टर प्रोसिक्युशनच्यावरील आहे. त्यांनी त्या स्तरावर चौकशी आदेशीत केलेली आहे. सदरहू चौकशीच्या निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यासंदर्भातील कार्यवाही ३० दिवसात पूर्ण करण्यात यावी व समितीला अहवाल सादर करण्यात यावा असे निदेश समितीने विभागास दिले असता ३० दिवसांचा कालावधी फार कमी होतो त्यामुळे साधारणतः ३ महिन्यांचा अवधी देण्यात यावा. संबंधितांना पत्र द्यावे लागणार आहे, त्यांच्याकडून रेकॉर्ड मागवावे लागणार आहे. यासर्व कार्यवाहीकरिता ३ महिन्यांचा अवधी द्यावा, अशी विनंती असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

आवश्यक बाबींची व्यवस्था न करता, तसेच करावयाच्या आवश्यक त्या अटींबाबत पुरवठादाराने विभागाला सुरूवातीलाच सांगितले, परंतु त्याचा काहीही विचार न करता स्पेक्ट्रोमीटरचा वापर करण्यात आला. तो २०११ मध्ये नादुरुस्त झाला, परंतु तुम्ही त्याची दोन वर्षे दुरुस्ती केली नाही. स्पेक्ट्रोमीटरच्या खरेदीकरिता २६ लाख रुपये लागले, परंतु तो नादुरुस्त झाल्यानंतर म्हणजेच २०११ पासून २०१३ पर्यंत त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे त्याची करण्यात आलेली खरेदी व दुरुस्त न केल्यामुळे तसाच पडून रहाणे असे दोन प्रकारचे नुकसान झालेले असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, सुरूवातीला सांगितले की, यासंदर्भातील चौकशी आदेशीत केलेली आहे. रमण स्पेक्ट्रोमीटर हा विशिष्ट प्रकारचा इन्स्ट्रुमेंट्स आहे याची किंमत देखील जास्त आहे.

स्पेक्ट्रोमीटर खूप प्रकारचे असतात. त्याच्या किमती १० लाख रुपयांपासून २ कोटी रुपयापर्यंत आहेत. स्पेक्ट्रोमीटर हा वेगळा नसतो स्पेक्ट्रोमीटरमध्ये अल्ट्रा लेटेस्ट असेल, परंतु त्याला जे आवश्यक आहे, ते ठेवलेच पाहिजे. सर्व व्यवस्था केली नसेल तर ती स्पेक्ट्रोमीटर खरेदी करणाऱ्याची चूक आहे या प्रकरणाची सचिव स्तरावर चौकशी करण्यात यावी. यामध्ये महानिदेशकांनीच चूक केलेली आहे. ज्यांनी चूक केलेली आहे, त्यांच्याकडूनच चौकशी करायची आहे काय अशी विचारणा समितीने केली असता डायरेक्टर जनरल, लिगल ॲक्ट टेक्नीकल हे पद आता निर्माण केलेले आहे. हे पद डायरेक्टर, एफ.एस.एल. यांच्या पदाच्या वरील पद आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी डायरेक्टर जनरल, लिगल ॲक्ट टेक्नीकल यांनी आदेशीत केली असून तेच चौकशी करणार आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

या बाबतची चौकशी एका महिन्याच्या आत करण्यात यावी व समितीला तसा अहवाल सादर करावा असे समितीने विभागास सांगितले.

या अनुषंगाने प्रभारी संचालक यांनी असे अवगत केले की, एका महिन्याच्या आत चौकशी होणे कठीण आहे. याचे कारण म्हणजे या प्रकरणाशी संबंधित असलेले सर्व अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवानिवृत्तीचा देखील विषय नाही परंतु त्या सर्वांना नोटीस द्यावी लागेल व यासंदर्भातील कागदपत्रे दाखवावी लागेल. त्यामुळे यास जास्तीचा अवधी देण्यात यावा असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

३० दिवसांऐवजी ४५ दिवसांमध्ये चौकशी करून अहवाल समितीला सादर करावा विभागाने दिलेल्या अहवालानंतर समिती सभागृहाला अहवाल सादर करेल असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी समितीस अशी विनंती केली की, नवीन प्रकारचे इन्स्ट्रुमेंट्स खरेदी करण्याबाबत माहिती द्यावयाची आहे. पीएसी आणि आपली यंत्रणा त्यांचा इंटरॅक्शन मधून यांना पुढे काम करण्याची, What I should say sir, there should not be disincentive for taking new decisions. रमण स्पेक्ट्रोमीटर हे नवीन प्रकारचे इन्स्ट्रुमेंट्स घेतले. ज्यावेळी नवीन स्पेसीफीकेशन्स ठरविले आणि ज्यावेळी टेंडर बोलविले, त्यावेळी या सप्लायर्सने हे कळविले होते किंवा कसे, हे स्पष्ट नाही. ज्यावेळी सप्लाय केले, त्यासोबतच त्यांनी पत्र दिले की, हे साहित्य आम्हाला गरजेचे आहे. परंतु त्याने जर सुरूवातीलाच आकलन करून दिले असते तर टेंडर काढत असताना आपण हे अंतर्भूत करणे गरजेचे होते की, यु.पी.एस. असायला पाहिजे डी-ह्युमीडीफायर असायला पाहिजे. परंतु पुरवठादाराने अचानक शेवटच्या क्षणी सप्लाय करीत असताना याबाबत सांगितले.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विभागीय सचिवांना चुकीची माहिती रेकॉर्डवर आणत आहात असे सांगितले. तसेच निविदा मंजूर होण्यापूर्वी म्हणजेच निविदा सादर करतेवेळी त्यांनी आवश्यक असलेल्या बाबींचा यामध्ये अंतर्भाव केला होता. याला कोणी ऑब्जेक्शन घेतले असेल तर तसे सांगावे. आपण एका बाजूला सांगता की, आपण ही नवीन मशीन घेतली. अशा प्रकारे नवीन मशीन घेत असताना सप्लायर्सच्या म्हणण्याप्रमाणे केले पाहिजे किंवा त्यातील जाणकार व्यक्तीकडून त्याबाबत सांगितले गेले पाहिजे की, ही व्यक्ती चुकीचे सांगत असून आपल्याला तर असे करावे लागणार आहे. दुसरी बाब अशी की, स्पेसीफीकली महालेखाकार यांनी या परिच्छेदामध्ये अशी टिपणी केलेली आहे की, " In spite of Suppliers instructions at tendering stage the requirement of stable power of २२० Volts and UPS of ५ KVA, the same was not purchased rendering the machine idle from २००९ to २०१५. Whether any responsibility has been fixed in this regard may be included in the reply to PAC. " आमच्या दृष्टीने २०११ ते २०१५ पर्यंत मशीन आयडीअल राहणे जास्त गंभीर आहे. ती मशीन खरेदी करण्याकरिता २६ लाख रुपये लागल्याची बाब समिती समजू शकते परंतु त्यापेक्षाही ही बाब अतिशय गंभीर आहे की, ही मशीन चार वर्षे दुरुस्त न करता तशीच पडून होती असे समितीने विदित केले असता समितीचे म्हणणे योग्य आहे. निदर्शनास आल्यावर देखील ती बाब तत्काळ का झाली नाही, याचे कारण बघावे लागणार आहे ती कारणे या चौकशीमध्ये निष्पन्न होईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

याअनुषंगाने महालेखाकार यांनी अशी माहिती दिली की,, I would like to respond to your comments that we should not disincentives the Director, Forensic Lab. आता आपण बघितले की, मॉडर्नायजेशनमध्ये त्यांचे लेटेस्ट इक्युपमेंटसाठीचे प्रपोजल शासनाने कधीच नाकारले नाही किंवा आपण खरेदी करून नये, असे शासनाने कधीच म्हटले नाही परंतु ते अर्धवट काम करतात. किमती यंत्र खरेदी करतात आणि त्याला हवी असलेली ॲक्सेसेरीज खरेदी करीत नाही व ते इक्युपमेंट आयडल ठेवतात.

महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने विभागीय सचिवांनी असे विदित केले की,एफ.एस.एल.मध्ये किती इन्स्ट्रुमेंट्स आहे व नेहमी किती इन्स्ट्रुमेंट्स सुस्थितीत चालतात आणि किती नादुरुस्त असल्यामुळे एवढा काळ बंद पडून राहिले, याबाबत समग्र विचार केला तर असे दिसून येईल की, हे एकमेव इन्स्ट्रुमेंट असे होते की, येथे अशा प्रकारची गफलत झालेली आहे.

विभागाचे म्हणणे अतिशय योग्य आहे या इन्स्ट्रुमेंट संदर्भात गफलत झाली असल्यामुळेच त्याकरिता संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, असे समितीचे म्हणणे असल्याचे समितीने विभागास सांगितले. तसेच मॉडर्नायजेशनमध्ये देखील विभागाने युनायटेड किंगडम येथील काही इन्स्ट्रुमेंट्स सॅम्पलींगसाठी घेतलेले आहे तेथे देखील अशीच बाब असल्याचा खुलासा महालेखाकारांनी केला.

हे इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्याकरिता कोणी आक्षेप घेतलेला आहे, ते देखील पहावे. तसेच आता झालेल्या चर्चेनुसार या इन्स्ट्रुमेंटसंदर्भातील दोषींवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व संबंधितांवर आवश्यक ती कार्यवाही करून समितीला ४५ दिवसांच्या आत अहवाल सादर करण्यात यावा, असे निदेश समितीने विभागास दिले तथापि अद्याप अहवाल अप्राप्त आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**१३.५ परिच्छेद क्रमांक ३.३.१ : " यंत्र सामुग्री विनावापर पडून राहणे "**

गृह विभागाने चाचण्यांचे निष्कर्ष, शोध विश्लेषण आणि नमुन्यांची रासायनिक व प्रत्यक्ष तपासणी याचा तुलनात्मक अभ्यास सुलभ व्हावा यासाठी गोळा केलेल्या नमुन्यांची रासायनिक, भौतिक व जैवशास्त्रीय पृथक्करण/विश्लेषण करण्यासाठी आवश्यक असलेले स्पेक्ट्रो फोटोमीटर या यंत्राची रु. १.०९ कोटी किंमतीस खरेदी करण्यात आली ज्याचा उपयोग स्फोटके, अंमलीपदार्थ ओळखणे, इतर अंमली द्रव्यांचा शोध, शाईची तपासणी/विश्लेषण, पॉलीमरची ओळख पटविणे इ. अनेक महत्वाच्या कामांसाठी देखील होतो. माहे सप्टेंबर,२००९ मध्ये हे यंत्र न्यायसहायक, वैज्ञानिक प्रयोगशाळा, संचालनालय, मुंबई येथे बसवण्यात आले. परंतु या यंत्रासाठी सातत्याने २०० व्होल्टचा वीजपुरवठा, ५ KVA क्षमतेचा अखंडीत वीजपुरवठा (UPs), नियंत्रीत आर्द्रता व अंतर्गत तापमान गरजेचे असल्यामुळे या यंत्रासाठी स्टॅबिलायझर, UPs, डीह्युमीडीफायर आवश्यक असल्याचे पुरवठादाराने निविदा सादर करतानाच सूचित केले असतानाही ते उपलब्ध न केल्यामुळे बराच काळ ते विनावापर पडून राहिले व त्यामुळे सदरहू यंत्र नादुरुस्त झाले यंत्र सुरू करणेसाठी लागणाऱ्या नविन सुटे भाग खरेदी करण्यावर अतिरिक्त रु. २६.९० लक्षचा खर्च करावा लागला. माहे सप्टेंबर,२००९ ते माहे फेब्रुवारी, २०११ या काळात १८ नमुन्यांची चाचणी घेण्यासाठी फक्त ५ वेळा हे यंत्र वापरण्यात आले व १५ महिने हे यंत्र कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे विनावापर पडून होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केलेले आहेत.

सदरहू विषयावर साक्षीदरम्यान विभागाने हे मान्य केले की, हे मशिन चालविण्याकरिता स्टॅबिलायझर, युपीएस व डीह्युमीडीफायर आवश्यक असल्याची सूचना पुरवठादाराने केली होती. तरीही सुरूवातीस सन २००९ ते २०१० मध्ये हे इन्स्ट्रयुमेंट तसेच वापरुन काही प्रमाणात चाचण्या करण्यात आल्या व नंतर सन २०१० मध्ये युपीएस घेण्यात आला व सन २०११ मध्ये मशिनमध्ये बिघाड आढळून आला. हे मशिन परदेशातून आयात केलेले असल्यामुळे त्या पुरवठादार कंपनीशी संपर्क केला असता या मशिन मधील चार्ज कपल डीव्हाईस शोधक यंत्र निकामी झालेले असून ते बदलणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे रु. २६.९० लक्ष किंमतीचे नविन CCD शोधक यंत्र खरेदी करण्यात आले.

१३.६ वास्तविक हे उपकरण फॉरेन्सीकच्या दृष्टीने तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी अतिशय उपयुक्त असल्यामुळे परदेशातून हे यंत्र रु. १.०९ कोटीस खरेदी करण्यात आले. परंतु पुरवठादाराने सांगितल्याप्रमाणे प्राथमिक स्तरावर त्यास आवश्यक असलेल्या काही महत्वाच्या बाबी पुरविणे ही विभागाची जबाबदारी होती. कंत्राटदाराने निविदा सादर करते वेळीच ही बाब विभागाच्या निदर्शनास आणली असतानाही विभागाकडून त्याची पुर्तता न केल्यामुळे रु. २६.९० लक्षचा अतिरिक्त आर्थिक भार विभागाला सहन करावा लागला. अशाप्रकारे परदेशातून एखाद्या नविन प्रकारच्या यंत्राची आयात करताना पुरवठादाराने घातलेल्या मुलभूत अटींची पुर्तता करणे आवश्यकच होते. पुरवठादाराने नमूद केलेल्या बाबी पुरविल्याशिवाय हे यंत्र चालणार नाही व अशा परिस्थितीत यंत्रात बिघाड झाल्यास पुरवठादार यंत्राची कुठलीही हमी (गॅरंटी) घेणार नाही याची विभागाला पुर्ण माहिती व जाणीव असतानाही विभागाने हा धोका पत्करण्याची काय आवश्यकता व गरज होती. याकडे विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे रु. २६.९० लक्षचा अतिरिक्त भार विभागास सहन करावा लागला. विभागाच्या निष्काळजीपणामुळे बरेच वर्ष हे यंत्र निकामी पडून राहिले व हे यंत्र खरेदी करण्याचे प्रयोजन साध्य होऊ शकले नाही. **या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ४५ दिवसांच्या आत सादर करण्यात यावा असे समितीने साक्षीदरम्यान निर्देशित केलेले असतानाही अद्याप ४ महिन्यांचा कालावधी उलटून देखील विभागाने या संदर्भात समितीला काहीही कळविले नाही, ही बाब तर अधिकच गंभीर असून समितीचा अवमान करणारी ठरते. अतः सदरहू प्रकरणात निष्काळजीपणा, शासकीय पैशांचा अपव्यय व नियोजन शून्यता दिसून येत असल्यामुळे याबाबत तातडीने सचिव दर्जाच्या विभागबाह्य अधिकाऱ्यांकडून सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करून केलेल्या कारवाईची माहिती समितीस १ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी तसेच समितीला आश्वासित करून देखील विहित मुदतीत माहिती समितीला सादर न करणाऱ्यांवर देखील जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस १ महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

१४ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.३.२ रुग्णालयातील यंत्रसामुग्री विनावापर पडून राहणे " यासंदर्भात महालेखाकारांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

### १४.१ परिच्छेद क्र.३.३.२ “ रुग्णालयातील यंत्रसामुग्री विनावापर पडून राहणे ”

धुळे येथील श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालयाच्या इमारतीच्या बांधकामच्या पूर्णत्वाच्या टप्प्यानुसार रुग्णालयासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या खरेदीचा समन्वय न साधल्यामुळे रु. १.०३ कोटी किमतीची यंत्रसामुग्री ४० ते ५० महिन्यांसाठी विनावापर पडून राहिली.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वर्ष २००७-०८ च्या अहवालातील (नागरी) परिच्छेद ४.३.३ मध्ये धुळे येथील चक्ककर बार्डी येथील श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (BHGMC) नवीन रुग्णालय इमारतीच्या बांधकामास झालेल्या विलंबाचा उल्लेख करण्यात आला होता.

प्रत्येकी २५० खाटांची क्षमता असलेल्या दोन शाखांचा समावेश असलेली BHGMC ची नवीन रुग्णालय इमारत बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन कंत्राटदारांना दिले होते. (नोव्हेंबर २००६ व मार्च २००८) जे पूर्ण करण्यास अनुक्रमे नोव्हेंबर २००८ व जून २००९ पर्यंतचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. प्रत्येकी २५० खाटांची क्षमता असलेल्या या दोन शाखांचे बांधकाम प्रत्यक्षात मार्च २०११ व मार्च २०१२ मध्ये म्हणजेच २८ महिने व ३३ महिन्यांच्या विलंबाने पूर्ण झाले.

लेखा परीक्षणात असे आढळून आले की, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने BHGMC च्या नवीन इमारतीसाठी हायड्रॉलीक टेबल्स, सिलिंग लॅम्पस व ऑटोक्लेव्ह मशिन्स यासारखी विविध रुग्णालय यंत्रसामूग्री खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता दिली होती. (ऑगस्ट २००९) एकूण रु. १.१९ कोटी किमतीची सहा हायड्रॉलिक टेबल्स, आठ सिलिंग लॅम्पस व १० ऑटोक्लेव्ह यंत्रे खरेदी करण्यासाठी (BHGMC) च्या अधिष्ठातांनी तीन एजन्सींना खरेदी आदेश जारी केले. (नोव्हेंबर २००९ व जानेवारी २०१०) ही सर्व यंत्रे/उपकरणे नोव्हेंबर २००९ ते सप्टेंबर २०१० दरम्यान पुरविण्यात आली. परंतु बांधकाम/विद्युतीकरणाची कामे पूर्ण झालेली नसल्याने आणि उद्वाहने व अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित केली नसल्याने PWD कडून BHGMC च्या अधिष्ठातांकडे नवीन रुग्णालय इमारतीचा ताबा देण्यात आला नव्हता, ज्यामुळे या खरेदी केलेल्या यंत्रसामूग्री/उपकरणाच्या जानेवारी २०१४ पर्यंत देखील वापर सुरू करण्यात आला नव्हता. परिणामी रु. १.०३ कोटी किमतीची १० पैकी ७ ऑटोक्लेव्ह मशीन व ६ हायड्रॉलिक टेबल्स, आठ सिलींग लॅम्पस खरेदी केल्यापासून ४० ते ५० महिने विनावापर पडून होती. (जानेवारी २०१४) प्रत्यक्षात या यंत्राचा हमी कालावधी डिसेंबर, २०११ व डिसेंबर २०१२ दरम्यान संपुष्टात आला होता.

अशाप्रकारे नवीन रुग्णालय इमारतीच्या बांधकामाच्या पूर्णत्वाच्या टप्प्यानुसार रुग्णालयातील यंत्रसामुग्रीच्या खरेदीचा समन्वय न साधल्यामुळे रु. १.०३ कोटी किमतीची यंत्रसामुग्री ४० ते ५० महिने विनावापर पडून होती.

सप्टेंबर, २०१३ मध्ये हे प्रकरण शासनाकडे निर्दोष्ट करण्यात आले. जानेवारी २०१४ पर्यंत त्याचे उत्तर प्राप्त झाले नव्हते.

**ज्ञापन :**

१४.२ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**केलेली कार्यवाही :**

भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळेशी संलग्नित आवश्यक असलेल्या २५० खाटांच्या रुग्णालयाच्या चक्करबर्डी येथील परिसरात दोन इमारतींचे बांधकाम करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांनी नोव्हेंबर, २००६ आणि मार्च २००८ मध्ये बांधकाम सुरू केले. सदरचे बांधकाम अनुक्रमे मार्च २००८ आणि नोव्हेंबर, २००९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपेक्षित वेळेत बांधकाम पूर्ण होईल हे गृहित धरून अधिष्ठाता श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांनी यंत्रसामूग्री मंजूर होणेसाठी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव दिनांक १६ जुलै २००९ रोजी संचालनालय, मुंबई यांनी सादर केला होता. सदर प्रस्तावित यंत्रसामूग्री ही भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक होती. त्यानुसार शासनाने दिनांक १२ ऑगस्ट २००९ रोजी सदर यंत्रे खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली. त्यानुसार राज्य स्तरीय खरेदी समितीने सदर यंत्रे खरेदीची कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पूर्ण केली.

निधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाला तरच माहे सप्टेंबर, २००९ अखेर पहिली २५० खाटांची इमारत बांधून हस्तांतरण करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांनी त्यांचे पत्र क्र.प्रशा/५५०६/२००९, दिनांक ७ ऑगस्ट २००९ नुसार अधिष्ठाता यांना कळविलेले होते.

राज्यस्तरीय खरेदी समितीने यंत्रसामुग्री खरेदीस मान्यता दिल्यानुसार संस्थेने संबंधित कंपनीस पुरवठा आदेश देऊन खरेदी करण्यात आली. गृहित धरलेल्या वेळेत बांधकाम न झाल्यामुळे बांधकामातील अपूर्ण कामकाजाविषयी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयात दिनांक २३ सप्टेंबर २०१३ रोजी बैठक घेण्यता आली. दिनांक ८ ऑक्टोबर २०१३ रोजीच्या इतिवृत्तात इलेक्ट्रिक फिटींग अपूर्ण असल्याबाबतची सदर बाब इतिवृत्तात नमूद करण्यात आली आहे. विद्युत विभागाचे इंजिनिअर सतत तीन वेळेस सदर बैठकीस हजर नसल्यामुळे विद्युतीकरणाच्या बाबीवर कोणतीही चर्चा झालेली नव्हती. सदरची बाब दिनांक २२ सप्टेंबर २०१३ रोजीच्या इतिवृत्तात नमूद करण्यात आली आहे.

कार्यालयाच्या पुरवठा आदेश जा.क्र.शावैमधु/भांडार-अ/डीपीसी/हायड्रोलिक ओटीनुसार हायड्रोलिक ओटी टेबल/११६५२-५७/२००९ दिनांक ६ नोव्हेंबर २००९ नुसार हायड्रोलिक ओटी टेबल, मे.गुंजन सर्जिकल, मुंबई यांचेकडून ०६ नग रुपये १८,५४,५४० एवढ्या किंमतीस खरेदी करण्यात आले. त्याचा पुरवठा दिनांक ३० नोव्हेंबर २००९ रोजी करण्यात आला होता.

कार्यालयाच्या पुरवठा आदेश जा.क्र.शावैमधु/भांडार-अ/डीपीसी/सिलींग लॅम्प/११६६४-७२/२००९, दिनांक ६ नोव्हेंबर २००९ नुसार सिलींग लॅम्प मे.दिनेश सेल्स कार्पोरेशन, औरंगाबाद यांचेकडून ०८ नग रुपये ४६,००,००० एवढ्या किंमतीस खरेदी करण्यात आले. त्याचा पुरवठा दिनाक ५ डिसेंबर २००९ रोजी करण्यात आला होता.

कार्यालयाच्या पुरवठा आदेश जा.क्र.शावैमधु/भांडार-अ/डीपीसी/ॲटोक्लेव्ह मशिन/२०९७-२१०२/२००९ दिनांक १० फेब्रुवारी २०१० नुसार टोक्लेव्ह मशिन मे. प्रशियन इलेक्ट्रॉनिक, मुंबई यांचेकडून १० नग रुपये ६१,१५००० एवढ्या किंमतीस खरेदी करण्यात आले. त्याचा पुरवठा दिनांक ३१ मार्च २०१० रोजी करण्यात आला होता.

त्यामुळे दिनांक ३० नोव्हेंबर २००९ ते ३१ मार्च २०१० या दरम्यान सदर यंत्रसामूग्री प्राप्त झाली होती. केवळ बांधकाम विभागाने सदर इमारत अधिष्ठाता, श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळे यांना वरील मुद्दा क्रमांक ३ नुसार हस्तांतरीत न केल्यामुळे सदर यंत्रसामूग्रीचे स्थापत्यकाम (इंन्स्टॉलेशन) पूर्ण होऊ शकले नाही. तद्नंतर दिनांक १६ ऑगस्ट २०१४ रोजी बांधकाम झालेल्या सदरील इमारतीचा ताबा मिळाला.

प्राप्त झालेल्या यंत्रसामूग्रीचे स्थापत्यकाम (इंन्स्ट्रॅलेशन) खालील दिनांकास पूर्ण करण्यात येऊन सदर यंत्रसामुग्री सद्यःस्थितीत कार्यान्वित आहे,—

१) सिलींग लॅम्प दिनांक २३ फेब्रुवारी २०११

२) हायड्रोलिक ओटी टेबल दिनाकं ५ डिसेंबर २०१४

३) ॲटोक्लेव्ह मशीन दिनांक ९ ऑक्टोबर २०१५

शासनाने मंजूर केलेला निधी व्यपगत होऊ नये म्हणून सदरची यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली होती. बांधकाम पूर्ण होण्यास तांत्रिक अडचणी आल्यामुळे बांधकाम पूर्ण होऊन अधिष्ठाता यांच्या ताब्यात येण्यास उशीर झालेला आहे. परंतु बांधकाम पूर्ण होऊन इमारती ताब्यात आल्याबरोबर खरेदी केलेली उपकरणे स्थापित करून उपयोगात आणली आहेत. भविष्यात इमारत बांधकाम व यंत्रसामूग्री खरेदी यांची योग्य सांगड घालण्यात येईल व योग्य नियोजन करून अशा घटना घडणार नाहीत याची योग्य ती दक्षता घेण्यात येत आहे.

**शासनाचे अभिप्राय :-**

भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली यांच्या मानकानुसार श्री.भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळेशी संलग्नित आवश्यक असलेल्या २५० खाटांच्या रुग्णालयाच्या चक्करबर्डी येथील परिसरात दोन इमारतीचे बांधकाम करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, धुळे यांनी नोव्हेंबर, २०१६ आणि मार्च २००८ मध्ये बांधकाम सुरू केले. सदरचे बांधकाम अनुक्रमे मार्च २००८ आणि नोव्हेंबर, २००९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते.

सदर बांधकामाच्या अनुषंगाने भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार सदर वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी शासन स्तरावरून सहा हायड्रॉलिक टेबल्स, आठ सिलींग लॅम्पस व १० ॲटोक्लेव्ह यंत्रे खरेदी करण्यास शासन स्तरावरून प्रशासकीय मान्यता तसेच राज्यस्तरीय खरेदी समितीची मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने संबंधित अधिष्ठाता यांनी सदर यंत्रे सन २००९-१० मध्ये पात्र निविदाधारकाकडून केली होती.

संबंधित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील उपरोक्त दोन इमारतींचे कामे नियोजित वेळेत पूर्ण न झाल्याने सदर यंत्रांचा वापर करणे शक्य झाले नाही. तदनंतर इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर सिलींग लॅम्प दिनांक २३ फेब्रुवारी २०११, हायड्रॉलिक ओटी टेबल्स दिनांक ५ डिसेंबर २०१४ व ऑटोक्लेव्ह यंत्रे दिनांक ९ ऑक्टोबर २०१५ रोजी कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत विषयी विहित कालावधीत बांधकाम पूर्ण न झाल्याने यंत्रसामुग्रीचा वापर विहित वेळेत करणे शक्य झाले नाही. याविषयी भविष्यात इमारतीचे बांधकाम पूर्णत्व व त्या अनुषंगाने यंत्रसामूग्रीची खरेदी यांचे योग्य नियोजन करून यंत्रसामूग्रीचे प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत संबंधितांस कळविण्यात येईल व अशा प्रकारच्या घटनाची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

**साक्ष :—**

१४.३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ रोजी प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

**परिच्छेद क्र.३.३.२ रुग्णालयातील यंत्रसामूग्री विनावापर पडून राहणे :—**

रुग्णालयातील यंत्रसामूग्री विनावापर पडून राहणे यासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, विभागाच्या अभिप्रायामध्ये शेवटच्या परिच्छेदात " प्रस्तुत विषयी विहित कालावधीत बांधकाम पूर्ण न झाल्याने यंत्रसामूग्रीचा वापर विहित वेळेत करणे शक्य झाले नाही. या विषयी भविष्यात इमारतीचे बांधकाम पूर्णत्व व त्या अनुषंगाने यंत्रसामूग्रीची खरेदी यांचे योग्य नियोजन करून यंत्रसामूग्रीचे प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत संबंधितांस कळविण्यात येईल व अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल. " असे नमूद केलेले आहे. अशा प्रकारच्या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही, याबाबत विभाग दक्षता घेणार असल्यामुळे समितीला समाधान आहे. परंतु महालेखाकार यांनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, ज्या घटना घडत गेल्या त्याला कोण जबाबदार आहे? असा प्रकार पुन्हा घडू नये म्हणून विभाग सुधारणा करीत आहे, याबद्दल समितीला काही म्हणायचे नाही. या अनुषंगाने विभाग सुधारणा करीत आहे ही चांगली बाब आहे.

विभागाने असे नमूद केले आहे की, निधी व्यपगत होऊ नये म्हणून यंत्रसामूग्रीची खरेदी करण्यात आली. सन २००९ ते २०१४ च्या दरम्यान सदरहू रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे निधीची मागणी केली होती. याअनुषंगाने महालेखाकारांना अशी माहिती हवी आहे की, सिव्हील वर्क्स वेळेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने विभागाने काय कार्यवाही केली होती? अशी विचारणा महालेखाकारांनी विभागास केली असता सदरहू खरेदी सन २००९-२०१० मध्ये झाली. त्यानुसार १० मार्च पर्यंत यंत्रसामुग्री प्राप्त झाली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९८ मध्ये ५०० खाटांच्या इमारतीसाठी प्रशासकीय मान्यता दिली होती. सदरहू इमारतीचे बांधकाम २००२ मध्ये सुरू झाले. २००९-१० च्या दरम्यान या विषयी बैठक झाली होती, त्या बैठकीच्या कार्यवृत्तात स्पष्टपणे उल्लेख आहे की, सदरहू इमारत मार्च-२०१० नंतर ताब्यात देण्यात येईल. तसेच याच दरम्यान विभाग एमसीआयकडे पूर्णपणे प्रयत्न करीत होते की, त्या महाविद्यालयात यु.जी. साठी असलेल्या ५० जागा वाढवून त्या १०० कराव्यात. त्यानुसार १० वैद्यकीय महाविद्यालयांत प्रत्येकी ५० जागा वाढविण्याच्या प्रयत्नात होतो. जागा वाढवून घेण्याची प्रक्रिया एका बाजूला सुरू असताना दुसऱ्या बाजूला या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याचा प्रयत्न होता. उक्त रुग्णालय, धुळे येथील सामान्य रुग्णालयाच्या आवारातून महाविद्यालयाच्या आवारामध्ये आणण्याचा विभागाचा प्रयत्न होता. उपरोक्त दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी सुरू होत्या. ही प्रक्रिया सुरू असतानाच वैद्यकीय शिक्षण विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे इमारतीचे बांधकाम पूर्ण करून देण्यासाठी पाठपुरावा करीत होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने विहित मुदतीत बांधकाम पूर्ण करणार असल्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार उक्त वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांनी विभागाकडे मागणी केली की, माहे जून महिन्यापासून नवीन इमारतीमध्ये रुग्णालय सुरू करावयाचे आहे. तसेच त्यांनी असेही सांगितले होते की, शैक्षणिक वर्षापासून तेथील वैद्यकीय महाविद्यालय सुरू होणार आहे. त्यामुळे आवश्यक ती यंत्रसामुग्री खरेदी करण्याची आवश्यकता आहे. पूर्वी वैद्यकीय महाविद्यालय हे धुळे येथील सामान्य रुग्णालयामध्ये सुरू होते. नवीन वैद्यकीय महाविद्यालय हे मालेगावपासून ७-८ कि.मी. अंतरावर असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

इमारतीचे बांधकाम पूर्ण करून घेण्याकडे विभागाचे जास्त लक्ष नव्हते तर, उपकरणांची खरेदी करण्याकडे जास्त लक्ष होते असे समितीने मत व्यक्त केले असता राज्य शासनाने यंत्रसामूग्रीची खरेदी करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यानुसार राज्य सरकारने एकूण २१ वस्तू खरेदी करण्यासाठी विभागाला मान्यता दिली होती. यातील एका ऑर्डरची किंमत २-३ कोटी रुपये आहे. या अंतर्गत खरेदी झालेल्या आणि विनावापर पडून असलेल्या यंत्रसामूग्रीबाबत महालेखाकारांनी आक्षेप घेतलेला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाच्या सचिवांचे म्हणणे आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने वैद्यकीय शिक्षण विभागाला आश्वासन दिले होते की, मार्च-२०१० पर्यंत इमारतीचे बांधकाम पूर्ण करून देण्यात येईल. असे असेल तर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला बांधकामाचे १०० टक्के पैसे २०१० पूर्वी दिले होते काय? नसल्यास, वैद्यकीय शिक्षण विभागाने २०१० ते २०१४ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाला बांधकामाचा एकही पैसा रिलीज केला नव्हता का अशी पृच्छा समितीने केली असता इतर विभागांच्या तुलनेत वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रक्रियेमध्ये थोडासा फरक आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाकडून केवळ प्रशासकीय मंजुरी दिली जाते. परंतु निधीचे बजेटींग करून घेण्यासाठी सदरहू प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून अधीक्षक अभियंता यांच्याकडे जातो. याचाच अर्थ वैद्यकीय शिक्षण विभागाकडून निधी दिला जात नाही. आमच्या विभागाकडून फक्त निधीची मागणी केली जाते व नंतर तो निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला अदा केला जातो अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

सन २०१० ते २०१४ पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाला किती निधी देण्यात आला? जेणेकरून यावरुन समितीला हे समजू शकेल की, २०१० पूर्वी इमारत बांधकामाची स्थिती काय होती. विभागाने २०१० पूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाला बांधकामाचे १०० टक्के पैसे दिले असतील आणि त्या विभागाने मार्च-२०१० पूर्वी इमारतीचे बांधकाम पूर्ण करून देण्यात येईल असे आश्वासन दिले असेल, ते समिती मान्य करेल. परंतु

विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला बांधकामाचा खर्चच नंतर दिला असेल तर ते मान्य करता येणार नाही. जर बांधकामाच्या निधीची विल्हेवाटच व्यवस्थित लागली नसेल तर इमारत पूर्ण कशी होणार? जर विहित मुदतीत इमारतच पूर्ण होणार नसेल तर यंत्रसामूग्रीची खरेदी कशासाठी केली, हा मुख्य मुद्दा असल्याचे समितीने नमूद केले असता यामध्ये सिंक्रोनायझेशन झालेले असल्याची बाब महालेखाकारांनी व्यक्त केली.

महालेखाकारांनी व्यक्त केलेल्या मतानुषंगाने विभागीय सचिवांनी यामध्ये सिंक्रोनायझेशन झालेले नसल्याचे सांगितले तसेच इमारत पूर्ण करणे आणि महाविद्यालय सुरू करणे, या दोन्हीमध्ये सिंक्रोनायझेशन झाले असते तर अशा प्रकारची खरेदी झाली नसती किंवा उक्त खरेदी नाकारता आली असती. या खरेदीबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाकडून माहिती घेतली असता इमारतीचे बांधकाम पूर्ण करून देण्यात येईल, अशा प्रकारचे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आले होते. त्यामुळेच सदरहू यंत्रसामूग्रीची खरेदी करण्यात आली होती असेही समितीस अवगत केले.

वैद्यकीय शिक्षण विभागाने इमारतीच्या बांधकामासाठी येणारा १०० टक्के खर्च सार्वजनिक बांधकाम विभागाला २००९ मध्ये दिला होता काय? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी इमारतीच्या बांधकाम प्रकरणी १९९८ मध्ये ११ कोटी ४४ लाख रुपये इतक्या रकमेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती अशी माहिती समितीला दिली.

समितीचा मुद्दा हा २५० खाटांची क्षमता असलेल्या दोन इमारतींच्या बाबतीत आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता दोन इमारती या ५०० खाटांच्या आहेत. सांगितलेला दर हा १९९८ मधील आहे त्यानंतर हा दर वाढतच आहे. एकंदरीत ३८.५१ कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण विभागाकडे आलेला आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने अद्यापपावेतो या प्रकरणी सुधारित प्रशासकीय मान्यता दिलेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे की, उक्त ३८.५१ कोटी रुपये सुद्धा खर्च झालेले आहेत. परंतु सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली नसताना ही रक्कम खर्च का झाली, हा प्रश्न आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उत्तर प्राप्त झालेले नाही. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, इमारत पूर्ण झाली असून ती वैद्यकीय शिक्षण विभागाच्या ताब्यात आली आहे विभागाचे वैद्यकीय महाविद्यालय त्या ठिकाणी सुरू असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली नसताना वित्त विभागाने निधी कसा दिला तसेच इमारत पूर्ण झालेली नसताना यंत्रसामूग्री खरेदी करण्यात आली हा मूळ मुद्दा असल्याचे समितीने नमूद केले असता त्यावेळी ज्या २१ उपकरणांची ऑर्डर दिली होती त्यापैकी ३ उपकरणे सोडून बाकी सर्व उपकरणे एक्झिस्टींग हॉस्पीटलमध्ये वापरण्यात आलेली आहेत. महालेखाकार यांनी ऑपरेशन टेबलवरील टॉप लाईट, ऑक्टोक्लेव्ह आणि हायड्रॉलिक टेबल्सच्या बाबतीत आक्षेप घेतलेला आहे. १० ऑटोक्लेव्ह खरेदी केले होते, त्यापैकी ३ वापरलेले आहेत आणि उरलेले वापरले नाहीत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जे ऑटोक्लेव्ह वापरलेले नाहीत त्यांची आता वॉरंटी सुद्धा संपलेली असेल अशी विचारणा समितीने केली असता सदरहू यंत्रसामूग्रीची वॉरंटी संपली असली तरी संबंधित कंपनीने सदरहू उपकरणांची जबाबदारी स्वीकारलेली आहे. कंपनीने ती उपकरणे चांगल्याप्रकारे इन्स्टॉल करून दिलेली आहेत. वर्षभरापासून ती यंत्रसामुग्री चांगल्याप्रकारे सुरू आहे. वॉरंटी संपली असली तरी त्या यंत्रसामूग्रीचा बोजा संस्थेवर पडलेला नाही ती यंत्रसामूग्री चांगल्या अवस्थेत असून, योग्यप्रकारे सुरू आहे असा खुलासा संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय यांनी केला.तसेच ती यंत्रसामुग्री आऊटडेटेड झाली नाही असेही समितीस अवगत केले.

या संदर्भात गेल्या पाच वर्षांत काहीच रिफॉर्म्स झाले नाही काय या समितीच्या प्रश्नाला नाही असे उत्तर विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

समिती विभागीय सचिवांकडून जाणून घेऊ इच्छिते की, हा जो काही प्रकार घडला त्याचे आपण समर्थन करता काय समितीच्या या प्रश्नाला या गोष्टीचे अजिबात समर्थन करीत नसून जी खरेदी करण्यात आली ती चुकीची आहे. उपकरणांची खरेदी करताना इमारत आपल्या ताब्यात येणार आहे की नाही, याची खात्री करून घेण्याची अत्यंत आवश्यकता होती. इमारत आपल्या ताब्यात येणार आहे याबाबत खातरजमा झाल्यानंतरच खरेदी प्रक्रिया राबवावयास हवी होती किंवा इमारत प्रत्यक्ष ताब्यात आल्यानंतर सुद्धा खरेदी करता आली असती. खरेदी प्रक्रिया आणि पुरवठ्यासाठी केवळ दोन महिन्यांचा कालावधी लागतो. मला वाटते या प्रकरणी अर्थसंकल्पित रक्कम व्यपगत होऊ नये म्हणून ही खरेदी करण्यात आली असावी. जी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली त्यांचा वापर होत आहे जर ही यंत्रसामुग्री वापराविना पडून असती तर समजू शकलो असतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

समितीची अपेक्षा आहे की, विभागाने असा प्रकार पुन्हा घडणार नाही याबाबत काळजी घ्यावी. तसेच बांधकामाच्या बाबतीत सुधारित प्रशासकीय मान्यतासुद्धा घ्यावी असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी याबाबत सकारात्मक असल्याचे समितीस अवगत केले. तसेच रोज नवीन नवीन टेक्नॉलॉजी आणि मॉडेल्स येत असतात परंतु विभागाकडे असलेल्या मॉडेल्सचा वापर होणार नाही अशी स्थिती नसल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

यावर महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, ही यंत्रसामुग्री ५० महिने तशीच ठेवण्याऐवजी अन्य रुग्णालयांकडे वळती का केली नाही या प्रश्नाला इमारत पूर्ण होऊन अमुक महिन्यात मिळेल, अमुक महिन्यात मिळेल असे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वारंवार सांगितले जात होते. विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागावर विश्वास ठेवूनच ही खरेदी केली असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००७-०८ या वर्षाच्या अहवालामध्ये इमारतीच्या बांधकामास लागलेल्या विलंबाबतचा परिच्छेद होता. विभागाला माहीत होते की, इमारतीच्या बांधकामाला विलंब झालेला आहे. शिवाय प्रशासकीय मान्यता, निधी या बाबी आहेत. ज्या यंत्रसामुग्रीची खरेदी केली होती ती यंत्रसामुग्री शासनाच्या अन्य रुग्णालयांमध्ये उपयोगात आणावयास पाहिजे होती. परंतु तसे न करता ५ वर्षे ती तशीच ठेवली असे महालेखाकारांनी समितीस अवगत केले.

समितीने सुचविल्यानुसार असा प्रकार भविष्यात कोणत्याही वैद्यकीय महाविद्यालयात होणार नाही याची दक्षता विभागाकडून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. समितीने या अनुषंगाने शिफारस केली पाहिजे असे मत व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

**१४.४ परिच्छेद क्रमांक ३.३.२ : " रुग्णालयातील यंत्रसामुग्री विनावापर पडून राहणे "**

धुळे, चक्करबर्डी येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रत्येकी २५० खाटांची क्षमता असलेल्या २ शाखांचा समावेश असलेली BHGMC ची नवीन रुग्णालय इमारत बांधण्याचे काम दोन कंत्राटदारांना देण्यात आले व हे बांधकाम काम पूर्ण करण्यास माहे नोव्हेंबर,२००८ व माहे जून, २००९ पर्यंतचा कालावधी निश्चित करण्यात आला असतानाही प्रत्यक्षात हे बांधकाम माहे मार्च,२०११ व मार्च,२०१२ मध्ये जवळजवळ २८ महिने व ३३ महिने उलटून पूर्ण झाले. या नवीन इमारतीमध्ये सुरू होणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने हायड्रोलिक टेबलस्, सिलींग लॅम्पस् व ऑटोक्लेव्ह मशिन इत्यादी रु. १.१९ कोटीचे यंत्र खरेदी आदेश अधिष्ठातांनी ३ एजन्सीला दिले व लगेचच ती पुरविण्यात देखील आली. परंतु बांधकाम/विद्युतीकरणाची कामे पूर्ण झालेली नसल्याने व उद्वाहने आणि अग्निशमन यंत्रे प्रस्थापित केलेली नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतीचा ताबा अधिष्ठातांकडे देण्यात आला नव्हता. परिणामी माहे जानेवारी, २०१४ पर्यंत या यंत्रसामुग्रीचा वापर सुरू होऊ शकला नाही. त्यातच रु. १.०३ कोटीची खरेदी केलेली यंत्रे ४० ते ५० महिने विनावापर पडून (माहे जानेवारी,२०१४) होती. प्रत्यक्षात या यंत्राचा हमी कालावधी माहे डिसेंबर,२०११ व माहे डिसेंबर,२०१२ पर्यंत संपुष्टात आला होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

उपरोक्त विषयासंदर्भात साक्षीच्या वेळी विभागाकडून असे सांगण्यात आले की, निधी व्यपगत होऊ नये म्हणून यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने विहित मुदतीत बांधकाम पूर्ण करणार असल्याचे आश्वासन दिलेले असल्यामुळे व नवीन शैक्षणिक वर्षापासून नवीन इमारतीमध्ये रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार असल्यामुळे यंत्रसामुग्री खरेदी करणे आवश्यक होते. एकीकडे इमारतीचे बांधकाम विहित मुदतीत करण्याबाबतचा पाठपुरावा करणे व दुसरीकडे वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्याची प्रक्रिया समांतर पातळीवर सुरू करण्यात आली होती. परंतु इमारतीचे बांधकाम विहित मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे या सर्व यंत्रसामुग्रीचा वापर करण्यास विलंब झाला. परंतु विलंबाने इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन वैद्यकीय शिक्षण विभागाकडे ताबा दिल्यानंतर ही सर्व यंत्रसामुग्री त्या रुग्णालयामध्ये वापरण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. तसेच काही यंत्रसामुग्रीची हमी संपलेली होती तरीही संबंधित कंपनीने सदरहू उपकरणांची जबाबदारी स्वीकारून ती इनस्टॉल करून दिलेली आहे व ती चांगल्याप्रकारे सुरू असून त्या यंत्रसामुग्रीचा बोजा संस्थेवर पडलेला नाही असे साक्षीदरम्यान समितीसमोर सांगण्यात आले.

१४.५ उपरोक्त खरेदीचा एकंदरीत घटनाक्रम पाहता जनतेच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या शासनाच्या महत्त्वाच्या विभागामध्ये अशाप्रकारे राबविण्यात येणारी आक्षेपार्ह कार्यपद्धती पाहता या विभागामध्ये समन्वय व नियोजनाचा अभाव असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. वास्तविक यंत्रसामुग्री खरेदीची निविदा प्रक्रिया राबवून यंत्र ताब्यात घेण्यासाठी २ महिन्यांपेक्षा अधिकचा कालावधी लागत नसतानाही इमारत अपूर्ण असताना अशाप्रकारे घाईने यंत्रसामुग्री खरेदी करून घेण्याची कोणतीही आवश्यकता विभागास नव्हती. त्यामुळे हा खरेदी व्यवहार कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही. अधिक गंभीर बाब म्हणजे यातील काही यंत्रांचा हमी कालावधी देखील त्यात संपलेला आहे. हमी कालावधीनंतर या यंत्रांमध्ये बिघाड झाला असता तर याची पूर्ण आर्थिक जबाबदारी ही शासनाचीच राहिली असती, असे असताना विभागाने हा धोका पत्करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. इमारत पूर्ण झाल्यानंतर या यंत्रसामुग्रीचा वापर त्या इमारतीमध्ये सुरू असून यंत्र सद्यःस्थितीत कार्यरत असल्याची सबब विभागाकडून समितीसमोर सांगण्यात आली. परंतु त्यामुळे महालेखाकारांनी घेतलेल्या आक्षेपांचे गांभिर्य कमी होऊ शकत नाही. शासनस्तरावरील राबविण्यात येणारी कोणतीही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी शाश्वत कालावधी नसतानाही इमारतीचे बांधकाम वेळेत पूर्ण होऊन मिळेल या केवळ आश्वासनावर यंत्रसामुग्री खरेदी करून ४० ते ५० महिने विनावापर पडून ठेवणे. ही बाब कोणत्याही परिस्थितीत समितीला मान्य करता येणार नाही. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारतीचे बांधकाम विहित मुदतीत न देण्यामागील कारण देखील समितीने शोधण्याचा प्रयत्न केला असता असे निदर्शनास आले की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकामावर झालेल्या वाढीव खर्चाला वैद्यकीय शिक्षण विभागाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता देखील देण्यात आली नव्हती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतींचे बांधकाम तातडीने पुर्ण करून घेण्याचा कोणताही प्रयत्न विभागाने केल्याचे दिसून येत नाही. मग अशा परिस्थितीत यंत्र खरेदी करण्याची एवढी घाई का करण्यात आली, यासाठी कोणतीही ठोस व समर्थनीय कारणमीमांसा समितीला दिसून आली नाही. झालेला प्रकार अजिबात समर्थनीय नसून जी खरेदी करण्यात आलेली आहे ती चुकीची आहे व उपकरणांची खरेदी करण्याअगोदर इमारत आपल्या ताब्यात कधी येणार याची माहिती करून घेण्याची अत्यंत आवश्यकता होती असे विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्यच केले. परंतु संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई विभागीय सचिवांनी प्रस्तावित केलेली नाही. **आता जरी विलंबाने इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन यंत्रसामुग्री तेथे कार्यान्वित करण्यात आली असली तरीही खरेदीची उपरोक्त कार्यपद्धती व महालेखाकारांनी घेतलेले गंभीर आक्षेप दुर्लक्षित करता येणार नाही. प्राथमिकदृष्ट्या या प्रकरणात समन्वय व नियोजनाचा अभाव दिसत असून शासकीय अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा व शासकीय निधीचा अपव्यय सिद्ध होतो. अतः या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांचा आत देण्यात यावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

१५ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.३.३ " यंत्रसामुग्री विनावापर पडून राहणे " यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत :—

### १५.१ ३.३.३ यंत्रसामुग्री विनावापर पडून राहणे

नाशिक येथील प्रादेशिक रुग्णालयात पूर्णवेळ कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त न केल्यामुळे, सर्व्हीकल कॅन्सरने पिडीत असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी रु. १.१२ कोटी किंमतीस खरेदी केलेले ब्रॅकीथेरेपी यंत्र ४५ महिने विनावापर पडून होते.

ज्या वैद्यकीय उपकरणांमध्ये यंत्रांमध्ये रेडिओपॅक्टीव्ह द्रव्यांचा वापर केला जातो त्यांची प्रस्थापना, वापर व सनियंत्रण यांचे नियमन अणुऊर्जा नियामक मंडळ यांच्याकडून (AERB) मुंबई केले जाते. अशी यंत्रणा कार्यान्वित करण्याआधी, रेडिएशन थेरपी यंत्रणा खरेदी करणाऱ्या रुग्णालयाने AERB ने घातलेल्या अनिवार्य अटींची जसे की, पूर्ण वेळ रेडिएशन थेरपी तंत्रज्ञ पर्याप्त संख्येत नियुक्त करणे, पूर्तता करणे आवश्यक असते. अशी यंत्रणा वापरणाऱ्या सर्व रुग्णालयांनी प्रत्येक वर्षी ३१ जानेवारी पूर्व AERB ने सादर केलेल्या वार्षिक रेडिएशन सुरक्षा अहवालाद्वारे, एईआरबी कडून सुरक्षा प्रमाणकांवर सनियंत्रण ठेवले जाते. प्रादेशिक संदर्भ रुग्णालये (रुग्णालय) नाशिक येथील अभिलेख्यांच्या तपासणीतून (जून-२०१३), असे उघडकीस आले की, रु. १.१२ कोटी किंमतीचे एक हाय डोस रेट रिमोट आफ्टर लोडींग ब्रॅकी थेरपी, युनिट यंत्र प्राप्त करण्यासाठी आरोग्य सेवा संचालनालयाचे मे.न्युक्लीट्रॉन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, चेन्नई यांच्याकडे एक खरेदी आदेश जारी केला होता (मार्च-ऑक्टोबर २००७). सर्व्हीकल कॅन्सरने पीडीत रुग्णांवर उपचार करण्यासाठी हे यंत्र उपयुक्त ठरणार होते. ऑक्टोबर २००८ मध्ये कंपनीने हे यंत्र उपलब्ध करून दिले. परंतु ज्या कक्षामध्ये हे यंत्र स्थापित करायचे होते तो कक्ष बांधून पूर्ण झाला नसल्यामुळे हे यंत्र अखेर ऑगस्ट २००९ मध्ये प्रस्थापित करण्यात आले. ऑक्टोबर २००९ पासून सदर यंत्राचा वापर करण्यास सुरुवात झाली.

रुग्णालयातील नोंदीनुसार, सर्व्हिकल कॅन्सरवरील उपचारांसाठी ४८ रुग्णांना ब्रॅकीथेरपी कक्षाकडे पाठविण्यात आले होते. ज्यापैकी फक्त ४ रुग्णांवर मार्च ते एप्रिल २०१० दरम्यान उपचार करण्यात आले होते. यंत्र कार्यरत ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रेडिओॲक्टीव्ह द्रव्याची (Iridium-192) क्षमता ग्राह्य मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात घटल्यामुळे उर्वरित ४४ रुग्णांना उपचारासाठी इतर शासकीय रुगणालयात पाठविण्यात आले.

लेखापरीक्षणातून असे निरीक्षणास आले की, ऑक्टोबर २००९ मध्ये जेव्हा हे यंत्र मागविण्यात आले. त्यावेळी रुग्णालयात जुलै २००८ ते जानेवारी २००९ दरम्यान कंत्राटावर नियुक्त केलेले एक रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट, एक रेडिऑलॉजिकल सुरक्षा अधिकारी व मुख्य भौतिक तज्ज्ञ आणि रेडिएशन थेरेपी तंत्रज्ञ रुग्णालयाच्या पटावर होते. मार्च २०१० ते मे २०१० मध्ये अनुक्रमे मुख्य भौतिकतज्ज्ञ आणि एक रेडिएशन थेरपी तंत्रज्ञ यांनी राजीनामा दिला. मुख्य भौतिक तज्ज्ञाच्या जो रेडिओलॉजिकल सुरक्षा अधिकारी म्हणूनही काम बघत होता व जो राजीनाम्यामुळे रुग्णालयातील कॅन्सर विभाग बंद झाला. यंत्र हाताळण्यासाठी/कार्यरत ठेवण्यासाठी मे २०१० नंतर रुग्णालयात पुरेशा प्रमाणात प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे AERB ने रेडिओॲक्टीव्ह द्रव्य आयात करण्यासाठी रुग्णालयाला परवानगी दिली नाही. दीर्घ काळ वापर न केलेल्या द्रव्यांच्या संदर्भात AERB च्या चालू धोरणाच्या अनुषंगाने AERB ने रुग्णालयास सदर यंत्र परत करण्याची कार्यवाही सुरू करण्याचा सल्ला दिला. (एप्रिल २०१२ ते एप्रिल २०१३). जानेवारी २०१४ पर्यंत यंत्र अकार्यरत होते.

पुढील लेखापरीक्षणात असेही आढळून आले की, नोव्हेंबर २००६ मध्येच महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने रुग्णालयासाठी एक रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट, एक मुख्य भौतिक तज्ज्ञ आणि तीन इतर भौतिकतज्ज्ञ यांची पदे मंजूर केली होती. परंतु यंत्र प्राप्त झाल्यावर तीन वर्षापेक्षा जास्त काळ उलटूनही, शासनाने या विशिष्ट पदांसाठी नियुक्ती नियम निश्चित केले नव्हते किंवा ही पदे कायमस्वरूपी/नियमित तत्त्वावर भरण्यासाठी काही प्रयत्नही केले नव्हते. परिणामी, रुग्णालयाने वेळोवेळी ही विशिष्ट पदे कंत्राट तत्त्वावर भरणे सुरू ठेवले. ज्यामुळे वेगवेगळ्या पदांमध्ये अनुशेष (११ ते ४१ महिने) निर्माण झाला. जे तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

तक्ता -२ विशिष्ट पदांमधील अनुशेष

| अ.क्र. | पद | कंत्राट तत्त्वावर नियुक्ती केल्याचा कालावधी | अनुशेष कालावधी (महिने) |
|---|---|---|---|
| (१) | रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट | १४.७.०८ ते १६.४.०११ | ११ |
| (२) | वैद्यकीय भौतिकतज्ज्ञ / रेडिओ लॉजिकल सुरक्षा अधिकारी | २४.९.०८ ते ११.३.१०<br>१३.३.१२ पासून पुढे. | २४ |
| (३) | रेडिएशन थेरपी तंत्रज्ञ | ५.१२.०८ ते ११.५.१०.<br>२७.९.१३ पासून पुढे<br>२३.१.०९ पासून पुढे.<br>२५.९.१३ पासून पुढे. | ४१ |

यंत्र हाताळण्यासाठी आवश्यक असलेले कर्मचारी सप्टेंबर १३ मध्ये नियुक्त करण्यात आले आहेत आणि रेडिओॲक्टीव्ह द्रव्य खरेदी करण्यासाठी AERB मुंबई यांच्याशी पत्रव्यवहार चालू असल्याचे शासनाकडून सांगण्यात आले (नोव्हेंबर २०१३) हे यंत्र प्राप्त झाल्यावर त्वरित कार्यरत करण्यात येईल. शासनाने पुढे असेही सांगितले की, नियुक्तीचे नियम निश्चित केल्यावर, ही पदे नियमित तत्त्वावर भरण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल.

अशाप्रकारे रुग्णालयात कायमस्वरूपी कर्मचारी नियुक्त न केल्यामुळे आणि त्यामुळे रेडिओॲक्टीव्ह द्रव्य आयात करण्यासाठी AERB ने मान्यता न दिल्यामुळे रु. १.१२ कोटी किमतीस खरेदी केलेले हे " हाय डोस रेट रिमोट आफ्टर लोडींग ब्रॅकीथेरपी " यंत्र ४५ महिने (मे २०१२ ते जानेवारी २०१४) विनावापर पडून राहिले. तसेच, त्यामुळे सर्व्हिकल कॅन्सरने पिडीत असलेल्या बऱ्याच रुग्णांवर उपचार करता येऊ शकले नाहीत. तसेच यंत्र दिर्घकाळ न वापरल्यामुळे त्याचे डिकमीशनींग नाकारता येणार नाही.

**ज्ञापन :—**

महालेखाकारांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालील प्रमाणे नमूद केले आहे.

१५.२ रुग्णालयातील कर्करोग विभाग (कॅन्सर विभाग) कार्यान्वित करणे कामी मूलतः खालील पदांची किमान आवश्यकता आहे :—

कर्करोग विभागामध्ये केमोथेरपी विभागासाठी ॲन्को फिजिशियन्सची किंमत किमान दोन नदांची व रेडीओथेरपी विभागात डॉक्टरांची किमान २ पदे व कॅन्सर सर्जरी विभागाकरिता कॅन्सर सर्जनची किमान २ पदे अशी किमान ६ पदांची आवश्यकता असतानाही फक्त एक किरणोपचार तज्ज्ञाचे पद रुग्णालयात मंजूर आहे. या व्यतिरिक्त मोल्डरुम तंत्रज्ञ, भौतिक शास्त्रवेत्ता अशा तंत्रज्ञांचे पदेही कर्करोग विभागात आवश्यक आहेत.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक हे माहे जुलै २००८ कार्यान्वित झालेले असून सदरील रुग्णालयात कॅन्सर विभाग (रेडीओथेरपी) मंजूर झालेले रुग्णालयाकरिता शा.नि., क्र. जिरु/१२९६/प्र.क्र.४२४/आरोग्य-३ , दिनांक १५ नोव्हेंबर २००६ अन्वये १ ते ४ वर्गांचे ३६७ पदांना मंजुरी देणेत आलेली असून रुग्णालयातील कॅन्सर विभागाकरिता खालीलप्रमाणे पदे मंजूर करणेत आहेत :—

| | मंजूर पदे |
|---|---|
| किरणोपचार तंत्रज्ञ वर्ग-१ | १ |
| मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता वर्ग-२ | १ |
| भौतिक शास्त्रवेत्ता वर्ग-३ | ३ |
| न्यूक्लिअर मेडिसीन तंज्ञत्र वर्ग-३ | ३ |
| मोल्डरुम तंत्रज्ञ वर्ग-३ | २ |
| एकूण | १० |

उपरोक्त रुग्णालयातील कॅन्सर विभाग (रेडीओथेरपी विभाग) कार्यान्वित करणेकामी या रुग्णालयाने उपरोक्त पदे त्वरित भरणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार मा.उप संचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांनी त्यांचेकडील आदेश क्र. उपसंआसे/आस्था-१अ/मुभौशा/ता.ने./२४७९०-९३, दिनांक ४ जून २००८ अन्वये श्री.देसले हापीनंदजी, मुख्य भौतिक शास्त्रोवेत्ता यांना ११ महिने कालावधीकरिता नियुक्ती देणेत आलेली होती. तसेच त्या विभागातील किरणोपचार तज्ज्ञ वर्ग-१ यांनाही आदेश क्र. उपसंआसे/आस्था-१अ/मुभौशा/ता.ने./२४७९६-९९, दिनांक २ जून, २००८ रोजी श्री. महेश भय्याजी ठाकरे व आदेश क्र. उपसंआसे/आस्था-१अ/मुभौशा/ता.ने/२७१००-०३, दिनांक २ जून २००८ अन्वये श्री.जितेंद्र पी. सोलंकी, किरणोपचार तज्ज्ञ यांना ११ महिने कालावधीकरिता तात्पुरती नियुक्ती देण्यांत आलेली होती. व त्यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुर्ननियुक्ती देण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी श्री.सोलंकी यांनी त्यांचे खाजगी कारणास्तव दिनांक १३ एप्रिल २०१० च्या अर्जान्वये एक महिन्याची आगाऊ नोटीस देऊन राजीनामा दिलेला होता. तेव्हापासून परिक्षण कालावधीपर्यंत त्यांचे पद रिक्त होते. अशा स्थितीतही रुग्णालयातील कर्कविभाग कार्यान्वयित होता. त्या कालावधीत व त्यानंतर विभागामार्फत कर्करोगपिडीत रुग्णांवर करणेत आलेल्या उपचाराबाबतचा अहवाल सोबत अवलोकनार्थ सादर करण्यात आला आहे.

दरम्यान काळात शासनाकडून ६ वा वेतन आयोग लागू करणेत आला. त्यान्वये संबंधित कर्मचाऱ्यांनी ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन भत्ते मिळणेबाबत मागणी केलेली होती. परंतु उपरोक्त पदे ही नव्यानेच मंजूर करणेत आलेली असल्याने त्या पदांचा समावेश ६ व्या वेतन आयोगाचे सूचीमध्ये नसल्याने त्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन देणेस अडचणी होत्या. तसेच उपरोक्त पदांचे, शासनस्तरावर सेवा व भरती नियम नसल्याने सदरील पदे नियमित सेवेने भरणेस अडचणी होत्या. उपरोक्त कर्मचाऱ्यांचे वार्षिक वेतनात वाद करणे अशक्य असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांनी त्या पदावर काम करण्यास असमर्थता दर्शविली त्यांनी त्या पदाचा श्री. देसले (मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता) दिनांक ११.४.२०१० रोजी व श्री. ए.एम.कुलकर्णी (किरणोपचार तज्ज्ञ) यांनी दिनांक १७ एप्रिल २०११ रोजी राजीनामा दिला.

त्यामुळे दरम्यानच्या काळात सदरील विभागातील तज्ज्ञांची पदे रिक्त असल्याने सदरील विभाग कार्यान्वित नवहता. बी.एच.आर.सी. यांचेकडील पात्रधारक उमेदवारांना नियुक्ती दिली जाते. या संवर्गातील उमेदवारांची कमतरता असल्याने ते सत्वर उपलब्ध होऊ शकत नाही.

इकडील रुग्णालयातील मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता व किरणोपचार ता यांनी राजीनामा दिल्यामुळे बी.आर.सी. यांचेकडील नियमानुसार मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता यांचे पद भरणे शिवाय त्या विभागास मान्यता देण्यांत येत नसल्याने या रुग्णालयाने उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक या कार्यालयाने संचालक आरोग्य सेवा, मुंबई व शासनस्तरावर उपरोक्त पदे नियमित आस्थापनेवर भरणेबाबत उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक याच्या सोबतच्या पत्र क्र.१ ते १० अन्वये तसेच वैद्यकीय अधिक्षक, संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक यांचे मार्फत पत्र क्र.१ ते १७ अन्वये वरिष्ठ कार्यालयास सदरील पदे भरणेबाबत पाठपुरावा केलेला होता. तसेच वरील पदे भरणेबाबत उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचेस्तरावर उपरोक्त पदांबाबतची दैनिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करूनही कोणतेही उमेदवारांकडून जाहिरातीस प्रतिसादर न मिळाल्याने त्या कालावधीत कर्करोग विभागातील उपरोक्त पदे रिक्त होती.

रुगणालयातील कर्करोग विभाग सुरळीतपणे कार्यान्वित होणेचे दृष्टीने रुग्णालयामार्फत रिक्त असलेले मुख्य भौतिक शास्त्रवेत्त पद भरणेचे दृष्टीने इतरत्र आरोग्य संस्थेतील कार्यरत असलेल्या मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता यांचेशी संपर्क साधून या संस्थेत आपले सेवा देणेविषयी सुचित केल्यावरुन श्री.शंकर रेड्डी आर.एस.ओ यांना रिक्त असलेल्या मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता पदी आदेश क्र. उपसंआसे/आस्था-१अ/कंत्राटी सेवा/ ८७६०-६५, दिनांक ५ मार्च २०१२ अन्वये ११ महिने कालावधीकरता नियुक्ती देण्यात आलेली होती.

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन शा.नि.क्र.संकीर्ण-२००९/प्र.क्र.५७/सेवा-२, मंत्रालय मुंबई दिनांक ३० जून २०१२ अन्वये किरणोपचार तज्ञ यांना एकत्रित वेतन रु. ४०००० व मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता वर्ग-२ यांना एकत्रित वेतन रु. ३७००० मंजूर केलेले असल्याने व त्यांना या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय नसल्याने उपरोक्त पदावर काम करण्यास सदरील पदाचे उमेदवाराकडून प्रतिसाद न मिळाल्याने सदरील पदे रिक्त होती. रिक्त पदे भरणेबाबत उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक या कार्यालयाकडून व वरिष्ठांकडून सदरच्या पदांचे सेवा व भरती नियम करणे कामी शासनास वारंवार पाठपुरावा केलेला आहे.

या रुग्णालयाचे दिनांक १ मे २००९ ते ३० एप्रिल २०१३ या कालावधीत महालेखापाल, मुंबई यांचेकडील लेखा परीक्षण अहवालात यंत्रसामुग्री उपकरणेबाबतचा सरकारी निधी रु. १.१२ कोटी स्तंभित राहिलेबाबत परिच्छेद क्र.१ अन्वये आक्षेप घेणेत आलेला होता. त्या अनुषंगाने उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक या कार्यालयाने मा.महालेखापाल यांना अनुपालन सादर केले असता महालेखापाल कार्यालयाकडून पत्र क्र. एसएस-२/प्रभार-४/फा.स९०१/नि.रि./६१९, दिनांक ११ फेब्रुवारी २०१५ अन्वये परिच्छेद निकाली काढणेत आलेला आहे. तसेच पुनश्च महालेखापाल यांचेकडील पत्र क्र. संआसे-२/प्रभार-५/फा.स.९०१/नि.रि./एन-२०१३०१५०१६/७३०, दिनांक ३० मार्च २०१५ अन्वये उपरोक्त परिच्छेद विभागाचे जबाबदारीवर निकाली काढणेत आल्याचे कळविलेले असल्याने परिच्छेदाचे अनुषंगाने सादर केलेले स्पष्टीकरणे मान्य होणेस विनंती.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात कर्करोग विभाग कार्यान्वित असून त्या विभागात सन २००८ ते सप्टेंबर २०१५ अखेर एकूण ५३५९ कर्करोग रुग्णांवर उपचार केलेले असून सद्यःस्थितीतही कर्करोग ग्रस्त रुग्णांवर नियमितपणे उपचार सुरू आहेत.

**साक्ष :—**

१५.३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ७ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

**परिच्छेद क्रमांक ३.३.३. " यंत्र सामुग्री विनावापर पडून राहणे "**

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की,यंत्र सामग्री पडून राहण्यास तीन कारणे आहेत वेळेवर इमारत तयार झाली नाही म्हणून काही दिवस यंत्रसामुग्री बसविता आली नाही. ज्यावेळेस यंत्रसामुग्रीची मागणी करण्यात आली त्यावेळेस आवश्यक कर्मचारी वर्ग भरण्याची आवश्यकता होती. परंतु शासनाने पद भरती केली नाही. म्हणजे यंत्रसामुग्री विकत घेणे, इमारत बांधणे आणि पदांची भरती करणे या तिनही गोष्टींचा कुठेही ताळमेळ नाही यामुळे या सर्व गोष्टी घडलेल्या आहेत यासाठी कोण जबाबदार आहे यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, नाशिक येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आहे आणि या हॉस्पिटलमध्ये कॅन्सरच्या उपचाराकरिता मशिनरीची खरेदी करण्यात आली होती. ब्रॅकोथेरपीचा वापर रेडिएशन देण्याकरिता केला जातो ब्रॅकोथेरपी यंत्र वापराकरिता तीन गोष्टींची आवश्यकता असते. यात यंत्र, मनुष्यबळ आणि तिसरे म्हणजे रेडीओथेरपीस्ट पाहिजे. कॅन्सर रुग्णाला रेडिएशन देण्याकरिता या तीन पैकी एखादी गोष्ट नसेल तर ही मशनरी कार्यान्वित होऊ शकत नाही. ही गोष्ट खरी आहे की, हे यंत्र खरेदी करण्याचे आदेश जुलै, २००७ मध्ये देण्यात आले होते. त्यानंतर हे यंत्र ऑक्टोबर, २००८ मध्ये मिळाले. त्यावेळी या यंत्राची ८५ टक्के रक्कम भरण्यात आली होती. त्यानंतर यंत्र ऑक्टोबर, २००८ मध्ये पुरविण्यात आले. परंतु त्यावेळेस हे यंत्र चालविण्यासाठी मनुष्यबळ नसल्याने यंत्र सुरू करता आले नाही.

सदरहू यंत्र सन २००९ मध्ये प्रस्तावित करण्यात आले होते काय अशी विचारणा समितीने केली असता यंत्र चालू करण्यासाठी खोलीची व्यवस्था करण्यात आली नव्हती. सदर व्यवस्था करायला उशिर झाला त्यात एक वर्ष निघून गेले. १० पदे मंजूर होती त्यात किरणोपचार तंत्रज्ञ वर्ग-१ हे एक पद, मुख्य भौतिक शास्त्रवेत्ता वर्ग-२ हे पद, भौतिक शास्त्रवेत्ता वर्ग-३ ही तीन पदे, मोल्डरुम तंत्रज्ञ वर्ग-३ ही दोन पदे आणि न्यूक्लिअर मेडिसीन तंत्रज्ञ वर्ग-३ ही तीन पदे आहेत. या पद भरतीची प्रक्रिया करण्याचे जे नियम आहेत ते पाळण्यात आले नाहीत आणि भरतीची कारवाई सुद्धा करण्यात आली नव्हती. या पदासाठी ११ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरुपात भरती करण्यात आली. याची जबाबदारी कोणी घेतली नव्हती. त्यामुळे सदर पदे भरण्यास उशीर झाला. या प्रक्रियेला उशीर झाल्याने काही पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली त्यात रेडीओथेरपिस्ट असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

या परिच्छेदात या सर्व गोष्टींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. विषय असा आहे की, ज्यावेळेस यंत्र खरेदीची मागणी केली जाते. तेव्हा यंत्र बसविण्यासाठी जागा उपलब्ध आहे काय? कर्मचारी उपलब्ध आहे काय? यंत्र बसविण्यासाठी रेडिएशन सेंटर तयार करावे लागते त्याची प्रोव्हीजन करण्यात आलेली नाही. कोणतेही कोऑर्डिनेशन न करता आधीच यंत्र खरेदी करण्यात आली हा समितीचा आक्षेप आहे. सदर यंत्र पडून राहिल्याने शासनाचे नुकसान झाले असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. या सर्व गोष्टी करीत असताना विभागाच्या हलगर्जीपणामुळे पैशांचे नुकसान झालेले आहे. याची जबाबदारी कोणावर तरी निश्चित करण्यात यावी असे समितीला वाटते याबाबत विभागीय सचिवांचे काय म्हणणे आहे? अशी पृच्छा समितीने केली असता यंत्र खरेदी करण्यापूर्वी पुरेसे मनुष्यबळ आहे काय हे तपासायला पाहिजे होते. तसेच यंत्र बसविण्यासाठी खोलीची व्यवस्था करावी लागते ती करायला हवी होती. पुरेसा कर्मचारी वर्ग मिळाल्यानंतर हे यंत्र खरेदी करायला हवे होते. परंतु मध्यंतरी कंत्राटी पद्धतीवर काही पदे भरण्यात आली होती त्यानंतर बरीचशी कारवाई झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

यंत्र खरेदी करण्याचा मूळ उद्देश रुग्णाला त्याचा फायदा मिळाला पाहिजे असा होता तथापि यंत्र खरेदी करण्याचा मूळ उद्देशच साध्य झालेला नाही. समितीचा असा आक्षेप आहे की, यंत्र खरेदी करण्यासाठी ८५ टक्के रक्कम देण्यात आली. यंत्र सुरू होऊन त्याचा रुग्णांना फायदा होईल याची विभागाला काळजी नव्हती. फक्त यंत्र खरेदी करण्यासाठी ॲडव्हान्स देण्यामध्ये स्वारस्य होते. म्हणून यासाठी कोणावर तरी जबाबदारी निश्चित करायला पाहिजे. एवढ्या दिवसांमध्ये फक्त चार रुग्णांवर उपचार करणे शक्य झाले असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले तसेच यामध्ये यंत्र खरेदीसाठी ८५ टक्के ॲडव्हान्स देण्यात आला, यंत्र बसविण्यासाठी कक्ष तयार करण्यात आला नाही, सन २००६ मध्ये पद भरतीची मंजूरी घेण्यात आली. तसेच पद भरतीसाठी जे नियम असतात ते तयार करण्यात न आल्यामुळे पद भरती करू शकलेलो नाही. त्या अनुषंगाने कंत्राटी पद्धतीने पद भरावे लागले. या सर्वांमध्ये फक्त यंत्र खरेदी करणे एवढाच उद्देश होता असे समितीचे म्हणणे आहे. ज्या तातडीने यंत्र खरेदी करण्यात आली, त्या तातडीने बाकीच्या कामांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले नाही यासाठी कोण जबाबदार आहे? त्याच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही असे समितीचे मत असल्याचे समितीने नमूद केले असता याची संपूर्ण चौकशी करून समितीला माहिती देण्याबाबत समितीस आश्वासित केले तथापि माहिती अप्राप्त आहे.

समितीच्या माहितीप्रमाणे सन २००६ मध्ये पद भरतीला मान्यता देण्यात आली. त्यानंतर सन २००७ मध्ये यंत्र खरेदीची ऑर्डर देण्यात आली. सन २००८ मध्ये यंत्र उपलब्ध झाले, सन २००९ मध्ये यंत्र बसविण्यासाठी कक्ष तयार झाला. परंतु पद भरती करता आली नाही, कारण नियमच

तयार करण्यात आले नाहीत अशी विचारणा समितीने केली असता त्यावेळी कायमस्वरुपी पद भरती करण्यात आली नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

कायमस्वरुपी १० पदे भरता आली नाही म्हणून तात्पुरत्या स्वरूपात पद भरती करण्यात आली. परंतु त्यांना सहावा वेतन आयोग न मिळाल्याने सदर पदावरील व्यक्ती निघून गेल्या. त्यानंतर एक वर्षासाठी यंत्र बंद झाले. याकडे दुर्लक्ष केलेल्या व्यक्तींना जबाबदार धरणार आहात काय अशी विचारणा समितीने केली असता सदर यंत्र चालू करण्यासाठी चार गोष्टींची आवश्यकता असते. त्यात कॉंकालॉजिस्ट, फिजिशियन्स, यंत्र आणि रेडिएशनचा सोर्स लागतो. जोपर्यंत ही दोन लोक नसतात तोपर्यंत भाभा हॉस्पिटल आम्हाला रेडिएशनचे सोर्स घेण्याची परवानगी देत नाही. फिजिशियनला शासनाच्या नियमाप्रमाणे ३७ हजार रुपये पगार मंजूर करण्यात आलेला आहे आणि बाहेर याच पदासाठी ७५ ते ८० हजार रुपये पगार मिळतो. म्हणून याठिकाणी कुणीही यायला तयार नाही. त्यामुळे ६ ते ८ महिन्यांत फिजिशियन्स नोकरी सोडून जातात. सोर्सची परवानगी घेईपर्यंत फिजिशियन नोकरी सोडून जात असल्यामुळे मान्यता घेता येत नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

विभागाला या सर्वांची जाणीव आहे की, या पगारामध्ये उमेदवार मिळणार किंवा नाही म्हणून या सर्व गोष्टींची जाणीव करूनच यंत्र खरेदी करायला पाहिजे. आपण ज्या सोर्सची माहिती सांगितली त्याचा ताळमेळ बसत नाही तोपर्यंत यंत्र खरेदी करायला नको होते असा समितीने मत व्यक्त केले असता त्यावेळी एवढी मोठी अडचण येईल असे वाटले नव्हते आता फिजिशियन मिळालेला असल्याने लवकरच यंत्र सुरू करण्यात येईल असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

सन २००८ मध्ये खरेदी केलेल्या यंत्राचा वापर ९ वर्षानंतरही करण्यात सक्षम झालेलो नाही. कारण कर्मचाऱ्यांना पगार देण्याबाबत कोणतेही नियम तयार करण्यात आलेले नाही. आता जी १० पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी काही नियम तयार करण्यात आलेले काय अशी पृच्छा समितीने केली असता आता नियम तयार करण्यात आले असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

ज्यावेळेस यंत्र खरेदीचा निर्णय घेण्यात आला त्यावेळेस पद भरतीचा सुद्धा निर्णय घ्यायला हवा होता. आता नवीन तंत्रज्ञान आल्याने नऊ वर्षे जुनी असलेली मशिनरी कशी काय चालेल तसेच ज्यावेळेस यंत्र खरेदी करण्यात आले आणि त्यामुळे शासनाचे काय नुकसान झाले त्यामुळे कुणावर तरी याची जबाबदारी निश्चित करायला पाहिजे असे समितीने नमूद केले असता अँकॉलॉजिस्ट आणि फिजिओथेरपिस्ट ही दोन पदे भरण्यात आलेली असल्यामुळे आता यंत्र सुरू करता येईल. कधी कधी नियमाप्रमाणे काम करताना अशा प्रकारची अडचण निर्माण होते. इतर मशिन्स व्यवस्थित चालू असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

ज्या त्रुटी आहेत त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती समितीला देण्यात यावी तसेच सन २००९ पासून हे यंत्र सुरू केले त्यामुळे किती रुग्णांना या यंत्राचा फायदा झाला व या मशिनचा लाभ किती लोकांना रेडिएशनसाठी दिला? असे समितीने विचारले असता कंत्राटी पद्धतीने पद भरती केली त्यामुळे नियमाप्रमाणे घेतलेल्या पेक्षा कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या पद भरतीमध्ये निगोशिएशन करता येते. चार गोष्टी एकत्र करण्यात आल्यामुळे या यंत्राची अडचण झालेली आहे नाशिक येथील हॉस्पिटल अगदी व्यवस्थित सुरू असून या यंत्रावर काम करणारी माणसे तीच आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

प्रथम वर्षामध्ये ४८ लोकांपैकी ४ लोकांना या यंत्राचा लाभ मिळालेला असून बाकीचे परत गेलेले आहेत असे समितीने विभागास अवगत केले असता या यंत्राचा पद भरती नसल्यामुळे इश्यू झालेला आहे बाकीच्या मशिन्स व्यवस्थित सुरू आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला तसेच यंत्र खरेदी करताना आधी प्लॅनिंग करायला हवे होते असेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. याअनुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी माणसे मिळाली आणि यंत्र सुरू करण्यात आले परंतु ती परत काम सोडून गेली असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

स्त्री रुग्णालयाचे बांधकाम करण्यात येते पण कर्मचारी मिळत नाही त्यामुळे दोन वर्ष इमारत बंद राहते. अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधण्यात येतात परंतु पाणी नसल्यामुळे ते ही बंद राहतात. डमिनीस्ट्रेशन किंवा मॅनेजमेंट ज्यावेळेस स्त्री रुग्णालयाला मान्यता देण्यात येते त्यावेळेस पद भरतीसाठी सुद्धा मान्यता द्यायला हवी असे समितीने विभागास अवगत केले असता या सर्व गोष्टी त्यांच्या अधिकार क्षेत्राबाहेर असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

तुमच्या अधिकार क्षेत्रात नाही म्हणून चुकीच्या गोष्टीचे समर्थन करण्यात येऊ नये. वस्तुस्थिती काय आहे ते समितीला सांगण्यात यावे म्हणजे समितीला ते शिफारसीमध्ये आणता येईल असे विभागीय प्रतिनिधींना समितीने सांगितले तसेच समितीचे एवढेच म्हणणे आहे की, यंत्र आणण्यासाठी एवढे प्रयत्न केले. तसेच इतर जे विषय होते त्याचा विचार केलेला नाही. मागील नऊ वर्षामध्ये या यंत्राचा जेवढ्या लोकांना फायदा व्हायला हवा होता तेवढा होऊ शकला नाही. कारण विभागाचा समन्वयाचा आणि नियोजनाचा अभाव आहे असे यामध्ये दिसून येते. याबाबत कोणावर कारवाई करण्यात यावी किंवा नाही हा वेगळा मुद्दा आहे परंतु हा विषय कुठेतरी थांबायला हवा असे समितीने नमूद केले असता याबाबत कालच नियोजन करण्यात आलेले आहे पुढच्या महिनाभरात या सर्व गोष्टी मार्गी लावण्यात येतील असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

यंत्रसामुग्री बाबत समितीचे असे मत आहे की, विभागाला यंत्रसामुग्री विकत घेण्यामध्ये रस आहे. सदर मशिनरी चालू झाली किंवा नाही, त्याचा लोकांना फायदा होतो किंवा नाही यात रस नाही. उदा.वाशिम येथे इमारत बांधण्यात आली, परंतु सात वर्षे इमारत बंद पडून होती. पैसे खर्च

झाले, कारण काय तर परवानगी मिळाली नाही त्यासाठी कुणी पाठपुरावा केला नाही. म्हणून कोणतीही गोष्ट करताना त्याचे नियोजन असायला पाहिजे की, इमारत बांधत असताना त्यासाठी पद भरती करायला पाहिजे. नाही तर परवानगी घेण्यात येऊ नये जोपर्यंत कुणावर कारवाई करण्यात येत नाही तोपर्यंत विभाग दखल घेत नाही असे समितीने मत व्यक्त केले असता विभागाचे हेच म्हणणे आहे की, बाकीचे अधिकारी/ कर्मचारी व्यवस्थित काम करीत आहे. सदर पद भरती झाली नसल्यामुळे ही अडचण झालेली आहे हे कोणी मुद्दाम केलेले नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

भविष्यासाठी यात सुधारणा व्हायला हवी होती ती झालेली नाही असे समितीचे म्हणणे असून आजही उप जिल्हा रुग्णालयाला मान्यता देण्यात येते आणि पद भरती, रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री यासाठी मान्यता देण्यात येत नाही. विभागाचे असे आहे की, आता एक गोष्ट करायची, नंतर दोन वर्षानी एक गोष्ट करायची. पण असे होऊ शकत नाही, कोणतीही गोष्ट नियोजनबद्ध व्हायला हवी. म्हणून यासाठी कोण जबाबदार आहे हे समितीला कळायला पाहिजे असे समितीने सांगितले असता या सर्व अडचणी बघून आता दोन चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत सर्व यंत्रसामुग्रीच्या देखभाल दुरुस्तीसाठी एक कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले आहे. वाशिम येथील सुद्धा सर्व यंत्रसामुग्री दुरुस्त करण्यात आलेली आहे. सर्व लॅबॉरेटरी सिरींज आऊट सोर्सिंग केलेल्या आहेत. प्रत्येक संस्थेतील सर्व लॅबॉरेटरीमध्ये एक संस्था येऊन रक्ताचे नमुने घेऊन तातडी असेल चार तासात आणि इतर रुग्णांचे चोवीस तासात रिपोर्ट होतात आणून देईल १५० लॅब स्थापन केलेल्या असून जिल्हा मुख्यालयात लॅब स्थापन झालेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

गोंदियामध्येही सिटीस्कॅन मशीन बंद पडलेली असल्याचे समितीने नमूद केले असता आता ही अडचण येणार नाही फेबर सिंदूरी नावाच्या कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे आणि एकूण कॉस्टच्या साडेपाच टक्के रक्कम वर्षाला द्यायची आहे. आपल्याकडे एकूण ५०० कोटी रुपयांची रिक्युटमेंट आहे. त्या बदल्यात सर्व यंत्रसामुग्रीची देखभाल करणार आहेत. एम्समधील यंत्रसामुग्री देखभाल दुरुस्तीचे काम सुद्धा घेतलेले आहे. त्याबाबत कंपनीसोबत बोलणी सुरू आहे. एका व्यक्तीला फोन केला तर तक्रार येते आणि चोवीस तासात माणूस येऊन मशिनरी दुरुस्त केली जाते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

महाराष्ट्राला आपण प्रगत म्हणतो आणि आजही जिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन मशीन चालू नाहीत. अमरावती विभागात पाच जिल्हा रुग्णालय आहेत त्यातील किती ठिकाणी सिटीस्कॅन मशिन्स चालू आहेत? अमरावती येथे तर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आहे बुलढाणा, वाशिम, यवतमाळ येथील जिल्हा रुग्णालयांची काय अवस्था आहे? अशी पृच्छा समितीने केली असता अमरावती येथे सिटीस्कॅन मशीन चालू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले तसेच बुलढाणा,वाशिम व यवतमाळ येथील रुग्णालयांमध्ये निधीची समस्या येते असेही समितीस अवगत केले.

सदर मशिन्ससाठी सध्या काय नेमणूक केली आहे या समितीच्या प्रश्नाला अँकॉलॉजिस्ट आणि फिजिशियन्सची पद भरती केलेली आहे त्यासाठी नेदरलँडवरुन रेडिएशन सोर्स मिळायला लागतो. जी पद भरती केलेली आहे ते सुद्धा आता ७५ हजार रुपये पगार द्या नाही तर सोडून जाऊ असे सांगत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले. तसेच पगार वाढविण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेला आहे. परंतु पद भरतीबाबतचे नियम अजूनही तयार करण्यात आलेले नाहीत. पद भरतीचे नियम तयार करून त्याची मान्यता घेण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभाग हे काम किती दिवसात करणार आहे एक महिन्याच्या आत सर्व कामे करून त्यासंदर्भातील अहवाल समितीला उपलब्ध करून देण्यात यावा. आपण भरतीचे नियम सन २००६ पासून तयार केलेले नाहीत. आता सन २०१७ आलेले आहे समितीचे म्हणणे असे आहे की, विभागाने उमेदवारांची भरती प्रक्रिया नंतर करावी परंतु भरतीच्या अगोदर भरतीचे नियम तयार करावेत. भरतीचे नियम तयार करण्यास विभागाला कोणती अडचण आहे असेही समितीने विचारले असता भरतीचे नियम दोन महिन्यात करतो असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला असता मशिनचा सोर्स मिळाल्यानंतर लगेच सुरू करू यासाठी आम्हाला दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी लागणार नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाचे जे डॉक्टर्स आहेत किंवा टेक्निशियन्स आहेत त्यांना जेवढे वेतन मिळावयास पाहिजे तेवढे वेतन विभागाकडून त्यांना मिळत नाही त्यामुळे शासनाने या विषयासंदर्भात पुनर्विचार करून वेतन वाढवून देण्यासंदर्भात समितीने शिफारस केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

कमी वेतन असल्यामुळे डॉक्टर्स आणि टेक्निशियन्स टिकत नाहीत ही वस्तुस्थिती असून समितीने डॉक्टर्स आणि टेक्निशियन्सची सॅलरी वाढवून देण्याची शिफारस केली तर बरे होईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

समिती यासंदर्भात नक्कीच शिफारस करेल परंतु त्यांच्या वेतनाची तुलना शासनाच्या वेतनश्रेणीशी संबंधित नाही तर त्यांना खाजगी क्षेत्रामध्ये किती पैसे मिळतात व शासनामध्ये किती पैसे मिळतात यासंदर्भात ते तुलना करीत असतील तर तसे होणार नाही मेडिकल ऑफिसरला शासनामध्ये जो पगार दिला जातो तो पगार सुद्धा या ठिकाणच्या टेक्निशियन्सला दिला जात नाही. टेक्निशियन्सला केवळ ३७ हजार पगार दिला जात असल्याचे समितीने नमूद केले असता फिजिसिस्ट एमएससी असल्यामुळे फिजिसिस्टला मार्केटमध्ये फार डिमांड आहे असे असतानाही त्यालाही तोच पगार दिला जातो या लोकांना कमितकमी ७० ते ७५ हजार रुपये पगार मिळाला पाहिजे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले आणि त्यामुळेच हे लोक कंत्राटी ठेवणे बरे पडते, नाही तर स्केलमध्ये ते अडचणीचे होते असे समितीस सांगितले.

सिस्टीम सुरू राहिली पाहिजे एवढेच समितीचे म्हणणे आहे. मशिनरी आणि इतर कामासाठी आपण जवळपास २ कोटी रुपये खर्च केले असून त्याचा लाभ जनतेला होणार नसेल तर एवढे पैसे खर्च करून काय उपयोग? त्यामुळे आतापर्यंत या मशिनरीचा किती लोकांना फायदा झालेला आहे याबाबत समितीला रिपोर्ट सादर करण्यात यावा तसेच पदे भरण्याच्या संदर्भात सर्व्हीस रुलमध्ये जे काही बदल करावयाचे आहेत ते बदल एक महिन्याच्या आत करण्यात यावेत. तसेच जी पदे मिळत नाहीत ती पदे मिळण्यासाठी व्यवहारीकदृष्टया वेतन ठरविण्याचे अधिकार संचालकांना देण्यात यावेत, यासंदर्भातील प्रस्ताव विभागाने समितीकडे पाठवला तर समिती सुद्धा या विषयाच्या संदर्भात शासनाला शिफारस करेल. तसेच कोणतेही नियोजन न करता या ठिकाणी यंत्रसामुग्री खरेदी करण्यात आल्यामुळे शासनाच्या पैशांचे नुकसान झालेले असल्यामुळे यासंदर्भात सुद्धा समितीने शासनाला शिफारस करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने नमूद कले तसेच योजनेचा फायदा जनतेला झालेला नाही ही वस्तुस्थिती असल्यामुळे यासंदर्भात समितीतर्फे निश्चितपणे शिफारस करण्यात येईल असे ही समितीने विभागास अवगत केले.

यासंदर्भात नियोजन केले होते नियोजनानुसार विभागाकडे टेक्निशियन्स सुद्धा आले होते परंतु माणूस आला की, सोर्स जातो, सोर्स आला की, माणूस जातो अशी परिस्थिती येते असे मत विभागीय प्रतिनिधींनी व्यक्त केले.

विभागाने दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे की, मशिनरी घेतली परंतु रेडिएशन रुम तयार नसल्यामुळे ही मशिनरीज तशीच पडून होती. मॅनेजमेंट नसल्यामुळेच तसे झालेले आहे. महिनाभर विलंब समजू शकतो परंतु एक वर्ष मशिनरीज तशीच पडून राहणे बरोबर नाही. नंतर रेडिएशन रुम तयार झाली परंतु त्यानंतर स्टाफ नसल्यामुळे मशिनरीज पडून होती. स्टाफ, रेडिएशन रुम, मटेरियल या सर्व बाबीचा विचार आपण एकत्रित करावयास पाहिजे होता तो झाला नाही परंतु विचार फक्त मशिनरीज खरेदीचा झालेला आहे. मशिनरीजसाठी ८५ टक्के पॅकेज देऊन टाकले परंतु बाकीच्या विषयावर कोणीही लक्ष दिलेले नाही. त्यामुळे यापुढे शासनाला कोणतीही खरेदी करावयाची असेल तर सर्व बाबींचा विचार करुनच पर्चेस ऑर्डर देण्यात यावी अशी समितीची शिफारस राहणार असल्याचे समितीने नमूद कले. यावर विभागीय प्रतिनिधींनी रेडिएशन रुम नसल्यामुळे मशिनरी तशीच पडून होती असे सुरूवातीला झाले असल्याचा खुलासा केला.

हा कारवाईचा विषय नाही परंतु हे सर्व ऑबझर्व्हेशन्स आहेतच. मागील आठ वर्षात रेडिएशनचा फायदा किती लोकांना मिळाला याची लेखी माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात यावी असे समितीने नमूद केले असता विभागीय प्रतिनिधींनी यासंदर्भातील माहिती समितीस उपलब्ध करून देण्याबाबत आश्वासित केले तथापि माहिती अप्राप्त आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

**१५.४ परिच्छेद क्रमांक ३.३.३ : " यंत्रसामुग्री विनावापर पडून राहणे "**

नाशिक येथील प्रादेशिक संदर्भ रुग्णालयात पूर्णवेळ कायमस्वरुपी कर्मचारी नियुक्त न केल्यामुळे सर्व्हीकल कॅन्सरने पिडीत असलेल्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी रु. १.१२ कोटी किंमतीस खरेदी केलेले ब्रँकोथेरेपी मशिन ४५ महिने विनावापर पडून होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नमूद केले आहेत.

ज्या वैद्यकीय उपकरणांमध्ये किंवा यंत्रांमध्ये रेडिओपॅक्टीव्ह द्रव्याचा वापर केला जातो त्याची प्रस्थापना, वापर व संनियंत्रण यांचे नियमन अणु ऊर्जा नियामक मंडळ, मुंबई (AERB) यांचेकडून केले जाते. अशी यंत्रणा कार्यान्वित करण्याआधी रेडिएशन थेरेपी यंत्रणा खरेदी करणाऱ्या रुग्णालयाने AERB ने घातलेल्या अनिवार्य अटींची जसे की, पूर्णवेळ रेडिएशन थेरेपी तंत्रज्ञ पर्याप्त संख्येत नियुक्त करून पुर्तता करणे आवश्यक होते. अशी यंत्रणा वापरणाऱ्या सर्व रुग्णालयांनी प्रत्येक वर्षी ३१ जानेवारीपूर्वी AERB ने सादर केलेल्या वार्षिक रेडिएशन सुरक्षा अहवालाद्वारे AERB कडून या बाबी प्रमाणित करून घेणे बंधनकारक आहे.

कॅन्सर रुग्णाला रेडिएशन देण्याकरिता अत्यंत उपयुक्त असे High Dose Remote After Loading Bronco Therapy हे यंत्र रु. १.१२ कोटी ला खरेदी करण्यात आले असून ते माहे ऑक्टोबर,२००८ मध्ये प्राप्त झाले. परंतु ज्या शाखेमध्ये हे यंत्र स्थापित करावयाचे होते ती शाखा बांधून पूर्ण झाली नसल्यामुळे हे यंत्र पडून होते व माहे ऑगस्ट,२००९ मध्ये ते प्रस्थापित करण्यात आले व माहे ऑक्टोबर,२००९ पासून या यंत्राचा वापर करण्यास सुरुवात झाली. सर्व्हीकल कॅन्सरवरील उपचारासाठी एकूण ४८ रुग्णांना ब्रँकोथेरेपी (Bronco Therapy) कक्षाकडे पाठविण्यात आले. ज्यापैकी माहे मार्च ते एप्रिल, २०१० पर्यंत फक्त ४ रुग्णांवर उपचार झाल्याचे रुग्णालयातील नोंदवहीवरुन दिसून येते. यंत्र कार्यरत ठेवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रेडिओपॅक्टीव्ह द्रव्याची क्षमता ग्राह्य मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात घटल्यामुळे उर्वरीत ४४ रुग्णांना उपचारासाठी इतर शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले. ज्यावेळी हे यंत्र मागविण्यात आले त्यावेळी रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेले रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट, एक रेडिऑलॉजिकल सुरक्षा अधिकारी व मुख्य भौतिक तज्ञ आणि रेडिएशन थेरेपी तंत्रज्ञ हे रुग्णालयात कार्यरत होते. मुख्य भौतिक तज्ञ आणि एक रेडिएशन थेरेपी तंत्रज्ञ यांनी राजीनामा दिला. मुख्य भौतिक तज्ञ जे रेडिऑलॉजिकल सुरक्षा अधिकारी म्हणूनही काम बघत होते यांच्या राजीनाम्यामुळे कॅन्सर विभाग बंद झाला. अतः सदरहू यंत्र हाताळण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे AERB ने रेडिओपॅक्टीव्ह द्रव्याची आयात करण्यासाठी रुग्णालयाला परवानगी दिली नाही व दीर्घ काळ वापर न केलेल्या द्रव्यांच्या संदर्भात AERB च्या चालू धोरणांच्या अनुषंगाने सदर यंत्र परत करण्याची कार्यवाही सुरू करण्याचा सल्ला दिला. माहे जानेवारी,२०१४ पर्यंत यंत्र अकार्यरत होते.

माहे नोव्हेंबर, २००६ मध्येच सार्वजनिक आरोग्य विभागाने रुग्णालयासाठी १ रेडिएशन ऑन्कॉलॉजिस्ट, एक मुख्य भौतिक तज्ञ आणि इतर भौतिक तज्ञ यांची पदे मंजूर केली होती. परंतु यंत्र प्राप्त झाल्यावर ३ वर्षापेक्षा जास्त काळ उलटूनही शासनाने या विशिष्ट पदासाठी नियुक्तीचे नियम निश्चित केले नाहीत किंवा ही पदे कायमस्वरुपी/नियमित तत्वावर भरण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाही. परिणामी रुग्णालयाने वेळोवेळी ही पदे

कंत्राटी तत्वावर भरणे सुरू ठेवले. अशाप्रकारे रुग्णालयात कायमस्वरुपी कर्मचारी नियुक्त न केल्यामुळे आणि त्यामुळे रेडिओपॅक्टीव्ह द्रव्याची आयात करण्यासाठी AERB ने मान्यता न दिल्यामुळे व कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या व्यक्तींनी राजीनामा दिल्यामुळे रु. १.१ कोटी किंमतीची यंत्रे ४५ महिने विनावापर पडून राहिली. यंत्र खरेदीची प्रक्रिया सुरू करतेवेळी यंत्रासाठी जागेची तसेच कर्मचाऱ्यांची उपलब्धता याची कोणतीही तरतूद न करता अथवा यासंदर्भात नियोजन व समन्वय न ठेवता आधीच यंत्र खरेदी करण्यात आली हाच महालेखाकारांचा मुळ आक्षेप आहे. यावर विभागीय सचिवांनी यंत्र खरेदी करण्यापूर्वी पुरेसे मनुष्यबळ, जागेची व्यवस्था व पुरेसा कर्मचारी वर्ग मिळाल्यानंतर ही यंत्रे खरेदी करणे आवश्यक होते हे समितीसमोर साक्षीदरम्यान मान्य केले. कायमस्वरुपी पद भरती करण्यासाठी नियमच अस्तित्वात नसतानाही केवळ कंत्राटी स्वरुपाच्या नियुक्तीवर एवढ्या मोठ्या रक्कमेचे यंत्र खरेदी करणे ही बाब खचितच गंभीर आहे. हे यंत्र खरेदी करण्यासाठी अथवा त्याचा वापर करण्यासाठीच्या AERB च्या अटी शर्ती या इतक्या कठोर असताना सदरहू प्रकरण विभागाने अतिशय निष्काळजीपणे व बेजबाबदारपणे हाताळले. अशा परिस्थितीत यंत्र घेण्याची घाई विभागाच्या स्तरावरुन का करण्यात आली? सर्व मुलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करुनच यंत्र खरेदी करणे आवश्यक होते. प्राथमिकदृष्ट्या ही बाब नियोजन समन्वयाचा अभाव, विभागाचा बेजबाबदारपणा व शासकीय निधीचा अपव्यय करणारी असल्याचे सिद्ध होते. इमारतीचे बांधकाम, पद भरती, वैद्यकीय उपकरणे अथवा यंत्रसामुग्री बसविणे या गोष्टी समांतर पातळीवर राबविणे क्रमःप्राप्त असताना या प्रकरणी तसे झाल्याचे दिसून येत नाही. कॅन्सर रुग्णांसाठी उपचाराची तातडी व महत्व लक्षात घेता शासनस्तरावरुन एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मिळून कॅन्सर रुग्णांसाठी अतिशय उपयुक्त असणाऱ्या या यंत्राच्या खरेदीसाठी निधी प्राप्त होवूनही त्याचा पुरेपूर लाभ केवळ विभागाच्या हलगर्जीपणामुळे रुग्णांना मिळू शकला नाही. फक्त या प्रकरणीच नव्हेतर थोड्याफार फरकाने आरोग्य विभागात राज्यभर सर्वत्र हीच परिस्थिती शासनस्तरावर दिसून येते. कधी विभागाकडे निधी नाही, निधी आहे तर डॉक्टर नाही, डॉक्टर आहे तर यंत्रसामुग्री नाही व यंत्रसामुग्री आहे तर त्यासाठी प्रशिक्षित तांत्रिक वर्ग नाही व हे सर्व असले तरी रुग्णालयासाठी इमारत नाही. अशा परिस्थितीत या सर्व बाबींचा समन्वय व नियोजन विभागाकडे समांतर पातळीवर नसेल तर राज्यात सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी निगडीत असलेला हा महत्वाचा विभाग परिणामकारकपणे कार्यरत राहूच शकत नाही. शासनाने या यंत्रासाठी मोठ्या प्रमाणात निधी देऊन हे यंत्र खरेदी करण्यात येणे, परंतु केवळ एका डॉक्टरने अथवा कर्मचाऱ्याने दिलेल्या राजीनाम्यामुळे पूर्ण कॅन्सर विभागच बंद पडणे, यंत्रे विनावापर पडून राहणे व या सर्वांचा अपेक्षित लाभ रुग्णांना न मिळणे अशा बाबी होत असतील तर या अडचणींवर शासनाने अन्य पर्यायांचा देखील विचार करणे आवश्यक असून रुग्णांना शाश्वत वैद्यकीयसेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर खाजगी क्षेत्रात डॉक्टरांना मिळणारे वेतन व राज्य शासनामार्फत देण्यात येणारे वेतन यात फार मोठी तफावत असल्यामुळे डॉक्टर हे कायमस्वरुपी शासकीय रुग्णालयात टिकत नाहीत. एकीकडे ही वेतनातील तफावत शासनाने दुर करण्याची आवश्यकता व दुसरीकडे ऐनवेळी राजीनामे देऊन संपूर्ण आरोग्य व्यवस्थाच विस्कळीत करणाऱ्या डॉक्टरांच्या या कार्यपद्धतीबाबतही कडक अटी, शर्ती व धोरण अवलंबिण्याची आवश्यकता आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. कोट्यावधी रुपयांची खरेदी करूनही व यंत्रसामुग्री घेवून देखील त्याचा लाभ रुग्णांना मिळत नसेल तर विभागाची एवढी मोठी व्यवस्था उभी करून व एवढा पैसा खर्च करून त्याचा कोणताही उपयोग होणार नाही असे वाटते.

**शिफारशी**

**१५.५ कोणत्याही प्रकारचे नियोजन न करता आणि समन्वय न ठेवता सदरहू प्रकरणी यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१५.६ पदे भरण्यासंदर्भात सेवा नियम तातडीने १ महिन्याच्या आत अंतिम करण्यात यावेत व पदे कायमस्वरुपी भरण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१५.७ खाजगी क्षेत्रात व शासकीय स्तरावरुन डॉक्टरांना व प्रशिक्षित तांत्रिक कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वेतनात फार मोठी तफावत असल्यामुळे हे डॉक्टर शासकीय रुग्णालयात कार्यरत रहात नाहीत व कमी वेतनश्रेणीमुळे पदे रिक्त राहतात. ही पदे भरण्यासाठी वेतनातील या तफावतीचा पुर्ण अभ्यास करून वेतननिश्चिती करण्यात यावी. तसेच ऐनवेळी राजीनामे देऊन अथवा अन्य कारणास्तव डॉक्टर सोडून जातात या कार्यपद्धतीवर अंकुश ठेवण्यासाठी कडक अटी, शर्ती व धोरण निश्चित करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**१५.८ मागील ८ वर्षात या रेडिएशनचा फायदा किती रुग्णांना मिळाला याची लेखी माहिती समितीला उपलब्ध करून देण्याबाबत साक्षीदरम्यान विभागीय प्रतिनिधींना सांगण्यात आले होते व विभागीय प्रतिनिधींनी माहिती देण्याचे मान्य करूनही जवळजवळ ४ ते ५ महिन्यांचा कालावधी उलटूनही ही माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात आली नाही. सदरहू माहिती १ महिन्याच्या आत समितीस उपलब्ध करून देण्यात यावी व समितीने मागितल्यानंतर माहिती वेळेत न देणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस १ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट-अ

**विवरण क्र. १**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
MUMBAI METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY

जा.क्र.निर्मल/झो.सु.मं.नि./०४-०७/११/३८७

दिनांक : २८ डिसेंबर,२०११

प्रति,
श्री.सतिश गवई (भा.प्र.से)
उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई-४०० ०५१

VP/MHADA

विषय:- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निधी अंतर्गत बांधावयाची शौचालये व इतर कामे मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

महोदय,

वरील विषयाच्या संदर्भात आपल्या दिनांक २२.१२.२०११ च्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे रु. १५० कोटी २ टप्प्यामध्ये म्हाडाकडे वर्ग करण्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिलेले आहेत. सदरील अनुदानाचा उपयोग खालील कामांसाठी करावयाचा आहे.

१) सार्वजनिक शौचालय व भागामध्ये PSC BLOCK

२) भागामध्ये पाण्याचे कनेक्शन

३) भागामध्ये नवीन गटारे

४) बालवाडी

५) शाळाखोली

६) समाजकल्याण केंद्र

वरील ६ कामाव्यतिरीक्त मुंबई शहरामध्ये उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीची कामे आवश्यकतेप्रमाणे शासनाने घालून दिलेल्या रु. २०००/- प्र.चौ.मी. या आर्थिक मर्यादेमध्ये राहून

करण्यात यावेत शिवाय PMGP कार्यक्रमातंर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये विशेष दुरुस्तीची काही कामे प्रस्तावित झाल्यास त्याचाही शासनाच्या धोरणानुसार विचार करण्यात यावा असेही आदेश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आहेत.

रु. १५० कोटींपैकी बँक ऑफ महाराष्ट्र धनादेश क्र. ७२६८२० दि. २८.१२.२०११ रक्कम रु. ७० कोटी व युनाइटेड बँक ऑफ इंडिया धनादेश क्र. ००२१८२ दि. २८.१२.२०११ रक्कम रु. ५ कोटी असे एकुण रु.७५ कोटी म्हाडाकडे पाठविण्यांत आले आहेत.

वरीलप्रमाणे देण्यात येणाऱ्या अनुदानाचा विनियोग विहीत पध्दतीने करावा व त्यासबंधीची सविस्तर माहिती या कार्यालयाला कृपया पाठवावी.

आपला विश्वासू

(एस.व्ही.आर श्रीनिवास)
अति. महानगर आयुक्त
व प्रकल्प संचालक

**विवरण क्र. २**

<u>तात्काळ/कालमर्यादित</u>

क्र.नागरी-२०१७/प्र.क्र.०५/भाग-१/गृनिभू
गृहनिर्माण विभाग, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
ई-मेल-gnb.housing@maharashtra.gov.in
दिनांक : मे, २०१७.

प्रति,

अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई ४०० ०३२

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या <u>सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.२.३.</u> इस्लामपूर, जि.सांगली येथील कासेगाव एज्युकेशन सोसायटीस वाटप करण्यात आलेल्या भूखंडामूळे महसूलाची झालेली हानीबाबत.

संदर्भ :- १) शासनपत्र समक्रमांक दि.२६.०४.२०१७
२) आपले पत्र क्र.१४९९५/म.वि.स./ड-१,दि.२३/५/२०१७

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार, सदर विषयाबाबत दि.१३/२/२०१७ रोजी झालेल्या साक्षीमध्ये निर्देशित केल्यानुसार परिच्छेद क्र.३.२.३ बाबत समितीस आश्वासित केल्यानुसार या संदर्भातील "टिप्पणीची प्रत" यासोबत सादर करण्यात येत आहे.

आपला,

(ग.तु.जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रत,

कक्ष अधिकारी (लेखा), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

लेखा कार्यासन, गृहनिर्माण विभाग यांचे दि.२४/१/२०१७ व त्यासोबतचे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे दि.२१/१/२०१७ चे पत्र तसेच या अनुषंगाने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२.३, वित्त नियंत्रक, प्राधिकरण यांचे दि.१०/१/२०१७ चे पत्र, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे दि.७/६/२०१६ चे पत्र, मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांचे दि.११/२/२०१६ व दि.३१/१/२०१७ चे पत्र सहपत्रांसह तसेच धारिका क्र.वाटप-११०६/प्र.क्र.६०१/गृनिभू कृपया पहावी.

२. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेदासंदर्भातील अपर मुख्य सचिव यांची साक्ष दि.१३/२/२०१७ रोजी दुपारी २.३० वाजता कक्ष क्र.११०१ (११ वा मजला), विधानभवन, मुंबई येथे आयोजित केली आहे. सदर परिच्छेदासंदर्भातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापने महालेखापरीक्षक यांचेकडून संमत करुन त्याच्या मराठी व इंग्रजी प्रती विधानमंडळ सचिवालयाला तात्काळ पाठविण्यात याव्यात, असे लेखा कार्यासन, गृहनिर्माण विभाग यांनी दि.२४/१/२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.

३. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२.३-- " स.क्र.१६२/२ इस्लामपूर, जि.सांगली येथील कासेगाव एज्युकेशन सोसायटीस वाटप करण्यात आलेल्या भूखंडाबाबत ", हा परिच्छेद गृनिभू कार्यासनाशी संबंधित असून याबाबत वित्त नियंत्रक, प्राधिकरण यांचे दि.१०/१/२०१७ चे पत्र, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे दि.७/६/२०१६ चे पत्र व मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांचे दि.११/२/२०१६ व दि.३१/१/२०१७ चे पत्रांन्वये सादर केलेल्या अहवालानुसार प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

१) कासेगांव, इस्लामपूर जि. सांगली, येथील स.नं. १६२/२, मधील २.०२ हेक्टर शासकीय जमीनीचा पुणे मंडळाने दि. १८/१०/१९६६ रोजी ताबा घेतला.

२) सदर जमीन निवासी घरे बांधण्यासाठी पुणे मंडळाला देण्यात आली होती. मंडळाने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ५० गाळ्यांची योजना दि. ३१/१/१९६९ रोजी पुर्ण केली. या योजनेला त्यावेळी अनेक प्रयत्न करुनही पाणी उपलब्ध झाले नव्हते व त्यामुळे गाळे विना वितरण रिक्त होते.

३) श्री. राजाराम अनंत पाटील, वि.प.स. यांनी दिनांक ०१/०८/१९८३ व ०३/०८/१९८३ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन मा. गृहनिर्माण मंत्री यांना पत्र लिहून त्यांच्या संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी सदर ५० गाळ्यांची मागणी केली होती. कासेगाव एज्युकेशन संस्थेच्या सचिवांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना देखील याच मागणीसाठी दि. ०१/०८/१९८३ रोजी पत्र पाठविले होते. सदर पत्राला अनुसरुन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने दि. २०/०८/१९८३ रोजी सोसायटीला उत्तर पाठवून त्याची प्रत म्हाडा व पुणे मंडळ यांना अग्रेषित केली व या प्रकरणी निर्णय घेऊन शासनास कळविण्याची सूचना केली होती.

४) उपरोक्त मागणीस अनूसरुन प्राधिकरणाने दि. २७/०९/१९८३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ७२२ पारित केला की " कासेगाव एज्युकेशन सोसायटी यांना इस्लामपूर येथे ५० गाळे सभोवतालच्या ५ एकर जमिनीसह प्राधिकरणाच्या गाळ्यांच्या व जमिनीच्या किंमतीविषयक धोरणास अनुसरुन देण्यात यावे "

५) मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी दि. २४/१०/१९८३ च्या पत्र क्र. ६९८५ अन्वये कासेगाव एज्युकेशन सोसायटीला ५० गाळे वितरणाचे आदेश काढले. सदर ५० गाळे रु. ४,९८,५००/- या किंमतीला एक रकमी पध्दतीवर देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या गाळ्यांच्या बांधकामाखालील जमीन व त्याला

अनुलग्न असलेली जमीन रु. १,७०५/- वार्षिक भुईभाडे आकारुन ९० वर्षाच्या लिजवर देण्यात येत असल्याचा उल्लेख आहे.

६) सदर ५० गाळ्यांच्या आणि ५ एकर जमिनीचा तात्पुरता ताबा (प्रोव्हिजनल पझेशन) दि. २८/१२/१९८३ रोजी कासेगाव एज्युकेशन सोसायटीस संस्थेच्या लेटर हेडवर पुणे मंडळाच्या उप अभियंता यांनी देण्यात आल्याचे दिसून येते.

७) जिल्हाधिकारी, सांगली यांनी दि. ११/०२/१९८७ रोजी नोटीस पाठवून सदर जमीन निवासी प्रयोजनासाठी उपयोगात आणली नसल्यामुळे किंबहुना होस्टेलसाठी इमारत बांधणी व जमीन विनापरवानगीने हस्तांतरीत केली असल्याने ती का काढून घेण्यात येऊ नये, अशा आशयाची नोटीस जारी केली होती.

८) जिल्हाधिकारी यांनी घेतलेला आक्षेप लक्षात घेऊन उर्वरीत जमीनीवर १०६ विविध उत्पन्न गटाची योजना राबविण्याचे पुणे मंडळाने ठरविले. पुणे मंडळाने योजना राबविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु केली होती. परंतु ती पुर्ण होऊ शकली नाही.

९) जून २००८ मध्ये, उर्वरित क्षेत्राचा ताबा कासेगाव शिक्षण संस्थेस देणेबाबत विचारार्थ प्रस्ताव पुणे मंडळाने प्राधिकरणास सादर केला होता. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने <u>दि. १३/०६/२००८ रोजी ठराव क्र. ६२९३ करण्यात येऊन खालील निर्णय घेण्यात आला.</u> :- "कासेगाव एज्यकेशन सोसायटी, इस्लामपूर या संस्थेला प्राधिकरणाचा दि. १७/०९/१९८३ चा ठराव क्र. ७२२ अन्वये, ५० सदनिका व ५ एकर जमीन (इस्लामपूर येथील म्हाडाची स.क्र. १६२/२) विक्री करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयातील ५० गाळे व त्याला अनुलग्न असलेल्या सुमारे ६५४२ चौ.मी. क्षेत्रफळ सोडून उर्वरीत सुमारे १५,९७२ चौ.मी. क्षेत्रफळ एवढी जमीन, कासेगाव एज्युकेशन सोसायटीने इस्लामपूर येथे गृहनिर्माणास योग्य अशी, तेवढ्याच मुल्याची व क्षेत्रफळाची जमीन (बदली जमीन) म्हणून म्हाडाला द्यावी. याबाबत शासन स्तरावरुन आदेश जारी करुन घेण्यासाठी गृहनिर्माण विभागाला पाठविण्यात आला होता. त्यात पुढीलप्रमाणे दोन पर्याय सुचविले होते :-

<u>पर्याय १ :-</u> प्राधिकरणाने दि.१७/९/१९८३ रोजी पारीत केलेला ठराव क्र.७२२ मध्ये भागश: सुधारणा करणे ज्या अन्वये हा फक्त ५० गाळे त्याला अनुलक्षून असलेली जमीन देण्यापूरता ठराव सिमित करुन उर्वरीत जमीन वितरणाचा ठराव रद्द करणे शासनाच्या मंजूरीनंतर अंमलबजावणी/कार्यवाही करणे.

<u>पर्याय २:-</u> सदरहू शासकीय जमीन ही मूलत: रहिवासी वापरासाठी आहे, ती कासेगांव एज्युकेशन सोसायटीला त्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी नियमित करुन द्यायची असेल तर त्याबाबत शासनाने योग्य तो निर्णय घेणे, शासनाने जर ही सर्व ५ एकर जमीन कासेगांव एज्युकेशन सोसायटीला नियमित करुन देण्याचा निर्णय घेतला तर ५ अटी (ठरावामध्ये ५ अटी असून प्रयोजनात बदल झाल्यास शासनाच्या/जिल्हाधिकारी यांच्या नियमाप्रमाणे अधिमुल्याची आकारणी वा दंड आकारणी केली त्या संस्थेने अदा करावी, अशी तरतुद केली होती) या दोन पर्यायांपैकी एका पर्यायावर शासनाने निर्णय घ्यावा, असे कळविले."

१०) त्या अनुषंगाने म्हाडा प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त जमिनीबाबत म्हाडा प्राधिकरणाच्या दि.१३.०६.२००८ रोजीच्या २२७ व्या बैठकीमध्ये पारित झालेल्या ठराव क्र.६२९३, दि.१३.०६.२००८ अन्वये घेतलेल्या निर्णयास शासनाची मान्यता देण्याचा प्रस्ताव विभागामार्फत सप्टेंबर २००८ मध्ये सादर केला होता. सदरहू प्रस्तावास तत्कालिन राज्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली होती.

परंतु तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी "सन १९८३ पासून शिक्षण संस्थेच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर त्यावेळेस प्रचलित धोरण/नियमाप्रमाणे आकारणी करणे योग्य होईल," असे आदेश दिले.

दरम्यानच्या काळात राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये बदल झाला. तद्नंतर नवनियुक्त तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांकडे प्रकरण सादर करत प्रकरण मान्यतेसाठी आदेशार्थ सादर केले असता, तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी, "पूर्वी घेतलेल्या निर्णयाची (पा.क.१७/टि.) सत्वर **अंमलबजावणी करावी,"** असे आदेश दिले व सदरहू आदेशास अनुलक्षून उक्त दि.०२.०६.२००९ चे पत्र निर्गमित केले आहे.

शासनाने दि. ०२/०६/२००९ च्या पत्र क्र. संकिर्ण-१९०६/प्र.क्र.६०१/ गृनिभू-१ अन्वये सुचना केल्या की, "सन १९८३ पासून कासेगांव शिक्षण संस्थेच्या ताब्यात असलेल्या विषयांकित जमिनीवर, त्यावेळेसच्या प्रचलित धोरण/ नियमाप्रमाणे आकारणी करण्याबाबतच्या कार्यवाहीची सत्वर अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा."

शासनाच्या सदरहू आदेशास अनुलक्षून प्राधिकरणाने दि. ०७/०८/२००९ च्या बैठकीत ठराव क्र. ६४१५ पारित केला की, "गृहनिर्माण विभागाच्या दि. ०२/०६/२००९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदरहू जमीन १९८३ पासून कासेगाव एज्युकेशन संस्थेच्या ताब्यात असल्यामुळे त्यावेळच्या प्रचलित धोरण/नियमाप्रमाणे मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी काढलेली किंमत (रु.१,६७,६७२ /- + त्यावरील दि. ३०/०९/१९८३ ते दि. २९/०९/२००९ या २६ वर्षाच्या कालावधीचे १२.५ टक्क्याने येणारे व्याज रु. ५,३५,१८४/- मिळून १५,९७२ चौ.मी. क्षेत्रातील येणारी एकूण किंमत) रु.६,९९,८५६/- आकारण्यात यावी."

वरील ठरावाप्रमाणे पुणे मंडळाने संस्थेला त्यांचे दि. ०५/०९/२००९ रोजी वितरण आदेश पारित केले. संस्थेने जमीनीचे अधिमुल्य रु.६,९९,८५६/- व ३० वर्षाचे भुईभाडे रु.८७,५१२/- असे एकूण रु.७,८७,३६८/- एवढ्या रक्कमेचा भरणा दि. ०७/०९/२००९ रोजी मंडळाकडे केला व मंडळातर्फे भूखंडाचा ताबा हस्तांतरीत करणेत आला. सदर दस्त दि. २३/१०/२००९ रोजी रु. ९,९००/- मुद्रांक शुल्क व रु. १९,८००/- दंड भरुन मुद्रांक जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडे मुद्रांकित करणेत आला.

११) प्राधिकरणाच्या ठराव क्र. ६४१५ (दि. ०७/०८/२००९) च्या बाब टिप्पणीत पुणे मंडळाने गृहनिर्माण विभाग यांच्या दि. ०२/०६/२००९ च्या पत्राच्या अनुषंगाने पुढालप्रमाण दान पर्याय सुचविले होते :-

**पर्याय क्र. १** मध्ये १९८३ चे जमिनीचे अधिमुल्य + त्यावरील २६ वर्षांचे व्याज + निवासी वापराचे अनिवासी करणाचे वापर बदल शुल्क आकारण्यात येऊन एकूण रु.४६,९२,८५६/- व

**पर्याय क्र. २** मध्ये २००८ च्या रेडी रेकनर नुसार जमीनीचे अधिमुल्य + निवासी वापराचे अनिवासी करणाचे वापर बदल शुल्क आकारण्यात येऊन, एकूण रु.८१,४५,७२०/- सुचविण्यात आले होते.

ठराव करताना फक्त १९८३ चे जमीनीचे अधिमुल्य व त्यावरील २६ वर्षांचे व्याज आकारणी करुन रु.६,९९,८५६/- एवढी रक्कम गृहीत धरण्यात आली आहे.

४. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.२.३ संदर्भातील लेखा परिक्षणात खालील बाबी आढळून आल्या :-

अ) एखाद्या जागेचे वाटप करण्यापूर्वी ज्या व्यक्ती किंवा संस्थेस वाटप करावयाचे आहे त्यांना जमिनीची किंमत व त्यावर लागू होणारे भाडेपट्टी भाडे याविषयी सुचित करणारे एक प्रस्ताव पत्र MHADA

जारी करत. सदर प्रकरणात, कोणतेही प्रस्ताव पत्र न घेता आणि कोणतेही [illegible] करता वर्ष १९८३ मध्ये मोकळया जमिनीचा तावा KES ला हस्तांतरीत करण्यात आला होता. त्याचप्रमाणे, भाडेपट्टी अधिमुल्य वसुल न करता आणि भाडेपट्टी करार कार्यान्वित न करता KES ला जमिनीचे हस्तांतरण केल्यामुळे MHADA अधिनियमाच्या विनियम क्र.१० चा भंग झाला होता. प्रत्यक्षात, जमिनीचे तात्पूरते हस्तांतरण व प्राप्ती हे व्यवहार KES च्या लेटरहेडवर करण्यात आले होते.

ब) वर्ष २००९ मधील प्रस्तावाच्या तारखेस प्रचलित असणाऱ्या बाजार दराऐवजी वर्ष १९८३ मधील दराने मोकळया जमिनीचे वाटप केल्यामुळे फक्त MHADA च्या मुल्य निश्चिती धोरणाचाच भंग झाला असे नाही तर MHADA ला रु.४५.४८ लाख महसूलाचे नुकसान झाले.

क) ठराव क्र.६४१५ (ऑगस्ट २००९) नुसार, MHADA ने जमिनीच्या वापरामध्ये निवासी ऐवजी बिगर निवासी असा बदल केला होता. मात्र MHADA ने जमिनीच्या वापरातील सदर बदलासाठी रु.२५०/- प्रती चौ.मी. दराने अधिमुल्याची वसुली केली नाही. परिणामी रु.३९.९३ लाख महसूलाचे नुकसान झाले.

अशाप्रकारे, MHADA च्या मुल्य निश्चिती धोरणाचे उल्लघंन करुन चालू बाजार दराचा अवलंब न करता जमिनीचे वाटप करणे आणि जमिनीच्या वापरात बदल केल्याबद्दल KES कडून अधिमुल्याची वसूली न करणे यामुळे MHADA ला रु.८५.४१ लाख महसूलाचे नुकसान झाले.

५. लेखापरिक्षणातील अहवालातील आक्षेपांच्या निर्गतीकरणासाठी पुणे मंडळाने त्यांच्या दि.०९/१२/२०१५ च्या कार्यालयीन टिप्पणीत जमीनीचे सन २००९ च्या शिघ्रसिध्द गणकानुसार अधिमुल्य निश्चित केले. तसेच, प्राधिकरणाच्या सन २००० च्या ठराव क्र. ५५५३ नुसार वापर बदल शुल्क आकारणी, सन २०१३ पासून २०४३ पर्यंतचे ३० वर्षाचे भुईभाडे व या तिन्हीचे दि. १३/११/२००९ ते दि. ३०/०३/२०१६ पर्यंत १२.५०% दराने भांडवलीकरण करुन एकूण रु.१,७९,५०,८५५/- (रुपये एक कोटी एकोणऐंशी लक्ष पन्नास हजार आठशे पंचावन्न फक्त) रकमेचे संस्थेकडून येणे काढले. सदर टिप्पणी उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी मंजुर केली आहे. व त्या अनुषंगाने मिळकत व्यवस्थापक, पुणे मंडळ यांनी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना दि. ११/०१/२०१६ च्या पत्रान्वये जमीनीचे अधिमुल्य, वापरबदल शुल्क व ३० वर्षाचे भुईभाडे पोटी रु.१,७९,५०,८५५/- एवढ्या रक्कमेची वसुली नोटीस बजावली.

संस्थेने पुणे मंडळाच्या नोटीशीला दि. २१/०१/२०१६ रोजी हरकती दाखल केली. सदरहू हरकतीमध्ये नमुद केले आहे की, म्हाडाने प्राधिकरणाच्या दि. १७/०९/१९८३ रोजीच्या ठराव क्र. ७२२ अन्वये आम्हांला ५० गाळे व सभोवतालची ५ एकर जमीन हस्तांतरीत करण्यात आली असून, प्राधिकरणाच्या दि. ०७/०९/२००९ रोजीच्या ठराव क्र. ६४१५ अन्वये प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे जमीनीचे १९८३ चे अधिमुल्य व त्यावरील २६ वर्षाचे १२.५०% दराने भांडवलीकरण करुन एकूण रक्कम रु.६,९९,८५६/- व ३० वर्षाचे भुईभाड (रु. ८७,५१२/-) मिळून रु.७,८७,३६८/- एवढा रकमेचा भरणा पुणे मंडळास दि. ०८/०९/२००९ रोजी केला आहे. तसेच मुद्रांक शुल्क पोटी रु. ९,९००/- + दंड रु. १९,८००/- भरुन दस्त मुद्रांकीत करुन घेतला आहे.

मंडळाने आकारलेले भुईभाडे हे ३० वर्षाचे असुन ते संस्थेस पेलवणारे नाही तरी ते वार्षिक अथवा त्रैवार्षिक आकारावे, संस्था ते भरण्याची हमी देत, असे संस्थेने म्हटलेले आहे. पुणे मंडळाने सन २००९ पासून आजपर्यंत संस्थेशी कुठलाही पत्रव्यवहार केलेला नाही. अथवा वाढीव जमीनीची किंमत मागीतली नाही. आता मंडळ वाढीव किंमत व्याजासकट मागत आहे ते योग्य नाही. मंडळाने संस्थेस व्याज माफी करावी अशी विनंती केलेली आहे.

६. सदरहू लेखा आक्षेपास अनुलक्षून उपाध्यक्ष, प्राधिकरण यांनी त्यांच्या दि.०७.०६.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे की, याबाबत शासनाच्या दि.०२.०६.२००९ च्या पत्रानुसार कासेगाव एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे सन १९८३ च्या दराप्रमाणे किंमत आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने सन २००९ मध्ये घेतला होता.

पुणे मंडळाने महालेखापालांच्या उक्त आक्षेपास अनुलक्षून दि.२५.०४.२०१६ च्या पुरक पत्रानुसार प्राधिकरणाचा ठराव क्र.६४१५, दि.०७.०९.२००९ रद्द करुन उक्त संस्थेकडून रु.१,७९,५०,८५५/- एवढ्या रक्कमेची वसुली करण्याबाबत कळविले आहे.

शासन स्तरावरुन दिलेल्या निर्देशास अनुलक्षून कमी किंमतीमुळे नुकसान झाल्याने उक्त परिच्छेद महालेखापालांनी उपस्थित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासन सार्वभौम असून संस्थेच्या कार्यपरिणामाचा योग्य तो विचार करुन शासनाने घेतलेला दि.०२.०६.२००९ चा निर्णय योग्य असल्याची पुनरुक्ती शासनाने केल्यास लोकलेखा समितीच्या साक्षीमधून सदरच्या परिच्छेदाविषयी निराकरण होऊ शकेल, असे अभिप्राय उपाध्यक्ष, म्हाडा प्राधिकरण यांनी नमुद केले आहेत.

७. **उपरोक्त पार्श्वभूमी विचारात घेता, खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येते.**

सदर योजनेतील सभोवतालची मोकळी सुमारे १५,९७२ चौमी. ही जागा कासेगाव शिक्षण संस्थेच्या ताब्यात सन १९८३ पासून असल्यामूळे त्यावेळेच्या प्रचलित धोरण/ नियमाप्रमाणे आकारणी करण्याबाबतचे शासनाने क्र.वाटप-११०६/प्र.क्र.६०१/गृनिभू , दि.०२.०६.२००९ च्या पत्रान्वये दिलेले आदेश कायम ठेवण्यात यावेत.

किंवा

सदर योजनेतील सभोवतालची मोकळी सुमारे १५,९७२ चौमी. ही जागा कासेगाव शिक्षण संस्थेच्या ताब्यात सन १९८३ पासून असल्यामूळे त्यावेळेच्या प्रचलित धोरण/ नियमाप्रमाणे आकारणी करण्याबाबतचे शासनाने क्र.वाटप-११०६/प्र.क्र.६०१/गृनिभू , दि.०२.०६.२००९ च्या पत्रान्वये दिलेले आदेश रद्द करुन, सन २००९ मधील प्रचलित धोरणानुसार आकारणी करण्यात यावी.

उपरोक्त प्रस्ताव आदेशार्थ सादर.

क.अ.(श्री.भरोसे)

अ.स.(श्री.जाधव)

उ.स.(श्री.धनावडे)

अ.मु.स.(गृहनिर्माण) Taking into Consideration the para in CAG Report, Second option will be preferable However, Submitted for order.

मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण)

मा.मंत्री (गृहनिर्माण)

6/2/17

मा.मुख्यमंत्री

C:\Users\anita.wagh\Desktop\GNB\...\813.2015...docx

<u>मा.राज्यमंत्री, गृहनिर्माण</u>

सादर :

(१) कासेगाव शिक्षण संस्था, इस्लामपूर या संस्थेस म्हाडाचे उपअभियंता, स्लम् ॲन्ड् हौसिंग सब डिव्हीजन क्र.४ कोल्हापूर यांनी दिनांक २३.१२.१९८३ रोजी ५० गाळयांच्या सभोवताली असलेली सर्व्हे नं.१६२ मधील ५ एकर जमिन सदर शैक्षणिक संस्थेस तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत केली. सदर हस्तांतरण पत्र सदर संस्थेच्या लेटर हेडवर दिल्याचे दिसून येते. सदर बाब बेकायदेशीर व गंभीर स्वरुपाची असून अशी जागा हस्तांतरणाचे उपअभियंता याना अधिकार नसतात. त्यामुळे शैक्षणीक संस्थेस दिलेली जागा बेकायदेशीरपणे हस्तांतरीत केली होती असे स्पष्ट् होते. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन कारवाई करणे आवश्यक् होते परंतु ते केल्याचे दिसून येत नाही. याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

(२) सदर जागा वरील शिक्षण संस्थेस द्यावी किंवा त्यांच्याकडून गृहनिर्माणास योग्य् अशी तेवढयाच मुल्याची व क्षेत्रफळाची बदली जमीन म्हाडाला द्यावी या बाबत निर्णयास्तव् विभागाने प्रस्तावित केलेल्या टिप्पणीचे अवलोकन केले असता सदर जमीन "सन १९८३ पासून संस्थेच्या ताब्यात असलेल्या जमीनीवर त्यावेळेस प्रचलीत धोरण / नियमाप्रमाणे आकारणी करणे योग्य् होईल" असे तत्कालीन मा.मुख्यमंत्र्यांनी सप्टेंबर २००८ मध्ये आदेश दिल्याचे दिसून येते.

सदर संस्थेने अनधिकृत वापरात असलेली जागा नियमित करतांना उपरोक्त् आदेश देतेवेळी सन १९८३ पासूनचे धोरणानुसार / नियमाप्रमाणे आकारणी न करता आदेश करतेवेळी जे प्रचलीत धोरण / नियम अस्तित्वात होते त्यानुसार आकारणी करणे योग्य् ठरले असते अशी धारणा आहे. त्यामुळे विभागाने प्रस्तावित केलेल्या टिप्पणीतील परिच्छेद क्र. ७ मधील २ रा पर्याय लागू करणे योग्य् होईल असे वाटते.

(३) सदर जमीन शैक्षणीक संस्थेने ज्या प्रायोजनासाठी मागणी केली होती व म्हाडाने सदर जागा ज्या प्रायोजनासाठी दिली त्या वापराच्या प्रायोजनात बदल केला असल्यास विभागाने तपासून नियमानुसार योग्य् ती कार्यवाही करावी असे मत आहे.

(सही)
रविंद्र दत्तात्राय वायकर
राज्यमंत्री, गृहनिर्माण

मा.मंत्री,गृहनिर्माण (सही)

महसूल विभागाने अभिप्राय द्यावे.

मा.मुख्यमंत्री

Secretariat - File No. 084 dt. 13.02.17
Handled by JS/DS : Shri.
Seen by Sec. : Shri.
Finally seen by Pr. Sec.: Shri.

१३८ मा. मंत्री गृ.ख.व का. नस्ती प्राप्त दि. ८.२.१७

प्र./स. (गृ.नि.) प्राप्त झाले दि. 29 MAR 2017

पूर्व पृष्ठावरील मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशास अनुलक्षून सादर.

२. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.२.३-- " स.क्र.१६२/२ इस्लामपूर, जि.सांगली येथील कासेगाव एज्युकेशन सोसायटीस वाटप करण्यात आलेल्या भूखंडाबाबत ", या विषयाबाबत उपस्थित केलेल्या लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने प्रकरणाबाबतची थोडक्यात वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे (विस्तृत टिप्पणी पृ.५-११/टि वर पहावी.) :-

१) कासेगांव, इस्लामपूर जि. सांगली, येथील स.नं. १६२/२, मधील २.०२ हेक्टर शासकीय जमीनीचा पुणें मंडळाने दि. १८/१०/१९६६ रोजी ताबा घेतला.

२) पुणे मंडळाने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ५० गाळ्यांची योजना दि. ३१/१/१९६९ रोजी पुर्ण केली.

३) श्री. राजाराम अनंत पाटील, वि.प.स. यांनी दिनांक ०१/०८/१९८३ व ०३/०८/१९८३ रोजीच्या पत्रान्वये तत्कालीन मा. गृहनिर्माण मंत्री यांना पत्र लिहून त्यांच्या संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी सदर ५० गाळ्यांची मागणी केली होती. कासेगाव एज्युकेशन संस्थेच्या सचिवांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना देखील याच मागणीसाठी दि. ०१/०८/१९८३ रोजी पत्र पाठविले होते. सदर पत्राला अनुसरुन गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने दि. २०/०८/१९८३ रोजी सोसायटीला उत्तर पाठवून त्याची प्रत म्हाडा व पुणे मंडळ यांना अग्रेषित केली व या प्रकरणी निर्णय घेऊन शासनास कळविण्याची सूचना केली होती.

४) उपरोक्त मागणीस अनूसरुन प्राधिकरणाने दि १७/०९/१९८३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ७२२ पारित केला की "कासेगाव एज्युकेशन सोसायटी यांना इस्लामपूर येथे ५० गाळे सभोवतालच्या ५ एकर जमिनीसह प्राधिकरणाच्या गाळ्यांच्या व जमिनींच्या किंमतीविषयक धोरणास अनुसरुन देण्यात यावे."

५) मुख्य अधिकारी, पुणे मंडळ यांनी दि. २४/१०/१९८३ च्या पत्र क्र. ६९८५ अन्वये कासेगाव एज्युकेशन सोसायटीला ५० गाळे वितरणाचे आदेश काढले. सदर ५० गाळे रु. ४,९८,५००/- या किंमतीला एक रकमी पध्दतीवर देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या गाळ्यांच्या बांधकामाखालील जमीन व त्याला अनुलग्न असलेली जमीन रु. १,७०५/- वार्षिक भुईभाडे आकारुन ९० वर्षाच्या लिजवर देण्यात येत असल्याचा उल्लेख आहे.

६) सदर ५० गाळ्यांच्या आणि ५ एकर जमिनीचा तात्पुरता ताबा (प्रोव्हिजनल पझेशन) दि. २८/१२/१९८३ रोजी कासेगाव एज्युकेशन सोसायटीस संस्थेच्या लेटर हेडवर पुणे मंडळाच्या उप अभियंता यांनी देण्यात आल्याचे दिसून येते.

७). जिल्हाधिकारी, सांगली यांनी दि. ११/०२/१९८७ रोजी नोटीस पाठवून सदर जमीन निवासी प्रयोजनासाठी उपयोगात आणली नसल्यामुळे किंबहुना होस्टेलसाठी इमारत बांधणी व जमीन विनापरवानगीने हस्तांतरीत केली असल्याने ती का काढून घेण्यात येऊ नये, अशा आशयाची नोटीस जारी केली होती.

८) जिल्हाधिकारी यांनी घेतलेला आक्षेप लक्षात घेऊन उर्वरीत जमीनीवर १०६ विविध उत्पन्न गटाची योजना राबविण्याचे पुणे मंडळाने ठरविले. पुणे मंडळाने योजना राबविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु केली होती. परंतु ती पुर्ण होऊ शकली नाही.

९) जून २००८ मध्ये, उर्वरित क्षेत्राचा ताबा कासेगाव शिक्षण संस्थेस देणेबाबत विचारार्थ प्रस्ताव पुणे मंडळाने प्राधिकरणास सादर केला होता. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने दि. १३/०६/२००८ रोजी ठराव क्र. ६२९३ करण्यात येऊन खालील निर्णय घेण्यात आला. :- "कासेगाव एज्युकेशन सोसायटी, इस्लामपूर या संस्थेला प्राधिकरणाचा दि. १७/०९/१९८३ चा ठराव क्र. ७२२ अन्वये, ५० सदनिका व ५ एकर जमीन (इस्लामपूर येथील म्हाडाची स.क्र. १६२/२) विक्री करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयातील ५० गाळे व त्याला अनुलग्न असलेल्या सुमारे ६५४२ चौ.मी. क्षेत्रफळ सोडून उर्वरीत सुमारे १५,९७२ चौ.मी. क्षेत्रफळ एवढी जमीन, कासेगाव एज्युकेशन सोसायटीने इस्लामपूर येथे गृहनिर्माणास योग्य अशी, तेवढ्याच मुल्याची व क्षेत्रफळाची जमीन (बदली जमीन) म्हणून म्हाडाला द्यावी. याबाबत शासन स्तरावरुन आदेश जारी करुन घेण्यासाठी गृहनिर्माण विभागाला पाठविण्यात आला होता.

१०) म्हाडा प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त जमिनीबाबत म्हाडा प्राधिकरणाच्या दि.१३.०६.२००८ रोजीच्या २२७ व्या बैठकीमध्ये पारित झालेल्या ठराव क्र.६२९३, दि.१३.०६.२००८ अन्वये घेतलेल्या निर्णयास शासनाची मान्यता देण्याचा प्रस्ताव विभागामार्फत सप्टेंबर २००८ मध्ये सादर केला होता. सदरहू प्रस्तावास तत्कालिन राज्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली होती. परंतु तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी "सन १९८३ पासून शिक्षण संस्थेच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर त्यावेळेस प्रचलित धोरण/नियमाप्रमाणे आकारणी करणे योग्य होईल," असे आदेश दिले.

दरम्यानच्या काळात राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये बदल झाला. तद्नंतर नवनियुक्त तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांकडे प्रकरण सादर करत प्रकरण मान्यतेसाठी आदेशार्थ सादर केले असता, तत्कालिन मा.मुख्यमंत्री महोदयांनी, "पूर्वी घेतलेल्या निर्णयाची (पा.क.१७/टि.) सत्वर अंमलबजावणी करावी," असे आदेश दिले व सदरहू आदेशास अनुलक्षून उक्त दि.०२.०६.२००९ चे पत्र निर्गमित केले आहे.

शासनाने दि. ०२/०६/२००९ च्या पत्र क्र. संकिर्ण-१९०६/प्र.क्र.६०१/ गृनिभू-१ अन्वये सुचना केल्या की, "सन १९८३ पासून कासेगांव शिक्षण संस्थेच्या ताब्यात असलेल्या विषयांकित जमिनीवर, त्यावेळेसच्या प्रचलित धोरण/ नियमाप्रमाणे आकारणी करण्याबाबतच्या कार्यवाहीची सत्वर अंमलबजावणी करुन अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा."

शासनाच्या सदरहू आदेशास अनुलक्षून प्राधिकरणाने दि. ०७/०८/२००९ च्या बैठकीत ठराव क्र. ६४१५ पारित केला की, "गृहनिर्माण विभागाच्या दि. ०२/०६/२००९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदरहू जमीन १९८३ पासून कासेगाव एज्युकेशन संस्थेच्या ताब्यात असल्यामुळे त्यावेळच्या प्रचलित धोरण/नियमाप्रमाणे मुख्य अधिकारी/पुणे मंडळ यांनी काढलेली किंमत रु.६,९९,८५६/- आकारण्यात यावी."

३. आता, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.२.३ संदर्भात लेखा आक्षेपास अनुलक्षून उपाध्यक्ष, प्राधिकरण यांनी त्यांच्या दि.०७.०६.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे की, याबाबत शासनाच्या दि.०२.०६.२००९ च्या पत्रानुसार कासेगाव एज्युकेशन सोसायटीच्या ताब्यात असलेल्या जमिनीचे सन १९८३ च्या दराप्रमाणे किंमत आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने सन २००९ मध्ये घेतला होता.

पुणे मंडळाने महालेखापालाच्या उक्त आक्षेपास अनुलक्षून दि.२५.०४.२०१६ च्या पुरक पत्रानुसार प्राधिकरणाचा ठराव क्र.६४१५, दि.०७.०९.२००९ रद्द करुन उक्त संस्थेकडून रु.१,७९,५०,८५५/- एवढ्या रक्कमेची वसुली करण्याबाबत कळविले आहे.

शासन स्तरावरुन दिलेल्या निर्देशास अनुलक्षून कमी किंमतीमुळे नुकसान झाल्याने उक्त परिच्छेद महालेखापालांनी उपस्थित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासन सार्वभौम असून संस्थेच्या कार्यपरिणामाचा योग्य तो विचार करुन शासनाने घेतलेला दि.०२.०६.२००९ चा निर्णय योग्य असल्याची पुनरुक्ती शासनाने केल्यास लोकलेखा समितीच्या साक्षीमधून सदरच्या परिच्छेदाविषयी निराकरण होऊ शकेल, असे अभिप्राय उपाध्यक्ष, म्हाडा प्राधिकरण यांनी नमुद केले आहेत.

४. त्यानुसार सदर योजनेतील सभोवतालची मोकळी सुमारे १५,९७२ चौमी. ही जागा कासेगाव शिक्षण संस्थेच्या ताब्यात सन १९८३ पासून असल्यामूळे त्यावेळेच्या प्रचलित धोरण/ नियमाप्रमाणे आकारणी करण्याबाबतचे शासनाने क्र.वाटप-११०६/प्र.क्र.६०१/गृनिभू , दि.०२.०६.२००९ च्या पत्रान्वये दिलेले आदेश रद्द करुन, सन २००९ मधील प्रचलित धोरणानुसार आकारणी करण्यात यावी असे दि.६/२/२०१७ च्या टिप्पणीन्वये प्रस्तावित करुन धारिका शासन आदेशार्थ सादर करण्यात आली. त्यावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी "महसूल विभागाने अभिप्राय द्यावेत." असे निर्देश दिले आहेत.

५. सबब, उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने महसूल व वन विभागास योग्य ते अभिप्राय देण्याची विनंती करण्यात यावी.

क.अ.(श्री.भरोसे) ६/४/२०१७

अ.स.(श्री.जाधव) ६/४/१७

उ.स.(श्री.धनावडे) ७/४/२०१७

अ.मु.स.(गृहनिर्माण) ७/४/१७

अ.मु.स. (महसूल व वन विभाग)

महसूल व वन विभाग, नोंदणी शाखा, १३७, १०/४/१७

प्रधान सचिव (महसूल) क्रमांक: २३५९३ दिनांक: १०/४/१७

११/४/२०१७

एस. बी. पाटणकर
सह सचिव

कक्ष अधिकारी ल-१
१२/४/१७

प्र.अ. (ल-१) प्राप्त झाले
दि. 7 APR 2017

# परिशिष्ट-ब

(शा.म.मु.) एचबी १३६२—१२ (८००—८-२०१७)

## मंगळवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०१७

### लोकलेखा समिती

लोकलेखा समितीची बैठक मंगळवार, दिनांक ७ फेब्रुवारी २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायं. ५-२० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(४) श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स.

(५) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

(६) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री. श्री. श्रीरंगम, उप सचिव तथा नि. अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय**

(१) श्री.राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय.

(२) श्री.मोहन पारखी, वरिष्ठ उप महालेखाकार, नागपूर कार्यालय.

**वित्त विभाग**

श्रीमती सुजाता सैनिक, प्रधान सचिव, वित्त विभाग.

**साक्षीदार :**

**सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग**

(१) डॉ. विजय सतबीर सिंघ, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.

(२) डॉ. सतीश पवार, संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.३.३ संदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण विभाग यांची साक्ष घेतली.

## सोमवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०१७

### लोकलेखा समिती

लोकलेखा समितीची बैठक सोमवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायं. ४-४५ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(४) श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स.

(५) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(६) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय :**

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

**वित्त विभाग :-**

श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव, वित्त विभाग.

**साक्षीदार :**

**गृहनिर्माण विभाग**

(१) श्री. संजय कुमार, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग.

(२) श्री. एस. एस. झेंडे, सी.ई.ओ., म्हाडा.

(३) श्री. चंद्रकांत कृ. डांगे, प्र.मु.अ.मुं.म., म्हाडा.

(४) श्री. अनंत दहिफळे, मु.अ., म्हाडा.

(५) श्री. र. को.धनावडे, उप सचिव, गृहनिर्माण विभाग.

(६) श्री. अशोक काकडे, मु.अ., पुणे, म्हाडा.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.१, ३.२.१, ३.२.२, ३.२.३ संदर्भात अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०१७**

**लोकलेखा समिती**

लोकलेखा समितीची बैठक मंगळवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायं. ४-३२ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(४) श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स.

(५) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(६) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय**

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय.

**वित्त विभाग**

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग.

**साक्षीदार :**

**गृह विभाग**

(१) श्री. सुधीर श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, गृह विभाग.

(२) डॉ. कुलकर्णी, संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, संचालनालय, मुंबई.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.३.१ संदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक  २८ फेब्रुवारी २०१७**

**लोकलेखा समिती**

लोकलेखा समितीची बैठक मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायं. ५-२० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. हरीभाऊ जावळे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(७) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(२) श्री. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :**

**महालेखाकार कार्यालय**

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार.

**वित्त विभाग**

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग.

**साक्षीदार :**

(१) श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग.

(२) डॉ. प्रविण शिनगारे, संचालक, वैद्यकीय शिक्षण विभाग.

(३) डॉ. सतीश कुमार गुप्ता, अधिष्ठाता, भा.हिरे.शा.वै.मं., धुळे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र.३.३.२ संदर्भात प्रधान सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ जुलै २०१७**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ११ जुलै २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायं. ४-३० वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.
(४) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.
(५) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.
(६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(८) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.
(१२) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.
(१३) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(२) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील गृह, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये व सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**सोमवार, दिनांक २४ जुलै २०१७**

**लोकलेखा समिती**

समितीची बैठक सोमवार, दिनांक २४ जुलै २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायं.४-४५ वाजता स्थगित झाली.

**उपस्थिती**

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

**सदस्य**

(२) शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.
(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(८) श्री. सत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.
(९) श्री. वैभव नाईक, वि.स.स.
(१०) श्री. जयंत पाटील, वि.स.स.
(११) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.
(१२) श्री. अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.
(१३) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(२) श्री. सोमनाथ सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील गृहनिर्माण विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई